समावेशित शिक्षण
विशेष शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

समावेशित शिक्षण : विशेष शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
  आर. विमला (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **अनुराधा ओक**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे**
  उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **वर्षाराणी भोपळे**
  विभागप्रमुख, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **सुजाता सावंत**
  कार्यक्रम अधिकारी, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  वर्षा दुशी
  अधीक्षक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : नोव्हेंबर २०२४
- **अर्थसाहाय्य** : समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/V

प्रस्तावना

–

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/V

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
१)	समावेशित शिक्षण	१
२)	'राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील समावेशनाच्या संकल्पनांचा विकास, NEP 2020 व निपुण भारत'	९
३)	बालकांची वाढ व विकास	१७
४)	दिव्यांगांचे प्रकार, स्वरूप, विद्यार्थीनिहाय सर्वेक्षण व अध्ययनशैली	३९
५)	असुरक्षित भावनेकडून सुरक्षित भावनेकडे	४७
६)	विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनामध्ये येणारी आव्हाने	५२
७)	वर्ग अध्ययन-अध्यापन पद्धती व तंत्रे	५६
८)	मूल्यमापन संकल्पना व पद्धत	६७
९)	अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा (ICT) वापर	१२०
१०)	उपलब्ध साहित्य साधनांचा प्रभावी वापर	१२६
११)	अडथळाविरहित वातावरण	१२९
१२)	गृहआधारित शिक्षण (Home Based Education)	१३४
१३)	मार्गदर्शन व समुपदेशन	१४३
१४)	व्यवसायाभिमुख शिक्षण	१५४
१५)	विशेष गरजाधारक अध्ययनार्थींच्या शिक्षणामध्ये सहभागी यंत्रणेची भूमिका	१६५
१६)	विशेष शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि सॉफ्ट स्किल्स	१७१
१७)	विविध शासकीय लाभाच्या योजना, शासन निर्णय, परिपत्रके व अधिसूचना	१९४
१८)	व्यक्ती अभ्यास (Case Study)	२०१
	संदर्भ सूची	२१२
	परिशिष्ट	२१५

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/V

१. समावेशित शिक्षण

समावेशनाकडून शिक्षणाकडे :

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उद्‌दिष्टांनुसार प्रत्येक मुलास जवळच्या नियमित शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा अधिकार, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये प्राप्त झालेला आहे. या अधिकारामुळे प्रत्येक बालकाप्रमाणे विशेष गरजा असणाऱ्या बालकांनाही शालेय शिक्षण हे शालेय वातावरणात आनंदाने घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. सर्वसामान्य विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थी यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आजही फरक असल्याचे दिसून येते. परिणामी विद्यार्थ्यांकडे असलेले कौशल्य किंवा प्रतिक्रिया शोधण्यास व त्या कौशल्यानुसार संधी उपलब्ध करून देण्यास आपण निश्चितच कमी पडतो. असा विचार करणाऱ्या व्यक्तींमध्ये पालक, शिक्षक, शेजारी, भावंडे, वर्गमित्र, समाज व शासकीय-अशासकीय व्यवस्थेमधील घटकसुद्‌धा असू शकतात. अशा विचारांचा पगडा अधिक प्रमाणात असल्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेत दाखल करणे व शालेय परिसरातील मित्रांबरोबर आंतरक्रिया घडवून त्यातून मित्रत्वाची भावना व प्रत्येकाला स्वयं-सुरक्षितता प्राप्त होणे आवश्यक आहे. सवंगडी व मित्र यांच्यामध्ये निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या माध्यमातून क्रमाक्रमाने शिक्षकांमध्ये व पालकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन सर्व विद्यार्थी भविष्यात एकत्रितपणे शिकण्यास मदत होईल आणि हेच विद्यार्थी भविष्यात राष्ट्रीय विकासासाठी उत्पादनशील घटक बनतील. यासाठी समावेशित शिक्षणाची पार्श्वभूमी व कालानुरूप त्याचा विकसित दृष्टिकोन समजून घेणे आवश्यक आहे.

समावेशित शिक्षणाची संकल्पना :

- समावेशित शिक्षण ही एक प्रक्रिया आहे यामध्ये अध्ययनार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी सर्व अध्ययनार्थींच्या विभिन्न गरजा जाणून घेऊन त्यावर उपाययोजना केल्या जातात. घरापासून शाळेत पोहोचण्यापर्यंतचे अंतर आणि त्यादरम्यान शाळेत येणाऱ्या इतर अडथळ्यांमुळे जी बालके घरी आहेत आणि शालेय प्रवाहात येऊ शकत नाहीत अशा बालकांचा शोध घेतला जातो.
- सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे समाजातील विविध गरजा असणाऱ्या बालकांसाठी जाणीवपूर्वक शाळेची रचना करणे. विशेष गरजा असलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना सर्वसामान्य बालकांबरोबर शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. सर्व बालकांची शारीरिक, बौद्‌धिक, सामाजिक, भावनिक, भाषिक किंवा अन्य स्थिती लक्षात घेऊन बालकांचा शाळेच्या मुख्य प्रवाहात समावेशन करण्यावर भर दिला जातो.
- प्रत्येक मूल समान मानून शाळा व शाळेच्या परिसरात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती व आनंददायी शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विचार केला जातो.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

समावेशित शिक्षण : व्याख्या

- **युनेस्को आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषद (UNESCO) :** 'समावेशित शिक्षण मूलभूत अधिकारावर आधारित असते, की जे संसाधनाचा वापर करून शैक्षणिक गरजा पूर्ण करून त्यांचे आयुष्य समृद्ध करते. वंचित समूहाचा विचार करता त्यांच्या क्षमतांचा पूर्णपणे विकास केला जातो. समावेशित शिक्षणात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण पुरविणे होय.'
- **स्टेनबेक आणि स्टेनबेक :** समावेशित शाळा हे असे ठिकाण असेल की, त्यातील प्रत्येक मुलाने स्वतःला शाळेचा सदस्य मानले पाहिजे, येथे त्याला आपले समजले जाते, ही भावना ठेवली पाहिजे, सर्वांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करून त्या पूर्ण केल्या जातील.
- **रिचर्ड ए. व्हिला :** 'समावेशित शिक्षण हा एक प्रकल्प किंवा योजना नाही, तर प्रत्येक मुलाच्या सन्मानाचे आणि हक्कांचे मूल्य देणारे तत्त्वज्ञान आहे.'
- **पॅट्रिशिया एच. फेल्प्स :** 'समावेश करणे हे केवळ भौतिक जवळीकतेबद्दल नसून हे सर्व विद्यार्थ्यांच्या यशासाठी हेतुपुरस्सर नियोजन करणे आहे.'
- **रॉबर्ट जॉन मीहान :** 'प्रत्येक मुलाची शिकण्याची शैली आणि गती वेगळी असते. प्रत्येक मूल अद्वितीय आहे, केवळ शिकण्यास सक्षम नाही तर यशस्वी होण्यासही सक्षम आहे.'
- **युनेस्को :** 'समावेशित शिक्षण ही सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षणप्रणालीची क्षमता मजबूत करण्याची प्रक्रिया आहे.'

समावेशित शिक्षणाची वैशिष्ट्ये :

- भिन्न क्षमता असूनही विशेष गरजा असणाऱ्या बालकांना सामान्य बालकांसमवेत एकाच वर्गात शिकण्याची समान संधी दिली जाते.
- सामान्य विद्यार्थी व विशेष विद्यार्थी या दोघांनाही शाळेत सुलभ प्रवेश व समान शिक्षण दिले जाते.
- या शिक्षणपद्धतीत लवचीकता ठेवून विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार अध्ययन-अध्यापन केले जाते.
- सर्वसामान्य विद्यार्थी व विशेष शैक्षणिक गरजा असणारे विद्यार्थी या दोघांनाही शिकविण्याचे कौशल्य प्राप्त असणाऱ्या शिक्षकांची उपलब्धता असते.
- सर्वसामान्य मुले व विशेष गरजा असणारी मुले या दोघांचाही विचार करून भौतिक सुविधेची उपलब्धता असते.
- समावेशित शाळेतील शैक्षणिक वातावरण विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता अनुकूल असते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/16-11-2024/D

पार्श्वभूमी :

भारतामध्ये समावेशित शिक्षण ही संकल्पना अनेक दशकांमधून विकसित झालेली आहे, जी दिव्यांगत्व आणि शिक्षणातील विविधतेबद्दल बदलत जाणारा सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोन प्रतिबिंबित करते.

- **स्वातंत्र्यपूर्व काळ :**

१) प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंड :

या कालखंडात शिक्षण हे प्रामुख्याने विशिष्ट गटांपुरते मर्यादित होते. दिव्यांग व्यक्ती शिक्षणापासून उपेक्षित होत्या आणि त्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहातून वगळण्यात येत होते.

२) ब्रिटिश कालखंड :

काही विशेष शाळा मिशनऱ्यांनी स्थापन केल्या होत्या, परंतु या शाळा लोकसंख्येच्या विशिष्ट गटाला शिक्षण देत होत्या आणि सर्वसमावेशनाऐवजी धार्मिकतेवर लक्ष केंद्रित करीत होत्या.

- **स्वातंत्र्योत्तर काळ १९४७–१९८० :**

१) भारतीय राज्यघटना (१९५०) :

घटनेतील कलम ४५ नुसार, ६ ते १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी राज्य प्रयत्न करेल.

२) कोठारी आयोग (१९६४–६६) :

सौम्य अपंगत्व असणाऱ्या मुलांना मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये समावेश करण्याची आणि गंभीर अपंगत्व असणाऱ्यांसाठी विशेष शाळांची शिफारस केली आहे.

- ➢ अपंगांसाठी विशेष शाळा व वसतिगृह यांवर शिफारस करण्यात आली.
- ➢ दिव्यांगांसाठी एकात्मिक शिक्षणावर भर देण्यात आला.
- ➢ दिव्यांगांच्या शिक्षणासाठी वित्तीय साहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शिफारस केली.

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) :

सौम्य अपंगत्व असणाऱ्या मुलांना नियमित शाळांमध्ये समावेश करण्यावर आणि गंभीर अपंगत्व असणाऱ्या मुलांना विशेष शाळा उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

- ➢ अपंग व्यक्तींसाठी शिक्षणाचा प्रवेश सुनिश्चित केला.
- ➢ 'सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण' हा मूलभूत अधिकार प्राप्त झाला.
- ➢ नियमित शाळेत शिकण्यासाठी एकात्मिक कार्यक्रमाची शिफारस केली.
- ➢ सर्वांप्रमाणे समान शिक्षण देऊन अपंगांना समाजातील एक सक्षम घटक बनविण्याबाबत शिफारस.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

४) **Project Integrated Education for the Disable (PIED-१९८७) :**

सर्व अपंग मुलांना सामान्य शाळेत आणणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता.

५) **कृती योजना (Programme of Action-१९९२) :**

विशेष गरजा असणाऱ्या बालकांना विशेष शाळेत प्रवेश देण्याऐवजी सामान्य शाळेतच शिक्षण दिले गेले पाहिजे हे तत्त्व स्वीकारण्यात आले.

६) **भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम १९९२ (Rehabilitation Council of India १९९२) :**

- व्यावसायिक संवर्गातील प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रम व संख्यांचे मूल्यमापन व प्रमाणीकीकरण करण्यावर भर देण्यात आला.
- दिव्यांग क्षेत्रासाठी विशेष प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याची व्यवस्था करण्यात आली.
- विशेष शिक्षक, साधन शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली.

७) **जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (DPEP-१९९४) :**

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या उद्देशाने केंद्रशासनाने हा कार्यक्रम देशातील काही निवडक राज्यांमध्ये आणि महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये सुरू केला. या योजनेचा प्रमुख उद्देश प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे, शाळेत दाखल करणे व अडथळाविरहित वर्गखोल्यांची निर्मिती करणे हा होता.

८) **दिव्यांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) कायदा (१९९५) :**

शिक्षण आणि रोजगारामध्ये भेदभाव न करणे अनिवार्य केले आणि मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये प्रोत्साहन दिले.

९) **राष्ट्रीय न्यास अधिनियम (NTA १९९९) :**

- तीव्र, अतितीव्र स्वरूपातील दिव्यांग व्यक्तींचे संरक्षण आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण.
- दिव्यांग व्यक्तीच्या पालकत्वाचा विचार केला.
- अडथळाविरहित वातावरण निर्मिती.
- या कायद्यात स्वमग्न, सेरेब्रल पाल्सी, मतिमंद, बहुविकलांग या प्रकारांचा समावेश केला.

१०) **सर्व शिक्षा अभियान (SSA २०००) :**

सर्व शिक्षा अभियान हा केंद्रशासनाचे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट कालबद्ध रीतीने गाठण्यासाठी तयार केलेला कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/16-11-2024/D

सर्व बालकांना मुख्य प्रवाहात आणणे, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे व मानवी क्षमतांचा विकास साधने ही प्रमुख उद्‌दिष्टे ठेवण्यात आली होती. विशेष गरजा असणारी बालके ही सार्वत्रिकीकरणापासून वंचित राहू नये यासाठी विशेष गरजा असणाऱ्या १८ वर्षांपर्यंतच्या बालकांना वेगळ्या गटात न ठेवता नियमित विद्यार्थ्यांसोबत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे बंधनकारक केल्यामुळे विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदतच झाली.

- **एकविसावे शतक :**

१) दिव्यांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय धोरण (२००६) :

मुख्य प्रवाहातील शाळांना आधार देण्यासाठी सर्वसमावेशक शिक्षण आणि संसाधन केंद्रे म्हणून विशेष शाळांच्या विकासासाठी समर्थन केले.

२) शिक्षण हक्क कायदा (RTE २००९) :

६–१४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी शिक्षण हा मूलभूत अधिकार बनवला आणि दिव्यांग मुलांसाठी सर्वसमावेशक शिक्षणावर भर दिला.

३) दिव्यांग व्यक्तींचे हक्क कायदा (RPWD २०१६) :

१९९५ च्या कायद्यात बदल करण्यात आला आणि दिव्यांगत्वाची व्याख्या विस्तृत करून सर्वसमावेशक शिक्षणासाठी तरतुदी मजबूत केल्या. दिव्यांग मुलांना सर्वसमावेशक शिक्षणात प्रवेश मिळेल याची खात्री करण्यासाठी योग्य सुधारणा करण्यात आल्या आणि २१ दिव्यांग प्रकाराचा समावेश करण्यात आला.

४) समग्र शिक्षा (२०१८) :

समावेशित शिक्षणावर लक्ष केंद्रित करत पूर्वप्राथमिक ते इयत्ता बारावीपर्यंत सर्वांगीण शिक्षण देण्यासाठी SSA सह अनेक योजनांचे विलीनीकरण केले.

५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Educational Policy - NEP 2020) :

समावेशित शिक्षणासाठी वचनबद्धतेला बळकटी देते, अडथळे दूर करण्याच्या गरजेवर भर देते आणि दिव्यांग मुलांना शैक्षणिक प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आवश्यक समर्थन पुरवते.

जागतिक स्तरावर समावेशित शिक्षण संकल्पनेचा विकास (UNCRPD)

दिव्यांग व्यक्तींचे हक्क आणि सन्मान कायम राखण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघामार्फत United Nations Convention on the Rights of persons with Disabilities (UNCRPD) हा करार करण्यात आला.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

- **UNCRPD बाबत काही महत्त्वाचे मुद्दे :**

१) **उद्दिष्ट :** दिव्यांग व्यक्तींना समाजात पूर्ण आणि समान हक्क मिळवून देणे आणि त्यांना सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणे.

२) **हक्कांची हमी :** या करारात दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा, स्वास्थ्य सेवा, न्याय, सार्वजनिक सेवा, स्वातंत्र्य आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग यांसारख्या मूलभूत हक्कांची हमी दिली आहे.

३) **समावेशकता :** दिव्यांग व्यक्तींना सर्व सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रांत सहभागी करणे.

४) **प्रवेशयोग्यता :** सर्व प्रकारच्या सेवा सुविधांसाठी दिव्यांग व्यक्तींना सहज आणि समान प्रवेश मिळवून देणे.

५) **स्वतंत्र जीवन :** दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्र आणि स्वायत्त जीवन जगता यावे यासाठी आवश्यक ती मदत आणि साहाय्य प्रदान करणे.

६) **जागरूकता :** समाजात दिव्यांग व्यक्तींबाबत सकारात्मक दृष्टिकोन वाढविणे आणि त्यांचा सन्मान कायम ठेवणे.

७) **समानता आणि गैर-भेदभाव :** दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता समान हक्क देणे आणि त्यांचे संरक्षण करणे.

भारतातील स्थिती :

भारताने UNCRPD ला १ ऑक्टोबर, २००७ रोजी मान्यता दिली आहे. याच्या माध्यमातून, भारतीय संविधानात आणि कायद्यांमध्ये बदल केले गेले आहेत. भारतात दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांसाठी विविध कायदे आणि योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे, ज्यामध्ये मुख्यतः Rights of persons with Disabilities Act, 2016 हा प्रमुख कायदा आहे.

UNCRPD हा करार दिव्यांग व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि त्यांना समाजात समान आणि सन्मानपूर्वक स्थान मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/16-11-2024/D

सर्वसमावेशक शिक्षणाची तत्त्वे :

- **समानता आणि भेदभाव :** प्रत्येक मुलाला त्यांची क्षमता किंवा दिव्यांगत्व काहीही असो, त्यांना शिक्षणाचा अधिकार आहे. सर्वसमावेशित शिक्षण दिव्यांग विद्यार्थ्यांना समान संधी प्रदान केल्या जातात आणि त्यांच्याशी भेदभाव केला जात नाही याची सुनिश्चिती करते.
- **प्रवेशयोग्यता :** शाळा आणि शैक्षणिक संस्था भौतिकदृष्ट्या प्रवेशयोग्य असणे आवश्यक आहे, ज्यामध्ये रॅम्प, प्रवेशयोग्य स्वच्छतागृहे आणि विविध स्वरूपातील शैक्षणिक साहित्य (ब्रेल, मोठे प्रिंट, ऑडिओ) यासारख्या योग्य सुविधा असणे आवश्यक आहे.
- **वैयक्तिक शैक्षणिक आराखडा (IEP) :** विद्यार्थ्यांच्या कौशल्यानुसार उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी त्रैमासिक, सहामाही व वार्षिक विकासाचे टप्पे म्हणजेच वैयक्तिक शैक्षणिक आराखडा. वैयक्तिक शैक्षणिक आराखड्यामुळे विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी, शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी मदत मिळू शकते.
- **शिक्षक प्रशिक्षण :** दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विविध गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण मिळाले पाहिजे. यामध्ये अनुकूलित तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, विविध सूचना आणि सर्वसमावेशक शिक्षणपद्धती यांचा समावेश होतो.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

- **सहयोगी दृष्टिकोन :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्गशिक्षक, विशेष शिक्षक, थेरपिस्ट, मानसशास्त्रज्ञ, पालक, सवंगडी आणि समुदाय यांच्यामध्ये परस्पर सहकार्य असणे गरजेचे आहे.

समावेशित शिक्षण म्हणजे...

- विशेष गरजा असणाऱ्या बालकांना सेवा व आधार न देता एकत्र डांबणे नव्हे.
- सामान्य मुलांबरोबर शिक्षण घेत असल्याने विशेष मुलांसाठी असणाऱ्या सेवांमध्ये कपात करणे नव्हे.
- विशेष मुलांना सामान्य मुलांमध्ये समाविष्ट केल्यामुळे सामान्य मुलांना शिक्षणाच्या मिळणाऱ्या संधी कमी होतात असे नाही.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/16-11-2024/D

२. 'राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील समावेशनाच्या संकल्पनांचा विकास, NEP 2020 व निपुण भारत'

प्रस्तावना :

समावेशित शिक्षण संकल्पना सन १९६० मध्ये अस्तित्वात आली असून, सन १९८१ च्या आंतरराष्ट्रीय दिव्यांग वर्षापासून या संकल्पनेला चालना मिळून तिचा प्रसार जागतिक स्तरावर झाला. १९९० मध्ये जागतिक स्तरावरील थायलंड या देशामधील 'जोमथियम' या ठिकाणी झालेल्या 'सल्मानका परिषदेत' समावेशित शिक्षणाची गरज या विषयावर चर्चा होऊन ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली.

सन १९९३ या वर्षी आत्मसात करण्यात आलेल्या 'Standard Rules for Equalization' या नियमानुसार सर्व क्षेत्रांतील रोजगारसंबंधित असलेले कायदे हे दिव्यांग व्यक्तींसोबत केले जाणारे भेदभाव आणि त्यांच्या रोजगारात येणारे अडथळे निर्माण होऊ नयेत याबाबत अंमलबजावणी केली गेली आहे.

१९९३ मध्ये 'Standard Rules for Equalization' नुसार दिव्यांग व्यक्तीसोबत केले जाणारे भेदभाव आणि त्यांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधीबाबत अंमलबजावणी करून सर्व देशांनी सक्रियपणे खुला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी दिव्यांग व्यक्तींना पाठिंबा द्यावा असे नमूद केले आहे. सन १९९४ या वर्षात भारतासह ९२ देश व २५ जागतिक संघटना यांनी समावेशित शिक्षणाची गरज याबाबतची संकल्पना मान्य केली.

१) थायलंड :

थायलंडमध्ये समावेशित शिक्षणाला एका वेगळ्या विषयाच्या अनुषंगाने महत्त्व दिले गेले आहे. विशेष बाब म्हणजे या देशात समावेशित शिक्षणाच्या अंतर्गत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या थेरपी सेवांबाबत शासन स्तरावरून प्रशिक्षण नियोजन, तसेच पालकांमार्फत घरीच थेरपी देण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे प्रत्यक्षरीत्या योजनेत उपलब्ध असलेल्या थेरपी तज्ज्ञ यांच्यावर पूर्णपणे अवलंबून न राहता त्यांच्या मार्गदर्शनाखाली पालकांमार्फत थेरपी दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक संतुलन विकसित होते व हालचालीस मदत होते. परिणामी शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत आहे.

२) अमेरिका :

अमेरिकेमध्ये पालकांचा समावेशित शिक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता प्रामुख्याने सहभाग घेतला जातो व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबींमध्ये अडथळाविरहित वातावरण निर्मितीवर (साहित्य साधने) विशेष भर देण्यात येतो. 'Individual with Disability Education Act (IDEA)' हा कायदा सन

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

२००४ मध्ये पारित करून १३ दिव्यांग प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये विशेष करून 'Emotional Disturbance' या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या समावेशित शिक्षणासाठी जास्त प्रमाणात भर देण्यात येतो.

परिणामी विद्यार्थ्यांमध्ये जागृत होणारी हिंसात्मक प्रवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्यास तसेच या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यास मदत झाली. अमेरिकेमध्ये शासनास अशासकीय संस्थांनी उपक्रम राबविण्यास सहकार्य केले आहे.

३) फिनलँड :

या देशामध्ये विशेष विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रक्रियेत भेदभाव केला जात नाही.

- अध्यापन सुलभ होण्याकरिता विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार अर्धवेळ विशेष शिक्षकांची सेवा उपलब्ध करून देण्यात येते.

  या देशात समावेशनाचे ३ प्रकारे वर्गीकरण करण्यात आले आहे.

  अ) सामान्य साहाय्यता. ब) हेतुपुरस्सर साहाय्यता क) विशेष साहाय्यता

  या प्रकारे आवश्यकतेनुसार साहाय्यता देण्यात येते.

४) जपान :

जपानच्या राज्यघटनेमध्ये 'सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार समान शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. दिव्यांग मुलांच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रित करण्यात येते. सोबतच शिक्षकांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न केले जातात. जपान सरकारने राष्ट्रीय विशेष शिक्षणसंस्था (NISE) ची स्थापना करून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कायदेशीर आणि आर्थिक समस्या सोडवण्यासाठी नव्याने उपाययोजना केली आहे.

भारतातील विविध राज्यांमधील समावेशित शिक्षणाबाबतची माहिती घेऊ.

१) आंध्रप्रदेश :

National Trust Act, 1999 नुसार आंध्रप्रदेशमध्ये 'घरंडा' या योजनेअंतर्गत 'ग्रुप होम' ही संकल्पना राबवली जात आहे. ज्यामुळे राज्यातील दिव्यांग बालकांना रोजगाराभिमुख कौशल्य शिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते. परिणामी दिव्यांग बालके आत्मनिर्भर होत आहेत.

२) मध्यप्रदेश :

मध्यप्रदेशमध्ये विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाकरिता अध्ययन कौशल्य, संवेदन प्रशिक्षण, भौतिक वातावरण निर्मिती यासोबतच 'नैतिकमूल्य' यावर विशेष लक्ष देण्यात आला आहे. परिणामी विद्यार्थी समाजातील जबाबदार नागरिक बनण्यास मदत झाली आहे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

३) बिहार :

बिहार राज्यात समावेशित शिक्षणासाठी मॉडेल स्कूल तयार करण्यात आले असून खेळ, उपक्रम, प्रवास भत्ता, आयसीटी रिसोर्स, अडथळा विरहित वातावरण इत्यादी २१ बाबींचा समावेश असून विशेष मॉडेल स्कूलमध्ये विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांसाठी साहाय्यक उपकरणे, ब्रेल लिपीचे साहित्य व विविध संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. परिणामी २१ दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकाच छताखाली विविध सोयी-सुविधा व उपकरणे यांचा उपयोग करावयास मिळाल्याने तसेच अनेक तज्ज्ञ उपलब्ध झाल्याने विशेष गरजाधारक बालकांचा सर्वांगीण विकास साधण्यात सुलभता आली आहे.

४) केरळ :

केरळ राज्यात नव्याने एका वेगळ्या संकल्पनेतून उगम झालेल्या **'चांगथीकूट्टम'** (मित्रगटाच्या) उपक्रमातून अंथरुणाला खिळलेल्या (HOME BASE EDUCATION) मुलांना शिक्षणामध्ये सहभागी करून घेण्यासाठी 'रिसोर्स बेडरूम आणि व्हर्चुअल क्लासरूम' तयार करण्यात आली आहेत.

रिसोर्स बेडरूम : अंथरुणाला खिळलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष साहित्य साधनांसह अध्ययन प्रक्रियेत गुंतून ठेवण्याकरिता विशेष तयार करण्यात आलेली बेडरूम.

व्हर्च्युअल क्लासरूम : Home Base Education च्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात सुरू असलेले वर्ग अध्यापन ऑनलाईन माध्यमातून स्वतःच्या बेडरूममधून वर्गातील क्रियांमध्ये सहभागी होता येते.

महाराष्ट्र राज्य हे दिव्यांग मंत्रालयाची स्थापना करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे. महाराष्ट्र राज्यात समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत गृह मार्गदर्शनाच्या विद्यार्थ्यांसाठी 'केअर टेकर' चे साहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रत्येक तालुका व आवश्यकतेनुसार केंद्र स्तरावर संसाधन कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. समावेशित शिक्षण उपक्रमअंतर्गत शिक्षक प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात आलेला आहे.

समावेशित शिक्षण उपक्रम अंतर्गत विशेष साहित्य साधने विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार उपलब्ध करून देण्यात येत आहेत, तसेच बहुउद्देशीय टीम/तज्ज्ञ मार्गदर्शक (जिल्हा समन्वयक, समावेशित साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, मानसोपचार तज्ज्ञ, फिजिओथेरपीस्ट, ऑक्युपेशनल थेरपीस्ट, भाषा व वाचा उपचार तज्ज्ञ इत्यादी कार्यरत आहेत.)

शीघ्र हस्तक्षेप (Early Intervention) उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता निवासी सेतू वर्गाचे आयोजन, अनिवासी मुलांकरिता डे-केअर सेंटरची निर्मिती, कौशल्य विकसन कार्यशाळा, बहुउद्देशीय संसाधन कक्षाची निर्मिती (MPRRTC - Multipurpose Resource Research Training Centre), पालक, वर्गशिक्षक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांचेकरिता प्रशिक्षण, अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण, क्षेत्रभेटीचे आयोजन, क्रीडास्पर्धेचे आयोजन आणि जाणीव जागृती

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

करिता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. परिणामी समावेशित शिक्षण उपक्रमअंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध, प्रमाणीकीकरण करून नजीकच्या शाळेत गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देऊन समाजाचा एक उत्पादनशील घटक बनण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Education Policy)-२०२० :

प्रस्तावना :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० समावेशित शिक्षणासाठी वचनबद्धतेला बळकटी देते, अडथळे दूर करण्याच्या गरजेवर भर देते आणि दिव्यांग मुलांना शैक्षणिक प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आवश्यक समर्थन करते.

राष्ट्रासमोर असणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मनुष्यबळ हे सर्वांत महत्त्वपूर्ण संसाधन आहे. याचाच अर्थ जर राष्ट्रातील नागरिक सक्षम असतील, तर ते राष्ट्र आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये करू शकते. त्यामुळे राष्ट्रातील नागरिक हे सक्षम बनविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठीचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपले स्वतंत्र असे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' ठरवत असते.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० पुढील पाच स्तंभावर आधारित आहे.

१) **Access (सर्वांना सहज शिक्षण) :** जात, पंथ, स्थान किंवा लिंग यांचा विचार न करता सर्व मुलांना उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळायला हवे.

२) **Equity (समता) :** सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक गरजांनुरूप शिक्षणाची उपलब्धता.

३) **Quality (गुणवत्ता) :** सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे.

४) **Affordability (परवडणारे शिक्षण) :** वय वर्षे ३ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण.

५) **Accountability (उत्तरदायित्व) :** शिक्षण ही केवळ शाळा व शिक्षकांची जबाबदारी नसून पालक, समाज व इतर समाजघटकांची देखील जबाबदारी आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मधील सर्वसमावेशक शिक्षणातील ठळक बाबी :

१) विशेष प्रशिक्षण घेतलेल्या खास शिक्षकांची भरती करणे.

२) साहाय्यक साहित्य आणि तंत्रज्ञानावर आधारित योग्य साधने पुरविणे.

३) मोठ्या अक्षरातील पुस्तके, ब्रेल बुक, भारतीय साईन लँग्वेज शिकविण्यासाठी चांगल्या दर्जाची मोड्यूल्स विकसित करणे.

४) गृहमार्गदर्शनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची कार्यक्षमता आणि परिणामकारकता यांचे ऑडिट केले जाईल.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

५) शिक्षणातील अक्षमता लवकरात लवकर शोधणे व त्या कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचे साहाय्य देणे.

६) अभ्यासक्रमात लवचीकपणा ठेवणे.

७) मूल्यांकनासाठी योग्य प्रणाली तयार करणे.

८) U-DISE च्या डेटानुसार प्राथमिक स्तरावर १.१% दिव्यांग विद्यार्थी असतात. पण हीच संख्या उच्च माध्यमिक स्तरावर ०.२५% एवढी होते.

त्यामुळे गळतीच्या प्रमाणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थ्यांसाठी संधी (Opportunities for Students) :

१) **दर्जेदार शिक्षण :** शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शैक्षणिक दर्जा उंचावण्यावर या शैक्षणिक धोरणात भर दिल्यामुळे दर्जेदार शिक्षण मिळण्याची संधी निर्माण होते.

२) **बाल्यावस्थेतील लाभ :** बाल्यावस्थेतील प्रारंभिक शिक्षणाचा शालेय शिक्षणाच्या आकृतिबंधामध्ये समावेश केल्यामुळे बाल्यावस्थेपासून अतिशय उत्तम दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी निर्माण होते.

३) आवडीनुसार शिक्षण अभ्यासक्रम निवडीच्या लवचीक धोरणामुळे या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार व गरजेनुसार शिक्षण घेऊ शकतात.

४) **तंत्रज्ञान कुशलता :** पूर्वमाध्यमिक स्तरावर कोडिंग व माध्यमिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारखे विषय शिकविले जाणार असल्यामुळे विद्यार्थी तंत्रज्ञान कुशल बनविण्यास संधी मिळते.

५) **रोजगारक्षम कौशल्य विकसन :** प्रात्यक्षिक व अनुभवांवर आधारित अध्ययन-अध्यापनास प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे रोजगारास सक्षम बनविणाऱ्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.

६) **सोयीनुसार शिक्षण :** ऑनलाइन किंवा ऑफलाइन यांपैकी कोणत्याही माध्यमातून शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना निर्माण करून दिली जाते, त्यामुळे या धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वत:च्या सोयीनुसार व वेळेनुसार शिक्षण घेऊ शकतात.

७) **शिष्यवृत्ती :** गुणवत्ता विकासासाठी व सर्वांसाठी समान शैक्षणिक संधी उपलब्ध करण्यासाठी विविध शिष्यवृत्त्यांचे प्रयोजन या शैक्षणिक धोरणात करण्यात आले आहे, त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता विकासाच्या संधी निर्माण होतात.

निपुण भारत :

भारत सरकारने 'समग्र शिक्षा' मध्ये निपुण भारत (Nantional Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता तिसरीपर्यंत मूलभूत साक्षरता व

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

संख्याज्ञान सन २०२६–२७ पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. याकरिता कृती आराखडा तयार करणे, विषयसूची व प्राधान्यक्रम ठरविण्याची गरज आहे. यासाठी जिज्ञासूवृत्तीस वाव देणारा अभ्यासक्रम व शैक्षणिक साहित्य (ऑफलाईन व ऑनलाईन), निश्चित क्षमता विधाने (Learning Competencies) व अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) शिक्षक सक्षमीकरण, मूल्यमापनाची तंत्रे इत्यादी विकसित करणे आवश्यक आहे. सध्या इयत्ता चौथी व पाचवीमधील ज्या विद्यार्थ्यांनी मूलभूत कौशल्ये प्राप्त केली नाहीत, त्यांनाही आवश्यक नैपुण्य प्राप्त करण्यासाठी वैयक्तिक मार्गदर्शन, समवयस्क विद्यार्थ्यांसोबत गटकार्य व वयानुरूप पूरक अध्ययन साहित्य (छापील व डिजिटल स्वरूपात दिल्यास विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच्या अध्ययनशैलीप्रमाणे उपलब्ध झाल्यास अध्ययन–अध्यापन सुलभ होईल.) करिता छापील व डिजिटल साहित्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) :

निपुण भारत अभियानांतर्गत ३ ते ९ वर्षे वयोगटातील बालकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी निश्चित करण्यात आलेली विकासात्मक ध्येये...



विकासात्मक ध्येय–१ : मुले उत्तम आरोग्य व स्वास्थ राखतात. (Health and well being) :

मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील सुरुवातीची काही वर्षे ही अतिशय महत्त्वाची असतात. यास्तव त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिक्षक, पालक, समाज किंबहुना शिक्षणप्रक्रियेतील प्रत्येक घटकाने पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

- मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व भावनिक विकासासाठी या काळात विविध अध्ययन अनुभव देणे आवश्यक आहे. या अध्ययन अनुभवातून मुलांना जास्तीत जास्त संधी व प्रोत्साहन मिळाले तर त्यांचा इंद्रिय, स्नायू आणि कारक कौशल्ये यांचा योग्य प्रकारे विकास होऊन त्याचा मुलांना पुढील शिक्षणात उपयोग होतो.
- मुले लहान-मोठ्या गटांमध्ये कृती करतात तेव्हा ती (खेळ, गटकार्य) सामाजिक कौशल्ये आत्मसात करतात. त्यातून 'स्व' विकासाबरोबर सामाजिक विकास होतो.
- मुलांनी निरोगी, सुदृढ व सुरक्षित जीवन जगण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, तसेच इतरही आवश्यक क्षमता विकसित करणे महत्त्वाचे आहे.

विकासात्मक ध्येय-२ : मुले प्रभावी संवादक बनतात. (Effective Communicator) :

शाळेत दाखल होण्यापूर्वी मुले त्यांच्या घरच्या भाषेतून परिसरातील घटकांबाबत व्यक्त होत असतात. शाळेत दाखल झाल्यानंतर घरची भाषा व शाळेतील अध्ययन-अध्यापनाची भाषा एकच असेल, तर त्याला शालेय परिसराशी जुळवून घेणे सोपे जाते. मुलांमध्ये प्रभावी संवाद कौशल्ये विकसित होण्यासाठी पुढील गोष्टींचा विचार होणे अपेक्षित आहे.

- या प्रारंभिक काळात मुलांमध्ये संवाद कौशल्य विकसित होण्यासाठी त्यांचे शिक्षण, घरची भाषा (मातृभाषा/स्थानिक भाषा) यातून होणे महत्त्वपूर्ण असते. यासाठी विविध भाषिक कृतींचा समावेश अपेक्षित आहे.
- भाषिक कृतींमधून मुलाला माहितीची देवाण-घेवाण, सर्जनशीलता व चिकित्सक विचार या क्षमता प्राप्त होतात. कालांतराने मूल समजपूर्वक वाचन व लेखन करायला शिकते.
- आपल्या देशात अनेक भाषा व बोली बोलल्या जातात. मुले त्यांच्यासोबत अनेक भाषा/बोली घेऊन शाळेत दाखल होतात. अशा वेळी शिक्षकांनी मुलांच्या बोलीभाषेचा स्वीकार करीत, मुलांना शिक्षणाच्या भाषेकडे आणावे. मुलाची मातृभाषा व शिक्षणाची भाषा यांचा दुवा जोडण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकांनी करणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या काळात मुलांचा भाषाविकास होऊन ते प्रभावी संवादक होणे अपेक्षित आहे.

विकासात्मक ध्येय-३ : मुले सक्रिय अध्ययनार्थी बनतात आणि त्यांच्या लगतच्या परिसराशी जोडली जातात. (Involved Learner) :

परिसरातील वस्तूंचे रंग, रूप, आकार, आवाज, गंध याबाबत मुलांमध्ये नैसर्गिकरीत्या आकर्षण असते. या सर्वांबद्दल मुलांना कुतूहल असते. मुले त्यांच्या परिसरातील विविध आकृतिबंध 'पाहत व शोधत' असतात. मुले जे पाहतात त्यातून परिसराबाबत त्यांना आकलन होत असते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

'शोध', 'करून बघा', 'माहीत करून घ्या' अशा स्वरूपाच्या कृतींमधून मुलांचा बोधात्मक विकास (Cognitive Development) होणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षकांनी अशा कृती हेतुपूर्वक तयार करणे अपेक्षित असते.

- पायाभूत शिक्षणात मुलांच्या तार्किक विचारक्षमतेचा विकास साधणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने परिसरातील घटनांचे संबोध मुलांमध्ये दृढ होण्यासाठी शिक्षकांनी प्रत्यक्ष अनुभव देणे गरजेचे आहे.
- गणितीय विचार व कारणमीमांसा ही बोधात्मक विकासाची महत्त्वाची अंगे आहेत. अर्थपूर्ण कृतींद्वारे मुलांच्या अमूर्त संकल्पनांच्या आकलनाचा पाया रचला जावा याकरिता वस्तू, त्यांचा संख्यात्मक व अवकाशीय संबंध या संकल्पनांचा समावेश गणिती विचारात होतो.
- गणनपूर्व → गणितीय संकल्पना → बीजगणितीय संबोध.
- आकार → अवकाश संकल्पना → भूमितीय संबोध अशा पद्धतीने मुलांचे आकलन व संबोध तयार होत असतात.

विशेष गरजाधारक (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी कार्यरत शिक्षक व व्यवस्थेतील घटकांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात :

- समतेचा दृष्टिकोन ठेवून एकेका छोट्या समूहाला शिकवण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागेल.
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीशी जुळवून घेण्यासाठी अधिक परिश्रमाची आवश्यकता आहे.
- विशेष गरजा असणाऱ्यांच्या शिक्षणासाठी शाळांमध्ये अडथळा विरहीत वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे.
- मूल जसे आहे तसे त्याला स्वीकारावे व समजून घ्यावे लागेल.
- कृती करताना निष्पत्तींपेक्षा कृतीच्या प्रक्रियेला महत्त्व द्यावे लागेल.
- संपादणूक तपासण्यासाठी नावीन्यपूर्ण पद्धती व दृष्टिकोनाचा अवलंब करावा.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

३. बालकांची वाढ व विकास

अ) बालकांची वाढ व विकासाची क्षेत्रे

प्रस्तावना :

वाढ आणि विकास हे दोन शब्द बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरले जातात; परंतु वाढ या शब्दाचा अर्थ फारच मर्यादित आहे. मूल जन्माला आल्यानंतर त्याची वाढ होते. मुलाची उंची, वजन यांमध्ये बदल होत असतो. ही वाढ आपणास प्रत्यक्ष मोजता येते. व्यक्तीचे वजन व उंची आपण मोजू शकतो व त्यात किती वाढ झाली हे सांगू शकतो. वाढ ही संख्यात्मक असते. याच वेळी मुलांच्या विकासाची प्रक्रियाही चालू असते. ही प्रक्रिया गुणात्मक स्वरूपाची असते. क्षणाक्षणाला हा विकास होत असतो. आपण काल जसे होतो तसे आज नाही. किंबहुना काही क्षणापूर्वी जसे होतो तसे आता या क्षणाला असत नाही. कारण, त्या अवधीमध्ये काही अनुभव प्राप्त झाल्यामुळे थोडातरी विकास झालेला असतो. हा सूक्ष्म विकास बाहेरून पाहणाऱ्याला जाणवणारही नाही.

वाढ हा विकासाचा एक अविभाज्य घटक आहे. शारीरिक विकास हा शारीरिक वाढीवर अवलंबून असला, तरी शारीरिक वाढीमुळे शारीरिक विकास होतोच असे नाही. व्यक्ती खूप लठ्ठ होते व वजन वाढते, म्हणून त्या व्यक्तीचा शारीरिक विकास झाला असे म्हणता येणार नाही. शरीराच्या आकारात होणारी वाढ, शारीरिक अवयवांच्या आकारात होणारे बदल आणि अवयवांच्या कार्यातील सुसंगतपणा या सर्वांचा विकासामध्ये समावेश होतो. एखादे कौशल्य संपादन करावयाचे असते, त्यावेळी प्रारंभी घडणाऱ्या प्रतिक्रियांमध्ये प्रावीण्याचा अभाव असतो. विविध अंगांच्या कार्यात सुसंगतपणा नसतो. नंतर सतत प्रयत्नाने व मार्गदर्शनाने कौशल्य-संपादनास मदत होते. आपण ते कौशल्य विकसित झाले असे म्हणतो; म्हणून विकास हा क्रमा-क्रमाने घडतो. तसेच, वाढ ही बऱ्याच अंशी अनुवंशावर अवलंबून असते, तर विकास हा अनुवंशाबरोबर बाह्य परिस्थितीवरदेखील अवलंबून असतो. बालकांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावण्यासाठी शिक्षकांनी त्याची विकासप्रक्रिया समजावून घेतली पाहिजे.

विकासप्रक्रियेची वैशिष्ट्ये :

१) व्यक्ती आणि परिस्थिती यांच्या आंतरक्रियेवर विकासप्रक्रिया अवलंबून असते. अनुवंश व परिस्थिती यांच्या प्रभावामुळेच व्यक्तीच्या विविध अंगांचा विकास होतो.

२) विकासप्रक्रिया ही सतत चालणारी व अनुक्रमित प्रक्रिया आहे.

३) विकासाची गती प्राथमिक अवस्थेत अतिजलद असते. शारीरिक विकास बाल्यावस्थेच्या पूर्वार्धात जलद गतीने होतो.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

४) प्राणिमात्रांच्या वर्तनात जातिसामान्यता आढळते. त्यांच्या विकासाचे स्वरूप व गती यांच्यामध्ये विशिष्ट अनुक्रम दिसतो.

५) बालकामध्ये बाल्यावस्थेत आढळणारी विकासाची लक्षणे सामान्यपणे पक्वावस्थेपर्यंत बदलत नाहीत.

६) विकासप्रक्रिया संश्लेषणात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.
उदाहरणार्थ, नवजात बालकाचे वर्तन सामूहिक क्रिया या स्वरूपाचे असते. नंतर विशिष्ट प्रकारच्या प्रतिक्रिया साकार होऊ लागतात. त्याचे रडणे सामूहिक क्रिया या प्रकारात मोडते. नंतर भूक लागल्यावर जे रडणे ते विश्लेषणात्मक स्वरूपाचे असते. भाषेचा योग्य उपयोग, हाताच्या बोटांचा उपयोग करून वस्तू पकडणे, चित्रकलेतील प्रगती इ. बाबतीत विश्लेषणात्मक विकास दिसतो. विश्लेषणात्मक विकासातूनच संश्लेषणात्मक विकास घडत जातो.

७) विकासप्रक्रियेमध्ये योग्य वेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाल्यास, त्याचा व्यक्तिविकासावर चांगला परिणाम होतो. चार महिन्यांच्या बाळाला चालण्याचे कौशल्य संपादन करण्यासाठी कितीही मदत केली तरी त्याचा उपयोग होत नाही.

८) विकासप्रक्रियेमध्ये व्यक्तिभेद दिसतात. समजा, दोन बालकांची बुद्धिमत्ता समान असली तरी त्यांच्या वाचनक्षमतेत, अभिरुचीत भेद असू शकतात.

९) विकास हा संकलित स्वरूपात दिसतो. विकासातील काही घटना आपल्या नजरेत भरतात. उदा. मुलाला आलेला पहिला दात, त्याने रांगायला केलेली सुरुवात, चालण्यासाठी टाकलेले पहिले पाऊल, उच्चारलेला पहिला शब्द इ., पण या प्रत्येक दृश्य घटनेपूर्वी त्या बालकाचा विकास चालू होताच दात काही एकाएकी निर्माण झाला नाही. त्याची पूर्वतयारी चालूच होती. फक्त ती आपल्याला कदाचित दिसली नसेल.

१०) विकासाचे स्वरूप एकजिनसी असते. मेंदूचा विकास, शारीरिक विकास, मानसिक विकास यांची गती जरी भिन्न असली तरी त्यांचा एकमेकांवर परिणाम होतो.

वाढ व विकासातील फरक

वाढ	विकास
परिमाणात्मक बदल	प्रगतीच्या स्वरूपात बदलाची क्रिया
संख्यात्मक	गुणात्मक
अनुवंशावर आधारित	परिसर अधिक महत्त्वाचा
मर्यादा असतात	अमर्याद व व्यापक स्वरूपात
विकासाचा एक भाग	जन्मापासून शेवटच्या श्वासापर्यंत होतो

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

बालकाच्या विकासावस्था (Stages of Development) :



बालकाच्या विकासाचा विचार करण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी विकासाचे विविध टप्पे दिलेले आहेत. त्यांनाच विकासाच्या अवस्था म्हणतात. या अवस्था केवळ स्थूलमानानेच घ्यावयाच्या आहेत. बालकांच्या विकासावस्थांचा अभ्यास पद्धतशीर करणे सोयीचे व्हावे म्हणून विकासाचे टप्पे पुढील वयोगटात विभागले आहेत.

१) शैशवावस्था (Infancy) : जन्मापासून पहिली ५ वर्षे

२) किशोरावस्था (Childhood) : ६ ते १२ वर्षे

३) कुमारावस्था (Adolescence) : १३ ते १९ वर्षे

४) प्रौढावस्था (Adulthood) : २० ते ६० वर्षे

५) वृद्धावस्था (Senescence) : ६० वर्षांनंतर

विकासाची ५ क्षेत्रे :

- **बौद्धिक विकास :** बालकाच्या जडणघडणीत बौद्धिक विकासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे व यापरत्वे होणारा विकास व वाढ यांची गती यावर लक्ष ठेवणे. त्यासाठी पूरक साहित्य साधने, आहार व मार्गदर्शन देणे. बोधात्मक विकास हा महत्त्वाचा घटक आहे. बालकांच्या बौद्धिक विकासासाठी पूरक वातावरण कुटुंब, शाळा, समाज यांच्याद्वारे मिळणे महत्त्वाचे आहे. विचार करण्यास प्रवृत्त करणे. विविध खेळाच्या माध्यमातून सामाजिक आंतरक्रियांमधून नेतृत्व कौशल्य, समस्या परिहार, निर्णय क्षमता, दैनंदिन कृती इत्यादी क्षमतांचा शालेय स्तरावर समान संधी–समान सहभाग या माध्यमातून केल्यास बौद्धिक क्षमतांचा विकास होत असतो.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

- **शारीरिक विकास :** बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासही होणे महत्त्वाचे आहे. शारीरिक विकासाचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. सूक्ष्म कारक कौशल्यांमध्ये उदा. शर्टची बटणे लावणे, सुईत धागा ओवणे आणि ढोबळ कारक कौशल्यामध्ये उदा. बॉटल पकडणे व चेंडू फेकणे. स्नायूच्या हालचाली विकसित झाल्यास बालकाचा शारीरिक विकास सुरळीतपणे होतो.



- **भावनिक विकास :** भावना, विचार व वर्तन या साखळी पद्धतीचा अभ्यास करताना असे लक्षात येते की संवेदना विचार व वर्तन प्रकार याच्या मुळाशी भावना दडलेल्या असतात. भावना योग्य पद्धतीने ओळखण्यासाठी, व्यक्त करण्यासाठी व तार्किकपणे भावनांचे रूपांतर विचार व वर्तनात होण्यासाठी भावनांच्या व्यवस्थापन तंत्राचे विकसन करण्याची पद्धती शिकण्याची व शिकवण्याची आवश्यकता असते.

- **सामाजिक विकास :** आपण समाजात वावरतो त्यातून आपल्याला इतरांबरोबर समरस कसे व्हायचे? जुळवून घेण्याची पद्धत, मानदंड या बाबी समजतात. त्याचा उपयोग आपण सामाजिक परिस्थितीत वातावरणात करतो. सामाजिक आंतरक्रिया, मैत्री प्रस्थापित करताना येणाऱ्या अडथळ्यांमुळे समायोजनाच्या समस्या निर्माण होतात व त्याचे पर्यवसन आपल्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीवर होते. त्यामुळे या गटातील बालकांना संधी देणे, एकत्र कृती करण्यासाठी खेळ, सामूहिक खेळाचे उपक्रम देणे व बालक त्या करतील यासाठी सातत्याने संधी देणे आवश्यक आहे; त्यामुळे सामाजिक विकासाला चालना मिळेल.



- **भाषिक विकास :** व्यक्तीचा समाजाशी नाते जुळण्यासाठी, शालेय स्तरावर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित होण्यासाठी संवाद अर्थात भाषेची गरज असते. बालक हावभावाच्या माध्यमातून म्हणजेच अमौखिक तर बोलीभाषेतून म्हणजेच मौखिक भाषेच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त करते. भाषिक विकास होण्यासाठी बालकांना पालक, शिक्षकांकडून संवाद साधण्यासाठी संधी. त्याच्याबरोबर सातत्याने प्रत्यक्ष संवाद साधणे आवश्यक आहे.

  विकासात्मक विलंब असलेले किंवा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी भाषा उपचार पद्धतीचा अवलंब केला जातो.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

विकासाचे टप्पे :

मुलाची वाढ ही एक जटिल आणि निरंतर प्रक्रिया आहे. मुलांना कोणत्या वयात कोणत्या गोष्टी करता आल्या पाहिजेत त्यासाठी जे मानदंड आहेत त्यांना विकासात्मक टप्पे म्हणतात. एक पालक म्हणून हे लक्षात घेणे आवश्यक आहे की दोन मुलांचा एकाच दराने विकास होत नाही. त्यामुळे ''शेजारचे मूल हे आणि ते करू शकते'' याची काळजी करणे व्यर्थ आहे, तर स्वतःचे मूल करू शकत नाही. हे लक्षात घेऊन त्यासाठी निरीक्षण, उपक्रम व आवश्यक तेथे उपचार पद्धतीचा अवलंब करणे. वेगवेगळ्या कृतींसाठी लक्षात घेतलेल्या वयात मुलाचे काही काळ निरीक्षण केले पाहिजे. विकासात्मक प्रक्रियेत बालक वयानुसार विशिष्ट कृती करत नसल्यास, बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. हे मूल आजारी किंवा अस्वस्थ असल्यामुळे मूल वेगळ्या पद्धतीने वागू शकते हे लक्षात घेते. काही वेळा मूल त्याच्या वयाच्या इतर मुलांपेक्षा ठरावीक भागात अधिक हळूहळू विकसित होऊ शकते. तर त्याच्या/तिच्या इतर कृती इतर मुलांपेक्षा पुढे असू शकतात.

मुलांमध्ये विकासाचे टप्पे :

जन्म ते ६ आठवडे :

- डोके एका बाजूला वळवलेले, बाळ पाठीवर पडलेले आहे.
- अचानक होणारा आवाज त्याला/तिला घाबरवतो ज्यामुळे शरीर ताठ होते.
- मुठी घट्ट पकडल्या जातात.

६ ते १२ आठवडे :

- त्याचे/तिचे डोके चांगले धरायला शिकते.
- वस्तूंवर त्याचे डोळे निश्चित करण्यास सक्षम.

३ महिने :

- पाठीवर झोपलेले असताना बाळ त्याचे प्रत्येक हात आणि पाय सारखेच हलवते. मूल रडण्याखेरीज गुरगुरणारे आवाज आणि इतर आवाजही काढते.
- बाळ आईला ओळखते आणि तिच्या आवाजाला प्रतिसाद देते.
- जेव्हा मुलाला सरळ धरले जाते, तेव्हा बाळ एका क्षणापेक्षा जास्त काळ त्याच्या डोक्याला आधार देऊ शकते.

६ महिने :

- बाळ त्याच्या/तिच्या हातांना एकत्र स्पर्श करून खेळते.
- मूल त्याच्या/तिच्याभोवती निर्माण होणाऱ्या आवाजांकडे डोके वळवते.
- बाळ पोटावरून पाठीवर किंवा पाठीवरून पोटावर पालथे होते.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

- बाळाला आधार देऊन बसता येते.
- जेव्हा बाळाला धरले जाते, तेव्हा तो/तिच्या पायांवर काही भार सहन करण्यास सक्षम असतो.
- जेव्हा तो/तिच्या पोटावर असतो, तेव्हा बाळ पसरलेल्या हातांवर त्याचे/तिचे वजन उचलू शकते.

९ महिने :

- बाळ आधाराशिवाय बसू शकते.
- बाळ त्याच्या/तिच्या हातावर आणि गुडघ्यांवर रांगण्यास किंवा रेंगाळण्यास सक्षम असतो.

१२ महिने :

- बाळ उभे राहण्यासाठी प्रयत्न करते.
- बाळ 'मामा' असे शब्द बोलू लागते.
- बाळ फर्निचरला धरून चालण्यास सक्षम होते.

१८ महिने :

- मूल मदतीशिवाय पेला धरू शकतो आणि ते सांडल्याशिवाय पिऊ शकतो.
- बाळाला न पडता किंवा न डगमगता मोठ्या खोलीत आधार न घेता संपूर्ण मार्गाने चालता येते.
- बाळ दोन शब्दांचे वाक्य बोलू शकते.

२ वर्षे :

- बाळ काही कपडे जसे की पायजमा काढू शकते.
- बाळ न पडता धावण्यास सक्षम आहे.
- बाळाला चित्र, पुस्तकातील चित्रांमध्ये रस असतो.
- बाळाला जे हवे आहे ते सांगण्यास सक्षम आहे.
- बाळ इतरांनी सांगितलेले शब्द पुन्हा सांगू लागते.
- बाळ त्याच्या शरीराच्या काही भागांकडे निर्देश करण्यास सक्षम असते.

३ वर्षे :

- बाळ हाताने चेंडू फेकण्यास सक्षम होते. (साइडआर्म किंवा अंडरहँड नाही)
- ''तू मुलगा आहेस की मुलगी'' यासारख्या सोप्या प्रश्नांची उत्तरे बाळ देऊ शकते.
- बाळ गोष्टी दूर ठेवण्यास मदत करते.
- बाळ कमीत कमी एका रंगाचे नाव देऊ शकते/सांगू शकते/दर्शविते.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

४ वर्षे :

- बाळ ट्रायसायकल पेडल करण्यास सक्षम असते.
- बाळ पुस्तके किंवा मासिकांमधील चित्रांना नाव देऊ शकते.

५ वर्षे :

- बाळ त्याच्या काही कपड्यांची बटण लावू शकते.
- बाळ किमान तीन रंग ओळखतो/सांगतो/दर्शवतो.
- बाळ पायऱ्यांवरून खाली उतरू शकते.
- बाळ त्याच्या पायांनी अलगद उडी मारू शकते.





वरील विकासाचे टप्पे गाठताना विलंब झाल्यास सदर बालकांस शीघ्र हस्तक्षेप सेवेसाठी संदर्भित करावे.

व्यक्तिमत्त्व विकास :

आतापर्यंत आपण बघितलेल्या विविध विकासाच्या क्षेत्राचा संक्षिप्त आढावा घेतला. या विकासाच्या अंगाने बालकाच्या जडणघडणीत अंतर्भाव झाल्यास व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू विकसित होण्यास मदत होते. विकासात्मक विलंबित व दिव्यांग बालकाच्या व्यक्तिमत्त्वावर विशेष लक्ष देणे, त्यास आकार देणे तितकेच महत्त्वाचे आहे. यात व्यावसायिकांच्या व्यापक व समग्र प्रणालीची अत्यंत महत्त्वाची भूमिका ठरते. बालकांमधील विषय क्षमता ओळखणे, त्याला प्रोत्साहन देणे, योग्य व्यासपीठ खुले करून देणे तितकेच गरजेचे आहे. मुलांमधील भावनिक अडथळ्यांच्या बौद्धिक मर्यादा व आव्हानांचा विचार करून विकसनशील तंत्राचा अवलंब किंवा निर्मिती करणे उचित ठरते.

आक्रमकता, अबोलपणा, संवेदनशील, वर्चस्व, बहिर्मुखी, अंतर्मुखी यांसारख्या अनेक व्यक्तिमत्त्वांचा विचार करून व्यक्ती विकासासाठी प्रयत्न केले पाहिजे. बालकाच्या अध्ययनशैलीनुसार व्यवस्थापनाच्या तंत्र पद्धती प्रत्यक्षात आणल्यास समावेशनाची चळवळ यशस्वीरीत्या आपली पाळेमुळे रोवेल यात शंकाच नाही.

व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडणारे घटक :

- **प्रेरणा व प्रोत्साहन :** एखाद्या कृतीसाठी प्रेरणा किंवा प्रोत्साहन मिळाल्यास ती कृती आपण पुन्हा करतो. म्हणून बालकाच्या विधायक व योग्य कृतीस प्रेरणा, प्रोत्साहन दिल्यानंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वावर सकारात्मक परिणाम दिसून येतो. व्यक्तित्त्व पैलूनुसार संधी मिळाल्यास किंवा दिल्यास बालकाचा आत्मविश्वास वाढतो. यातूनच नेतृत्व, संवाद, व्यवस्थापन, संघटन कौशल्य यांसारख्या व्यक्तिमत्वावर अनेक पैलूचा विकास होतो.
- **अध्ययनांची संधी व अभाव :** बालकांना वयोगटानुसार अध्ययन करण्यास संधी मिळाल्यास, सरावाचा अनुभव दिल्यास त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत पूरक ठरतात. संधी न मिळाल्यास अथवा

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

सरावाचा अनुभव मिळाल्यास त्याचा परिणाम व्यक्तिमत्त्वावर होतो. उदा. वयाच्या ३/४ थ्या वर्षांपर्यंत समवयस्क बालकांमध्ये मिसळण्याची/खेळण्याची संधी दिल्यास, अनुभव दिल्यास बालकाचे व्यक्तिमत्त्व खुलते.

विविध मर्यादा किंवा आव्हाने व उपाययोजना :

विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी त्याच्या गरजेनुसार बाबी (उदा. शिक्षण, खेळ, कला) उपलब्ध नसल्यास अथवा संधी न मिळाल्यास व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करतात. बालकांच्या मर्यादा लक्षात घेऊन संसाधनाची उपलब्धता केल्यास, समान संधी दिल्यास, समतेचा भाव यांसारख्या उपाययोजना अवलंबल्यास व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळते.

- **तज्ज्ञांची अनुपलब्धता :** बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्या–त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची आवश्यकता लागते. तज्ज्ञ उपलब्ध नसल्यास बालकाच्या संधी, कौशल्य प्राप्तीसाठी मर्यादा येतात.
- **संसाधनांचा पुरवठा :** विशिष्ट कौशल्य प्राप्तीसाठी संधी, सरावाबरोबरच संसाधनांची गरज भासते, तसेच संसाधने मिळाल्यास क्षमता विकासासाठी उपयुक्त ठरते. उदा. क्रिकेटसाठी पूरक साहित्य मिळाल्यास खेळासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त करता येते. त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासास साधण्यास मदत मिळते.
- **कौटुंबिक व सामाजिक परिस्थिती :** व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी कुटुंबाकडून, तसेच समाजाकडून मिळणारे सहकार्य व पाठिंब्यामुळे बालकांना प्रेरणा मिळते.
- **सामाजिक भेदभाव व कलंक :** विशिष्ट कौशल्य प्राप्त करताना संधी किंवा सराव करताना जर समाज किंवा व्यवस्थेकडून सामाजिक भेदभाव अथवा कलंक याचा अनुभव आल्यास त्याचा विपरित परिणाम व्यक्तिमत्त्व विकासावर होतो. अशा बालकांना बहिष्कृत करणे, वेगळी वागणूक देणे, समूहापासून दूर ठेवणे. विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या बाबतीत बालकास नावाने न ओळखता त्याच्या दिव्यांगत्वाने ओळखणे. यामुळे बालकाची स्व अस्मिता, आधारभाव यावर परिणाम होतो.

शीघ्र हस्तक्षेप

शीघ्र/प्रारंभिक हस्तक्षेप दृष्टिकोन बहुतेकदा बालविकासाच्या चार प्रमुख पैलूंना समर्थन देण्यावर लक्ष केंद्रित करतात. त्यांचा शारीरिक, संज्ञानात्मक, वर्तणूक, सामाजिक आणि भावनिक विकास–जिथे सर्वांत मोठा फरक आणण्याची आणि एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यात फायदे प्रदान करण्याची क्षमता असते.

शीघ्र/लवकर मदत नेहमीच ऐच्छिक असते. हे आरोग्य विभाग किंवा शाळेसारख्या सार्वत्रिक सेवांद्वारे देऊ केलेल्या समर्थनाच्या पलीकडे जाऊ शकते. रणनीती आणि सामर्थ्य विकसित करण्यासाठी, अडचणी सोडवण्यासाठी आणि समस्या वाढण्यापासून रोखण्यासाठी कुटुंबांना पाठिंबा देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

सुरुवातीच्या मदत कार्यसंघांमध्ये अनेकदा मानसिक आरोग्य परिचारिका, आरोग्य अभ्यागत, थेरपिस्ट, मानसशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि कौटुंबिक साहाय्य कामगार/व्यावसायिक यांसारख्या व्यावसायिकांचा समावेश असतो.

शीघ्र हस्तक्षेप

विद्यार्थ्यांच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये बरेच विकासाचे टप्पे असतात. या विकासाच्या टप्प्यांमध्ये प्रामुख्याने बौद्धिक, सामाजिक, भावनिक, भाषिक, शारीरिक या टप्प्यांचा समावेश होतो. या विकासाच्या टप्प्यांमध्ये कधीकधी अनुवांशिक, सामाजिक आणि वातावरणातील घटकांमुळे अनेक समस्या निर्माण होतात त्या समस्यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या वाढीवर व विकासावर होतो. त्यामुळे लवकरात लवकर म्हणजे सहा वर्षाच्या आत जर त्या विलंबत्वाची कारणे, निदान ओळखण्यास आपण शिकलो तर त्या विद्यार्थ्यांमध्ये येणारे दिव्यांगत्वाचे प्रमाण लवकरात लवकर आपण शोधू शकतो आणि त्या विद्यार्थ्यास संदर्भित सेवा पुरवून त्याची सर्वांगीण प्रगती कशी साध्य करता येईल याकडे आपण लक्ष देऊ शकतो म्हणूनच शीघ्र हस्तक्षेप ही काळाची गरज आहे. शीघ्र हस्तक्षेप हे पालकांसाठी आपण जितक्या शक्य तितक्या लवकर केले तितके ते त्या पालकांसाठी हितावह असते.

शीघ्र हस्तक्षेपाचे महत्त्व

विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे लवकरात लवकर निदान होते. त्यांच्या गरजेनुसार प्राथमिक स्तरावर वैद्यकीय तपासणी होते. प्राथमिक स्तरावरील वैद्यकीय तपासणीमुळे आवश्यक शस्त्रक्रियेसाठी मुलांना संदर्भित करून वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देता येते. उदा. पायांची शस्त्रक्रिया, डोळ्यांची शस्त्रक्रिया, कानाची शस्त्रक्रिया, विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या गरजेनुसार स्पीच थेरपी, फिजिओथेरपी देऊन वाचा कौशल्य, कारक कौशल्य विकास घडवून आणता येतो. तसेच मुलाच्या गरजेनुसार आवश्यक साहित्य साधने उपलब्ध करून दिली जातात. उदा. श्रवण यंत्र, कॅलिपर साहित्य साधनांचा वापर करणेबाबत पालकांना समुपदेशन करण्यात येते. साहाय्यभूत सेवा उपलब्ध करून देऊन शिक्षणातील अडथळे कमी करून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत होते. शारीरिक, मानसिक, भावनिक व शैक्षणिक विकास होण्यास मदत होते.

शीघ्र हस्तक्षेपाची गरज म्हणून समस्या ओळखल्यानंतर, हस्तक्षेपाची रचना करण्याची प्रक्रिया सहा महत्त्वपूर्ण पायऱ्यांमध्ये विभागली जाऊ शकते.

१) समस्या आणि त्याची कारणे परिभाषित करणे आणि समजून घेणे.

२) कोणते कारण किंवा संदर्भ घटक बदलता येण्याजोगे आहेत हे ओळखणे : ज्यात बदलाला सर्वांत जास्त वाव आहे आणि कोणाला सर्वाधिक फायदा होईल.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

३) बदलाच्या यंत्रणेवर निर्णय घेणे.

४) हे कसे वितरित केले जातील हे स्पष्ट करणे.

५) शीघ्र हस्तक्षेपाची चाचणी आणि रूपांतर करणे.

६) कठोर मूल्यमापनासाठी पुढे जाण्यासाठी प्रभावीतेचे पुरेसे पुरावे गोळा करणे.

जर यापैकी प्रत्येक पायरी काळजीपूर्वक हाताळली गेली तर, अनावश्यक हस्तक्षेपांचे खर्चीक मूल्यमापन किंवा अंमलबजावणी टाळून दुर्मीळ सार्वजनिक संसाधनांचा अधिक चांगला वापर केला जाईल.

संशोधनातून असे लक्षात आले आहे की, नवजात बालकाच्या जीवनातील पहिले १००० दिवस अत्यंत संवेदनशील व सर्वांगीण वाढीसाठी महत्त्वाचे असतात. ''० ते ६ वर्षातील दिव्यांग बालकांसाठी शीघ्र उपचार सेवा'' ही सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालय, नवी दिल्ली अंतर्गत मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली आहे. देशभरातील सर्व राष्ट्रीय दिव्यांग संस्था व 'Composite Rehabilitation Centre' मध्ये शीघ्र हस्तक्षेप केंद्र सुरू करण्यामध्ये मंत्रालयाने पुढाकार घेतला आहे.

केंद्रसरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीने २०२१ मध्ये देशातील १४ शीघ्र उपचार केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. Cross Disability शीघ्र केंद्रामुळे ६ वर्षापर्यंतच्या बालकांच्या क्षमतांमध्ये उशिराने विकास होत असल्याची समस्या आढळल्यास अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा देता येणार आहे.

जिल्हा स्तरावर आरोग्य विभाग अंतर्गत जिल्हा शीघ्र उपचार केंद्रात (DEIC) काम करणारे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) आहे.

कोणत्या परिस्थितीत लवकर मदत उपलब्ध आहे?

ज्या कुटुंबात मुलाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो अशा अनेक परिस्थितींमध्ये लवकर मदत दिली जाऊ शकते.

उदाहरणार्थ, जर तुमच्या मुलाला,

- विशेष शैक्षणिक गरजा किंवा दीर्घकालीन शारीरिक आरोग्य समस्या आहेत.
- सौम्य किंवा उदयोन्मुख मानसिक आरोग्य समस्या आहेत.
- घरातील आव्हानांना तोंड द्यावे लागते जसे की, कठीण नातेसंबंध, घरगुती गैरवर्तन, पालकांचे व्यसन, पालक किंवा भावंडांच्या मानसिक किंवा शारीरिक आरोग्याच्या समस्या, आर्थिक अडचणी, इत्यादी.

साहाय्य (Support) मिळविण्याचे इतर स्रोत कसे शोधायचे?

जर तुमच्या कुटुंबाला लवकर मदत केली जात नसेल किंवा प्रतीक्षा यादीत असताना मदतीची

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

आवश्यकता असेल, तर अधिक तपशीलवार माहितीसाठी, तुमच्या क्षेत्रात काय सेवा दिली जाते? ते कसे शोधायचे?

तर यासाठी इतर काही पर्याय,

- शाळेत समर्थन
- स्वयंसेवी संस्था आणि धर्मादाय संस्था
- खाजगी समुपदेशन केंद्र आणि थेरपी सेवा
- ऑनलाइन समर्थन, वेबसाईट आणि ॲप्स ज्यामध्ये तुमचे मूल थेट प्रवेश करू शकते.
- शासनाच्या आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण विभाग बरोबर एकात्मिक विकास सेवा (ICDS)

सुरुवातीच्या मदतीद्वारे कोणत्या प्रकारचे समर्थन उपलब्ध आहे?

लवकर देऊ केलेली मदत वैयक्तिक किंवा गटआधारित असू शकते. हे यामध्ये होऊ शकते.

- तुमचे घर
- तुमच्या मुलाची शाळा
- आरोग्य किंवा मुलांचे केंद्र
- एक मानसिक आरोग्य केंद्र

लवकर मदत मिळण्याचे फायदे : काही उदाहरणे –

- शाळा किंवा आरोग्य सेवा यांसारख्या इतर सेवांमध्ये प्रवेश आणि नेव्हिगेट करण्यात संपर्क आणि मदत.
- पालकत्व कार्यक्रम, उदाहरणार्थ आव्हानात्मक वर्तन व्यवस्थापित करणे.
- कृती गट, उदाहरणार्थ लहान मुलांच्या पालकांसाठी, तरुण काळजीवाहू किंवा इतर गटांसाठी.
- तरुण लोकांसाठी किंवा पालकांसाठी वैयक्तिक मार्गदर्शन, उदाहरणार्थ, शाळेत उपस्थितीबाबत साहाय्य करण्यासाठी भाषण आणि भाषा, भावनिक किंवा सामाजिक कौशल्ये विकसित करण्यासाठी तज्ज्ञांची मदत किंवा थेरपी किंवा कुटुंबात शारीरिक किंवा मानसिक आरोग्याची गरज असल्यास मुलांवर परिणाम करणे.
- नातेसंबंधांच्या बाबतीत साहाय्य, उदाहरणार्थ पालकांच्या संघर्षात मदत करण्यासाठी.
- गृहनिर्माण किंवा राहण्याची परिस्थिती सुधारण्यासाठी साहाय्य.

विकासात्मक विलंबता आणि दिव्यांगत्व असणारे लहान मूल आणि त्यांच्या कुटुंबांना उपलब्ध असलेल्या सेवा संदर्भात हा शीघ्र हस्तक्षेप (Early Intervention) शब्द वापरला जातो. यामध्ये मुलाच्या गरजेवर आधारित (Speech Therapy, Physiotherapy, occupational therapy, वैद्यकीय शिबिर या व अशा इतर सेवांचा समावेश यामध्ये केला जातो.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

नवजात बालकांमधील दिव्यांगता शोधून त्यावर लवकर निदान व उपचार होणे गरजेचे आहे. यासाठी शीघ्र हस्तक्षेप (Early Intervention) ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी हा उपक्रम राबविला जातो. नवजात बालकांमधील दिव्यांगत्व शोधून त्यावर त्वरित उपचार केल्यास भविष्यात दिव्यांग मुलांना येणारी आव्हाने टाळता येतील. त्यासाठी सर्व पालकांनी आपल्या नवजात बालकाची विविध वैद्यकीय तपासणी तज्ज्ञांमार्फत करून घेणे आवश्यक आहे. तसेच लवकर निदान व उपचार मिळाल्यामुळे दिव्यांगता दूर होण्यास मदत होईल.

पालकांची भूमिका :

- वैद्यकीय तज्ज्ञांच्या कडून योग्य टप्प्यानुसार लसीकरण झाले आहे का पाहणे.
- कोणत्या कारणामुळे आपल्या बालकास सदोषता निर्माण हे समजून घेणे.
- वैद्यकीय तपासणी शिबिरांना बालकास घेऊन उपस्थित राहणे.
- तज्ज्ञ डॉक्टरांच्या संदर्भीय सल्ल्यानुसार बालकाचे पुढील उपचार करून घेणे.
- राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत संबंधितांकडून वेळोवेळी मार्गदर्शन घेणे.
- अंगणवाडीताई यांचे संपर्कात राहून शासनाकडून येणाऱ्या पोषक आहाराबाबत माहिती घेणे.
- तीव्र स्वरूपाचे गंभीर आजार असतील तर आरोग्य विभागाच्या योजनांची माहिती जाणून घेणे.

अंगणवाडीताईंची भूमिका :

- ० ते ६ वर्षे वयोगटातील दिव्यांग बालकांच्या सर्वेक्षणाबाबत प्रचार व प्रसार करणे.
- केलेल्या नोंदीनुसार पुढील उपचारासाठी आरोग्य विभागास माहिती पुरविणे.
- पालकांना विविध लसीकरण यांची माहिती देणे, ते लसीकरण वेळेत घेतले का याचा पाठपुरावा करणे.
- आरोग्य तपासणी शिबिराच्या वेळी सदोषधारक बालकांच्या पालकांना मार्गदर्शन करून शिबिरस्थळी उपस्थित ठेवणे.
- वेळोवेळी पालकसभेचे आयोजन करून दिव्यांग बालकांच्या पालकांना सहभागी करून घेणे.
- शिक्षण विभागातील दिव्यांग विभागाच्या संपर्कात राहून दिव्यांग बालकांची माहिती पुरविणे.
- दिव्यांग विभाग किंवा शासनाच्या इतर सेवांचा लाभ दिव्यांग बालकांना मिळवून देणे व त्याचा पाठपुरावा करणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

विशेष शिक्षकांची भूमिका :

- शालेय परिसरातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण करून शोध घेणे.
- शोध घेतलेल्या बालकांची नोंद घेणे.
- पालक, अंगणवाडी ताई यांना मार्गदर्शन करणे.
- २१ दिव्यांग प्रकारानुसार, मुलाच्या गरजेनुसार, क्षमतेनुसार त्याचे वर्गीकरण करणे, स्क्रिनिंग करणे.
- दिव्यांग बालकांची स्थिती, योग्यता जाणून घेऊन त्यामध्ये शीघ्र हस्तक्षेप करणे.

- विविध बहुतज्ज्ञांच्या साहाय्याने बालकाची IEP तयार करणे.
- शैक्षणिक व अशैक्षणिक कार्यक्रम तयार करणे.
- अभ्यासक्रम तयार करून बालकाच्या आवश्यकतेनुसार शैक्षणिक उपलब्धता करून देणे.
- मुलांचा लहान वयात विकास जास्त गतीने होत असतो. त्यामुळे भाषा, वाचा, शारीरिक वाढ तर अशा गतीला चालना देणे.

- बालकाच्या शैलीनुसार कौशल्य विकसित करणे.
- शैक्षणिक साहाय्यभूत सेवा, भौतिक सुविधा, साधन–साहित्य या सेवांचा लाभ गरजेनुसार मिळून देणे.
- दैनंदिन क्रिया, सामाजिक, भावनिक, शारीरिक क्रियांचा विकास करणे.
- मुलांमध्ये शीघ्र हस्तक्षेपमुळे सकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात. अशा वेळी राहत्या वातावरणातील व बाहेरील वातावरणातील अनुभव द्यावे.
- प्रशिक्षण, शिबिर, विविध प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृती कार्यक्रम राबविणे.

ड) वर्तन व्यवस्थापन

वर्तनवाद :

'वर्तनवाद' या शब्दाचा वापर अमेरिकन मानसशास्त्रज्ञ जे.बी. वॉटसन यांनी १९१४ मध्ये केला होता. वॉटसनने मन, अंतःप्रेरणा, विचार आणि भावना या दोन्ही निरुपयोगी आणि अतिउत्साही सारख्या संकल्पना

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

मांडल्या. त्याने मानवामध्ये अंतःप्रेरणेचे अस्तित्व नाकारले आणि विचार कमी केला. जसे की बोलणे आणि शारीरिक प्रतिसादांना भावना व्यक्त करणे. वॉटसनने यावर जोर दिला की मानसशास्त्रज्ञांनी केवळ अशा कृती/क्रियांचा अभ्यास केला पाहिजे ज्यांचे वस्तुनिष्ठपणे निरीक्षण केले जाऊ शकते आणि मोजले जाऊ शकते.

वर्तनाची व्याख्या :

एखाद्या व्यक्तीने निरीक्षण करण्यायोग्य आणि ठोस प्रतिसादाच्या स्वरूपात केलेली कोणतीही कृती वर्तन म्हणून ओळखली जाते.

एखाद्या व्यक्तीने दैनंदिन जीवनात केलेली कोणतीही कृती जसे की बसणे, धावणे, चढणे, आदर, आवडीनिवडी इ. या अशा काही कृती आहेत ज्या आपण अगदी स्पष्टपणे पाहू शकतो.

१) ठोस क्रिया–चालणे/धावणे.

२) अमूर्त विचारप्रक्रिया.

चांगल्या समायोजनाच्या काही महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रित करूया.

१) स्वतःची ताकद आणि मर्यादांची जाणीव.

२) स्वतःचा आणि इतरांचा आदर करणे.

३) आकांक्षेची पुरेशी पातळी

४) मूलभूत गरजा पूर्ण करणे.

५) वागण्यात लवचीकपणा.

६) प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याची क्षमता.

७) जगाची वास्तववादी धारणा.

८) त्याच्या सभोवतालच्या वातावरणासह सहजतेची भावना.

९) जीवनाचे संतुलित तत्त्वज्ञान.

समस्यायुक्त वर्तनाची लक्षणे

१) हिंसक आणि विध्वंसक वर्तन.

२) असामाजिक वर्तन.

३) बंडखोर आचरण

४) विचित्र वागणूक.

५) स्टिरियोटाइप वर्तन/वारंवार एकच कृती.

६) अयोग्य परस्पर शिष्टाचार. (Inappropriate Inter personal Manners)

७) अस्वीकार्य स्वर सवयी (Unaccepetable Vocal Habits)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

८) अस्वीकार्य विक्षिप्त सवयी (Unaccepetable eccentric habits)

९) स्वत:ची अपमानास्पद/हानीकारक वर्तणूक (Self Injurious behaviours)

१०) अतिक्रियाशील प्रवृत्ती. (Hyperactive Tendencies)

११) लैंगिकदृष्ट्या विकृत वर्तन.

१२) मानसिक त्रास/फोबिक प्रतिक्रिया.

समस्यायुक्त वर्तन शोधण्यासाठी BASIC-MR (Behavioural Assessment Scale for Indian children with Mental Retardation) या चाचण्या वापरल्या जातात.

समस्यायुक्त वर्तनाची कारणे

१) गोष्टी साध्य करण्यासाठी (हव्या असलेल्या वस्तू/वस्तू)

२) कौशल्याच्या कमतरतेमुळे.

३) स्वतःला प्रेरित करण्यासाठी

४) काम टाळण्यासाठी.

५) अवधान वेधण्यासाठी (Attention Seeking)

वर्तन सुधार

''वर्तन सुधार हे एक तंत्र आहे ज्यामध्ये निरीक्षण करण्यायोग्य वर्तनात विशिष्ट बदल घडवून आणण्यासाठी पर्यावरणीय घटनांची मांडणी केली जाते.''

वर्तन सुधार तत्त्वे

- वर्तन सुधारणे म्हणजे वर्तनातील बदल, जो निरीक्षण करण्यायोग्य, मोजण्यायोग्य आणि रेकॉर्ड करण्यायोग्य आहे.
- वर्तन सुधारणे शिकण्याच्या तत्त्वांवर आधारित आहे जसे की निरीक्षणात्मक घटक.
- वर्तन सुधारणेचा वापर अपेक्षित वर्तन वाढविण्यासाठी, तसेच अयोग्य वर्तन कमी करण्यासाठी केला जातो.

विशेष शिक्षकांनी समस्या वर्तनांची वारंवारता किंवा घटना लक्षात घेणे सर्वांत महत्त्वाचे आहे. समस्यायुक्त वर्तन रेकॉर्ड करण्यासाठी काही तंत्रे आहेत ती खालीलप्रमाणे आहेत.

१) इव्हेंट रेकॉर्डिंग तंत्र. (Event Recording Technique)

२) कालावधी/वेळ रेकॉर्डिंग तंत्र. (Time Recording Technique)

३) इंटरव्हल रेकॉर्डिंग तंत्र. (Interval Recording Technique)

४) वेळापत्रक रेकॉर्डिंग तंत्र. (Schedule Recording Technique)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

उपरोक्त रेकॉर्डिंग तंत्रांचा तपशीलवार अभ्यास करूया,

१) **इव्हेंट रेकॉर्डिंग तंत्र (Event Recording Technique) :** या तंत्रात आपण नोंद करतो की मूल किती वेळा समस्या वर्तन दाखवते. किंवा प्रॉब्लेम वर्तन किती वेळा होते?

उदा. भिंतीवर डोके आपटणे त्यामुळे इव्हेंट रेकॉर्डिंग आपण याप्रमाणे वापरू शकतो.

दिनांक	वेळ	घटना (वारंवारता)	एकूण
२.७.२०२४	११ ते ०२	IV	४
३.७.२०२४	११ ते ०२	III	३
४.७.२०२४	११ ते ०२	IV	४
५.७.२०२४	११ ते ०२	VI	६
६.७.२०२४	११ ते ०२	III	३
७.७.२०२४	११ ते ०२	V	५

अशा प्रकारे मर्यादित वेळापत्रकात आपण घटना/वर्तन रेकॉर्ड करू शकतो.

२) **वेळ/कालावधी रेकॉर्डिंग तंत्र (Time Recording Technique) :** यामध्ये आपण वेळ (कालावधी) नोंदवतो. मुलाच्या रेकॉर्ड करता येतील अशा वर्तन समस्यांचे रेकॉर्डिंग केले जाते.

या समस्येसाठी आपण घरी, शाळेत, मध्यंतरात खेळाच्या मैदानात किंवा वर्गात अशा विविध ठिकाणी रेकॉर्डिंगसाठी वेळ काढू शकतो. उदा.

दिनांक	वेळ	घटना (वारंवारता)	एकूण
२.७.२०२४	११ ते १२	६० मिनिटे	५० मिनिटे
३.७.२०२४	११ ते १२	६० मिनिटे	४० मिनिटे
४.७.२०२४	११ ते १२	६० मिनिटे	३५ मिनिटे
५.७.२०२४	११ ते १२	६० मिनिटे	३० मिनिटे
६.७.२०२४	११ ते १२	६० मिनिटे	१० मिनिटे
७.७.२०२४	११ ते १२	६० मिनिटे	२० मिनिटे

३) **इंटरव्हल रेकॉर्डिंग तंत्र (Interval Recording Technique) :** या तंत्रामध्ये वेळेच्या अंतराने समस्या वर्तन रेकॉर्ड केले जाते कारण दीर्घकाळ रेकॉर्डिंगसाठी खूप वेळ लागतो. त्यामुळे समस्या वर्तन वारंवार उद्‌भवल्यास हे रेकॉर्डिंग तंत्र उपयुक्त आहे. उदा.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

दिनांक	वेळ	घटना घडणे (Occurance)	किती वेळा
२.७.२०२४	११ ते ११.१०	होय	४–५ वेळा
२.७.२०२४	११ ते ११.२०	नाही	०–० वेळा
२.७.२०२४	११.२० ते ११.३०	होय	२–३ वेळा
२.७.२०२४	११.३० ते ११.४०	नाही	३–४ वेळा
२.७.२०२४	११.४० ते ११.५०	होय	४.५ वेळा
२.७.२०२४	११.५० ते १२.००	होय	१–२ वेळा

४) **शेड्युल रेकॉर्डिंग तंत्र (Schedule Recording Technique) :** या तंत्रात रेकॉर्डिंग विशिष्ट आणि मर्यादित वेळेसाठी आहे. याचा अर्थ रेकॉर्डिंग विशिष्ट वेळापत्रकात आहे. उदा.

दिनांक	वेळ	घटना घडणे (Occurance)	किती वेळा
२.७.२०२४	११.१०	होय	४–५ वेळा
२.७.२०२४	११.१५	नाही	–
२.७.२०२४	११.२०	होय	२–३ वेळा
२.७.२०२४	११.२५	नाही	३–४ वेळा
२.७.२०२४	११.३०	होय	–
२.७.२०२४	११.३५	होय	१–२ वेळा

त्यामुळे समस्या वर्तनाचे विश्लेषण करण्यासाठी रेकॉर्डिंग सर्वांत महत्त्वाचे आहे. या विविध तंत्रांचा वापर विशेष शिक्षक आणि मानसशास्त्राज्ञांद्वारे केला जातो.

एबीसी मॉडेल



समस्येचे योग्य विश्लेषण करणे ही समाधानाची गुरुकिल्ली आहे. वर्तन समस्येचे विश्लेषण करण्यासाठी अनेक मॉडेल्स उपलब्ध आहेत. A-B-C मॉडेल हे सोप्या मॉडेलपैकी एक आहे. आम्हाला या मॉडेलचा वापर कोणत्याही विश्लेषणासाठी आणि तीन प्रमुख घटकांच्या दृष्टीने समस्या वर्तन समजून घेण्यासाठी करणे आवश्यक आहे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

Antecedent	Behaviour	Consequence
वर्तनाआधी लगेच काय होते?	**वर्तनादरम्यान काय होते?**	**वर्तनानंतर लगेच काय होते?**
• समस्या वर्तन सामान्यत: कधी होते? • दिवसाची काही विशिष्ट वेळ आहे का जेव्हा समस्या वर्तन अधिक होते?	१) समस्या वर्तन किती वेळा घडून येते? २) समस्या वर्तन किती काळासाठी होते?	१) वातावरणातील लोक वर्तन थांबवण्यासाठी नेमके काय करतात? २) वर्गातील मुलावर किंवा इतरांवर समस्यायुक्त
• समस्या वर्तन कोणासह होते? • समस्या वर्तन का उद्‌भवते? यात कोणते घटक त्वरित कारणीभूत आहेत हे शोधणे समाविष्ट आहे. • समस्या वर्तन कोठे होते?		वर्तणुकीचा काय परिणाम होतो? ३) समस्यायुक्त वर्तणुकीमुळे मुलाला कसा फायदा होतो?

विशिष्ट वर्तनाबद्‌दल काही तत्त्वे :

- इतरांना त्रास होईल असे वर्तन.
- स्वतःला इजा/त्रास होईल असे वर्तन.
- (विशिष्ट) वर्तनाची वारंवारता.
- कामाच्या ठिकाणी/वर्गात अडथळा आणणारी किंवा अडथळे निर्माण करणारी वर्तणूक.
- वयानुरूप अयोग्य वर्तन/कृती.
- सामाजिक नियमांच्या पलीकडील वर्तन (असामाजिक).

समस्यायुक्त/अयोग्य वर्तन कमी करण्यासाठी १० पायऱ्या

१) **समस्या वर्तन ओळखणे :** एकदा समस्या वर्तन शिक्षकांच्या निदर्शनास आणणे व ओळखणे.

२) **समस्या वर्तनाचे वर्तनात्मक वर्णन :** निरीक्षण योग्य समस्या वर्तनांचे वर्णन वस्तुनिष्ठ पद्‌धतीने करणे आवश्यक आहे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

३) **समस्या वर्तनाची निवड :** एक मूल एकापेक्षा जास्त समस्याप्रधान वर्तन करू शकते परंतु व्यवस्थापनासाठी एका वेळी फक्त किंवा दोन समस्या निवडल्या जातात.

४) **बेस लाईन असेसमेंट (निरीक्षण तंत्र) :** या प्रक्रियेत एक किंवा अधिक व्यक्तींच्या वास्तविक जीवनात कोणते समस्यायुक्त वर्तन घडत आहे याचे निरीक्षण बेस लाईन डेटाद्वारे करतात.

५) **कार्यात्मक विश्लेषण (वर्तणूक विश्लेषण) :** कार्यात्मक विश्लेषण ही समस्या वर्तनाची जटिलता त्याच्या सोप्या किंवा सर्वांत प्राथमिक भागांमध्ये समजून घेण्याची प्रक्रिया आहे. सर्वात सोप्या मॉडेलपैकी एक A-B-C मॉडेल म्हणून ओळखले जाते जे सामान्यतः मानसिकदृष्ट्या समस्या वर्तनाचे विश्लेषण करण्यासाठी वापरले जाते. हे मॉडेल समस्या वर्तणुकीच्या घटनेसाठी कारणीभूत घटक ओळखण्यास मदत करते.

६) **समस्या वर्तनाची कारणे ओळखा :** कोणते घटक वर्तनास जबाबदार आहेत. (लक्ष मिळवणे, स्व–उत्तेजना, कौशल्य कमतरता घटक इ.)

७) **प्रबलनाची/रिवॉर्ड्सची ओळख :** वर्तनातील बदल, मग ते इष्ट वर्तन वाढवण्यासाठी असो किंवा अनिष्ट वर्तन कमी करण्यासाठी असो. बक्षिसे देणे ही एक महत्त्वाची पायरी आहे. हे कौशल्य प्रशिक्षणासाठी मदत करते.

८) A-B-C मॉडेलच्या मदतीने व्यवस्थापन आणि रीइन्फोर्सचा वापर करून आपण वर्तणूक व्यवस्थापन कार्यक्रम राबवू शकतो.

९) **शिक्षा :** हे एक वर्तन तंत्र आहे; समस्यायुक्त वर्तन नियंत्रित करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी वापरले जाते.

प्रबलनाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

- कोणत्या वर्तनाला बक्षीस द्यायचे आणि कोणत्या वर्तनाला बक्षीस द्यायचे नाही हे शिकवण्यास सुरुवात करण्यापूर्वी केवळ योग्य वर्तनाला बक्षीस द्यावे.
- मुलांच्या विशिष्ट वर्तनांना पुरस्कृत करताना सूचनांमध्ये स्पष्टता असावी.
- सुरुवातीला इच्छित वर्तनानंतर लगेच बक्षीस द्यावे.
- अपेक्षित वर्तणूक झाल्यानंतर प्रत्येक वेळी बक्षीस द्यावे.
- योग्य रक्कम/बक्षीस द्यावे.
- इतर प्रकारच्या पुरस्कारांसह सामाजिक पुरस्कारांचा वापर करावा.
- बदल/पर्यायी पुरस्कार देणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

- बक्षिसे कमी करणे – मूल जसे वर्तन आत्मसात करते त्यानुसार बक्षिसे हळूहळू काढून टाकणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याला/तिला कौशल्याने स्वतंत्र बनवले जावे.

प्रबलनाचे प्रकार

१) प्राथमिक प्रबलन :

अ) घन – चॉकलेट, केळी, चिप्स, पॉपकॉर्न

आ) द्रव – शेक, कॉफी, शीतपेय, रस

२) दुय्यम प्रबलन :

पेन्सिल, पेन, बॉल, कॉपी. ड्रेस, खेळणी, बांगड्या, इ.

३) सामाजिक प्रबलन :

अ) **शाब्दिक :** खूप छान असे म्हणणे, स्तुती करणे, इतरांसमोर स्तुती करणे, इतरांसमोर शाब्दिक कौतुक इ.

आ) **अशाब्दिक :** स्मित हास्य करणे, चेहऱ्यावरचे हावभाव, अंगठा दाखवणे, हस्तांदोलन करणे, मिठी मारणे इ.

४) कार्यात्मक प्रबलन : खेळण्यास, चित्र काढण्यास, सायकल चालविण्यास तसेच टीव्ही पाहण्याची परवानगी देणे व बाहेर जाण्यास परवानगी देणे.

५) टोकन इकॉनॉमी : टोकन म्हणून इष्ट वर्तनावर अतिरिक्त गुण किंवा कूपन, स्टार देणे.

६) विशेष अधिकार : इष्ट वर्तनावर क्लास मॉनिटर किंवा ग्रुप कॅप्टन किंवा विद्यार्थ्याला लीडर बनवणे.

वर्तन उपचाराची तंत्रे (वर्तणुकीत बदल करण्याचे तंत्र)

वर्तन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत बालकांच्या ऐच्छिक वर्तनासाठी प्रेरणा, प्रोत्साहन इत्यादींचा व अनैच्छिक वर्तन कमी करण्यासाठी विशिष्ट व्यवस्थापन तंत्राचा अवलंब केला जातो. वर्तन व्यवस्थापन तत्त्वात अनैच्छिक वर्तन कमी करणे व ऐच्छिक वर्तन विकसित करणे यासाठी शास्त्रशुद्ध व्यवस्थापन तंत्राचा वापर केला जातो.

१) वातावर्णनात्मक निर्बंध (Environmental manipulation) : समस्ययुक्त वर्तनाला प्रभावित करणाऱ्या वातावरणात्मक घटकांना निर्बंध घालणे.

२) दुर्लक्ष करणे/विलोपन (Extinction) :

काही प्रसंगी मुले आपले लक्ष वेधून घेण्यासाठी विशिष्ट वर्तन करतात त्याचे प्रमाणही जास्त असते. उदा. वर्गात शिक्षकांना वारंवार लक्ष वेधून घेण्यासाठी आवाज देतात, हालचाली करतात. यावेळी दुर्लक्ष करणे तंत्राचा वापर करणे योग्य ठरते. यावेळी फक्त ही काळजी घेण्याची गरज असते की

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

हे तंत्र वापरताना मुलांकडून धोकादायक, इजा पोहोचेल (स्वतःला, इतरांना) असे वर्तन तर होत नाही ना? अशा वेळी इतर तंत्राचाही वापर करावा.

३) टाईम आऊट (Time Out) :

मूल एखाद्या कृतीमध्ये वारंवार हेतू पुरस्सर अडथळा आणत असेल तर त्यास कृतीपासून विशिष्ट वेळेसाठी (तीन ते पाच मिनिटे) दूर करणे अथवा कृती त्याच्यापासून दूर करणे म्हणजे टाईम आऊट. उदाहरणार्थ – वर्गात शिकवताना संपूर्ण वर्गाला बाधा होईल असे वर्तन वारंवार मूल करत असेल तर त्याला वर्गातील कोपऱ्यामध्ये किंवा बाहेर विशिष्ट वेळासाठी बाहेर उभे राहायला सांगणे किंवा वर्ग अध्यापन प्रक्रिया त्या ठिकाणाहून दुसरीकडे नेणे.



४) प्रतिसाद प्रतिबंध : प्रतिसाद प्रतिबंध म्हणजे, अयोग्य वर्तन घडण्यापूर्वीच प्रतिबंध करणे होय. प्रतिसाद प्रतिबंध अयोग्य वर्तनाची त्वरित आणि सक्तीने पुनरावृत्ती करू शकते. तथापि, येथे मुलाशी शारीरिक संघर्ष करण्याचा हेतू नाही म्हणून सुधारित केलेल्या वर्तनाचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यानंतर प्रतिसाद प्रतिबंध लागू केला पाहिजे.

५) शारीरिक संयम : अयोग्य वर्तन घडल्यानंतर शारीरिक कृतींवर प्रतिबंधित करणे. आक्रमक वर्तन कमी करण्यासाठी सौम्य शारीरिक संयम उपयुक्त आहे. यामध्ये मुलाच्या शारीरिक हालचालींवरील निर्बंध समाविष्ट आहेत.

६) प्रतिसाद खर्च : हे एक तंत्र आहे ज्यामध्ये आधीच पुरस्कृत मजबुतीकरण (योग्य वर्तनाच्या घटनेला बळकटी देणारा भाग म्हणून) अयोग्य वर्तनानंतर परत घेतले जाते ही पद्धत सामान्यतः कधी वापरली जाते टोकन योग्य वर्तन वाढवण्यासाठी वापरले जातात जेणेकरून विशिष्ट समस्या वर्तनाचे अनुसरण करता येईल व मुलाने मिळवलेले टोकन परत घेतले जातात. येथे व्यक्ती विशिष्ट अनिष्ट वर्तन करण्याची किंमत मोजतात.

७) अति दुरुस्ती (Overcorrection) : मूल जर एकच वर्तन वारंवार करत असेल उदाहरणार्थ फरशीवर पाणी सांडणे तर त्याला अति दुरुस्ती या तंत्राचा वापर करावा. यात मुलाला पाणी सांडल्यावर फरशी स्वच्छ करण्यास सांगणे. मुलाने फरशीवर जेथे पाणी सांडले असेल तेथील फरशीच्या जागेसह जास्तीच्या फरशीची जागा स्वच्छ करण्यास सांगणे.

८) ॲव्हर्सिव्ह थेरपी (Aversive Therapy) : हे एक तंत्र आहे जे कंडिशनिंग प्रक्रियेदरम्यान अयोग्य वर्तनाची वारंवारता कमी करते आणि त्यास वास्तविक किंवा काल्पनिक प्रतिकूल उत्तेजनासह संबद्ध करते. या प्रक्रियेमध्ये वेदनादायक उत्तेजनासाठी (१० ते ६० व्होल्ट्स दरम्यान) सौम्य शॉक दिले जातात.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

९) **शारीरिक निर्बंध :** समजा मूल दुसऱ्यांना अथवा स्वतःला हानिकारक असे वर्तन करत असेल तर त्या वर्तनाला आळा घालण्यासाठी शारीरिक निर्बंध तंत्राचा अवलंब केला जातो. काही मुले दुसऱ्यांना ढकलतात, मारतात किंवा स्वतःचे डोके आपटतात अशा वेळी आपण त्याला शारीरिकदृष्ट्या प्रतिबंध करावा, त्याचा हात पकडावा शारीरिक मज्जाव करताना मुलाला इजा होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे. तसेच हे तंत्र दोन ते तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ पर्यंत वापरू नये.

१०) **शिक्षा :** शिक्षेचा अवलंब अपवादात्मक परिस्थितीत अथवा इतर कोणतेही तंत्र वापरून वर्तनावर नियंत्रण ठेवता येत नसेल तरच वापरावे. शिक्षाही शाब्दिक प्रतीकात्मक असावी.

सारांश : बालक असो किंवा व्यक्ती त्याचा संबंध समाजाशी येत असतो. हा संबंध प्रस्थापित करण्याचा महत्त्वाचा घटक म्हणजे वर्तन होय. रोज बालकाचा संबंध पालक, भावंड, सवंगडी, शिक्षक, व समाज यांच्याशी येत असतो. त्यादरम्यान बालकांमध्ये बऱ्याचदा असुरक्षित भावना निर्माण होतात. त्या भावनांना बालकाला योग्य पद्धतीने व्यक्त करता येत नाही. त्या भावनांना दाबून ठेवले जाते. त्यामुळे त्या भावनांचा उद्रेक, ओरडणे, किंचाळणे, मारणे, चावणे, अंगठा चुकणे, बिछाना ओला करणे, भिंतीला चिकटणे, नखे कुरतडणे आणि अशा अनेक वर्तन प्रकारांमध्ये आपल्याला बघायला मिळते. म्हणूनच या सर्व वर्तन समस्या योग्य पद्धतीने हाताळण्यासाठी वर्तन उपचार ही पद्धती सर्वसामान्य मुलांप्रमाणे विशेष गरजा असणाऱ्या मुलांना उपयुक्त ठरते.

❖❖❖

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

४. दिव्यांगांचे प्रकार, स्वरूप, विद्यार्थिनिहाय सर्वेक्षण व अध्ययनशैली

दिव्यांगांचे प्रकार व स्वरूप :

समावेशित शिक्षण वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये काही विद्यार्थी हे शारीरिक, बौद्धिक, मानसिकदृष्ट्या अक्षम असतात अशा विद्यार्थ्यांची शीघ्र ओळख, निदान करून त्यांना आवश्यक सेवा व सवलती दिल्यास त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवता येते, तसेच वर्गशिक्षकांनी त्यांची शिकण्याची पद्धत विचारात घेऊन त्यांना अध्ययन-अध्यापन केले, तर दिव्यांग विद्यार्थी प्रवाहात टिकून राहतील.

समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण अधिनियम १९९५ व राष्ट्रीय न्यास कायदा १९९९ नुसार, ७ दिव्यांग प्रवर्ग निश्चित करण्यात आले होते. तदनंतर दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ मधील कलम २ (ZC) मध्ये नमूद केल्याप्रमाणे २१ दिव्यांग प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे, तसेच या कायद्यानुसार अपंग व्यक्तींना 'दिव्यांग' हे संबोधन प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त २१ दिव्यांग प्रवर्गांचे ९ क्षेत्रनिहाय वर्गीकरण करण्यात आले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	क्षेत्र	प्रवर्ग	लक्षणे
१)	शारीरिक	१) अस्थिव्यंग (Locomotor Disability)	➢ शारीरिक हालचाल व क्रिया करण्यास अक्षम. ➢ हात किंवा पाय निष्क्रिय. ➢ अनियंत्रित शारीरिक हालचाल.
		२) कुष्ठरोग (Leprosy)	➢ हातापायांच्या बोटांमध्ये विकृती. ➢ त्वचेचा रंग बदलणे. ➢ हात व बोटे सुन्न पडणे.
		३) मेंदूचा पक्षाघात (Cerebral Palsy)	➢ हातापायांच्या स्नायूंमध्ये कडकपणा किंवा मऊपणा ➢ वस्तू पकडताना अडचण. ➢ शारीरिक हालचाली करण्यास मर्यादा. ➢ शारीरिक क्रियांवर मेंदूचा ताबा नसणे.
		४) बुटकेपणा (Dwarfism)	➢ समवयस्क मुलांपेक्षा शारीरिक वाढ कमी असणे. ➢ उंची कमी असणे (शारीरिक वाढीचे वय संपल्यानंतरही उंची ४ फूट, १० इंच किंवा त्यापेक्षा कमी असणे.)
		५) मांसपेशी दुर्विकास (Muscular Dystrophy)	➢ मांसपेशी कमकुवत असणे. ➢ मांसपेशीमध्ये विकृती निर्माण होणे. ➢ शारीरिक हालचालीतील वेग मंदावणे. ➢ शारीरिक हालचाल करण्यास असमर्थ.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	क्षेत्र	प्रवर्ग	लक्षणे
		६) ॲसिड हल्ला पीडित (Acid Attack Victims)	➢ हात, पाय, डोळे यांवर ॲसिडचा हल्ला. ➢ ॲसिड हल्ल्यामुळे शरीराचे अवयव निकामी होणे. ➢ ॲसिड हल्ल्यामुळे विद्रूपता येणे. ➢ ॲसिड हल्ल्यामुळे शरीरावर तीव्र जखमा होणे.
२)	दृष्टीदोष	७) पूर्णतः अंध (Blindness)	➢ जन्मतः शंभर टक्के दृष्टी नसणे. ➢ अपघाती अंधत्व ➢ वैद्यकीय कारणामुळे दृष्टी मंदावत जाऊन पूर्ण अंधत्व येणे.
		८) अंशतः अंध (Low vision)	➢ जवळचे कमी दिसणे. ➢ भिंगाच्या चष्म्याचा वापर करणे. ➢ फळ्यावरील लेखन उतरून घेताना इतरांची मदत घेणे. ➢ वस्तू डोळ्यांजवळ धरून पाहणे. ➢ विविध रंगांतील फरक ओळखता न येणे.
३)	कर्णदोष	९) कर्णबधिर (Hearing Impaired)	➢ ऐकण्याची क्षमता नसणे. ➢ श्रवण न झाल्याने बोलता न येणे.
		१०) वाचादोष (Speech and Language Disability)	➢ बोलण्यात अडखळणे. ➢ जीभ जाड असणे. ➢ जिभेला शेंडा नसणे. ➢ उच्चार अस्पष्ट असणे. ➢ टाळूला छिद्र असणे. ➢ तोतरे व बोबडे बोलणे.
४)	बौद्धिक दिव्यांगत्व	११) बौद्धिक अक्षमता (Intellectual Disability)	➢ अध्ययनामध्ये सहाध्यायींपेक्षा मागे असणे. ➢ दैनंदिन क्रिया करण्यास असमर्थ. ➢ समजणे, बोलणे, अभिव्यक्त होण्यास असमर्थ ➢ वर्तणूक समस्या ➢ डोळे, डोके व नाक यांच्या रचनेत जाणवण्याइतपत फरक दिसून येतो. ➢ अतिचंचलता, आक्रमकता असणे.
		१२) विशिष्ट अध्ययन अक्षमता (Specific Learning Disability)	➢ लेखन, वाचन व गणितीय क्रियांमध्ये अडचण ➢ संकल्पना समजण्यात अडचण ➢ अभ्यासात मागे राहणे. ➢ आकलनास वेळ लागणे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	क्षेत्र	प्रवर्ग	लक्षणे
			➢ सारखे दिसणारे शब्द व आकृत्या यांमधील फरक न समजणे. ➢ आरशाच्या प्रतिमेप्रमाणे उलटे लिहिणे. ➢ अक्षराच्या योग्य जोड्या लावू न शकणे. ➢ बोलताना, वाचताना व लिहिताना शब्द गाळणे व पुन्हापुन्हा वाचणे. ➢ गणितातील मूलभूत संकल्पना संबोध न समजणे. ➢ − + / × इत्यादी गणितीय चिन्हांचा अर्थ लावता न येणे.
		१३) स्वमग्नता (Autism Spectrum Disorder)	➢ स्वतःच्या विश्वात रमणे. ➢ एकच क्रिया वारंवार करणे. ➢ अनोळखी व्यक्ती व अनोळखी ठिकाणी न मिसळणे. ➢ अर्थहीन आवाज काढणे. ➢ समोरील व्यक्तीच्या नजरेला नजर न मिळवणे. ➢ नेहमी भावविरहित असणे.
५)	मानसिक वर्तन	१४) मानसिक आजार (Mental Illness)	➢ असामान्य किंवा अस्वाभाविक वर्तन ➢ अभिव्यक्त होण्यास भीती वाटणे. ➢ असंबंध बडबड करणे. ➢ भीती वाटणे किंवा अजिबात न घाबरणे.
६)	मज्जासंस्थेचे आजार	१५) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological conditions)	➢ फिट्स येणे. ➢ मेंदूज्वर, ब्रेन ट्युमर ➢ तीव्र डोकेदुखी ➢ संतुलन बिघडणे.
		१६) मल्टिपल स्केलेरोसीस (Multiple Sclerosis)	➢ मेंदू व अवयव यांच्या समन्वयात अडचण ➢ डोळ्यांना कमी दिसणे. ➢ स्नायूंमधील कमजोरी ➢ पायांना मुंग्या येणे.
		१७) पार्किन्सन विकार (Parkinson's)	➢ हात, पाय, मांसपेशीमध्ये ताठरता, हालचाल करण्यास अक्षम. ➢ हातांना व पायांना कंप सुटणे. ➢ हा आजार प्रामुख्याने वयस्कर लोकांमध्ये आढळून येतो.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	क्षेत्र	प्रवर्ग	लक्षणे
७)	रक्ताशी संबंधित	१८) थॅलेसेमिया (Thalassemia)	➢ रक्तामध्ये हिमोग्लोबिनची कमतरता ➢ रक्ताच्या गाठी तयार होणे. ➢ रक्ताची मात्रा कमी असणे. ➢ गरजेनुसार प्राणवायू न मिळणे. ➢ वजन घटणे. ➢ सहज संसर्ग होणे. ➢ सतत आजारी असल्यासारखे दिसणे. ➢ चार ते सहा आठवड्यांनी नियमित रक्त देण्याची गरज पडणे. ➢ वयाच्या तिसऱ्या ते सहाव्या महिन्यात वरील लक्षणे दिसून येतात.
		१९) हिमोफिलिया (Hemophilia)	➢ जखम झाल्यास रक्तस्राव अधिक होणे. ➢ रक्तस्राव बंद न होणे. ➢ रक्तस्राव झाल्याने शरीराचा भाग फुगणे.
		२०) सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)	➢ रक्ताचे प्रमाण कमी असणे. ➢ रक्ताच्या कमतरतेमुळे शरीराचे अवयव खराब होणे. ➢ हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होऊन थकवा जाणवणे. ➢ रक्तपेशींचा आकार इंग्रजी अक्षर C प्रमाणे होणे. ➢ सांधे दुखणे.
८)	बहुविकलांगता	२१) बहुविकलांगता (Multiple Disabilities)	➢ एका पेक्षा जास्त दिव्यांगत्व
९)	इतर आजार	Epidermolysis Bullosa	सद्यःस्थितीमध्ये या प्रकारातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र उपलब्ध होत नाही, परंतु १६ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार यांना शैक्षणिक सवलती मिळू शकतात.
		HIV	
		Diabetes mellitus type	
		Pediatric cancer survivors	
		Cancer affected children on maintenance therapy	
		Children with epilepsy	
		Children with ADHD (Attention deficit Hyperactivity Disorder)	
		Children with neurological wilson's disease	

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण :

समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत वय वर्षे ० ते १८ वयोगटातील विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून यु-डायस प्लस प्रणालीमध्ये दरवर्षी अद्ययावत करणे ही नियमित प्रक्रिया आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शाळा सुरू झाल्यावर पहिल्या १५ दिवसांत विशेष शिक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रात पायाभूत, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक स्तरावर असलेली, शाळेत दाखल नसलेली व शाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंद स्वतंत्रपणे ठेवावी. महिला व बालविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांच्याशी समन्वय साधून कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी सर्वेक्षणातून सुटणार नाही याची खात्री करावी, तसेच सर्वेक्षणातून शोधलेल्या विद्यार्थ्यांची माहिती जिल्हा स्तरावरून पुरविण्यात आलेल्या प्रपत्रात व गुगल लिंकमध्ये अद्ययावत करावी.

सर्वेक्षणात आढळून आलेले शाळाबाह्य विद्यार्थी यांना तात्काळ जवळच्या शाळेत वयानुरूप प्रवेशित करून, मुख्याध्यापक यांच्याशी समन्वय साधून यु-डायस प्लस प्रणालीमध्ये त्यांची नोंद अद्ययावत करावी. शाळा रिपोर्ट कार्ड काढून सर्व विशेष गरजाधारक विद्यार्थी नोंदीची पुनःपडताळणी करावी.

सर्वेक्षण झालेल्या अथवा नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन विशेष शिक्षकांनी पूर्ण करून त्यांच्या शिकण्याच्या पद्धतीनुसार त्यांचे विविध अध्ययनशैलीमध्ये वर्गीकरण करावे.

१) सर्वेक्षण करत असताना केंद्रशासनाच्या प्रशस्त ॲपमधील पडताळणी सूचीचा वापर करावा. सदर पडताळणी सूची पाहण्यासाठी QR कोडचा वापर करावा.

२) सर्वेक्षण बाबतीत दि. २३ जून, २०२२ चे शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण हा शासन निर्णय पाहण्यासाठी QR कोडचा वापर करावा.

मूल कसे शिकते?

आपण ज्ञान ग्रहण करण्यासाठी पंचेज्ञानेंद्रियांचा वापर करतो.

१) डोळे (८३%) : दृश्य संवेदना
२) कान (११%) : श्राव्य संवेदना
३) त्वचा (३.५%) : स्पर्श संवेदना
४) नाक (५%) : गंध संवेदना
५) जीभ (१.५%) : चव संवेदना



Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

संवेदना → उपलब्ध ज्ञानेंद्रियाद्वारे अनुभव, ज्ञान व माहिती ग्रहण करणे. एखादे ज्ञानेंद्रिय बाधित असले तरी उर्वरित ज्ञानेंद्रियाद्वारे संवेदना पोहोचवता येते. उदाहरणार्थ, बालक मोर किंवा मोराचे चित्र दृष्टिदोषामुळे प्रत्यक्ष पाहू शकत नसले, तरी ऐकून समजून घेण्याचा प्रयत्न करू शकते. द्विमितीय आकृत्या उठावदार बनवल्यास स्पर्श संवेदनेतून असे बालक आकार समजून घेऊ शकते.

अवधान → विशिष्ट कृतींवर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता. एकाग्रतेची क्षमता म्हणजेच 'अवधान'.

मेंदूला एखाद्या विशिष्ट ज्ञानेंद्रियाकडून येणारे संदेश बाजूला टाकण्याची किंवा त्याच ज्ञानेंद्रियाचे संदेश जास्त प्रमाणात ग्रहण करण्याची क्षमता असते. सर्व ज्ञानेंद्रियांकडून मिळणारे संदेश एक प्रकारे काहीसे दाबून ठेवले जातात. आपण आपल्याला पाहिजे तेव्हा हव्या त्या ज्ञानेंद्रियांच्या संदेशाकडे जास्त लक्ष देऊ शकतो. म्हणजेच आपल्याला त्याक्षणी जी गोष्ट महत्त्वाची वाटते किंवा रंजक वाटते त्या गोष्टीकडे आपण जास्त लक्ष देत असतो.

आकलन → योग्य संवेदनेमुळे बालकाचे लक्ष (अवधान) वेधले जाते आणि त्यामुळे माहितीचे आकलन होते. आवश्यकतेनुसार दृष्टी, श्रवण, कृती असे योग्य माध्यम मिळाल्यास बालक अधिक सक्रियपणे सहभाग घेते आणि तेव्हाच त्याला त्या माहितीचा अर्थ लक्षात येऊ लागतो. उदा. विज्ञानातील प्रयोग करताना शाब्दिक वर्णन व उपकरण हाताळणे, प्रत्यक्ष कृती करून घेणे इत्यादी बाबी बालकांच्या गरजेनुसार केल्यास प्रयोग समजतो.

प्रतिमा → माहितीचे योग्य आकलन झाल्यानंतर संबंधित बाबींची स्पष्ट प्रतिमा बालकांच्या मनात तयार होते. जसे की, भूगोल शिकवताना बालकाला योग्य संवेदनांमार्फत माहिती व अनुभव मिळाल्यास त्याचा सहभाग वाढतो. भूगोल विषयातील डोंगर प्रत्यक्ष अथवा मॉडेल, चित्र दाखवल्यास त्यांच्या मनात संबंधित डोंगराची प्रतिमा तयार होते.

प्रतीकीकरण → मनात एखाद्या माहितीची प्रतिमा, रचना स्पष्ट झाल्यास त्या माहितीचे वास्तविक स्वरूप बालकांच्या पूर्ण लक्षात येते. जसे की, नकाशावाचन करताना नकाशातील चिन्हे मुलांच्या लक्षात आल्याने नकाशावाचन मुलास समजते. उदा. शाळा, हॉस्पिटलचा नकाशा.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

संकल्पना → बालकांच्या गरजा व क्षमतानुरूप संवेदना, अवधान, आकलन, प्रतिमा, प्रतीकीकरण या पायऱ्या योग्य पद्धतीने पूर्ण झाल्यास बालकांची संबंधित विषयातील 'संकल्पना' स्पष्ट होते. जसे की, जलचक्र या संकल्पनेच्या स्पष्टतेसाठी शाब्दिक वर्णन, प्रत्यक्ष अनुभव, चित्र, व्हिडिओ इत्यादी माध्यमांतून पाण्याची वाफ होणे, वाफेचे ढग बनणे व त्याद्वारे पाऊस पडणे ही संपूर्ण प्रक्रिया बालक समजू शकेल.

प्रत्येक मूल शिकू शकते जेव्हा...

१) प्रत्येक मुलाची ज्ञानेंद्रियांची क्षमता ओळखाल.

२) मुलांच्या क्षमतेनुसार अध्ययन अनुभव द्याल.

३) मुलांच्या अध्ययनगतीला योग्य ती चालना द्याल.

४) मुलांमधील सुप्त गुणांना वाव द्याल.

५) अध्ययन-अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा योग्य तो वापर कराल.

६) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत मुलांच्या शैलीनुसार उत्स्फूर्तपणे सहभाग घेण्याची संधी उपलब्ध करून द्याल.

७) मुलांमधील उर्वरित संवेदनांचा अध्ययन-अध्यापनात वापर करून घ्याल.

अध्ययनशैली :

वर प्रतिपादित केल्यानुसार उपलब्ध ज्ञानेंद्रियाद्वारे योग्य संवेदना मिळाल्यानंतरच बालकांची शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. ज्या ज्ञानेंद्रियाद्वारे बालक जास्त संवेदना प्राप्त करते, त्याआधारे बालकाची अध्ययनशैली निश्चित होते. अर्थातच अध्ययनशैली म्हणजे, बालकाची ज्ञानेंद्रियाद्वारे शिकण्याची पद्धत.

वैद्यकीय दृष्टिकोनातून २१ दिव्यांग प्रकार असून, शैक्षणिक दृष्टिकोनातून मुलांच्या शिकण्याच्या पद्धतीनुसार मुख्यत्वे चार अध्ययनशैली दिसून येतात.

१) **दृश्य अध्ययनशैली :** दृश्य अध्ययनशैली म्हणजे, डोळ्यांनी पाहून शिकणारे अध्ययनार्थी. वर्गामध्ये कर्णदोष असलेले अध्ययनार्थी या अध्ययनशैलीचा वापर करतात. या शैलीचा वापर करताना शिक्षक शब्द, अक्षर व वाक्य-चित्रकार्ड यांचा वापर करू शकतात. याशिवाय मोबाइल, संगणक, प्रोजेक्टर व शिक्षकांचे सादरीकरण आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा वापर करून दृश्य अध्ययनशैलीच्या माध्यमातून अध्ययनार्थी यांचे प्रभावी अध्ययन घडून आणता येते.

२) **श्राव्य अध्ययनशैली :** श्राव्य अध्ययनशैली म्हणजे, कानाने ऐकून शिकणारे अध्ययनार्थी. वर्गामधील अंध किंवा दृष्टीदोष असलेले अध्ययनार्थी या शैलीचा वापर करतात. अध्ययन-अध्यापनात या शैलीचा

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

वापर करताना परिस्थितीनुसार टेपरेकॉर्डर, मोबाइल, संगणक, प्रोजेक्टर, आवाज, विविध संगीत साहित्य इत्यादी साहित्यांचा वापर करता येतो.

३) **स्पर्श अध्ययनशैली :** स्पर्श अध्ययनशैली म्हणजे, स्पर्शाच्या माध्यमातून अध्ययन करणारे अध्ययनार्थी. वर्गामधील दृष्टिदोष व अंध, बधिरांध असलेले अध्ययनार्थी या अध्ययनशैलीचा वापर करतात. प्रत्यक्ष वस्तू आणि स्पर्शाच्या माध्यमांतून विविध अनुभव देता येतात. उदा. डावा–उजवा, पुढे–मागे.

४) **बहु अध्ययनशैली :** एकापेक्षा अधिक ज्ञानेद्रिंयांचा किंवा सर्व ज्ञानेद्रिंयांचा वापर करून विद्यार्थ्यांचे अध्ययन होते. वाचादोष, अल्पदृष्टी, अध्ययन अक्षमता, बोधात्मक अक्षमता, अस्थिव्यंग, बहुविकलांग, मानसिक आजार, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्न, प्रतिभावंत विद्यार्थी हे सर्व बहु अध्ययनशैलीचा वापर करतात.

वर्गशिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययन–अध्यापन व मूल्यमापन करताना त्याच्या वैद्यकीय दृष्टिकोनातून असणाऱ्या दिव्यांग प्रवर्गाचा विचार न करता त्यांच्या अध्ययनशैलीनुसार त्याचे अध्ययन–अध्यापन व मूल्यमापन करावे.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

५. असुरक्षित भावनेकडून सुरक्षित भावनेकडे

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम–२००९ तसेच दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम–२०१६ नुसार, जवळच्या शाळेत मोफत प्रवेश व शाळा परिसरात अडथळाविरहित वातावरण निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे विशेष गरजाधारक बालके शाळेत प्रवेशित होऊन परिसरात मुक्त संचार करत आहेत. अध्ययन–अध्यापन प्रक्रिया व सहशालेय उपक्रमात समान संधी उपलब्ध झाल्याने त्यांचे शिकणे सुलभ झाले आहे, परंतु या विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या घटकांच्या मनातील भीती, गैरसमज, माहितीचा अभाव, उदासीनता व अतिकाळजी म्हणजे त्यांच्या मनातील असुरक्षित भावना होय. या असुरक्षित भावनांना सुरक्षित भावनेत रूपांतरीत करण्याची गरज आहे.

संबंधित मूल शाळेत जाईल काय? अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचा लाभ त्याला घेता येईल काय? त्याचबरोबर त्याचे आरोग्य, स्वावलंबन, दैनंदिन क्रिया, संवादकौशल्य इत्यादी सगळ्याच बाबींबद्दल भावंडे, सवंगडी, पालक, शिक्षक, समाज यांच्यात मोठ्या प्रमाणात असुरक्षित भावना तयार होते. या असुरक्षित भावनाच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेत आव्हाने उभी करतात, म्हणूनच या असुरक्षित भावनांची तात्काळ यादी करून, त्याचे विश्लेषण करून, प्रत्येक घटकाचे स्वतंत्रपणे तथा एकत्रित समुपदेशन करण्यात यावे. प्रत्यक्ष अनुभवातून, कृतीतून वेळोवेळी प्रोत्साहन देऊन योग्य माहिती उपलब्ध करून या असुरक्षित भावनांचे तात्काळ निराकरण झाल्यास या विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे दूर होतील. यासाठी शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक घटकाने (पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विशेषतज्ज्ञ व विशेष शिक्षक) आपली जबाबदारी समजून समुपदेशन करावे.

असुरक्षित भावना व त्यावरील उपाय :

अ. क्र.	घटक	असुरक्षित भावना	उपाययोजना
१)	**पालक**	१) माझे मूल हे विशेष आहे हे मान्य नसणे.	विशेष गरजा असणाऱ्या मुलांमधील विकासात्मक विलंबता पालकांच्या लक्षात आणून देणे व योग्य वैद्यकीय तज्ज्ञांकडे जाण्याचा सल्ला देणे.
		२) माझे मूल स्वतःची कामे स्वतः करू शकेल काय?	उर्वरित ज्ञानेंद्रियांचा उपयोग करून, सततचा अनुभव, सराव देऊन बालकांच्या स्वावलंबनाबाबत कृतिशील समुपदेशन करणे.
		३) परिसरातील शाळा माझ्या मुलाला प्रवेश देईल का?	समग्र शिक्षा अभियानातील समावेशित शिक्षणाची माहिती, शिक्षण हक्क अधिनियम (RTE २००९, कलम २६) तसेच दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम (RPWD 2016 Act) यातील तरतुदींची माहिती करून देणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/ Chapter 5 /Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	घटक	असुरक्षित भावना	उपाययोजना
		४) माझे मूल घरापासून शाळेपर्यंत ये-जा करू शकेल काय?	समावेशित उपक्रमाकडून गंभीर स्वरूपातील तसेच शारीरिक हालचालींमध्ये समस्या असणाऱ्या बालकांना प्रवास, मदतनीस भत्ता तसेच सुलभ साहित्य मोफत उपलब्ध करून दिले जाते.
		५) माझे मूल शाळेत सहजपणे वावरू शकेल काय?	शाळेमध्ये समावेशित शिक्षण उपक्रमाकडून रॅम्प, हँडरेल, चेकर टाईल, बिपर, लुप इंडक्शन सिस्टिम, कमोड टॉयलेट, पिण्याच्या पाण्याची मुलानुरूप योग्य व्यवस्था, तळमजल्यावर वर्गव्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.
		६) माझे मूल इतर मुलांसारखे शिकेल काय?	समावेशित शिक्षण उपक्रमातून वर्गात बसण्यासाठी मॉडीफाय चेअर, सिटींग कॉर्नर, टेबललँप, बसकी मॉडीफाय डेस्क, लो-व्हीजन टेबल, लो-व्हिजन कीट, ब्रेल कीट, ब्रेलर, ब्रेल बूक, श्रवणयंत्र, चष्मा इत्यादी आवश्यक शैक्षणिक साहित्य मोफत पुरविण्यात येते. बालकांच्या गरजेनुरूप वर्गशिक्षकांना प्रशिक्षण, आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात येते.
		७) विविध परीक्षांमध्ये माझ्या मुलाच्या विशेष गरजांबाबत स्वतंत्र विचार केला जाईल का?	विशेष गरजाधारक बालकांसाठी परीक्षा पद्धतींबाबत असलेले शासन निर्णय, सवलती, योजना यांची माहिती पालकांना करून द्यावी.
		८) माझे मूल स्वावलंबी कसे होईल?	बालकाला दिव्यांग प्रवर्गनिहाय व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. भविष्यासाठी आवश्यक असलेल्या समाजकल्याण, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, दिव्यांग मंत्रालय इत्यादी विभागांकडून तसेच स्वयंसेवी संस्थांकडून लाभ दिले जातात.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/ Chapter 5 /Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	घटक	असुरक्षित भावना	उपाययोजना
२)	**भावंडे**	१) माझे विशेष भावंड माझ्यासोबत कसे खेळेल?	सर्वसामान्य बालकांप्रमाणे सर्व खेळ खेळू शकतो त्यासाठी त्याला प्रत्यक्ष अनुभूती, विविध उदाहरणे, खेळाचे ऑडिओ, व्हिडिओ यांद्वारे तसेच खेळाच्या साहित्यात अनुकूलित बदल करून आपल्या भावंडाबाबत कसे खेळता येईल याबाबतचे मार्गदर्शन भेटीदरम्यान करणे. याबाबत उद्बोधन सत्र शाळांमध्ये घेणे.
		२) माझ्या विशेष भावडांची माझ्यापेक्षा अधिक काळजी/लाड केले जातात.	विशेष बालकांची अक्षमता, त्यांची माझ्यापेक्षा अधिक काळजी, गरजा इत्यादींची सोप्या भाषेत भावंडाला जाणीव करून देणे.
३)	**सवंगडी**	१) मी विशेष गरजा असणाऱ्या मुलाशी/मुलीशी मैत्री कशी करू?	प्रत्यक्ष बालकाच्या क्षमतेनुसार त्याच्याशी संवाद साधणे, कुठलाही भेदभाव न करणे, आवश्यकतेनुसार मदत करणे या कृतींमधून विशेष बालकाशी मैत्री होऊ शकते हे पटवून देणे.
		२) सांघिक कृती/खेळताना विशेष बालकाला आम्ही कसे सामावून घेऊ?	सर्वसमावेशक सांघिक खेळ, कृतीची निवड करून सर्वांना समान संधी दिली जाते. उदा., सतीश हा दृष्टिहीन प्रवर्गातील विद्यार्थी असून, क्रिकेट खेळताना आवाज करणारा चेंडू, पत्ते खेळताना ब्रेल अंकित पत्ते यांचा वापर केल्यास खेळ व कृती करणे सहज शक्य होईल हे दाखवून देणे.
		३) वर्गात असताना मी विशेष बालकाला कशी मदत करू?	दिव्यांग प्रकारानुसार बालकाची विशेष क्षमता व गरज लक्षात घेऊन ही मदत केली जाईल. उदा. संदीप हा कर्णबधिर प्रवर्गातील विद्यार्थी आहे अशा वेळी मौखिक स्वरूपात असणाऱ्या सूचना त्याला करपल्लवी (साईन लँग्वेज/खुणा) करून लिखित स्वरूपात देईल.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/ Chapter 5 /Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	घटक	असुरक्षित भावना	उपाययोजना
४)	**वर्गशिक्षक**	१) सर्वांसोबत विशेष गरजा असणाऱ्या बालकांना कसे अध्यापन करू?	समावेशित शिक्षणाची संकल्पना मुलाच्या गरजेनुरूप अध्ययनशैली याची जाणीव करून देणे. आवश्यकतेनुसार प्रशिक्षण उपलब्ध करून देणे. प्रत्यक्ष नमुना पाठ घेऊन अनुभव देणे. अनुकूलित साहित्य-साधनांचा वापर करून घटक सोपा करण्याचे तंत्र अवगत करून देणे.
		२) इतर मुलांपेक्षा विशेष बालकास जास्त वेळ द्यावा लागेल का?	वर्गात केली जाणारी कृती, घेतला जाणारा पाठ अनुकूलित साहित्य-साधनांचा वापर हा सर्वसमावेशक असल्यास जास्तीचा वेळ हळूहळू कमी केला जाऊ शकतो हे प्रत्यक्ष कृतीतून शिक्षकांना लक्षात आणून द्यावे.
		३) विशेष मुलास वर्गात कसे सामावून घेऊ?	अनुकूलित बैठकव्यवस्था उपलब्ध करून देणे, बालकाशी स्वतःहून संवाद साधणे, दिव्यांगत्वाचा उल्लेख न करता बालकाच्या नावाने संबोधित करणे, वर्गातील सहाध्यायीसोबत त्याची मैत्री होईल यासाठी प्रोत्साहन देणे.
		४) माझ्या वर्ग अध्यापनामध्ये विशेष बालकामुळे अडथळा निर्माण होईल का?	अशा वेळी शिक्षकांना दिव्यांग बालकाच्या इतर क्षमतांची जाणीव निर्माण करून देणे. समावेशित शिक्षणातील तंत्रपद्धती लक्षात आणून देणे. प्रशिक्षण समुपदेशन याचा अवलंब करणे.
		५) सहशालेय उपक्रमात विशेष बालकांना कसे सामावून घ्यावे?	विशेष बालकांमधील सुप्त कलागुण ओळखून त्याप्रमाणे संधी उपलब्ध करून देणे. सवंगड्याच्या मदतीने सांघिक कृतीमध्ये समान संधी देणे. विशेष बालकाला विविध कृतींमध्ये सतत प्रोत्साहन देणे.
		६) विविध अभिलेख्यांमध्ये विशेष गरजाधारक बालकांच्या नोंदी कशा घ्याव्यात?	विशेष गरजाधारक बालकांच्या नोंदी नियमित घ्याव्यात. नोंदी घेताना विद्यार्थ्यांचा अनुभव व्यक्त करण्याची समान संधी द्यावी. तीव्र/अतितीव्र मुलांसाठी विशेष शिक्षक/विशेष तज्ज्ञ यांच्या मदतीने दैनंदिन क्रियाकौशल्य,

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/ Chapter 5 /Proof -VIII/15-11-2024/D

अ. क्र.	घटक	असुरक्षित भावना	उपाययोजना
			सामाजिक कौशल्य, वर्तन व शैक्षणिक बाबी इ. संबंधित चेकलिस्ट करावी.
		७) इतर बालकांसमवेत विशेष बालकांचे मूल्यमापन कसे करावे ?	विशेष गरजा असणाऱ्या समावेशित शिक्षणांतर्गत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाबाबत माहिती दिलेली असून वेळोवेळी विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षकांच्या भेटीदरम्यान मार्गदर्शन केले जाते. विशेष गरजा असणाऱ्या बालकांना दैनंदिन गृहपाठ देण्यात यावा तो तपासण्यात यावा, मासिक, त्रैमासिक, सहमाही, वार्षिक परीक्षेला बसवून गुणदान करण्यात यावे.
		८) प्रत्यक्ष विविध परीक्षांमध्ये विशेष गरजाधारक मुलांना कसे सहभागी करून घ्यावे ?	१६ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये विविध प्रकारच्या दिव्यांग प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या सवलती व सुविधांची परीक्षेदरम्यान अंमलबजावणी करावी. दहावी व बारावी या परीक्षांसाठी बोर्डाशी संपर्क साधून मार्गदर्शक सूचना वेळोवेळी प्राप्त करून घेण्यात येतात. परीक्षेसाठी शाळेतून लेखनिक उपलब्ध करून घेता येईल. याबाबत पर्यवेक्षीय यंत्रणेकडून माहिती घ्यावी. विशेष शिक्षक/ विशेषतज्ज्ञ यांचे आवश्यकतेनुसार सहकार्य घ्यावे याबाबत त्यांना अवगत करावे.
५)	समाज	१) विशेष बालकांप्रति समाज म्हणून आपले वर्तन कसे असेल ?	समाजाने विशेष बालकांशी सुसंवाद ठेवावा. दिव्यांगत्वावरून भेदभाव करू नये. चिडवू नये. व्यक्ती म्हणून त्याचे सामाजिक स्थान अबाधित ठेवावे. शासकीय / सामाजिक उपक्रमांमधून जाणीवजागृती मोठ्या प्रमाणात केली जावी.
		२) सामाजिक उपक्रमांमध्ये विशेष बालक सहभागी कसे होईल ?	सामाजिक उपक्रम, सभा, बैठका, गावातील कार्यक्रम, सण, उत्सव, समारंभ, लग्नकार्य इत्यादींमध्ये विशेष बालकांना व त्यांच्या पालकांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/ Chapter 5 /Proof -VIII/15-11-2024/D

६. विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनामध्ये येणारी आव्हाने

समावेशित शिक्षणाच्या संकल्पनेनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना समतामूलक वातावरणामध्ये शिक्षण देणे व त्यांचा सर्वांगीण विकास इतर सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे होणे अपेक्षित आहे. या प्रक्रियेमध्ये कुटुंब, समाज, शाळा, सवंगडी या सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे.

दिव्यांग मुलांना वाढविताना, त्यांचे संगोपन करताना कुटुंब व शाळा या ठिकाणी असणाऱ्या साहाय्यभूत प्रणाली म्हणून कर्तव्य बजावणाऱ्या व्यक्तींना या प्रकारच्या विद्यार्थ्यांबाबत काही चुकीचे समज, भीती किंवा आव्हाने यांचा सामना करावा लागतो. ही भीती असुरक्षितता वाढवते त्यामुळे दिव्यांग बालकांचे संगोपन व शिक्षण याबाबतीत अडथळा निर्माण होतो. तो दूर करण्यासाठी प्रथम आपण विविध घटकांना येणारी आव्हाने कोणती याचा विचार करणे गरजेचे आहे.



पालक

१) माझे मूल शाळेत प्रवेश कसा घेईल?

२) माझे मूल शाळेत प्रवेश केल्यानंतर वर्गापर्यंत कसे जाईल?

३) रॅम्प, लिफ्ट, विशेष मुलांकरिता स्वच्छतागृहे आणि इतर आवश्यक भौतिक सुविधा शाळेत उपलब्ध असतील का?

४) दिव्यांग मुलांसाठी योग्य प्रशिक्षित, विशेष शिक्षकांची उपलब्धता असेल का?

५) ब्रेल, श्रवणयंत्र किंवा इतर साहाय्यभूत साधने व तंत्रज्ञानाची उपलब्धता असेल का?

६) सुरक्षित आणि अनुकूल वाहतूक साधनांची उपलब्धता नसणे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

७) माझ्या पाल्याचा इतर मुलांकडून स्वीकार होईल का?

८) दिव्यांग मुलांसाठी समायोजित केलेले पाठ्यक्रम नसणे.

९) शाळा आणि इतर विद्यार्थ्यांच्या पालकांचे सहकार्य मिळेल का?

१०) माझ्या पाल्यासाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील का?

भावंडे/सवंगडी :

१) दिव्यांग भावंडावरच अधिक लक्ष दिले जाते.

२) दिव्यांग भावंडाच्या स्थितीमुळे भावनिक तणाव जाणवतो.

३) दिव्यांग बालकाची देखभाल करण्याची जबाबदारी इतर भावंडावर/सवंगड्यावर येते.

४) कुटुंबातील इतर मुलांच्या गरजांची पूर्तता होऊ शकत नाही.

५) दिव्यांग बालकामुळे त्याचे सवंगडी व भावंडे यांच्या शालेय शिक्षणावर परिणाम होऊ शकतो.

६) दिव्यांग बालकांच्या भावंडांना सहकारी/मित्रपरिवाराचा आधार कमी मिळतो.

७) घरातील तणावपूर्ण वातावरणामुळे मानसिक त्रास

८) पालकांकडून अधिक अपेक्षांचा दबाव येणे.

९) समाजातील लोकांच्या प्रतिक्रिया सहन कराव्या लागतात.

१०) घरातील आर्थिकस्थितीची चिंता

शाळा/मुख्याध्यापक यंत्रणा :

१) शालेय प्रार्थना व इतर उपक्रमांमध्ये सहभाग कसा घेईल?

२) वर्गातील दैनंदिन वर्ग आंतरक्रियांमध्ये सहभाग कसा असेल?

३) खेळामध्ये, सहशालेय उपक्रमांमध्ये सहभाग कसा असेल?

४) मध्यान्ह भोजनात सहभाग कसा घेईल?

५) त्यांच्या अध्ययन अनुरूप दैनंदिन परिसरात आवश्यक असणारी साहाय्यभूत साधनांची शाळेत कशी उपलब्धता करता येईल?

सहाध्यायी :

१) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त गरजांमुळे इतर मुलांचे लक्ष विचलित होऊ शकते.

२) शिक्षणाची गती कमी होणे किंवा बदलणे.

३) शिक्षणाच्या संसाधनांचा असमान वापर.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

४) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या स्थितीमुळे भावनिक त्रास.

५) वर्गात गोंधळ वाढणे.

६) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजांना समजून घेण्यात अडचण येणे.

७) संधींची असमानता जाणवणे.

८) वर्ग गटा–गटांमध्ये विभागला जातो.

९) भावनात्मक सहयोगाची कमी

विशेष शिक्षक :

१) उपक्रमाव्यातिरिक्त दिली जाणारी इतर कामे.

२) भौगोलिक परिस्थितीनुसार शाळेचे अंतर.

३) पालकांकडून मिळणारा अल्पप्रतिसाद.

४) शैक्षणिक संसाधनांचा अभाव.

५) प्रवर्गनिहाय मनुष्यबळाची कमी.

६) प्रत्येक व प्रवर्गनिहाय विद्यार्थी मूल्यमापन करणे संदर्भात अडचणी.

७) विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात विशेष शिक्षकांची संख्या.

८) सहकारी विशेष शिक्षक यांच्याशी समन्वयाची कमतरता.

९) सामान्य शिक्षकांना देण्यात येणारी प्रशिक्षणे ही विशेष शिक्षकांना मिळत नाहीत.

१०) नियमित प्रशिक्षणाच्या अभावाने वर्गशिक्षकांना मार्गदर्शन करताना, मूल्यमापन संकल्पना स्पष्ट करणेबाबत आव्हाने.

११) अध्ययन–अध्यापन प्रक्रियेसाठी व आनुषंगिक कामकाजासाठी आवश्यक डिजिटल साधनांची अनुपलब्धता.

१२) गृह मार्गदर्शनाच्या वेळी वेगवेगळ्या कारणाने पालक उपलब्ध नसणे.

१३) गृह मार्गदर्शनाच्या वेळी दिलेल्या कृतींच्या सरावात पालकांचे सातत्य नसणे.

१४) कार्यक्षेत्रात विविध भेटींसाठी आवश्यक दळणवळण साधनांची उपलब्धता नसणे.

वर्गशिक्षक :

१) श्रवणदोष किंवा वाचादोष असणारे विद्यार्थी यांच्याशी संवाद साधण्यास अडचण.

२) विशेष शैक्षणिक साहित्याची उपलब्धता नसणे.

३) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आवश्यकतांनुसार वेळेचे व्यवस्थापन करण्यात अडचण.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

४) शिक्षकांना विशेष शैक्षणिक प्रशिक्षणाचा अभाव.

५) विद्यार्थ्यांच्या असमर्थतेमुळे त्याचे मनोबल कमी होणे.

६) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिकवण्यासाठी आवश्यक साहित्य साधनांची कमतरता.

७) वर्गातील शैक्षणिक आणि सामाजिक समायोजनाची अडचण.

८) गटकार्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग कमी असणे.

९) विद्यार्थ्यांच्या योग्य मूल्यांकनाची अडचण

१०) शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांचा तणाव वाढणे.

११) इतर शिक्षक किंवा सहकाऱ्यांकडून अपेक्षित मदत न मिळणे.

१२) दिव्यांग विद्यार्थ्यांना संकल्पना समजावून देण्यास जास्त वेळ द्यावा लागतो.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या संदर्भात वरील सर्व आव्हाने येतात. याशिवाय शिक्षकांना वर्ग अध्ययन–अध्यापनाच्या वेळेस विविध अध्ययनशैलीच्या विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना अध्यापन व मूल्यमापन करताना विषयनिहाय खालील आव्हानांना तोंड द्यावे लागते.

उदा.

- भाषा विषयाचे अध्यापन करताना व्याकरणाच्या संकल्पना.
- मूर्त व अमूर्त संकल्पना
- आकारिक मूल्यमापन
- अनुकूलित प्रश्नपत्रिका
- मौखिक व प्रात्यक्षिक परीक्षा आयोजन
- पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान

दिव्यांग मुलांचे समावेशन करताना वरील सर्व वेगवेगळी आव्हाने येत असली, तरी या आव्हानांवर उपाययोजना केल्यास दिव्यांग मुलांचे समायोजन करता येते.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/D

७. वर्ग अध्ययन-अध्यापन पद्धती व तंत्रे

अध्यापनाची व्याख्या, स्वरूप, अध्यापकाचे कार्य इत्यादी संकल्पना प्राचीन काळापासून सतत बदलत आल्या आहेत. आधुनिक मानसशास्त्राच्या दृष्टीनेही प्रेरणा व मार्गदर्शन हे अध्यापनाचे सार होय. निवेदन, चर्चा, विवरण व मार्गदर्शन इत्यादींचा समावेश असलेली कृती म्हणजे अध्यापन. अध्यापनामध्ये उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्ययन प्रसंगाची योजना, अध्यापन पद्धती आणि उद्दिष्टांच्या साध्यतेसाठी मूल्यमापन या पाचही गोष्टींचा समावेश होतो. संपूर्ण अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत अध्यापन पद्धती हा एक महत्त्वाचा भाग होय.

अध्यापन म्हणजे,

१) आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, एखादी गोष्ट सहज व सोप्या भाषेत समजावून सांगणे म्हणजे 'अध्यापन' होय.

२) 'अध्यापन' म्हणजे, विविध कृतींद्वारे व उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना नवीन असे शिकविणे होय.

३) विद्यार्थ्यांना अनुभवांतून मिळालेल्या ज्ञानाची पद्धतशीर पुनर्रचना करण्यास साहाय्य करणे, म्हणजे 'अध्यापन' होय.

अध्यापन ही अध्ययनास साहाय्य करणारी प्रक्रिया आहे. अध्ययनात सुलभता आणणे, हे अध्यापनशास्त्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

अध्यापन पद्धतीचे दोन प्रकार सांगता येतील–

१) प्रचलित अध्ययन–अध्यापन पद्धती.

२) नावीन्यपूर्ण अध्ययन–अध्यापन पद्धती.

१) प्रचलित अध्ययन–अध्यापन पद्धती :

- **प्रात्यक्षिक/कृतियुक्त अध्यापन पद्धती :** विद्यार्थ्याला प्रत्यक्ष साहित्य हाताळण्यास देऊन अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुलभ करणे. उदा. गणितातील बेरीज–वजाबाकी या क्रिया करताना परिसरातील पाने–फुले, काड्या, दगड, चिंचोके, वर्गातील नाणी, नोटा, मणीमाळ यांचा वापर प्रत्यक्ष देऊन घटक समजावून देणे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

- **कथाकथन अध्यापन पद्धती :** कथेमध्ये घटना असतात. या घटनांना एखाद्या सूत्रानुसार गुंफण्यासाठी कथानक असते. कथानकात पात्रे असतात. वास्तवातल्या माणसासारखीच ही पात्रे चित्रित केलेली असतात. कथा ही बालकांसाठी जगाकडे बघण्याची जणू एक खिडकीच आहे. कथा या आकर्षक, सुंदर, मनोरंजक असल्याकारणाने विद्यार्थ्यांना कथा ऐकणे हे खूप मजेदार वाटते. भावना, हावभाव आणि सचेतन अभिव्यक्तीशी सांगितलेल्या गोष्टी जादुई असतात, आणि प्रसंगी तुमचा श्वास रोखून धरायला लावतात. कथेतील पात्र/प्रसंग मुलांच्या डोळ्यांसमोर उभे राहून त्यांचे भावविश्व समृद्ध होण्यास पोषक ठरते. कथा सांगण्यासाठी पुस्तकांचा वापर केला पाहिजे. पुस्तकांचा आनंद घेण्यासाठी बालकांना वाचता येणे आवश्यक नाही. पुस्तकामधील चित्रे आशयास पुष्टी देतात.

  खालील पायऱ्यांचा अवलंब करून शिक्षक त्यांच्या वर्गात वर्गात कथाधारित अध्ययन वापरण्यास सुरुवात करू शकतात.

  कथाआधारित अध्ययनाच्या पायऱ्या : १) विषयनिश्चिती २) एक कथा तयार करा. ३) उपक्रमांची योजना करा. ४) मल्टीमीडिया समाविष्ट करा ५) तंत्रज्ञानाचा वापर करा. ६) विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन.

- **भूमिकाभिनय/नाट्यीकरण :** पाठातील घटकावर विद्यार्थ्याला एखादी भूमिका देऊन त्यावर अभिव्यक्त व्हावे. उदा. परिसरातील प्राणी, परिसरातील आपले मित्र जसे : पोलीस, डॉक्टर, पोस्टमन, शेतकरी इत्यादी.

- **प्रकल्प पद्धती :** प्रकल्पामुळे मिळणारे शिक्षण हे अनुभवांतून मिळते. प्रकल्प करीत असताना विद्यार्थी आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांचा वापर करीत असल्याने ते अधिक प्रभावी, चिरकाल टिकणारे आणि जोवनोपयोगी असते. विद्यार्थी स्वतः कृती करत असल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास व साहस या गुणांची जोपासना होते. या ठिकाणी जी समस्या द्यायची आहे, ती विद्यार्थ्यांच्या गरजेतून व आवडीनुसार निवडलेली असल्याने, विद्यार्थी ही कृती लक्षपूर्वक करतात आणि अध्ययन सुलभ होते. विद्यार्थी गटागटाने काम करीत असल्याने सामूहिक शिस्त आणि परस्पर सहकार्य या वृत्तींची जोपासना होते.

  प्रकल्पाधारित अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व चिकित्सक कौशल्यांचा विकास होतो. तसेच एकापेक्षा जास्त वेळा मूल्यांकनास संधी मिळते.

  प्रकल्प पद्धतीचे प्रकार :

  अ) निर्मितीप्रधान प्रकल्प : १) सूर्यमालेची प्रतिकृती तयार करणे. २) एखाद्या उपकरणाची रचना करणे.

  आ) आस्वादप्रधान प्रकल्प : १) एखाद्या विशिष्ट विषयावरील आवडते हस्तलिखित, कविता व कथा यांचे संकलन करणे. २) वार्तफलक तयार करणे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

इ) **कौशल्यप्रधान प्रकल्प :** भाषा, कला, क्रीडा या प्रकारांतील कौशल्ये विकसित करता येतात.

ई) **समस्यापूर्ती प्रकल्प :** या प्रकल्पाचा प्रकार आपल्या आजूबाजूला भेडसावणाऱ्या समस्यांशी निगडित आहे. उदा. विविध प्रकारचे प्रदूषण व त्यांवरील उपाय.

ऊ) **संग्रहात्मक प्रकल्प :** टपाल तिकिटे, नाणी, नोटा, पाने-फुले यांचा संग्रह.

२) नावीन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन तंत्र पद्धती :

- **सहाध्यायी अध्यापन पद्धती (Peer-learning) :** या पद्धतीत हेतुपुरस्सर अध्ययनात खूप गती असलेले, मध्यम गती असलेले, आणि कमी गती असलेले विद्यार्थ्यांचे गट करून विद्यार्थ्यांना आंतरक्रियेची संधी दिली जाते. यातून त्यांचे स्वतःचे तसेच गटातील इतरांचे अध्ययन साध्य होते. वर्गात इतर विद्यार्थ्यांसोबत अध्यापनात प्रत्यक्ष कृतीत सहभागी होणे. जसे : कृतियुक्त कविता म्हणताना, गाणी, गप्पा व इतर मुलांच्या तालासुरात ताल धरणे. पाढे व प्रोजेक्ट वर्क, गणितातील साहित्य, वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू वेगळ्या करणे, वर्गीकरण या घटकांचा समावेश करणे.

- **Flipped Classroom पद्धती :** विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार व कौशल्यानुसार वर्गरचना करून घटक शिकविणे. जसे : अध्ययन स्तरामध्ये प्रारंभिक स्तर, शब्द व अक्षर स्तर, परिच्छेद वाचन व समजपूर्वक वाचन यांनुसार गट तयार करून कौशल्यनिहाय अध्यापन करणे. ही एक अध्ययन-अध्यापन पद्धत असून मिश्रित शिक्षणाचा एक प्रकार आहे. या पद्धतीत विद्यार्थ्यांना घरी व शाळेत अध्यापन केला जाणारा अध्यापनविषय संपूर्णपणे वाचन करून येण्यास सांगितले जाते. वाचनानंतर ज्या भागात विद्यार्थ्यांना समजण्यात समस्या निर्माण झाली असेल, तर ती समस्या शाळेत वर्गअध्यापनाच्या वेळी विषय शिक्षकांमार्फत सोडवण्यात येते. परिणामतः विद्यार्थ्यांची अध्ययन-अध्यापनातील व्यस्तता वाढवून शैक्षणिक व दर्जा/गुणवत्ता वाढ होण्यास मदत होते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

ही एक विद्यार्थिकेंद्रित अध्यापन पद्धत असून याद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडण्यास मदत होते. या पद्धतीत विद्यार्थी विविध अध्ययनस्रोतांचा वापर करत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सकवृत्ती वाढीस लागते. विषयांचे सखोल ज्ञान प्राप्त झाल्यामुळे तो वर्गमित्रांसोबत झालेल्या विषयावर विस्तृत चर्चा करण्यास समर्थ होतो.

- **संवेदनात्मक अध्यापन पद्धती (Stimulated Method) :** विद्यार्थी माहिती ग्रहण करतो/ समजून घेतो व शिकतो. उद्दिपकामुळे होणारे चेतक बदल ज्यामध्ये त्यांच्या अध्ययनशैलीला योग्य वळण मिळते. विद्यार्थी त्या अध्ययनशैलीचा वापर करून अध्ययनातील बारकावे योग्य प्रकारे समजू शकतात.



दृक अध्ययन अनुभव : शब्द चिठ्ठी, चित्रकार्ड, वस्तूंचे मॉडेल्स, गंध, चव, स्पर्शज्ञानेंद्रिय, विकासाच्या कृती, व्हिडिओ व प्रतिकृती यांचा वापर.

श्राव्य अध्ययन अनुभव : ऑडिओ क्लिप, चित्रवर्णन, कविता, प्रसंगाचे रसभरीत वर्णन, वस्तू व मॉडेल्स यांचे वर्णन.

गंध व चव अध्ययन अनुभव : विविध फुले, फळे, औषधे, विविध चवींचे पदार्थ यांचा अध्ययन–अध्यापन अनुभवांमध्ये वापर.

स्पर्श अध्ययन अनुभव : उठावदार अक्षरे, आकृती, अंक, प्रत्यक्ष वस्तूचा वापर.

- **चर्चात्मक अध्यापन पद्धती :** विद्यार्थ्यांना गटचर्चा करायला सांगून, त्यावर स्वतःचे मत व्यक्त करण्यास सांगितले जाते. उदा. वनस्पतींचे प्रकार, मोबाइलचा वाढता वापर योग्य की अयोग्य, पावसाचे महत्त्व; ज्यामध्ये विद्यार्थी इतरांचे मत जाणून योग्य व अयोग्य बाबींचा ऊहापोह करून दैनंदिन जीवनात उपयोजन करतात. चर्चापद्धत ही विचाराने परिपक्व गटास उपयुक्त ठरते. चर्चा करण्यासाठी विद्यार्थ्यांना आशयासंदर्भात पुरसे पूर्वज्ञान असते ते स्वत:चे विचार व स्वतःची बाजू आत्मविश्वासाने मांडू शकतात. चर्चापद्धत ही इतिहास, भूगोल व भाषा विषयांच्या अध्यापनासाठी उपयुक्त ठरते. शिक्षक विषयांच्या अनुषंगाने गटचर्चा, पथकचर्चा, संवाद या कृतींमुळे विद्यार्थ्यामध्ये आंतरक्रिया वाढतात व त्यांतून सहकार्याची भावना निर्माण होते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

- **खेळणी आधारित अध्ययन (Toy Based Learning) :** हा खेळ आधारित अध्यापन पद्धतीचा महत्त्वाचा घटक आहे. लहान बालके प्रत्यक्ष अनुभवांतून शिकतात आणि प्रत्यक्ष वस्तूंबरोबर काम करतात. ते प्रयत्न करतात, शोध घेतात व शिकतात. वर्गातील वातावरणातून खेळण्यांशी खेळण्याची आणि ती हाताळताना शोध घेण्याची भावना जोपासली पाहिजे. प्रत्येक बालकाच्या परिसरात अनेक स्थानिक खेळणी उपलब्ध असतात. याचा उपयोग अध्यापन आणि अध्ययनासाठी महत्त्वाचा स्रोत म्हणून केला पाहिजे. खेळणी साधी असोत किंवा क्लिष्ट त्यात बालकांसाठी शिकण्यायोग्य काही ना काही असतेच. जेव्हा बालक एखादे खेळणे हातात धरते आणि ते हाताळते तेव्हा त्यांच्या कारककौशल्यांचा सराव आपोआप होतो. हस्त–नेत्र–(Eye Hand co-ordination)समन्वय दृढ होतो. ज्या खेळण्यांमुळे बालकांना ढकलणे, ओढणे, पकडणे, चिमटीत धरणे, वळवणे या कृती हात आणि शरीराचा साधन म्हणून वापर करून काहीतरी करावे लागते. हे बालकांच्या वाढीसाठी महत्त्वाचे असते. जेव्हा बालक ठोकळे, बाहुल्या, प्राण्यांची खेळणी, चेंडू, खेळण्यांतील गाडी, लुटूपुटूची खेळणी वापरतात, तेव्हा त्यांच्या मनात एखादे कथाबीज तयार होते. त्यानंतर वास्तव जीवनाशी सांगड घालण्याची प्रक्रिया सुरू होते. उदा. रिंग संच कोडे, सुती बाहुली, बोलकी बाहुली, चिकन माती, मणी, कोलाज साहित्य, बोर्ड गेम्स इ.

- **सहयोगी अध्यापन पद्धती :** सगळ्यांच्या मदतीने अध्यापनातील अडथळे दूर करून अध्यापन सुलभ करणे. उदा. दिव्यांग विद्यार्थ्याला पाठातील चित्रवाचन करताना हुशार मुलाची मदत घेऊन त्याचे हावभाव व प्रतिसाद लिखित स्वरूपात नोंद करून घेणे. सहयोगी अध्ययनासाठी कृती व साहित्यनियोजन करून विद्यार्थ्यांना सहयोगी अध्ययनास प्रेरित करावे. जेणेकरून त्यांच्यात संघभावना निर्माण होईल व गटकार्य सुलभ होईल.

  सहयोगी अध्ययन–अध्यापन पद्धतीने विद्यार्थ्यांना सामाजिक वर्तनाचे धडे मिळतील व संवाद कौशल्य विकसित होईल. गटातील सर्वांची भूमिका महत्त्वाची असल्याने कोणीही मागे राहत नाही. आंतरक्रियांद्वारे सकारात्मक दृष्टिकोन व मूल्य विकसित होईल.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

- **डिजिटल अध्ययन :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार प्रकरण २३ मध्ये शिक्षणाच्या सर्व स्तरावर शैक्षणिक तंत्रज्ञानाचा समतोल आणि योग्य तो वापर निश्चित करण्यासंदर्भात शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीमधील संपादणूक वाढविणे, अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन, वंचित घटकांना शिक्षणप्रक्रियेत सहभागी करून घेणे, मुले कशी शिकतात, त्यांची समज वाढविण्यासाठी माहितीची उपलब्धता, शैक्षणिक नियोजन, प्रशासन आणि व्यवस्थापन सुव्यवस्थित करणे. जागतिक दर्जाच्या डिजिटल पायाभूत सुविधा, शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी युनिट निर्माण इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

  डिजिटल शिक्षणाच्या पद्धती :

  १) ऑनलाईन २) ऑफलाईन

  ३) संमिश्र (Blended) ४) Hybrid-Online Lectur + Practice + Face to Face Orientation

अध्ययन–अध्यापन पद्धतीचे फायदे :

१) वैविध्यपूर्ण अध्ययन : तंत्रपद्धती वर्गात वापरल्यामुळे वर्गातील विद्यार्थ्यांचे शैलीनुसार आकारिक व संकलित मूल्यमापन करणे सुकर झाले आहे.

२) शाळेत येणारा विद्यार्थी वर्गात बसू लागला. अभिव्यक्त होऊ लागला.

३) विद्यार्थ्याचे भावविश्व विस्तारित झाले आहे.

४) शिक्षक नवीन संकल्पना शिकवताना पूरक असे अध्ययनअनुभव वरील तंत्रपद्धतीच्या आधाराने जोडू लागतात.

५) विशेष शिक्षक, समावेशित तज्ज्ञ व वर्गशिक्षक व मुख्याध्यापक, पालक यांच्यातील सुसंवाद व समन्वय वाढीस लागला.

६) सदर अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांची स्तर पडताळणी योग्यरीत्या होऊन त्यांच्यासाठी नियोजन करणे सुकर झाले व त्यांच्यातील सुप्त गुण ओळखण्यास मदत झाली.

७) वर्गअध्यापनात गरजेनुसार, क्षमतेनुसार व स्तरनिहाय साहित्य वापरून पाठ्यघटकाचे अनुकूलन करणे सुलभ झाले.

८) बालकांमध्ये सकारात्मक अध्ययन सवयी, भावनिक बुद्धिमत्ता, सामाजिक बुद्धिमत्ता, त्यांचे पूर्वज्ञान आरोह–अवरोह, कुतूहल, भाषिक तार्किकता, संप्रेषण कौशल्य, सृजनात्मकता, निरीक्षण या क्षमतांचा विकास करणे सुकर झाले.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

अभ्यासक्रम सुलभीकरण :

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत अध्यापन जितके प्रभावी असेल तितके अध्ययन चांगले होईल. एखादा घटक शिकविताना शिक्षकांना मनापासून हा प्रश्न पडत असतो की, अध्यापन चांगले होण्यासाठी शिक्षकांनी काय करावे? तसेच प्रभावी अध्यापन होण्यासाठी शिक्षकांना साहजिकच अनेक प्रश्न पडतात का? कसे? कधी? कोठे? व केव्हा? या प्रश्नांचा विचार करून अध्यापनपूर्वतयारी शिक्षक करीत असतो. तरी सर्व विद्यार्थ्यांचे शिकणे एकसारखे होतेच, असे नाही. त्यामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत उणिवा कुठे राहिल्या आहेत, याचा विचार शिक्षकांनी करणे खूप गरजेचे आहे. अध्ययन-अध्यापन करताना शिक्षकांनी मेहनत घेतली, मग शिकणे का झाले नाही? हा प्रश्न प्रत्येक शिक्षकाला वर्गात कमी-अधिक प्रमाणात जाणवतो. या अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन कशा पद्धतीने करता येईल, याचे उत्तर सर्व शिक्षकांनी शोधायला हवे. याकरिता स्वतःचे ज्ञान व कौशल्य विकसित करण्याची गरज आहे; जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्याचे शिकणे सुलभ होईल.

''वर्गात अध्यापन करताना विद्यार्थ्याची क्षमता, विद्यार्थी शैली व विद्यार्थी कल लक्षात घेऊन अध्ययनअनुभव देताना केलेला आवश्यक बदल म्हणजे अभ्यासक्रमाचे अनुकूलन होय.''

अध्ययन सुलभीकरणाचे नऊ टप्पे :

इनपुट पद्धती (Input)	आउटपुट पद्धती (Output)	वेळ (Time)
विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील आशय समजून सांगण्यासाठी वापरलेली पद्धती, यालाच इनपुट पद्धतीतंत्र म्हणू शकतो. समजतील अशा पद्धतीने सूचना द्या. उदा. विविध दृश्यसाधने वापरा. मूर्त उदाहरणांचा अनुभव द्या. अध्यापनात जास्तीत-जास्त कृतियुक्त उपक्रमांचा समावेश करा. विद्यार्थ्यांना सहकारी गटांमध्ये ठेवा.	अध्ययनार्थी सूचनांना कसा प्रतिसाद देऊ शकतो, हे तपासून पाहावे व त्याप्रमाणे बदल करावे. उदा. लेखी ऐवजी तोंडी प्रतिसाद स्वीकारा. विद्यार्थ्यांसाठी संप्रेषण पुस्तक वापरा. साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांचे आकलन तपासावे.	विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार अध्ययनासाठी लागणाऱ्या नियोजित कृती पूर्ण करण्यासाठी लागणारा व तपासणीसाठी लागणाऱ्या वेळेचे शिक्षकांनी अनुकूलन करावे. उदा. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार अध्ययनाचा कालावधी यात लवचीकता असावी.
काठिण्यपातळी (Difficulty Level)	**सहकार्य (Level of Support)**	**आकार (Size)**
अध्ययनातील कौशल्याची पातळी विचारात घेऊन नियमामध्ये बदल करणे. उदा. गणितामध्ये गणकयंत्राचा वापर.	विद्यार्थ्याच्या वैयक्तिक गरजेनुसार विद्यार्थ्यांना सहकार्य करणे. उदा. सहाध्यायी अध्यापक मदतनीस, वरच्या वर्गातील विद्यार्थी यांचे सहकार्य घ्या.	विद्यार्थ्याने पूर्ण करावयाच्या अपेक्षित घटकांच्या संख्येत, त्याच्या क्षमतेनुसार घटक कमी करणे. उदा. सामाजिक शास्त्रांतील संज्ञांची संख्या कमी करा.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

सहभाग (Degree of Participation)	पर्यायी उद्दिष्ट (Alternative Goal)	कार्यात्मक अभ्यासक्रम (Substitute curriculam)
विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार त्यांचा कृतीमधील सहभाग स्वीकारावा. उदा. भूगोलातील पृथ्वीचा गोल एक विद्यार्थी पकडेल व इतर विद्यार्थी त्यावरील ठिकाणे दाखवतील.	विशिष्ट साहित्य वापरताना अपेक्षित उद्दिष्टांसोबत पर्यायी उद्दिष्टांचा विचार करावा. उदा. सामाजिक शास्त्रांत एका विद्यार्थ्याने फक्त राज्ये शोधण्यात सक्षम व्हावे, अशी अपेक्षा करा, तर इतरांनी राजधान्या शोधायला शिकले पाहिजे.	विद्यार्थ्यांची वैयक्तिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध सूचना व साहित्य उपलब्ध करून दयावे. उदा. काही विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार अध्ययनाचा कालावधी व कृती पूर्ण करण्याचा कालावधी यांत लवचीकपणा असावा.

विषय क्र. ६ : अनुकूलित पाठनियोजन

इयत्ता : तिसरी : **विषय** : परिसर अभ्यास

घटक : वाहतुकीची साधने

शैक्षणिक साहित्य : वाहनांचे चार्ट, प्रत्यक्ष मॉडेल (बस, आगगाडी, बैलगाडी, विमान, ट्रक, जहाज), वाहनांची शब्दचिठ्ठी, दृश्य व ऑडिओ स्वरूपांतील क्लिप.

अध्ययन शैली	शिक्षक कृती	विद्यार्थी कृती	मूल्यमापन
श्राव्य अध्ययनशैली	१) प्रत्यक्ष उठावदार वाहनांची मॉडेल्स उपलब्ध करून देतील. २) वाहनांच्या माहितीची ऑडिओ क्लिप ऐकवतील व पूर्वज्ञान जाणून घेतील. ३) मॉडेल हाताळण्यासाठी देऊन स्पर्शाने वाहनांची ओळख करून देतील. ४) वाहनांचा उपयोग काय व कोणते वाहन कशावर चालते, ते जाणून घेतील. ५) वर्गमित्राची मदत घेतील.	१) ऑडिओ क्लिपद्वारे वाहनांबाबत जाणून घेतात. २) विद्यार्थी वाहनांची मॉडेल्स हाताळतात व कोणते वाहन आहे, हे पूर्वज्ञानाच्या आधारे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. ३) वर्गमित्राच्या मदतीने वाहनांविषयी माहिती जाणून घेऊन तोंडी स्वरूपात माहिती सांगण्याचा प्रयत्न करतात.	१) शिक्षकांनी वाहनांची दिलेली मॉडेल्स हाताळून, तोंडी स्वरूपात वाहनांची नावे व उपयोग सांगण्याचा प्रयत्न करतात. २) शिक्षकांनी दिलेल्या सूचनेचे पालन करतात.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

अध्ययन शैली	शिक्षक कृती	विद्यार्थी कृती	मूल्यमापन
दृश्य अध्ययनशैली.	१) वाहनांचे मॉडेल, चार्ट व शब्दचिठ्ठी उपलब्ध करतील. २) दृश्य स्वरूपात वाहनांचे चित्र दाखवतील व पूर्वज्ञान जाणून घेतील. ३) चित्रांद्वारे वाहनांचा उपयोग काय? कोणते वाहन कशावर चालते? ते चार्ट व चित्राद्वारे लेखी किंवा सांकेतिक भाषेत सांगण्यास सांगतील.	१) दृश्य स्वरूपात वाहनांची चित्रे बघतात व पूर्वज्ञान आधारित वाहनांची माहिती सांकेतिक भाषेत सांगण्याचा प्रयत्न करतात. २) वाहनांची मॉडेल्स हाताळतात व निरीक्षण करतात. ३) वर्गमित्राची मदत घेतात.	१) शिक्षकांनी वाहनांचे दिलेले मॉडेल्स हाताळून लेखी व शब्द्चिठ्ठीच्या स्वरूपांत वाहनांचे नाव सांगण्याचा प्रयत्न करतात व उपयोग सांगण्याचा प्रयत्न करतात. २) शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचे पालन करतात.
स्पर्श अध्ययनशैली	१) वाहनांचे मॉडेल्स हाताळण्यास देऊन ओळख करून देतील. २) ऑडिओ व व्हिडिओ स्वरूपांत क्लिपद्वारा पूर्वज्ञान जाणून घेतील. ३) वाहनांचा उपयोग काय व कोणते वाहन कशावर चालते, ते विचारतील. ४) वर्गमित्राची मदत घेतील.	१) ऑडिओ, व्हिडिओ स्वरूपांत दाखवण्यात आलेले व ऐकविण्यात आलेल्या वाहनांची माहिती तोंडी-लेखी व सांकेतिक स्वरूपांत सांगतात. २) विद्यार्थी वाहनांचे मॉडेल्स स्पर्शाने हाताळतो, निरीक्षण करतो व वाहनांची माहिती सांगण्याचा प्रयत्न करतो.	१) शिक्षकांनी दिलेली वाहनांची मॉडेल्स स्पर्शाने हाताळतात, निरीक्षण करतात व तोंडी-लेखी व सांकेतिक स्वरूपांत माहिती व उपयोग सांगण्याचा प्रयत्न करतात. २) शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचे पालन करतात.
बहुअध्ययन शैली	१) वाहनांची मॉडेल्स, चार्ट, ऑडिओ, व्हिडिओ स्वरूपांत क्लिप, शब्दचिठ्ठी, उपलब्ध करतील व विद्यार्थ्यांना दाखवून त्यांचे पूर्वज्ञान जाणून घेतील व वाहनांची ओळख करून वाहनांबद्दल माहिती सांगतील. २) वर्गमित्राची मदत घेतील.	१) वाहनांची मॉडेल्स हाताळतात. २) ऑडिओ व व्हिडिओंद्वारे माहिती सांगण्याचा प्रयत्न करतात. ३) वर्गमित्रांची मदत घेतात.	१) ऑडिओ व व्हिडिओ क्लिपद्वारे ऐकून व बघून शिक्षकांनी विचारलेल्या वाहनांची माहिती सांगतात व त्याचा उपयोग सांगण्याचा प्रयत्न करतात. २) शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचे पालन करतात.

सदर पाठांमध्ये अध्ययनाच्या नऊ पायऱ्यांवर भर देण्यात आलेला आहे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

एकविसाव्या शतकातील कौशल्ये (4 C's) :

१) संप्रेषण कौशल्य (Communication) :

संप्रेषण हा मानवी संवादाचा एक मूलभूत पैलू आहे. संप्रेषणामध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती यांच्यामध्ये माहिती, कल्पना, विचार व भावनांची देवाणघेवाण होते. संप्रेषण नातेसंबंध तयार करण्यात, टिकवून ठेवण्यात, समस्या सोडवण्यात आणि अर्थ व्यक्त करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

प्रभावी संप्रेषणासाठी प्रेषक व ग्राहक दोघांनी एकमेकांचा दृष्टिकोन समजून घेणे, योग्य भाषा आणि संदर्भ वापरणे आवश्यक आहे. समस्या सोडविताना आणि निर्णय घेताना संप्रेषण आवश्यक आहे.

पालक समुपदेशन व शिक्षक समुपदेशनात प्रभावी संप्रेषणाची भूमिका महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांमध्ये बोलणे-ऐकणे, लेखन-वाचन व सांकेतिकीकरण अशी मूलभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

शिक्षकांनी वर्गात शिकविताना विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती टाळावी. नेमके मुद्द्याचे बोलणे असावे असंबंधित बोलू नये, क्रमबद्धता तर्कशुद्धता, मुद्द्यांची स्पष्टता उदाहरणासह देण्यात यावी.

२) चिकित्सक विचार (Critical Thinking) :

एकविसाव्या शतकातील कौशल्यांची अशी कोणतीही स्पष्ट व्याख्या नसली; तरीही काही ठरावीक कौशल्ये आहेत, जी तांत्रिकदृष्ट्या प्रगत वैयक्तिक वातावरणात जगण्यासाठी आवश्यक आहेत. चिकित्सक विचार व्यक्तीला आपल्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असतात, जेणेकरून प्रत्येक व्यक्ती आपल्या समाजाच्या, राष्ट्राच्या आणि जगाच्या विकासात योगदान देऊ शकेल.

या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एखादी घटना किंवा प्रसंगाचा तार्किक व चिकित्सक विचार करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, ही काळाची गरज झाली आहे. म्हणून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना चिकित्सक विचार म्हणजे नेमके काय, हे सांगणे गरजेचे आहे. दैनंदिन जीवनातील समस्या समजून घेऊन त्या-त्या समस्येची उकल करण्यासाठी चौफेर विचार करता येणे, प्रत्येक घटना, प्रसंग, परिस्थिती यांचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण व परीक्षण करणे म्हणजे, चिकित्सक विचार होय. उदा. विद्यार्थ्यांना एखादा प्रसंग/घटना यांवर विचार करण्यास प्रोत्साहित करणे, ग्रह व तारे, परिवलन व परिभ्रमण.

३) सहयोग कौशल्य (Collaboration) :

सहकार्याची खरी शक्ती सामूहिक प्रयत्नांमध्ये असते, सवंगडी व भावंडांची मदत घेणे, वर्गाध्यापन करताना दिव्यांग विद्यार्थ्याला पाढे म्हणताना मध्येच अडखळल्यास त्यास सहकार्य करणे. सहयोग ही माणसाची जन्मजात गरज आहे, माणसाचे अस्तित्व, त्याचा विकास आणि जीवन हे सहयोगावर अवलंबून असते. माणसांच्या विविध गरजा भागवण्यासाठी त्याला विविध घटकांचा सहयोग घ्यावा लागतो. सहयोग

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

म्हणजे इतरांसोबत प्रभावीपणे काम करण्याची क्षमता होय. सहयोगी अध्ययनासाठी कृती व साहित्य यांचे नियोजन करावे. विद्यार्थ्यांना सहयोगी अध्यायनास प्रेरित करावे. संघभावना निर्माण करावी, गटकार्यात अडचण येईल तेथे मार्गदर्शक म्हणून शिक्षकांनी कार्य करावे.

सहयोगी शिक्षणाने सामाजिक वर्तनाचे धडे मिळतात. वर्गात आरोग्यपूर्ण वातावरण निर्माण होते. विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य विकसित होते. गटातील सर्वांची भूमिका महत्त्वाची असल्याने कोणीही मागे राहत नाही. आंतरक्रियेद्वारे सकारात्मक दृष्टिकोन व मूल्य विकसित होतात.

४) सर्जनशील कौशल्य (Creativity) :

काहीतरी चांगले करण्यासाठी कल्पनेच्या पलीकडे जाऊन विचार करावा लागतो. प्रत्येक व्यक्ती कमी–अधिक प्रमाणात सर्जनशील असतेच; मात्र सर्जनशीलतेबरोबर नावीन्याची कास धरल्यास फलिताची प्राप्ती करण्यास उपयोगी पडते.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांतील स्वतंत्र विचारशक्ती, शोधप्रवृत्ती, कल्पनाशक्ती, नवनिर्मिती यांना वाव द्यावा उदा. इतिहासातील पाठावर आधारित नाट्यीकरण, अभिनय किंवा कवितेवर आधारित नृत्य–नाटिका तयार करणे. श्राव्य, दृक्श्राव्य या माध्यमांतून नवनिर्मितीचा वापर करून ध्वनिचित्रफिती तयार करणे, व्हिडिओनिर्मिती करणे, भिंतीवर पेंटिंग करणे, मंगलयान तयार करणे यांसारख्या कृतींद्वारे.

विद्यार्थ्यांना काहीतरी नवीन तयार करून इतर विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यासाठी प्रेरित करावी. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्यातील गुणांचे अवलोकन करावे. त्यांच्यातील गुणांना प्रोत्साहन द्यावे. उदा. विद्यार्थ्याला त्याच्या आवडीच्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/D

८. मूल्यमापन संकल्पना व पद्धत

पार्श्वभूमी :

प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक अशा स्तरावरील क्षमता आणि कौशल्य यांचा विकास अपेक्षित आहे. विद्यार्थ्यामध्ये सुप्त शक्ती, क्षमता आणि विविध कौशल्य ही अध्ययन-अध्यापन, विविध अनुभव यामधून विकसित होत असतात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असताना मूल्यमापनामधून वेळोवेळी त्यांच्या अध्ययनातील त्रुटी, आव्हाने दूर होऊन विद्यार्थ्यांची उत्तम शैक्षणिक प्रगती व्हावी अशी अपेक्षा आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - १९८६ :

यामध्ये परीक्षा पद्धती आणि मूल्यमापन प्रक्रिया सुधारणेवर विशेष भर दिलेला आहे. तत्कालीन परीक्षा पद्धतीमध्ये दोषांचे दिग्दर्शन करताना शैक्षणिक आव्हान - एक धोरणात्मक यथार्थ दर्शन यामध्ये परीक्षेविषयी पुढील विचार नमूद केले आहेत,

परीक्षापद्धतीचा विचार केल्याखेरीज समकालीन शैक्षणिक चित्राचे वर्णन परिपूर्ण होणार नाही. कारण परीक्षापद्धती फक्त विद्यार्थ्यांचेच भवितव्य ठरवीत नाही तर आशय, उद्बोधन व सर्व स्तरांवरील शिक्षणाचा दर्जा निश्चित करते. वार्षिक परीक्षापद्धती ही पाठांतर व स्मरणशक्ती यांच्या आधारांवर परीक्षार्थीचे मूल्यमापन करते आणि वर्षातील तीन-चार महिनेच अभ्यास करून उरलेला वेळ निरर्थकपणे घालविण्याची प्रवृत्ती व परिस्थिती निर्माण करते. त्यामुळे ज्ञानाचे उपयोजन सातत्याने न झाल्याने वर्षाअखेरीस सहन न होण्याजोगे तणाव निर्माण होतात. म्हणून मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा पद्धती याबाबत वेगळा विचार करण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २००५ :

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मध्ये स्मरणावर भर देणाऱ्या परीक्षेऐवजी नावीन्यपूर्ण मूल्यमापन प्रक्रियेचा अवलंब करण्यावर विशेष भर दिला आहे. त्यामध्ये तोंडी काम, गटकार्य, गटकार्यातून मूल्यमापन, छोटे-छोटे प्रकल्प इत्यादी पर्याय सुचविले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (RTE Act) २००९ :

केंद्रशासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ दिनांक १ एप्रिल, २०१० पासून भारतात लागू केला. या अधिनियमातील प्रकरण २ भाग ३ (२) नुसार नमूद असलेल्या अपंग व्यक्ती अधिनियम (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) १९९५ अन्वये प्रकरण क्रमांक ५ मधील कलम क्रमांक २६ (अ) नुसार, राज्यशासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रत्येक विशेष गरजा असणाऱ्या बालकांना वयाच्या १८ वर्षांपर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात, नियमित विद्यार्थ्यांसोबत शिक्षणाची समान

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

संधी देऊन मुख्य प्रवाहात आणणे व प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे.

सदर कायद्यातील तरतुदींनुसार इयत्ता आठवीपर्यंत पुढील वर्गातील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना कोणत्याही बोर्डाची परीक्षा देण्याची आवश्यकता नाही. सदर अधिनियमामधील कलम २९(१) ब (२) नुसार राज्यामध्ये सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आलेली आहे. सन २०१०-११ पासून आजपर्यंत कालानुरूप आपल्या समाज जीवनात बरेच बदल झालेले आहेत.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२० (National Curriculum Framework - NCF) :

NCF मध्ये 'अभ्यासक्रम' हा एकंदर उद्दिष्टे, योजना, व्यवस्था आणि शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अनुभवांना आकार देणाऱ्या पद्धतींचा संदर्भ देते. 'अभ्यासक्रम' हा केवळ पाठ्यपुस्तके व इतर अध्ययन-अध्यापन साहित्य (TLM) आणि त्यांच्या अध्यापनशास्त्रातील विषय सामग्रीचा संदर्भ देत नाही तर त्यात शालेय वातावरण आणि संस्कृती यांसारख्या बाबींचाही समावेश होतो.

शाळेतील शिक्षकांसाठीच नव्हे तर शाळेचे मुख्याध्यापक, शैक्षणिक व प्रशासकीय अधिकारी यांमध्ये गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती, विशेष साधनव्यक्ती, विशेष शिक्षक, परीक्षा मंडळे आणि अभ्यासक्रमासह शिक्षणाच्या सर्व अभ्यासकांसाठी NCF अधिक उपयुक्त आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ (State Curriculum Framework - SCF) :

हे एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक साधन आहे जे राज्य स्तरावर अभ्यासक्रम विकसन व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि मानकांची रूपरेषा देते. विशिष्ट राज्य आणि प्रदेशात शैक्षणिक उत्कृष्टता सुनिश्चित करण्यासाठी ही एक व्यापक ब्लू प्रिंट आहे.

राज्य स्तरावरील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात SCF महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. स्थानिक प्रासंगिकता, मुख्य क्षमता, समावेशन, व्यावसायिक विकास आणि मूल्यांकन पद्धतीवर लक्ष केंद्रित करून SCF राज्यांना त्यांच्या विद्यार्थ्यांच्या गरजा, आजीवन शिक्षण, वैयक्तिक वाढ आणि आकांक्षा पूर्ण करणारे शिक्षण प्रदान करण्यास सक्षम करते.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन :

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ देशात १ एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला. कायद्यातील कलम-२९ प्रमाणे वर्गावर्गात ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सूचित केली आहे. वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ज्ञानरचनावादी असणारी असेल तर मूल्यमापन प्रक्रियेत बदल करणे अनिवार्य आहे ही बाब लक्षात घेऊन कलम-२९ चे उपकलम-२ प्रमाणे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची (CCE) प्रक्रिया सूचित करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने २० ऑगस्ट, २०१० ला शासन निर्णय निर्गमित केला आहे. शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील इयत्ता पहिली ते आठवीकरिता

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन निर्धारित केले आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात आकारिक व संकलित मूल्यमापनाचा समावेश करण्यात आला आहे.

१) आकारिक मूल्यमापन :

मुलांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असताना ते आपल्या अपेक्षेप्रमाणे आणि अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टानुसार घडते आहे किंवा नाही याची नियमितपणे पडताळणी करणे म्हणजेच **आकारिक मूल्यमापन** होय.

आकारिक मूल्यमापनासाठी एकूण ८ साधनांची निश्चिती करण्यात आली. प्रत्येक साधनामध्ये विविध तंत्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्या तंत्राच्या आधारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या समग्र मूल्यमापनाचा विचार करण्यात आला आहे. निम्न प्राथमिक स्तरावर आकारिक मूल्यमापनावर अधिक भर दिला आहे. आकारिक मूल्यमापन प्रक्रिया ही लवचीक स्वरूपाची आहे. NCERT ने २०१९ मध्ये मूल्यमापनाबाबत मार्गदर्शक सूचना व नवीन शैक्षणिक धोरण – २०२० नुसार शाळा आधारित मूल्यमापन, अध्ययन निष्पत्ती व क्षमता आधारित मूल्यमापन यानुसार आकारिक मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

आकारिक मूल्यमापनाची साधनतंत्रे ही केवळ मूल्यमापनाची साधनतंत्रे नाहीत, तर ती अध्ययन–अध्यापनाचीही तंत्रे आहेत. ही बाब लक्षात घेऊन वर्गात मूल्यमापनाची जी साधनतंत्रे निवडली गेली असतील, त्याचा पुन्हा पुन्हा वापर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिकणे हे समग्र व सातत्याने होण्यासाठी निश्चित स्वरूपात मदत होते. विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक व भावनिक असा सर्वांगीण विकास होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व साकल्याने आकाराला येत आहे, हे नियमितपणे पडताळून पाहणे आवश्यक आहे.

शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधने वापरण्याचे तंत्र अधिक स्पष्ट होण्यासाठी आपण पुढील साधनतंत्रे समजून घेऊ या.

१) दैनंदिन निरीक्षण :

- सर्व विषयासाठी अनिवार्य.
- या साधनास गुण द्यायचे नाहीत.
- विशेष उल्लेखनीय व अध्ययनात अडथळे, त्रुटी या बाबीच्या नोंदी करा.
- निरीक्षण नियमित करावे.
- या नोंदीचा उपयोग प्रगतिपुस्तकातील वर्णनात्मक नोंदीसाठी करावा.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

२) तोंडी काम (प्रश्नोत्तरे, प्रकटवाचन, भाषण-संभाषण, भूमिकाभिनय, मुलाखत) :

- हे साधन गाणी म्हणणे, गोष्टी सांगणे, कविता म्हणणे, प्रकटवाचन, तोंडी हिशोब, संख्यावाचन, भाषण-संभाषण, भूमिकाभिनय, मुलाखत व गटचर्चा इ. साठी करावा.

३) प्रात्यक्षिके/प्रयोग :

- सामान्य विज्ञान विषयातील प्रयोग नियमित घ्यावे.
- एक किंवा समान काठीण्यपातळीच्या प्रयोगापैकी एका प्रयोगाचे मूल्यमापन.
- प्रात्याक्षिके/प्रयोग फक्त विज्ञानापुरते मर्यादित नसावेत.
- भाषा, गणित, कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण यांसाठी प्रात्यक्षिक या साधनाचा वापर उदा. गणिताची प्रयोगशाळा, कार्डावरील अक्षरजुळणी, शब्द किंवा शब्दकार्डावरील जुळणी इ.

४) उपक्रम/कृती (वैयक्तिक, गटात, स्वयंअध्ययनाद्वारे) :

- बचत बँक खाते उघडणे, जवळचे किल्ले, वस्तुसंग्रहालय यांना भेटी देणारे उपक्रम माहितीपत्रक संकलित करणे.
- आकारिक मूल्यमापनासाठी पुरेसा सराव झाल्यावर कृतीपैकी काही कृती निवडून मूल्यमापन करावे.
- उपक्रम निरंतर सुरू असतात त्यामुळे सहभाग, सातत्य व कृतीतील सफाईपणा यांद्वारे मूल्यमापन करावे.

५) प्रकल्प :

- दिनांक ३१ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयानुसार, प्राथमिक स्तरावर इयत्ता तिसरी ते आठवीसाठी प्रकल्प घ्यावेत.
- संग्रहात्मक प्रकल्प, प्रतिकृती प्रकल्प, सर्वेक्षणात्मक व संशोधनात्मक प्रकल्प घ्यावे.
- प्रति विद्यार्थी वर्षभरात कोणत्याही विषयाचा किमान एक प्रकल्प तयार करून घ्यावा.
- प्रकल्प विद्यार्थ्याने स्वतः करावा.
- प्रकल्प एका सत्रात पूर्ण होईल एवढा कालावधीचा असावा.
- शोधक, चिकित्सक व निरीक्षण क्षमता वाढीस लागेल. उदा. इयत्ता सातवी विषय - मराठी प्रकल्पाचे नाव - सूचनांचा अभ्यास असे प्रकल्प असावे.
- चार पायऱ्यांमध्ये प्रकल्प - माहितीचे संकलन, माहितीवर प्रक्रिया, निष्कर्ष व प्रकल्पाचे सादरीकरण - अहवाल तयार करून घेणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

६) चाचणी लेखी (वेळापत्रक जाहीर न करता अनौपचारिक स्वरूपात घ्यावयाची छोट्या कालावधीची लेखी चाचणी/पुस्तकासह) (Open book test) :

- वेळापत्रक जाहीर करता अनौपचारिक स्वरूपाची छोट्या कालावधीची लेखी चाचणी/पुस्तकासह चाचणी.
- सर्व विषयांच्या चाचणीसाठी समान गुण असणे आवश्यक नाही.
- ३० मिनिटांचा कालावधी लागेल अशी १५ ते २० गुणांची लेखी स्वरुपात चाचणी घ्यावी चाचणीची प्रश्नपत्रिका शिक्षकांनी स्वतः तयार करावी.
- चाचणीच्या वेळेत लवचीकता असावी.
- इयत्ता पहिली व दुसरीच्या मुलांची इंग्रजी विषयाची लेखी चाचणी घेऊ नये. (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून)
- प्रत्येक सत्रात मूल्यमापनासाठी एक चाचणी घ्यावी.

(उपरोक्त १ ते ६ साधनतंत्रे वापरताना पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी व रुब्रिक इत्यादींचा वापर करावा.)

७) स्वाध्याय/वर्गकार्य : (माहितीलेखन/वर्णनलेखन/निबंधलेखन/अहवाललेखन/कथालेखन/पत्रलेखन/ संवादलेखन/कल्पनाविस्तार इत्यादी)

(संदर्भ : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, सप्टेंबर २०१०)

- नियमित घ्यावे, मूल्यमापनासाठी स्वतंत्र स्वाध्याय/वर्गकार्य देऊन मूल्यमापन करावे.
- गुण नोंदवहीत नोंदवणे.

८) इतर साधने : प्रश्नावली, स्वयंमूल्यमापन, सहाध्यायी मूल्यमापन, गटकार्य

(संदर्भ : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, सप्टेंबर २०१०), विद्यार्थी संचिका

(संदर्भ : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, भाग ३ व ४)

अ. क्र.	सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधन तंत्रे	इतर साधने
१)	दैनंदिन निरीक्षण	पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, रुब्रिक्स
२)	तोंडी काम (प्रश्नोत्तरे, प्रकटवाचन, भाषण-संभाषण, भूमिकाभिनय, मुलाखत गटचर्चा इत्यादी)	
३)	प्रात्यक्षिके / प्रयोग	
४)	उपक्रम / कृती (वैयक्तिक/गटात/स्वयंअध्ययनाद्वारे)	
५)	प्रकल्प	

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधन तंत्रे	इतर साधने
६)	चाचणी लेखी (वेळापत्रक जाहीर न करता अनौपचारिक स्वरूपात घ्यावयाची छोट्या कालावधीची लेखी चाचणी/पुस्तकासह) (Open book test)	
७)	स्वाध्याय / वर्गकार्य (माहितीलेखन / वर्णनलेखन / निबंधलेखन /अहवाललेखन/ कथालेखन / पत्रलेखन / संवादलेखन / कल्पनाविस्तार इत्यादी) (संदर्भ – सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, सप्टेंबर २०१०)	
८)	इतर साधने प्रश्नावली, स्वयंमूल्यमापन, सहाध्यायी मूल्यमापन, गटकार्य (संदर्भ : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, सप्टेंबर २०१०) (सदंर्भ : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका भाग ३ व ४)	

उपरोक्त तक्त्याचे निरीक्षण केले असता असे लक्षात येते की,

१) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचे कोणतेही साधन प्रभावीपणे वापरण्यासाठी दिलेल्या तंत्रांपैकी कोणत्याही तंत्राचा मूल्यमापनाच्या उद्देशानुसार वापर करता येतो.

२) या तंत्रामुळे विद्यार्थांच्या मूल्यमापनात अधिक स्पष्टता व वस्तुनिष्ठता येण्यास मदत होते.

३) विद्यार्थी प्रगतीच्या नेमक्या कोणत्या टप्प्यावर आहे हे समजण्यास मदत होते, ज्यामुळे विद्यार्थ्याला पुढील प्रगती करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे सोपे होते.

आकारिक मूल्यमापनाची साधने व तंत्रे निवडीबाबत सूचना :

- इयत्ता, विषय आणि उद्दिष्टे विचारात घेता जास्तीत – जास्त साधनतंत्राची निवड करणे.
- ८ साधन–तंत्रापैकी किमान ५ साधन–तंत्राची वापर करणे.
- कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण विषयासाठी किमान ३ साधन–तंत्राची वापर करणे
- दैनंदिन निरीक्षण हे साधन सर्व विषयांसाठी वापरणे अनिवार्य आहे, पण या साधनाला गुण द्यायचे नाहीत.
- विद्यार्थी वर्षभरात किमान एक प्रकल्प करतील असे नियोजन असावे.
- प्रत्येक सत्रात किमान एक छोट्या कालावधीची लेखी चाचणी/पुस्तकासह चाचणी (Open book test) घ्यावी.
- विषय आणि उद्दिष्टानुसार साधन–तंत्राच्या वापराबाबत लवचीकता.
- प्रत्येक साधन–तंत्रास योग्य भारांश द्यावा.
- एका विषयासाठी साधन–तंत्राचा भारांश सर्व विद्यार्थ्यांसाठी सारखा असावा.

- सारख्याच साधन – तंत्राचा वेगवेगळ्या विषयासाठी भारांश वेगळा असू शकतो. (विषय, उद्दिष्ट व पाठ्यांशाचे स्वरूप यानुसार भारांश बदलू शकतो.)
- निवडलेल्या सर्व पाठ्यांशाचे भारांश आकारिक मूल्यमापनाच्या एकूण भारांशाएवढा असावा.

विषयनिहाय निवडावयाची साधन व तंत्रे :

अ. क्र.	विषय	निवडावयाची साधने
१)	भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी) व गणित	१) दैनंदिन निरीक्षण २) तोंडी काम ३) लेखी चाचणी ४) उर्वरित साधनांपैकी किमान दोन.
२)	भूगोल, सामान्य विज्ञान व परिसर अभ्यास	१) दैनंदिन निरीक्षण २) लेखी चाचणी ३) प्रयोग / प्रात्यक्षिक ४) उर्वरित साधनांपैकी किमान दोन.
३)	इतिहास व नागरिकशास्त्र	१) दैनंदिन निरीक्षण २) लेखी चाचणी ३) उर्वरित साधनांपैकी किमान तीन.
४)	कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण	१) दैनंदिन निरीक्षण २) प्रात्यक्षिक ३) कृती/उपक्रम

मूल्यमापनाच्या साधनतंत्रांचा समर्पक ताळमेळ साधण्यासाठी आपण मूल्यमापनाच्या तंत्रामधील फरक समजून घेऊ या.

यापूर्वीच्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका भाग ३ व ४ मध्ये पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी देण्यात आली आहे. यामध्ये कोणत्या तंत्राचा वापर केला आहे ते आपण सोदाहरण समजून घेणार आहोत. उदा.

पडताळा सूची :

पडताळा सूची या तंत्रात एखादी बाब उपलब्ध आहे किंवा नाही याचा पडताळा घेतला जातो. विद्यार्थ्यांनी एखादे कौशल्य प्राप्त केले आहे किंवा नाही, निश्चित केलेला निकष विद्यार्थ्यांमध्ये दिसतो आहे किंवा नाही याचा पडताळा घेण्याची सुविधा या तंत्रात असते. या तंत्राची मांडणी ही निकषांची शब्द, वाक्य स्वरूपातील यादी व त्यापुढे प्रतिसाद स्वरूपात होय / नाही हे पर्याय दिलेले असतात. उदा.

निकष	प्रतिसाद	
	होय	नाही
दोन अक्षरी शब्दांचे वाचन करतो.		
जोडाक्षरांचे वाचन करतो.		
योग्य गतीने वाचन करतो.		

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

पदनिश्चयन श्रेणी :

पडताळा सूची या तंत्रात अगदी टोकाच्या दोन प्रतिसादांचा विचार केला जातो. मात्र याऐवजी एखाद्या शिक्षकाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद दोन टोकाकडील प्रतिसादाऐवजी त्यामध्ये नेमका कोठे आहे हे समजून घ्यायचे असेल, विद्यार्थ्याने एखाद्या निकषात कितपत प्रगती केली आहे याची निश्चिती करायची असल्यास पदनिश्चयन श्रेणी या तंत्राचा वापर करणे क्रमप्राप्त ठरते.

संकल्पना :

पद म्हणजे पाऊल, निश्चयन म्हणजे निश्चित करणे, श्रेणी म्हणजे स्तर म्हणजेच एखादा विद्यार्थी प्रगतीच्या कोणत्या स्तरावर आहे हे निश्चित करणे होय. पदनिश्चयन या तंत्रामध्ये निकषांच्या आधारे काही ठरावीक स्तर निश्चित केले जातात. या निकषांच्या स्वरूपानुसार प्रगतीचे स्तर गुण/शब्द/विधान स्वरूपात मांडणी करता येते. विद्यार्थ्यांचे पुरेसे निरीक्षण करून त्यांच्या प्रगतीचा स्तर निश्चित करणे आवश्यक असते.

शिक्षक वर्गात विषयातील घटकांच्या अध्ययनाकरिता विविध कृती/उपक्रम/प्रकल्प/गटचर्चा राबवीत असतात. या दरम्यान विद्यार्थ्यांनी परस्परांशी त्या घटकांच्या अंगाने चर्चा करणे, आपले मत विश्वासपूर्वक मांडणे, इतरांच्या मतांचा स्वीकार करणे, चर्चेत सक्रिय भाग घेणे अपेक्षित असते. विद्यार्थ्याने गटचर्चेत/कृतीत कितपत भाग घेतला याचे मूल्यमापन करावयाचे असल्यास त्या विद्यार्थ्याचा चर्चेत भाग घेण्याच्या बाबतीतील दर्जा पुढीलप्रमाणे ठरविता येईल.

पदनिश्चयन श्रेणी ही तीन, चार, पाच किंवा सात स्तरांनुसार असू शकते या स्तराला बिंदू असे देखील म्हणतात.

पदनिश्चयन श्रेणीचे प्रकार :

१) **अंकात्मक पदनिश्चयन श्रेणी :** निश्चित केलेल्या निकषासंदर्भात ज्या प्रमाणात निरीक्षण होत आहे, त्या प्रमाणात या श्रेणीद्वारे नोंद करता येते. अंकात्मक क्रमांकांना निकषांचा स्तर दर्शविण्यासाठी शाब्दिक वर्णनाऐवजी अंक दिले जातात. उदा. पाच बिंदू पदनिश्चयन श्रेणीमध्ये निम्नप्रतीच्या स्तराचा क्रमांक एक व उच्च प्रतीच्या स्तराचा क्रमांक पाच असतो. मधले दोन, तीन व चार क्रमांक निकषांच्या प्रमाणात असतात आणि तीन हा क्रमांक सरासरी किंवा मध्यम प्रमाणाच्या निकषांचा असतो.

निकषाचे विधान	स्तर दर्शक अंक				
	१	२	३	४	५
विद्यार्थी इंग्रजी वाक्याचे/शब्दाचे अचूक वाचन करतो.					

निकषाच्या विधानासमोर अंक लिहिलेले असल्यामुळे प्रतिसाद देणाऱ्यास त्या विधानासमोर व अंकांच्या खाली (✓) अशी खूण करण्यास सांगितले जाते. निकषाचे स्तर दर्शक अंकांना गुणात्मक किंवा गुणांचे प्रमाण दिल्यास मूल्यमापन साधनाच्या संदर्भातील निकषांचे गुण एकत्र करता येतात.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

२) **आरेखित पदनिश्चयन श्रेणी :** आरेखित पदनिश्चयन श्रेणीचे प्रमुख लक्षण म्हणजे अंकांऐवजी मूल्यमापनाच्या निकषासंदर्भाने स्तर शाब्दिक स्वरूपात दर्शविलेले असतात. मूल्यमापनाच्या निकषासंदर्भाने शाब्दिक स्थान निश्चित करून योग्य स्तराच्या खाली (✓) अशी खूण करण्यास सांगितले जाते. अंकात्मक पदनिश्चयन श्रेणीचे रूपांतर खालीलप्रमाणे आरेखित पदनिश्चयन श्रेणीमध्ये करता येते. **उदा.**

त्रिस्तरीय			
श्रेणी बिंदूची उदाहरणे	**श्रेणी / स्तर**		
	स्तर १ (कधीच नाही)	**स्तर २** (कधी कधी)	**स्तर ३** (सातत्याने)
विद्यार्थी चर्चा/कृतीत सहभाग घेतो.			

चारस्तरीय				
श्रेणी बिंदूची उदाहरणे	**श्रेणी/स्तर**			
	स्तर १ (कधीच नाही)	**स्तर २** (क्वचित)	**स्तर ३** (कधी कधी)	**स्तर ४** (बऱ्याचदा)
विद्यार्थी स्वतःचा मुद्दा कार्यकारणभावासह/अध्ययन शैलीसह पटवून देतो.				

३) **वर्णनात्मक पदनिश्चयन श्रेणी :** विद्यार्थ्यांच्या क्षमता/शैली/स्थान/स्तर निश्चित करण्यासाठी नेहमी, कधी-कधी, क्वचित असे संदिग्ध शब्द न वापरता वर्णनात्मक शब्दयोजना केली जाते.

पंचस्तरीय					
श्रेणी बिंदूची उदाहरणे	**श्रेणी / स्तर**				
	स्तर १ (भाग न घेता फक्त ऐकतो.)	**स्तर २** (कोणी सांगितले तरच भाग घेतो.	**स्तर ३** (स्वतःहून क्वचित भाग घेतो.)	**स्तर ४** (स्वतःहून बऱ्याचदा भाग घेतो.)	**स्तर ५** (स्वतःहून सातत्याने भाग घेतो.)
विद्यार्थी चर्चा/कृतीत सहभाग घेतो.					

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

विद्यार्थ्यांमध्ये एखाद्या कौशल्याचा विकास कसा होत आहे हे यातून समजू शकते. विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची वृत्ती, आपल्या मताविषयीची स्पष्टता, सहकाऱ्यांशी जुळवून घेण्याची वृत्ती या व अशा गुणांचा कौशल्यांचा विकास कितपत झाला आहे हे समजण्यास मदत होते.

आकारिक मूल्यमापनाच्या नोंदी कशा कराव्यात?

अ. क्र.	साधन तंत्रे	श्राव्य अध्ययनशैली	दृक् अध्ययनशैली	स्पर्श अध्ययनशैली	बहु अध्ययनशैली
१)	दैनंदिन निरीक्षण	हे साधनतंत्र वापरणे सक्तीचे पण गुण द्यायचे नाहीत. नोंदी घ्याव्या.	हे साधनतंत्र वापरणे सक्तीचे पण गुण द्यायचे नाहीत. नोंदी घ्याव्या.	हे साधनतंत्र वापरणे सक्तीचे पण गुण द्यायचे नाहीत. नोंदी घ्याव्या.	हे साधनतंत्र वापरणे सक्तीचे पण गुण द्यायचे नाहीत. नोंदी घ्याव्या.
२)	तोंडी काम	तोंडीकाम करून घेताना या विद्यार्थ्याचा मिळणारा प्रतिसाद स्वीकारावा व तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्यावी, त्यानुसार सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	तोंडीकाम घेताना हे विद्यार्थी खुणांद्वारे/ चित्राद्वारे किंवा हावभावाद्वारे व्यक्त होत असतील तर तो त्या विद्यार्थ्याचा प्रतिसाद स्वीकारावा व तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्यावी.	हे साधनतंत्र घेताना हे विद्यार्थी खुणांद्वारे/ स्पर्शाद्वारे व्यक्त होत असल्यास तर तो त्या विद्यार्थ्याचा प्रतिसाद स्वीकारावा व तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्यावी.	ज्या विद्यार्थ्याला शारीरिक व्यंगत्वामुळे हातवारे करता येत नाहीत उदा. चित्र वाचन घटक त्यांच्याकडून करून घ्यायचा आहे; अशा वेळी विद्यार्थ्याने दिलेला प्रतिसाद योग्य आहे की नाही तशी नोंद करावी. जसे की – विद्यार्थ्याने बरोबर पर्यायाला मान हलवून जरी होकार दिला तरी तो त्या मुलाचा प्रतिसाद समजावा व तशी नोंद आपल्याकडे घ्यावी.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	साधन तंत्रे	श्राव्य अध्ययनशैली	दृक् अध्ययनशैली	स्पर्श अध्ययनशैली	बहु अध्ययन शैली
३)	प्रात्यक्षिके/ प्रयोग	या शैलीच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके/ प्रयोग करताना सहाध्यायांची मदत घ्या. त्याचा प्रतिसाद पाहून तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्यावी, त्यानुसार सत्राअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	हे साधनतंत्र घेताना वस्तू हाताळायला द्या. त्यानुसार विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिकातील आवड, सहभाग, लक्षकेंद्रित करण्याची क्षमता, क्रिया करण्याची क्षमता व सातत्यपणा पाहून तशी नोंद करा व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके/ प्रयोग करताना सहाध्यायांची मदत घ्या. वस्तू हाताळायला द्या. त्यानुसार त्याचा प्रतिसाद पाहून तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्यावी त्यानुसार सत्राअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	हे साधनतंत्र घेताना विद्यार्थ्यांना वस्तू हाताळायला द्या, सहाध्यायी विद्यार्थ्यांसोबत द्या व मुलाची प्रात्यक्षिकातील आवड, सहभाग, लक्षकेंद्रित करण्याची क्षमता, क्रिया करण्याची क्षमता व सातत्यपूर्णता पाहून तशी नोंद करा. सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.
४)	उपक्रम कृती	या शैलीच्या विद्यार्थ्यांना ही साधनतंत्रे घेताना वस्तू हाताळायला द्या, मुलांचे कृतीतील सातत्य, आवड, सक्रिय सहभाग व कुशलता पाहून विविध कृतीतून काही कृती निवडून गुण द्या.	या शैलीचे विद्यार्थी उपक्रम अगदी चांगल्या प्रकारे, सक्रीय सहभागाने व कुशलतापूर्वक करतात म्हणून विविध कृतीतून काही कृती निवडून गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना वस्तू हाताळायला द्या. सहाध्यायी सोबत द्या व विद्यार्थ्याची कृतीतील आवड, सहभाग, एका जागेवर बसण्याची क्षमता व कुशलता पाहून नोंद करा.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना वस्तू हाताळायला द्या, सहाध्यायी विद्यार्थ्याची सोबत द्या व मुलाची कृतीतील आवड, सहभाग, लक्षकेंद्रित करण्याची क्षमता, एका जागेवर बसण्याची क्षमता

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	साधन तंत्रे	श्राव्य अध्ययनशैली	दृक् अध्ययनशैली	स्पर्श अध्ययनशैली	बहु अध्ययनशैली
				विविध कृतीतून क्षमतेनुसार काही कृती निवडून गुण द्या.	व कुशलता पाहून नोंद करा. विविध कृतींतून काही कृती निवडून गुण द्या.
५)	प्रकल्प	विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना सहाध्यायांची मदत घ्या. क्षमतेनुसार प्रकल्पांचे स्वरूप निश्चित करावे. विद्यार्थ्यांची शोधक वृत्ती, आवड, सक्रिय सहभाग, कुशलता, माहितीचे संकलन, माहितीवर प्रक्रिया, निष्कर्ष व प्रकल्पाचे सादरीकरण पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना सहाध्यायांची मदत घ्या. विद्यार्थ्यांची शोधक वृत्ती, निरीक्षण वृत्ती, आवड, सक्रिय सहभाग, कुशलता, माहितीचे संकलन, माहितीवर प्रक्रिया, निष्कर्ष व प्रकल्पाचे सादरीकरण पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना सहाध्यायांची मदत घ्या. क्षमतेनुसार प्रकल्पाचे स्वरूप निश्चित करावे. विद्यार्थ्यांची शोधक वृत्ती, आवड, सक्रिय सहभाग, कुशलता, माहितीचे संकलन, माहितीवर प्रक्रिया, निष्कर्ष व प्रकल्पाचे सादरीकरण पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना सहाध्यायांची मदत घ्या. क्षमतेनुसार प्रकल्पाचे स्वरूप निश्चित करावे. विद्यार्थ्यांची शोधकवृत्ती, निरीक्षण वृत्ती, आवड, सक्रिय सहभाग, कुशलता माहितीचे संकलन, माहितीवर प्रक्रिया, निष्कर्ष व प्रकल्पाचे सादरीकरण पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	साधन तंत्रे	श्राव्य अध्ययनशैली	दृक् अध्ययनशैली	स्पर्श अध्ययनशैली	बहु अध्ययनशैली
६)	चाचणी (लेखी)	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना लेखीकाम/ चाचणीऐवजी तोंडी प्रश्नोत्तर स्वरूपात चाचणी घ्यावी, लवचिकता असावी, अतिरिक्त वेळ द्यावा. गरजेनुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना तोंडीऐवजी लेखी स्वरूपात घ्यावी. लवचिकता असावी, अतिरिक्त वेळ द्यावा.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना लेखीकाम/ चाचणीमध्ये लवचिकता असावी, अतिरिक्त वेळ द्यावा. गरजेनुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा. चाचणी घेताना विशेष शिक्षकाची मदत घेऊन ब्रेल/ खुणाद्वारे प्रतिसाद घेऊन सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना लवचिकता असावी. अतिरिक्त वेळ द्यावा. गरजेनुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा. सदर विद्यार्थी काही सांगू शकत नसेल फक्त हातवारे/हावभाव करत असेल तर तो प्रतिसाद ग्राह्य धरून तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्यावी व त्यानुसार सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.
७)	स्वाध्याय/ वर्गकार्य	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना सहाध्यायी सोबत द्या. शक्यतो तोंडी स्वरूपात त्यांच्या प्रतिसादाची नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्या, त्यानुसार सत्रअखेर निश्चित केलेल्या	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना वर्गकार्य/गट कार्यासाठी विविध संधी उपलब्ध करून द्यावी. त्यानुसार त्यांच्या प्रतिसादाची नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्या, त्यानुसार सत्रअखेर	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना सहाध्यायी सोबत द्या. शक्यतो खुणांद्वारे/ हावभाव/स्पर्श स्वरूपात त्यांच्या प्रतिसादाची नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्या, त्यानुसार सत्रअखेर	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र घेताना सहाध्यायी सोबत द्या. कार्यातील प्रतिसाद तोंडी/ खुणांद्वारे/ हावभाव स्वरूपात स्वीकारून तशी नोंद आपल्याकडील नोंदवहीत घ्या, त्यानुसार सत्रअखेर

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	साधन तंत्रे	श्राव्य अध्ययनशैली	दृक् अध्ययनशैली	स्पर्श अध्ययनशैली	बहु अध्ययनशैली
		भारांशापैकी गुण द्यावेत.	निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.
८)	इतर साधने	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना गट कार्यामध्ये विद्यार्थ्यांची आवड, सक्रिय सहभाग व कुशलता पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना गट कार्यामध्ये विद्यार्थ्यांची आवड, सक्रिय सहभाग व कुशलता पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना गटकार्यामध्ये विद्यार्थ्यांची आवड, सक्रिय सहभाग व कुशलता पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.	या शैलीच्या विद्यार्थ्यांना हे साधनतंत्र वापरताना गट कार्यामध्ये विद्यार्थ्यांची आवड, सक्रिय सहभाग व कुशलता पाहून तशी नोंद करावी व सत्रअखेर निश्चित केलेल्या भारांशापैकी गुण द्यावेत.

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन पद्धती

विद्यार्थ्यांच्या मूलभूत भाषिक कौशल्ये आणि गणिती क्षमता यांच्या विकसनामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. आपण मुलांची परीक्षा घेताना, विद्यार्थ्यांना अध्ययनशैलीनुसार अध्ययन अनुभव देऊन त्या अध्ययन अनुभवांच्या आधारावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन सहजपणे करू शकतो. दि. १६ ऑक्टोबर, २०१८, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या शासन निर्णयानुसार शिक्षकांनी समजून घ्यावयाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्याचे अध्ययन-अध्यापन पद्धती व मूल्यमापनाची तंत्रे हे देखील विविध अध्ययनशैलीनुसार (श्रवण अध्ययनशैली, दृश्य अध्ययनशैली, स्पर्श अध्ययनशैली) असावी.

२) इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्याच्या अध्ययनशैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलतींबाबत मार्गदर्शक सूचना वाचाव्यात.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

३) २१ विशेष प्रकारांतील कुठलेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये व आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना अध्ययन सहाय्यभूत सेवा, अनुकूलित परीक्षा/मूल्यांकन पद्धती, शिक्षकांना मार्गदर्शन तसेच क्षेत्रीय यंत्रणा व समुदायाचे सक्षमीकरण करावे.

४) इयत्ता पूर्वप्राथमिक ते बारावीपर्यंतच्या विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे इतर सामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने प्रत्येक घटकामध्ये मूल्यांकन/मूल्यमापन न करता, त्यांच्या अध्ययनशैलीनुसार, ज्ञानाच्या, भाषेच्या/विषयवार अनुकूलित अध्यापन व मूल्यमापनाच्या पद्धती उपयोगात आणणे अपेक्षित आहे.

५) इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) करताना नमूद केलेल्या ८ तंत्रापैकी, विद्यार्थ्यांची क्षमता पाहून योग्य तंत्र निवडून, मूल्यमापन करता येईल. मूल्यमापनाच्या शैक्षणिक सवलतींमध्ये विविध २१ प्रकारच्या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना, गरजेनुसार अतिरिक्त २० मिनिटे, अतिरिक्त २० गुण, लेखनिक, विषययोजना, शैक्षणिक साहित्याचा वापर, अनुकूलित प्रश्नावली, मौखिक परीक्षा, प्रात्यक्षिक सूट, आकृत्या, नकाशे सूट, अनुकूलित बैठकव्यवस्था इत्यादी सवलती देता येतात. विषययोजनेमधील विद्यार्थ्यांच्या विशेष प्रकारानुसार व क्षमतेनुसार इयत्ता दहावी व बारावीसाठी विषय बदलून घेतात येतात. उदा. अंध विद्यार्थ्यांला गणिताऐवजी संगीत विषय घेता येतो.

यासाठी पुढील मार्गदर्शक सूचना आपल्याला मदत करतीलच.

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे ज्या अध्ययन-अध्यापनशैली लक्षात घेऊन अध्यापन केले त्यानुसारच करावे. विविध अध्यापनशैलींचा वापर करून कृती, प्रात्यक्षिक, मौखिक उपक्रम, तोंडी, लिखित मूल्यमापनाच्या साधनांचा उपयोग करून मूल्यमापन करू शकतो.

इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलतींबाबत मार्गदर्शक सूचना

अ. क्र.	दिव्यांगत्व प्रकार	वेळ अतिरिक्त २० मिनिटे	अध्ययनशैलीनुसार मूल्यांकन पद्धती								
			अतिरिक्त २० गुण	लेखनिक	विषय योजना	शैक्षणिक साहित्य	अनुकूलित प्रश्नावली	मौखिक परीक्षा	प्रात्य. सूट	आकृत्या नकाशे सूट	बैठक व्यवस्था
१.	अस्थिव्यंग (Locomotor Impairment)	✓	✓	✓	--	✓	--	--	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
२.	कुष्ठरोग निवारित (Leprosy Cured)	✓	✓	✓	--	✓	--	--	--	--	गरजे-नुसार

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	दिव्यांगत्व प्रकार	वेळ अतिरिक्त २० मिनिटे	अध्ययनशैलीनुसार मूल्यांकन पद्धती								
			अतिरिक्त २० गुण	लेखनिक	विषय योजना	शैक्षणिक साहित्य	अनुकूलित प्रश्नावली	मौखिक परीक्षा	प्रात्य. सूट	आकृत्या नकाशे सूट	बैठक व्यवस्था
३.	मेंदूचा पक्षाघात (Cerebral Palsy)	✓	✓	✓	--	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
४.	बुटकेपणा (Dwarfism)	✓	✓	✓	--	✓	--	--	--	--	गरजे-नुसार
५.	Muscular Dystrophy	✓	✓	✓	--	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
६.	Acid Attack Victim	✓	✓	✓	--	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
७.	अंधत्व Blindness (Total Blind)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
८.	अल्पदृष्टी (Low vision)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
९.	कर्णबधिरत्व (Hearing impairement)	✓	✓	--	✓	✓	✓	✓	--	--	गरजे-नुसार
१०.	वाचादोष (Speech impairement)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	--	✓	गरजे-नुसार
११.	बौद्धिक अक्षमता (Intellectual Disability)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
१२.	विशिष्ट अध्ययन अक्षमता (Specific Learning Disability)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
१३.	स्वमग्नता (Autism)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
१४.	मानसिक आजार (Mental illness)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	--	--	गरजे-नुसार
१५.	Multiple sclerosis	✓	✓	✓	--	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
१६.	Parkinson's Disease	✓	✓	✓	--	✓	✓	--	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
१७.	हिमोफिलिया (Haemophilia)	✓	✓	✓	--	✓	✓	--	गरजे-नुसार	--	गरजे-नुसार

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	दिव्यांगत्व प्रकार	वेळ अतिरिक्त २० मिनिटे	अध्ययन शैलीनुसार मूल्यांकन पद्धती								
			अतिरिक्त २० गुण	लेखनिक	विषय योजना	शैक्षणिक साहित्य	अनुकूलित प्रश्नावली	मौखिक परीक्षा	प्रात्य. सूट	आकृत्या नकाशे सूट	बैठक व्यवस्था
१८.	थॅलेसेमिया (Thalassemia)	✓	✓	✓	--	✓	✓	--	गरजे-नुसार	--	गरजे-नुसार
१९	सिकल सेल डिसीज (Sickle cell disease)	✓	✓	✓	--	✓	✓	--	गरजे-नुसार	--	गरजे-नुसार
२०.	Chronic Neuro Logical disease	✓	✓	✓	--	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार
२१.	बहुविकलांगता (Multiples Disability MD)	✓	✓	✓	✓	✓	✓	✓	गरजे-नुसार	✓	गरजे-नुसार

रुब्रिक्स :

- **रुब्रिक्स म्हणजे काय?** : विशिष्ट कार्यानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यासाठी निकषांचा वर्णनात्मक संच म्हणजे 'रुब्रिक्स' होय. रुब्रिक्स हे असे मूल्यांकनाचे साधन आहे जे स्पष्टपणे लिखित, मौखिक व दृश्य अशा कामाच्या सर्व घटकांमधील उपलब्धतेचे निकष स्पष्टपणे विधान स्वरूपात सूचित करते.
- **रुब्रिक्सचे महत्त्व, गरज आणि आवश्यकता :** रुब्रिक्समध्ये लवचीकता व सुधारणेला वाव आहे. रुब्रिक्समुळे विद्यार्थी प्रगतीच्या स्तरावर कुठे आहे ते समजते. रुब्रिक्सद्वारा प्रोत्साहन देता येते. अध्ययन-अध्यापन पद्धती सुधारता येते.

१) विद्यार्थ्यांच्या आकारिक मूल्यमापनासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनतंत्राच्या सुलभ व शास्त्रीय वापरासाठी रुब्रिक्सची निर्मिती करावी, रुब्रिक्स हे निरीक्षण असून ते पुराव्यावर आधारित असते.

२) रुब्रिक्स द्वारा मापन करावयाचे उद्दिष्ट हे स्पष्ट असावे.

३) जेव्हा रुब्रिक्स स्वयं-मूल्यांकन किंवा सहाध्यायी मूल्यांकनासाठी वापरले जाणार असेल तेव्हा रुब्रिक्स हे दिव्यांग विद्यार्थ्यांना आकलन होण्यास सोपे असावे. उदा.

इयत्ता : दुसरी - विषय : भाषा

घटक - भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण

अध्ययन निष्पत्ती :

१) पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी, कथा, कविता इ. बद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपले मत व्यक्त करतात.

२) गप्पा, गोष्टी व कविता इ. लक्षपूर्वक ऐकतात. स्वतःच्या भाषेत सांगतात.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

उपरोक्त अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शिक्षकाने वर्गात उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्यक्ष वस्तू, मोड्यूल, ब्रेल, अम्ब्रोस चित्रपट्टी, ब्रेल शब्द चिठ्ठी तयार करून त्याचे सादरीकरण करून पुरेसे अध्ययन अनुभव दिल्यानंतर पुढील मूल्यमापन साधनतंत्र वापरू शकतात.

साधने : प्रत्यक्ष वस्तू, मोड्यूल, ब्रेल, अम्ब्रोस चित्रपट्टी, ब्रेल शब्दचिठ्ठी इ.

निकष	श्राव्य अध्ययनशैली	दृक् अध्ययनशैली	स्पर्श अध्ययनशैली	बहु अध्ययनशैली
माहितीचे स्रोत	ब्रेल पाठ्यपुस्तकाचा वापर केला.संदर्भ पुस्तक यासोबत तंत्रज्ञानाचा देखील वापर केला.	पाठ्यपुस्तक चित्र कार्ड, शब्दकार्डचा वापर केला.	ब्रेल पाठ्यपुस्तक, ब्रेल व अम्ब्रोस चित्रकार्ड व शब्दकार्ड चा वापर केला.	पाठ्यपुस्तक, संदर्भ पुस्तक यासोबत तंत्रज्ञानाचा देखील वापर केला.
शब्द, चित्र पट्टी व प्रत्यक्ष वस्तू	प्रत्यक्ष वस्तू, सर्व घटक समाविष्ट करून घेतले, योग्य मांडणी केली.	प्रत्यक्ष वस्तू, सर्व घटक समाविष्ट करून घेतले.	प्रत्यक्ष वस्तू त्यांचा आकार, गंध, चव, ब्रेलमध्ये शब्दचिठ्ठी हे सर्व घटक समाविष्ट केले.	प्रत्यक्ष वस्तू त्यांचा आकार, रंगसंगती, गंध, चव, शब्दचिठ्ठी, चित्रचिठ्ठी हे सर्व घटक समाविष्ट केले.
सादरीकरण	प्रत्यक्ष वस्तूंची नावे सांगितली व जास्तीत जास्त माहितीचे सादरीकरण केले. ब्रेल शब्दचिठ्ठी वाचन करून दाखवले.	फक्त नावे दाखवली प्रत्यक्ष वस्तू दाखवल्यावर त्याबद्दल सांकेतिक खुणांमार्फत माहिती सादर केली.	प्रत्यक्ष वस्तू स्पर्शाने, गंध, चव घेऊन, ब्रेल शब्दचिठ्ठी यांच्या साहाय्याने माहिती सादर केली.	प्रत्यक्ष वस्तू, शब्दचिठ्ठी, चित्र पट्टी, मोड्यूल व सादरीकरण दिलेल्या वेळेत दर्जेदारपणे सादर केले.
वेळेचे व्यवस्थापन	ब्रेल, अम्ब्रोस चित्रकार्ड, शब्दकार्ड, प्रत्यक्ष वस्तू, मोड्यूल व सादरीकरण दिलेल्या वेळेत पूर्ण केले.	प्रत्यक्ष वस्तू, शब्द चिठ्ठी, चित्रपट्टी, मोड्यूल व सादरी–करण दिलेल्या वेळेत पूर्ण केले.	प्रत्यक्ष वस्तू, ब्रेल, गंध, चव, मोड्यूल अपेक्षेप्रमाणे जास्तीत जास्त पूर्ण करण्याचा प्रयत्न केला व सादरीकरण करण्याचा प्रयत्न केला.	प्रत्यक्ष वस्तू, शब्दचिठ्ठी, चित्र पट्टी, मोड्यूल दिलेल्या वोळेत दर्जेदारपणे सादर केले.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात समाविष्ट साधनांच्या परिणामकारक व वस्तुनिष्ठ वापरासाठी उपरोक्त पडताळा सूची/पदनिश्चयन श्रेणी/रुब्रिक्स यांचा वापर करता येणे सहज शक्य आहे.

स्वयं–मूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन व गट अध्ययनाचे मूल्यांकन यातील फरक

इयत्ता : दुसरी – विषय : भाषा

घटक – भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण

अध्ययन निष्पत्ती :

१) पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी, कथा, कविता इ. बद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपले मत व्यक्त करतात.

२) गप्पा, गोष्टी व कविता इ. लक्षपूर्वक ऐकतात. स्वत:च्या भाषेत सांगतात.

घटक	अध्ययनशैली	स्वयं मूल्यमापन	सहाध्यायी मूल्यमापन	गट अध्ययनाचे मूल्यमापन
हेतू	श्राव्य अध्ययन शैली	१) विद्यार्थ्यांना स्वत:चे अध्ययन समजून त्यात सुधारणा करण्यास संधी देणे. २) विद्यार्थ्यांना त्याच्यामधील क्षमता व कौशल्य वाढीसाठी प्रेरित करणे. ३) विद्यार्थ्यांना स्वत:ची अध्ययन पडताळणी करण्यास संधी देणे.	१) विद्यार्थ्यांना आपली गरज, क्षमता, कौशल्य, प्रगती आणि विकास यावर विचार करून मूल्यांकन करण्यास शिकविणे. २) विद्यार्थ्यांना स्वत:ची कार्यक्षमता सुधारण्यासाठी विचार करण्यास मदत करणे.	१) गटातील विद्यार्थ्यांचे अध्ययन समजून घेणे. २) गटातील सहाध्यायी विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत, हालचाली, बौद्धिक कौशल्ये व सामाजिक कौशल्ये यांचे मूल्यमापन करणे. ३) गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनातील उणिवांवर मात करण्यास मदत करणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

घटक	अध्ययनशैली	स्वयं मूल्यमापन	सहाध्यायी मूल्यमापन	गट अध्ययनाचे मूल्यमापन
हेतू	दृक् अध्ययन शैली	१) विद्यार्थ्यांना स्वत:चे अध्ययन समजून घेऊन त्यात सुधारणा करण्यास संधी देणे. २) विद्यार्थ्यांना त्याच्यामधील क्षमता व कौशल्य वाढीसाठी प्रेरित करणे. ३) विद्यार्थ्यांना स्वतःची अध्ययन पडताळणी करण्यास संधी देणे.	१) विद्यार्थ्यांना आपली गरज, क्षमता, कौशल्य, प्रगती आणि विकास यावर विचार करून मूल्यांकन करण्यास शिकविणे. २) विद्यार्थ्यांना स्वत:ची कार्यक्षमता सुधारण्यासाठी विचार करण्यास मदत करणे.	१) गटातील विद्यार्थ्यांचे अध्ययन समजून घेणे. २) गटातील सहाध्यायी विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत, हालचाली, बौद्धिक कौशल्ये व सामाजिक कौशल्ये यांचे मूल्यमापन करणे. ३) गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनातील उणिवांवर मात करण्यास मदत करणे.
हेतू	स्पर्श अध्ययन शैली	१) विद्यार्थ्यांना स्वत:चे अध्ययन समजून घेऊन त्यात सुधारणा करण्यास संधी देणे. २) विद्यार्थ्यांना त्याच्यामधील क्षमता व कौशल्य वाढीसाठी प्रेरित करणे. ३) विद्यार्थ्यांना स्वतःची अध्ययन पडताळणी करण्यास वेळ देणे.	१) विद्यार्थ्यांना आपली गरज, क्षमता, कौशल्य, प्रगती आणि विकास यावर विचार करून प्रतिसादाचे स्वरूप लक्षात घेत टप्प्या टप्प्याने मूल्यांकन करण्यास शिकविणे. २) विद्यार्थ्यांना स्वत:ची कार्यक्षमता सुधारण्यासाठी विचार करण्यास मदत करणे.	१) गटातील विद्यार्थ्यांचे अध्ययन समजून घेणे. २) गटातील सहाध्यायी विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत, हालचाली, बौद्धिक कौशल्ये व सामाजिक कौशल्ये व वर्तन यांचे मूल्यमापन करणे. ३) गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनातील

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

घटक	अध्ययनशैली	स्वयं मूल्यमापन	सहाध्यायी मूल्यमापन	गट अध्ययनाचे मूल्यमापन
				उणिवांवर मात करण्यास मदत करणे.
हेतू	बहुअध्ययन शैली	१) विद्यार्थ्यांना स्वत:चे अध्ययन समजून त्यात सुधारणा करण्यास संधी देणे. २) विद्यार्थ्यांना त्यांच्यामधील क्षमता व कौशल्य वाढीसाठी प्रेरित करणे. ३) विद्यार्थ्यांना स्वतःची अध्ययन पडताळणी करण्यास वेळ देणे.	१) विद्यार्थ्यांना आपली गरज, क्षमता, कौशल्य, प्रगती आणि विकास यावर विचार करून मूल्यांकन करण्यास शिकविणे. २) विद्यार्थ्यांना स्वत:ची कार्यक्षमता सुधारण्यासाठी विचार करण्यास मदत करणे.	१) गटातील विद्यार्थ्यांचे अध्ययन समजून घेणे. २) गटातील सहाध्यायी विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत, हालचाली, बौद्धिक कौशल्ये व सामाजिक कौशल्ये व वर्तन यांचे मूल्यमापन करणे. ३) गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनातील उणिवांवर मात करण्यास मदत करणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीवर आधारित कृती आराखडा

विषय : मराठी (बालभारती भाग – १) – इयत्ता : दुसरी

पाठाचे नाव : भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण

दिव्यांग विद्यार्थ्यांची अध्ययन शैली विचारात घेऊन विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर व प्रतिसाद यावर आधारित कृती आराखडा तयार करण्यात यावा.

सूचना – कृती आराखळ्यासाठी रुब्रिक किंवा Rating Scale नुसार अध्ययन स्तर निश्चित करण्यात यावा.

अध्ययन निष्पत्ती :

१) एखादी कथा, कविता स्वतःच्या कल्पनेने पूर्ण करतात.

२) लिखित/छापलेली मजकुरातील अक्षर, शब्द, आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात.

३) चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूचे बारकाईने निरीक्षण करतात.

४) चित्रातील व चित्रमालिकेतील घडणाऱ्या घटना, कृती आणि पात्र इ. एकसंघपणे समजून त्याचा आनंद घेतात.

५) परिचित/अपरिचित साहित्यात रस घेतात आणि अर्थ शोधण्यासठी विविध युक्त्यांचा वापर करतात. (उदा. चित्र व मजकूर यांचा अदाज लावणे, शब्द ओळखणे, पूर्वानुभव आणि माहितीचा वापर करून अर्थाचा अंदाज करणे.)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	पाठ्यपुस्तकातील घटक	विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर व प्रतिसाद यावर आधारित कृती आराखडा			
		दृश्य शैली (जी मुले पाहून शिकतात.)	**श्राव्य शैली** (जी मुले ऐकून शिकतात.)	**स्पर्श शैली** (जी मुले स्पर्श करून शिकतात.)	**बहु शैली** (सर्व पंच ज्ञानेंद्रियांवरून शिकतात.)
		अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव
१.	चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून पाठवा.	चित्रकार्ड, शब्दकार्ड, व्हिडिओ, गरजेनुसार बाजारातील, स्वयंपाक घरातील भाज्यांचे प्रत्यक्ष अनुभव (पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)	ब्रेल शब्दकार्ड बाजारातील, स्वयंपाक घरातील भाज्याचे प्रत्यक्ष अनुभव, गंध, चव, वास्तविक मोड्यूल पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर	बाजारातील, स्वयंपाक घरातील भाज्यांचे प्रत्यक्ष अनुभव, गंध, चव वास्तविक मोड्यूल (पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)	पाठ्यपुस्तक, चित्रकार्ड, शब्दकार्ड, ठळक अक्षरातील शब्दकार्ड/ अम्ब्रोस केलेले शब्द, चित्रकार्ड, व्हिडिओ, गरजेनुसार बाजारातील, स्वयंपाक घरातील भाज्यांचे प्रत्यक्ष अनुभव. गंध, चव, वास्तविक मोड्यूल (पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)
२.	शैक्षणिक साहित्य	१) पाठ्यपुस्तक	१) वास्तविक मोड्यूल (पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)	१) वास्तविक मोड्यूल	१) शक्य असे वास्तविक मोड्यूल
		२) चित्रकार्ड पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा कांदा, मिरची, गाजर.	२) पाठ्यपुस्तक	२) पाठ्यपुस्तक	२) प्रतिकृती

अ. क्र.	पाठ्यपुस्तकातील घटक	विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर व प्रतिसाद यावर आधारित कृती आराखडा			
		दृश्य शैली (जी मुले पाहून शिकतात.)	**श्राव्य शैली** (जी मुले ऐकून शिकतात.)	**स्पर्श शैली** (जी मुले स्पर्श करून शिकतात.)	**बहु शैली** (सर्व पंच ज्ञानेंद्रियांवरून शिकतात.)
		अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव
		३) शब्दकार्ड पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)	३) (पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)	३) (पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)	३) पाठ्यपुस्तक
		४) व्हिडिओ	४) व्हिडिओ	४) व्हिडिओ	४) शब्दकार्ड, अम्ब्रोस केलेले पिशवी, टोपली, टोमॅटो, काकडी, कोथिंबीर, वांगी, बटाटा, भोपळा, कांदा, मिरची, गाजर)
३.	कालावधी	३ दिवस	३ दिवस	३ दिवस	५ दिवस
४.	आकारिक मूल्यमापन वापरणारे साधन तंत्र	१) दैनंदिन निरीक्षण	१) दैनंदिन निरीक्षण	१) दैनंदिन निरीक्षण	१) दैनंदिन निरीक्षण
		२) तोंडीकाम	२) तोंडीकाम	२) उपक्रम कृती	२) तोंडीकाम
		३) उपक्रम, कृती	३) उपक्रम, कृती	३) प्रकल्प	३) उपक्रम, कृती
		४) प्रकल्प	४) प्रकल्प	४) चाचणी	४) प्रकल्प
		५) चाचणी	५) चाचणी	५) स्वाध्याय	५) चाचणी
		६) स्वाध्याय	६) स्वाध्याय	६) इतर (गटकार्य, प्रश्नावली, स्वमूल्यमापन)	६) स्वाध्याय
		७) इतर (गटकार्य, प्रश्नावली, स्वमूल्यमापन)	७) इतर (गटकार्य, प्रश्नावली, स्वमूल्यमापन)		७) इतर (गटकार्य, प्रश्नावली, स्वमूल्यमापन)

अ. क्र.	पाठ्यपुस्तकातील घटक	विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर व प्रतिसाद यावर आधारित कृती आराखडा			
		दृश्य शैली (जी मुले पाहून शिकतात.)	**श्राव्य शैली** (जी मुले ऐकून शिकतात.)	**स्पर्श शैली** (जी मुले स्पर्श करून शिकतात.)	**बहु शैली** (सर्व पंच ज्ञानेंद्रियांवरून शिकतात.)
		अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव	अध्ययन अनुभव
५.	अनुकूलित प्रश्ननिर्मिती (किमान २)	१) आजीने बाजारामधून कोणत्या भाज्या आणल्या?	१) आजीने बाजारामधून कोणत्या भाज्या आणल्या?	१) आजीने बाजारामधून कोणत्या भाज्या आणल्या?	१) आजीने बाजारामधून कोणत्या भाज्या आणल्या?
		पर्याय	पर्याय	पर्याय	पर्याय
		१) भोपळा	१) भोपळा	१) भोपळा	१) भोपळा
		२) वांगे	२) वांगे	२) वांगे	२) वांगे
		३) टोमॅटो	३) टोमॅटो	३) टोमॅटो	३) टोमॅटो
		४) यापैकी काही नाही	४) यापैकी काही नाही	४) यापैकी काही नाही	४) यापैकी काही नाही

Com1/E(2024/25) Samveshit Shikashan /Proof-VIII/15-11-2024/T

संकलित मूल्यमापन :

संकलित मूल्यमापनामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासंदर्भातील प्रगतीचे संकलन करण्याचा प्रयत्न केला जातो. आकारिक मूल्यमापनामध्ये आठ साधनतंत्रे यांचा वापर करून विद्यार्थ्यांचे शरीर, मन, बुद्धी यांचा विकास याविषयी माहिती सातत्याने गोळा केली जाते. असे असताना संकलित मूल्यमापन कशासाठी असा प्रश्न मनात येतो. असे करण्याची निरनिराळी कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास हा निरनिराळ्या विषयांचे अध्ययन, सहशालेय उपक्रम यांतून निरनिराळ्या ठिकाणी/वेळी होत असतो. तुकड्या तुकड्यांमध्ये विखुरलेली ही माहिती एखाद्या टप्प्यावर एकत्र केल्याशिवाय त्या टप्प्यांवर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे संकीर्ण चित्र एका दृष्टिक्षेपात डोळ्यांसमोर येऊ शकणार नाही. दुसरे कारण म्हणजे आकारिक मूल्यमापनामध्ये दिसलेली प्रगती पुरेसा काळ लोटल्यानंतरही टिकून आहे किंवा नाही याचा मागोवा घेणे आवश्यक आहे. तसेच NCERT ने दिलेल्या २०१९ च्या मूल्यमापनाबाबत मार्गदर्शक सूचना व नवीन शैक्षणिक धोरण – २०२० नुसार शाळा आधारित मूल्यांकन, अध्ययन निष्पत्ती व क्षमता आधारित मूल्यमापन यानुसार संकलित मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

असा मागोवा पुरेशा कालावधीनंतर घ्यायला हवा कारण विद्यार्थ्यांची निरनिराळ्या विषयांतील समज वाढणे, जीवन कौशल्यातील विकास, चांगली सवय लागण्याच्या दृष्टीने प्रगती होणे असे बदल आठ/दहा दिवसांत होणारे नाहीत. पुरेसा कालावधी लोटल्याशिवाय अशा बदलांची अपेक्षा करणे योग्य होणार नाही. त्यामुळे वर्षातून दोन वेळा असे मूल्यमापन करणे पुरेसे आहे.

संकलित मूल्यमापनाचे हेतू :

१) शैक्षणिक वर्षातील निरनिराळ्या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाविषयी विखुरलेल्या माहितीमधून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे संकलित चित्र तयार करणे.

२) आकारिक मूल्यमापनामध्ये दिसलेली प्रगती टिकून आहे की नाही हे पाहणे.

३) व्यक्तिमत्त्व विकासाचे सिंहावलोकन करून पुढील अध्ययन–अध्यापन दिशा ठरविणे, त्यामध्ये आवश्यक बदल करणे.

संकलित मूल्यमापनाचे स्वरूप :

संकलित मूल्यमापन लेखी, तोंडी आणि प्रात्यक्षिक अशा प्रतिसादांच्या आधारे घ्यावयाचे आहे. याचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

१) कालावधी : प्रथम सत्राच्या व दुसऱ्या सत्राच्या अखेरीस,

२) विषय : पहिली ते आठवीच्या कला, कार्यानुभव तसेच शारीरिक शिक्षण व आरोग्य हे विषय वगळता बाकी सर्व विषयांसाठी संकलित मूल्यमापन करायचे आहे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाचे संकलित मूल्यमापन तोंडी व प्रात्यक्षिक स्वरूपात असावे.

३) **प्रतिसाद प्रकारानुसार भारांश :** प्रत्येक सत्रातील १०० गुणांपैकी इयत्ता गटनिहाय भारांश पुढील तक्त्यात दिला आहे.

इयत्ता	तोंडी/प्रात्यक्षिक	लेखी
पहिली–दुसरी	१० गुण	२० गुण
तिसरी–चौथी	१० गुण	३० गुण
पाचवी–सहावी	१० गुण	४० गुण
सातवी–आठवी	१० गुण	५० गुण

४) **प्रश्नपत्रिका निर्मिती :** वर्ग स्तरावर प्रश्नपत्रिका तयार कराव्या लागणार आहेत. इतर कोणत्याही यंत्रणेकडून तयार करण्यात आलेली साधने/तंत्रे, प्रश्नपत्रिका वापरता येणार नाहीत. यासाठी प्रत्येक शिक्षकाकडे स्वतःची प्रश्नांची वही असावी. त्यात निरनिराळ्या प्रकारच्या प्रश्नांचा संग्रह असावा. शाळेकडेही प्रत्येक इयत्तेसाठी आणि प्रत्येक विषयासाठी प्रश्नपेढी असावी. त्यामध्ये प्रश्नकार्डाचे संकलन अशा स्वरूपात ही पेढी ठेवल्यास आणि वाढविल्यास तिचा उपयोग अध्ययन सराव आणि मूल्यमापनासाठी होईल. अनुकूलित प्रश्नपत्रिका निर्मिती करताना आवश्यकतेनुसार विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांचे सहकार्य घेणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अनुकूलित प्रश्नपत्रिका नमुना

इयत्ता : पहिली **विषय** : मराठी **एकूण गुण–** २०

प्र. १. : 'म' आवाज ऐक, 'म' अक्षर पाहा 'म' अक्षराला ◯ कर. **(५)**

म ग र

क म ला मै ना

म

सा मा न मी रा

का म सो म वा र

प्र. २. : दिलेली अक्षरे गिरव, म्हण लिही. **(५)**

क → क .....

म → म .....

ल → ल .....

आ → आ .....

प्र. ३. : चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव. **(३)**



....

....

प्र. ४. : दिलेल्या अक्षराला काना जोडून वाच, लिही. **(२)**

१) क – .... २) म – .... ३) ल – ....

प्र. ५. : खालील शब्द वाच, लिही. **(५)**

१) काम – .... २) काका – .... ३) मला – ....

४) मका – .... ५) आला – ....

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अनुकूलित प्रश्नपत्रिका नमुना

इयत्ता : पहिली **विषय** : गणित **एकूण गुण** – २०

(प्रत्येक उपप्रश्नास २ गुण द्यावेत.)

प्र. १. : अ) वस्तू मोज संख्या सांग. (प्रत्यक्ष वस्तू देऊन)

= ☐

ब) काड्यांची संख्या सांग (प्रत्यक्ष वस्तू देऊन)



= ☐

क) प्रत्येक माळेत १० मणी आहेत, तर किती दशक मणी आहेत ते सांग.



= ☐

ड) १ दशक ८ एकक ही संख्या वस्तू वापरून तयार कर व सांग.

प्र. २. : अ) हातावर एक संख्या काढतो तिच्या मागची व पुढची संख्या सांग.

	७	

ब) बरणीत किती लाडू आहेत?

= ☐

क) खोक्यातील वस्तू ओळख मोज व एकत्र कर.



४
+ ३
☐

ड) सारख्या आकाराच्या वस्तू वेगळ्या कर व मोज.

= ☐ = ☐

प्र. ३. : अ) टेबलावर असलेली वस्तू टेबलाखाली ठेव.

ब) वाटीत फुगे किती आहेत?

(वाटीत फुगे, कापडाचे तुकडे ठेवणे.)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

संकलित मूल्यमापन करण्याबाबत सूचना :

- प्रथम सत्राच्या अखेरीस पहिले संकलित मूल्यमापन करणे.
- द्वितीय सत्राच्या अखेरीस दुसरे संकलित मूल्यमापन करणे.
- मूल्यमापनात उद्दिष्टानुसार लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक प्रश्नाचा समावेश असावा.
- विद्यार्थ्याला आपली मते आनंदीपणे, मुक्तपणे व सहजपणे देता येतील याची दक्षता घ्यावी शिक्षकाने विषयनिहाय मूल्यमापन करावे.
- पहिली ते चौथी – वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्न असावेत.
- पाचवी ते आठवी – वस्तुनिष्ठ, लघुत्तरी प्रश्न व दीर्घोत्तरी प्रश्न असावेत.
- संकलित मूल्यमापनाचे वेळापत्रक वर्ग व शाळास्तरावर निश्चित करावे व वेळेबाबत लवचीकता असावी.
- 'ड' श्रेणी आलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून किमान क – २ श्रेणीपर्यंत आणणे हे शाळा व शिक्षकांना बंधनकारक आहे.
- कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण व आरोग्य या विषयांचे संकलित मूल्यमापन करू नये.
- संकलित मूल्यमापनात तोंडी व प्रात्यक्षिकसाठी १० गुण द्यावेत उर्वरित गुण लेखीसाठी द्यावेत.
- शिक्षकांनी स्वतः प्रश्नपत्रिका तयार करावी.
- तोंडी व प्रात्यक्षिकाचे गुण वेळीच नोंदवहीत नोंदवावे.
- अनुपस्थित विद्यार्थी उपस्थित झाल्यावर मूल्यमापन करावे.
- संकलित मूल्यमापन करताना मुलांना गरजेप्रमाणे वेळ द्यावा.
- एकावेळी एका वर्गाचे, एका विषयाचे मूल्यमापन करावे.
- लेखी परीक्षा घेताना लवचीकता असावी.
- विद्यार्थ्याची क्षमता व अध्ययनशैलीनुसार १६ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार अनुकूलित बदल करून लेखी परीक्षा घ्यावी.
- चाचणी सोडवण्यासाठी वरील शासननिर्णयानुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा, परंतु लेखनिकाला सदर विद्यार्थी काही सांगू शकत नसेल फक्त Pointing करत असेल तर तो प्रतिसाद ग्राह्य धरून त्या प्रश्नाला गुण द्यावेत.
- चाचणीमध्ये अंकांच्या जोड्या लावणे ही गणिती क्रिया असेल त्यासाठी लेखनिक उपलब्ध करून दिला, परंतु लेखनिकाला सदर विद्यार्थी काही सांगू शकत नसेल, Pointing देखील करत नसेल किंवा हाताने अंकांची जोडी लावत नसेल अशा वेळेस त्याची चाचणी घेताना लेखनिकाने मुलाचा हात पकडून १ अंक समोर कुठे दिसतो हे स्वतःच्या हाताने एक एक करून दाखवले आणि योग्य

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

पर्यायाला किंवा/उत्तराला मुलगा चेहऱ्यावर प्रतिसादात्मक हावभाव आणत असेल तर लेखनिकाने तसे उत्तर चाचणीत, नोंदवहीत नोंदवून त्याला गुण द्यावेत.

विविध अध्ययन शैलीच्या बालकांसाठी प्रश्नपेढी तयार करण्यासाठीचा नमुना :

अ. क्र.	घटक	उपघटक	अध्ययन निष्पत्ती क्र.	वस्तुनिष्ठ लघुत्तरी/ दीर्घोत्तरी यांपैकी कोणत्या स्वरूपाचा प्रश्न आहे.	अध्ययन शैली	प्रश्न	पर्याय				अपेक्षित उत्तराचा पर्याय	प्रश्नाचा स्तर (सोपे/ मध्यम/ कठीण) यांपैकी कोणता आहे.
							A	B	C	D		
					सामान्य							
					दृश्य							
					श्राव्य							
					स्पर्श							
					बहू							

१) प्रश्न प्रकारानुसार भारांश :

इयत्ता गटानुसार प्रश्न प्रकार भारांश पुढील तक्त्यात सुचविला आहे.

इयत्ता	वस्तुनिष्ठ	लघुत्तरी	दीर्घोत्तरी
पहिली ते दुसरी	७०%	३०%	–
तिसरी ते चौथी	४०%	५०%	१०%
पाचवी ते आठवी	२०%	६०%	२०%

२) प्रश्नांबाबत विशेष अपेक्षा :

- इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्तीचा विचार करावा.
- मुक्तोत्तरी प्रश्नांचा वापर करावा.
- सर्जनशील प्रतिसादांना वाव देणाऱ्या प्रश्नांचा समावेश असावा.

शाळा आधारित मूल्यमापनाच्या सूचना :

शाळा आधारित मूल्यांकन हे पूर्णपणे वर्ग किंवा विद्यार्थी यांच्या गरजांनुसार वर्ग शिक्षकांद्वारे तयार केलेल्या मूल्यांकन साधनांच्या माध्यमातून सूक्ष्म स्तरावरील गुणवत्तेचे मूल्यांकन करण्याविषयी आहे.

१) मूल्यांकन चाचण्या आणि तंत्रांची संख्या : शाळेची भौगोलिक व सांस्कृतिक विविधता लक्षात

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

घेऊन सर्व विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे मूल्यांकन करण्यासाठी एकच चाचणी पुरेशी होऊ शकत नाही. म्हणून वेगवेगळ्या भागातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक आणि भाषिक विविधतेला अनुसरून शाळानिहाय विविध मूल्यांकन चाचण्या तयार करणे आवश्यक आहे. शिवाय मूल्यांकन तंत्रे देखील नावीन्यपूर्ण असायला हवीत आणि वर्गातील विद्यार्थ्यांना अध्ययन निष्पत्ती प्राप्तीच्या प्रयत्नात सहभागी करून घेतले पाहिजे. तथापि विद्यार्थ्यांना मूल्यांकनाचा दबाव वाटू नये म्हणून शक्यतो सहयोग आणि गटकार्याच्या माध्यमातून वर्गात एक आनंददायी कृती म्हणून मूल्यांकन हाती घेतले पाहिजे.

२) **अध्ययन निष्पत्तीवर आधारित नमुना मूल्यांकन चाचणीची निर्मिती :** या मूल्यांकन चाचण्या व्यक्तिनिष्ठ आणि वर्गातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तरानुसार असाव्यात, परंतु या व्यक्तिनिष्ठतेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन निष्पत्ती प्राप्तीचा उद्देश बाजूला राहता कामा नये. या मूल्यांकन चाचण्या तयार करताना प्रामुख्याने अध्ययन निष्पत्तीवर लक्ष देण्यात यावे जेणेकरून वर्गासाठी तयार केलेल्या दोन वेगवेगळ्या चाचण्यांत दर्जा राखला जाईल.

३) **प्रश्नपेढी विकसन :** DIET आणि SCERT यांसारख्या संस्था वेगवेगळ्या इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी विषयनिहाय प्रश्नसंचदेखील विकसित करू शकतात. प्रश्नपेढीसाठी प्रश्न विकसित करताना प्रत्येक वर्गाच्या अध्ययन निष्पत्ती विचारात घेतल्या पाहिजेत. या प्रश्नपेढ्यांचा उपयोग वर्गातील गटांसाठी प्रश्नमंजुषा म्हणून केला जाऊ शकतो किंवा विद्यार्थ्यांना इतर गटासाठी प्रश्नमंजुषा तयार करण्यासाठी गटामध्ये काम करण्यास सांगितले जाऊ शकते. मात्र या प्रश्नपेढीतील प्रश्नांचा आकारिक किंवा संकलित मूल्यमापनासाठी वापर करताना शाळेतील विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाच्या संदर्भाने आवश्यक तो बदल शिक्षकाने करणे गरजेचे आहे.

४) **मूल्यांकनासाठी दृक्श्राव्य साधनांची निर्मिती :** विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन निष्पत्तीची प्राप्ती समजून घेण्यासाठी आणि त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी काही दृक्श्राव्य चाचण्या देखील विकसित केल्या जाऊ शकतात. ही दृक्श्राव्य साधने वेगवेगळ्या भाषेत तयार करू शकतात, जेणेकरून विविध सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भाषिक पार्श्वभूमीतून असलेल्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तींचे मूल्यांकन करण्यासाठी ते अधिक योग्य ठरू शकतील.

शाळा आधारित मूल्यमापनाची साधनतंत्रे :

१) **निरीक्षण :** दिव्यांग विद्यार्थी कोणत्या गोष्टीमुळे अध्ययनात गुंतून राहतो याचे निरीक्षण करणे हा विद्यार्थ्यांचे अध्ययन समजणे यातील एक महत्त्वाचा भाग आहे म्हणून प्राथमिक शिक्षणादरम्यान 'निरीक्षण' हे मूल्यांकनाचे एक महत्त्वाचे तंत्र आहे. विद्यार्थी खेळत किंवा शिकत असताना त्याला आपल्या क्षमता व्यक्त करता येतील अशा संधी निर्माण करणे गरजेचे आहे, कारण खेळ

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

आधारित पद्धती, कृती आधारित पद्धती या शिक्षणशास्त्राने सुचविलेल्या अध्यापन पद्धती आहेत. या अध्यापन पद्धती वर्गात किंवा घरी देखील सहज वापरल्या जाऊ शकतात आणि निरीक्षण केले जाऊ शकते. विद्यार्थ्यांची आवड ही एक अध्ययनासाठीची उत्कृष्ट प्रेरणा आहे. जेव्हा विद्यार्थी एखाद्या कृतीमध्ये किंवा रंजक अध्ययन अनुभवात गुंतलेले असतात, तेव्हा ते शिकण्याची शक्यता अधिक असते तसेच विद्यार्थी कोणत्या परिस्थितीत उत्तमप्रकारे शिकतात? या प्रश्नाचे वेगवेगळ्या विद्यार्थ्यांसाठीचे उत्तर वेगवेगळे असेल. उदा. प्रत्येक दिव्यांग विद्यार्थीची शिकण्याची क्षमता वेगवेगळी असते. उदा. अंध विद्यार्थी हा स्पर्शाने अथवा श्रवणाने शिकतो, कर्णबधीर हा विद्यार्थी बघून शिकतो. बहुविकलांग विद्यार्थी हा श्रवणाने, बघून शिकतो.

२) **स्वयं-मूल्यांकन आणि सहाध्यायी मूल्यांकन** : विशेषतः प्राथमिक स्तरावरील मूल्यांकन हे विद्यार्थ्यांना एकमेकांचे आणि त्यांचे स्वतःचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षकांनी स्वयं आणि सहाध्यायी मूल्यांकनाचा वापर करणे गरजेचे आहे. मुलांना आपल्या शिक्षणाची, मूल्यांकन निकष आणि त्यांच्या स्वतःच्या व त्यांच्या सहाध्यायींच्या कामाचे चिंतन यामध्ये सक्रिय राहण्याची जबाबदारी घेण्यास यातून प्रेरणा मिळेल. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या अगोदरच्या चुकांमधून शिकायला मिळेल, त्यांची बलस्था आणि कमतरता ओळखता येतील. उदा. अंध, मतिमंद, कर्णबधिर, बहुविकलांग, स्वमग्न इत्यादी दिव्यांग विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत वेगवेगळी असल्याचे दिसून येते. त्यानुसार त्यांना आपल्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करून शिकता येईल. शिक्षकांना नावीन्यपूर्ण आणि खेळ आधारित कार्यनिती वापरून स्वयं आणि सहाध्यायी मूल्यांकन करता येईल. छोट्याछोट्या गटांमध्ये विविध कृती देऊन विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक, सामाजिक, भावनिक विकासाचे मूल्यांकन करण्यासाठी कृती, उपक्रम, गटकार्य, प्रकल्प यांचा अतिशय कल्पकतेने वापर केला जाऊ शकतो. विद्यार्थ्यांसाठी हे ओझे वाटू नये यासाठी स्वयं आणि सहाध्यायी मूल्यांकनाचा वापर करताना लहान विद्यार्थ्यांबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

इयत्ता : पहिली – विषय : गणित

अध्ययन निष्पत्ती : वस्तूंचा आकार आणि लहान-मोठेपणा, घरंगळणे, घसरणे यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतो.

अध्ययन अनुभव : विद्यार्थ्यांना आकारावर आधारित वस्तूंचे गट तयार करण्याचे काम दिले जाते.

संसाधने : त्रिकोणी, आयताकृती, गोलाकार आणि चौकोनी आकारांच्या पुठ्ठ्यांचे तुकडे आणि या आकारांच्या काही वस्तू आणि खेळणे जसे की, शाईचे पॅड, बांगड्या, अंगठ्या इत्यादी.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

स्वयं-मूल्यांकन पत्रिका : पडताळा सूची

नाव : .....

तुम्हांला तुमच्यासाठी योग्य वाटणाऱ्या पर्यायावर खूण करा.

(लहान विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थी जेथे खूण करणार आहेत त्याठिकाणी शिक्षक इमोजी किंवा हसरे चेहरे वापरू शकतात.)

अ. क्र.	विधाने	होय	नाही
१)	मी वस्तूंचे गट केले आणि मी शिक्षक/मित्रांच्या मदतीने कागद (पेपर) वापरून नवीन आकार तयार केले.		
२)	मी प्रामुख्याने कोणत्याही मदतीशिवाय ते सर्व आकार आणि वस्तूंचे गट तयार केले. फक्त काही वस्तूंसाठी मी मदत मागितली.		
३)	गट कसा तयार करावा हे मला समजले नव्हते, म्हणून शिक्षकांना विचारले.		
४)	आकारांचे गट करण्यास मला फार थोडा वेळ लागला आणि मी इतरांना देखील मदत केली.		

सहाध्यायी मूल्यांकन पत्रिका : पडताळा सूची

माझ्या मित्राचे नाव : .....

तुम्हांला तुमच्यासाठी योग्य वाटणाऱ्या पर्यायावर खूण करा.

अ. क्र.	विधाने	होय	नाही
१)	कोणत्याही मदतीशिवाय काम पूर्ण केले.		
२)	इतरांना त्यांची कामे पूर्ण करण्यास मदत केली.		
३)	काम पूर्ण करण्यासाठी मदत मागितली जात होती.		
४)	काम खूप कठीण वाटले, म्हणून तो/ती शांत बसून होती.		

३) **संचिका (Portfolio)** : संचिका विद्यार्थ्यांची प्रगती, विद्यार्थ्यांची अध्ययनातील बलस्थाने आणि संपादन यांविषयी सर्वंकष कल्पना देते. संचिका अगोदरची वर्गातील विद्यार्थ्यांची प्रगती आणि अध्ययन प्रक्रिया या विषयी शिक्षकास आवश्यक माहिती देखील प्रदान करते. शिक्षकांशी चर्चा करून विद्यार्थ्यांनी संचिका तयार करणे आवश्यक असून सहाध्यायी आणि स्वयं-मूल्यांकन यांसाठी देखील याचा उपयोग केला जाऊ शकतो. दिव्यांग विद्यार्थ्यांनी त्याच्या क्षमतेनुसार

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

संचिकेत केलेल्या चांगल्या कामाच्या नोंदी बरोबर सर्व उल्लेखनीय कृतींची तसेच उपक्रमांची नोंद असावी. ज्यात वर्गकार्य, कृतिपत्रिका, प्रकल्प, विशेष कृती, विद्यार्थ्यांसोबतचे तोंडी संवाद इ. चा समावेश होतो.

४) **रुब्रिक्सद्वारे मूल्यांकन :** रुब्रिक्सचा वापर करताना ते रुब्रिक्स वापरकर्त्यांचा उपलब्ध वेळ, कामाचे स्वरूप इ. च्या व्यवहार्यतेवर अवलंबून असावा. उदा. जर विद्यार्थ्याला त्यांचा वापर करावयाचा असल्यास त्यांची निर्मिती करताना आणि वापर करताना त्यांच्या क्षमता विचारात घेणे गरजेचे आहे. रुब्रिक्स हे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यांकन आणि शाळा आधारित मूल्यांकन (CCE व SBA) यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन शिक्षकांनी रुब्रिक्स विकसित केले पाहिजेत. ते शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना समजायला सुलभ असायला हवे.

५) **क्षमता आधारित मूल्यांकन :** आतापर्यंतच्या शिक्षण पद्धतीचे अवलोकन केले असता, अध्यापनाची उद्दिष्टे, अध्ययन अनुभव, मूल्यमापन या सर्व प्रक्रियेमध्ये शिक्षण प्रक्रिया ही पाठ्यपुस्तक केंद्रित झालेली पाहायला मिळते. प्रत्येक स्तरासाठी अभ्यासक्रम व इयत्तेसाठी पाठ्यक्रम निश्चित केलेला असतानाही केवळ पाठ्यपुस्तक शिकवून संपविणे म्हणजे अभ्यासक्रम पूर्ण करणे असा समज आहे. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पाठ्यपुस्तक हे केवळ एक साधन आहे, साध्य नव्हे, परंतु आपल्या रूढ शिक्षण पद्धतीमध्ये मात्र अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन हे पाठ्यपुस्तक आशयाला अनुसरून होत असल्याचे दिसून येते.

अध्ययन निष्पत्ती : राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) ने २०१७ मध्ये प्राथमिक वर्ग आणि विषयासाठी **'अध्ययन निष्पत्ती'** विकसित केल्या आहेत. अध्ययनार्थी त्यांच्या स्वतःच्या गतीने आणि कौशल्याने या अध्ययन निष्पत्ती साध्य करू शकतात. अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याच्या प्रक्रियाभिमुख पद्धतींचा अवलंब करण्यासाठी शिक्षकांना अध्यापन पद्धती आणि मूल्यांकनाबाबत माहिती दिली पाहिजे. त्यामुळे आता वर्गात अध्ययन प्रक्रिया ही आशय आधारित न होता **अध्ययन निष्पत्ती** आधारित होणे अत्यंत आवश्यक आहे. अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शिक्षकांनी सर्वसमावेशक वर्गात वेगवेगळ्या **विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार** विविध प्रकारच्या शैक्षणिक परिस्थिती/संधी निर्माण आणि उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. **अध्ययन निष्पत्ती** या शिक्षक आणि भागधारकांसाठी मार्गदर्शक बिंदू म्हणून काम करतात आणि वेगवेगळ्या वर्गातील मुलांच्या शिकण्याच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी त्यांचा सर्वांनी वापर केला पाहिजे.

६) **क्षमता आधारित अध्ययन :** क्षमता ही अशी वर्णन विधाने आहेत की, जे विद्यार्थ्यांना काय कळेल, ते काय करू शकतील किंवा पाठ्यक्रम पूर्ण केल्यावर अथवा पाठ्यक्रमाशिवाय काय करून दाखवू शकतील हे निर्देशित करतात. अध्ययन निष्पत्ती या मूलतः क्षमता संपादन केल्याचा पुरावा

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

आहे. अध्ययन निष्पत्ती ही विशिष्ट विधाने आहेत, जे विद्यार्थी नेमके काय करू शकतात याचे मापन करता येण्याजोग्या पद्धतीचे तंतोतंत वर्णन करतात. एखाद्या क्षमतेसाठी परिभाषित केलेले, मोजता येणारे परिणाम एकापेक्षा जास्त असू शकतात. एखादी क्षमता प्राप्त होण्यासाठी एक किंवा अधिक अध्ययन निष्पत्ती साध्य कराव्या लागतात.

सद्यःस्थितीमध्ये इयत्तानिहाय सर्व विषयांच्या क्षमता निर्देशित केल्या नसतील तरीही विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती निश्चित केल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने इयत्ता व विषयनिहाय दिलेल्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यासाठी त्या अध्ययन निष्पत्तींचे विश्लेषण करून अध्ययन अनुभवांची रचना व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे तसेच अध्ययन निष्पत्ती व अध्ययन अनुभव आधारित मूल्यमापन साधनांचा वापर करणे आवश्यक आहे.

विविध पार्श्वभूमीतील अध्ययन गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घ्याव्यात, तसेच विद्यार्थी काय शिकत आहेत यावर लक्ष द्यावे. केवळ पाठ्यक्रम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित केले जाऊ नये.

६) **क्षमता आधारित मूल्यांकन :** क्षमता आधारित मूल्यांकनामध्ये आकारिक मूल्यमापनावर अधिक भर दिला जातो. जेणेकरून, विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणी येत आहेत हे शिक्षकांना समजेल, जेणेकरून त्यांना मदत करता येईल, त्यांच्या अध्ययनात कुठे सुधारणा करणे आवश्यक आहे याबद्दल अभिप्राय देता येईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० ने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. शारीरिक विकास, सामाजिक–भावनिक विकास, बौद्धिक विकास, आध्यात्मिक आणि नैतिक विकास, कला आणि सौंदर्यवृत्तीचा विकास यांसारखी विकासाची वेगवेगळी क्षेत्रे आहेत. जे परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी आहेत. या विकासात्मक पैलूंमुळे विद्यार्थी जीवनातील जटिल परिस्थितींना तोंड देण्यास सक्षम बनतो.

७) **विद्यार्थी संपादणूक सर्वेक्षण :**

१) NAS (National Achievement Survey)

२) SLAS (State Level Assessment Survey)

३) FLS (Foundational Literecy Survey), FLN (Foundational Literecy and Numeracy)

४) SEAS (State Educational Assessment Survey)

५) इतर

वरीलप्रमाणे केंद्र स्तरावरून व राज्य स्तरावरून विविध सर्वेक्षणे हाती घेण्यात येतात. यातून देशाच्या, राज्याच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला जातो.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

इयत्ता पाचवी व आठवी परीक्षा कार्यपद्धती

प्रस्तावना

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०२३ (सुधारणा), दि. २९ मे, २०२३ अन्वये महाराष्ट्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील नियम – ३ व नियम – १० मध्ये सुधारणा केलेली आहे. त्यानुसार इयत्ता पाचवी व आठवी वर्गांसाठी वार्षिक परीक्षा असेल जर बालक वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाही, तर त्यास अतिरिक्त पूरक मार्गदर्शन प्रदान करून वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत पुनर्परीक्षेची संधी देण्यात येईल. जर ते बालक पुनर्परीक्षेत देखील नापास झाले तर त्याला इयत्ता पाचवीच्या वर्गात किंवा इयत्ता आठवीच्या वर्गात जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकास शाळेतून काढून टाकले जाणार नाही अशी तरतूद करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने इयत्ता पाचवी व आठवीसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे.

अध्ययन शैलीनुसार इयत्ता पाचवी व आठवी परीक्षा पद्धतीतील अनुकूलन

इयत्ता पाचवी व आठवीसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन कार्यपद्धतीमध्ये अनुकूलन पुढीलप्रमाणे करता येईल,

निकष	श्राव्य अध्ययन शैली	दृश्य अध्ययन शैली	स्पर्श अध्ययन शैली	बहु अध्ययन शैली
आकारिक मूल्यमापन	आठ साधन तंत्रापैकी आवश्यकतेनुसार साधन तंत्रे वापरून मूल्यमापन करू शकतो	तोंडीकाम हे साधन तंत्र वगळता इतर सर्व साधन तंत्रे आवश्यकतेनुसार वापरून मूल्यमापन करू शकतो.	बधिरांध विद्यार्थ्यांसाठी तोंडीकाम हे साधन तंत्र वगळता इतर सर्व साधन तंत्रे आवश्यकतेनुसार वापरून मूल्यमापन करू शकतो.	आठ साधन तंत्रापैकी आवश्यकतेनुसार साधन तंत्रे वापरून मूल्यमापन करू शकतो
संकलित मूल्यमापन पुनर्परीक्षा	१) आवश्यकतेनुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा. २) प्रश्नपत्रिकेचे अनुकूलन करणे.	१) प्रश्नपत्रिकेचे अनुकूलन करणे. २) प्रति तास २० मि. अतिरिक्त वेळ देणे.	१) प्रत्यक्ष वस्तू / साहित्य वापरून उत्तर दिल्यास त्यास गुण द्यावे. २) प्रति तास २० मि. अतिरिक्त वेळ देणे.	१) आवश्यकतेनुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा. २) प्रश्नपत्रिकेचे अनुकूलन करणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

निकष	श्राव्य अध्ययन शैली	दृश्य अध्ययन शैली	स्पर्श अध्ययन शैली	बहु अध्ययन शैली
	३) प्रति तास २० मि. अतिरिक्त वेळ देणे. ४) परीक्षा तोंडी स्वरूपात घेण्यात यावी. ५) सहाध्यायीची मदत देणे. ६) प्रत्यक्ष वस्तू / साहित्य वापरून उत्तर दिल्यास त्यास गुण द्यावे.	३) हावभाव/हातवारे व चित्राद्वारे दिलेला प्रतिसाद ग्राह्य धरणे. ४) सहाध्यायीची मदत देणे.	३) स्पर्शिय प्रतिसाद ग्राह्य धरणे. ४) प्रश्नपत्रिकेचे अनुकूलन करणे. ५) सहाध्यायीची मदत देणे. ६) आवश्यकतेनुसार लेखनिक उपलब्ध करून द्यावा.	३) प्रति तास २० मि. अतिरिक्त वेळ देणे. ४) मौखिक हावभाव/हातवारे व चित्राद्वारे दिलेला प्रतिसाद ग्राह्य धरणे. ५) सहाध्यायीची मदत देणे.
वर्गोन्नती	शासन निर्णयानुसार किमान ३५% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.	शासन निर्णयानुसार किमान ३५% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.	शासन निर्णयानुसार किमान ३५% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.	शासन निर्णयानुसार किमान ३५% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.
सवलतीचे गुण	उत्तीर्ण होण्यासाठी कमाल तीन विषयासाठी १० गुण विभागून देणे. मात्र एका विषयासाठी कमाल ५ गुण देणे.	उत्तीर्ण होण्यासाठी कमाल तीन विषयासाठी १० गुण विभागून देणे. मात्र एका विषयासाठी कमाल ५ गुण देणे.	उत्तीर्ण होण्यासाठी कमाल तीन विषयासाठी १० गुण विभागून देणे. मात्र एका विषयासाठी कमाल ५ गुण देणे.	उत्तीर्ण होण्यासाठी कमाल तीन विषयासाठी १० गुण विभागून देणे. मात्र एका विषयासाठी कमाल ५ गुण देणे.
वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल	इ. ६ वी ते ८ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासाठी इ. ५ वी ची परीक्षा/ पुनर्परीक्षा उतीर्ण होणे बंधनकारक.	इ. ६ वी ते ८ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासाठी इ. ५ वी ची परीक्षा/ पुनर्परीक्षा उतीर्ण होणे बंधनकारक.	इ. ६ वी ते ८ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासाठी इ. ५ वी ची परीक्षा/ पुनर्परीक्षा उतीर्ण होणे बंधनकारक.	इ. ६ वी ते ८ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासाठी इ. ५ वी ची परीक्षा/ पुनर्परीक्षा उतीर्ण होणे बंधनकारक.

संदर्भ : शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दि. ७ डिसेंबर २०२३ रोजीचा शासन निर्णय

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

इयत्ता दहावीच्या विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांची परीक्षा व विषय योजना

प्रस्तावना :

माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता दहावी)/बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना व शाळांना विद्यार्थ्यांचा परीक्षेचा फॉर्म कसा भरावा? त्यांना दिव्यांग प्रकारानुसार पर्यायी विषय कोणते असतात? ते कसे निवडावेत? निवडलेल्या विषयाची पुस्तके कशी मिळवावी? त्यासाठी संदर्भित शासन निर्णय/परिपत्रके कोणती आहेत? त्यानुसार अंमलबजावणी कशी करावी? यांसारख्या अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. काही अडचणी शाळा स्तरावर सोडविल्या जातात, परंतु काही अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

विषय निवड व परीक्षा नियोजन प्रक्रिया :

- साधारणतः शाळा सुरू झाल्यानंतर माहे जून/जुलै महिन्यात इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसलेल्या मुलांचा प्रस्ताव तयार करून बोर्डाला पाठवावा.
- प्रस्ताव तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे किमान ४०% किंवा ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचे दिव्यांग प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांकडे उशिरा दिव्यांग प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यास विलंब शुल्क भरून प्रस्ताव सादर करू शकतो.

विषय निवडीबाबत महत्त्वपूर्ण सूचना :

- इयत्ता दहावीनंतर पुढील अभ्यासक्रमास जावयाचे असल्यास इंग्रजी भाषा घेणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांनी प्रथम भाषा, द्वितीय भाषा व तृतीय भाषा या शिर्षकातील घेतलेला प्रत्येक भाषा विषय स्वतंत्र असणे आवश्यक आहे.
- एकच भाषा विषय २ वेळा घेता येणार नाही तसेच कार्यशिक्षण विषयाचा एक विषय २ वेळा घेता येणार नाही. तसेच श्रेणी विषयामध्ये (Graded Subject) तोच विषय पुन्हा घेता येणार नाही.
- अमराठी माध्यमाच्या शाळातील दिव्यांग विद्यार्थ्यांना मराठी भाषा विषय न घेण्याची सवलत अनुज्ञेय राहील.
- वरील विषय योजना करताना शाळा स्तरावर उपलब्ध फॉर्म क्र. १ ते ५ पैकी दिव्यांग प्रवर्ग निहायच संबंधित फॉर्मचा वापर करावा.
- मराठी माध्यमाच्या शाळांनी प्रथम भाषा 'मराठी' हा विषय निवड केल्यावर द्वितीय भाषा व तृतीय भाषा यांपैकी एक विषय इंग्रजी निवडणे आवश्यक आहे.
- इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी प्रथम भाषा 'इंग्रजी' हा विषय निवड केल्यावर द्वितीय भाषा व तृतीय भाषा या ठिकाणी **कार्यशिक्षण अंतर्गत विषय निवडावे.**

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

दिव्यांग विद्यार्थी विषय निवड व विषय योजना :

इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नियमित विषयासोबत कार्यशिक्षण अंतर्गत एकूण ९ विषय समाविष्ट करण्यात आलेले आहेत. इयत्ता नववीपासून या विषयांपैकी काही विषयांची निवड पुढीलप्रमाणे करू शकतो.

विषय योजना नमुना तक्ता

अ. क्र.	विषयाचे नाव	लेखी प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन	एकूण गुण
१)	**प्रथम भाषा :** (प्रथम भाषा/द्वितीय भाषा/तृतीय भाषा या शीर्षकातील कोणतीही एक भाषा)	१००	१००
२)	**द्वितीय भाषा (संपूर्ण) किवा (संयुक्त अभ्यासक्रम – हिंदी व संस्कृत)** (द्वितीय भाषा/तृतीय भाषा या शीर्षकातील कोणतीही एक भाषा) **किंवा** **कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या विषयांपैकी कोणताही एक विषय** लेखी + वार्षिक काम + प्रात्यक्षिक २५ + २५ + ५० = १०० गुण **येथे कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या ९ विषयांपैकी एक विषय निवडावा.** उदा. दूध आणि दुधाचे पदार्थ (J – ५)	१०० **किंवा** १००	१००
३)	**तृतीय भाषा :** (द्वितीय भाषा/तृतीय भाषा या शीर्षकातील कोणतीही एक भाषा) **किंवा** **कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या विषयांपैकी कोणताही एक विषय** लेखी + वार्षिक काम + प्रात्यक्षिक २५ + २५ + ५० = १०० गुण **येथे कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या ९ विषयापैकी एक विषय निवडावा.** उदा. पाककला (J – ७)	१०० **किंवा** १००	१००

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	विषयाचे नाव	लेखी प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन	एकूण गुण
४)	**गणित (बीजगणित, भूमिती) :** **अंतिम लेखी परीक्षा** गणित भाग १ (बीजगणित) – ४० गुण गणित भाग २ (भूमिती) – ४० गुण **अंतर्गत मूल्यमापन** गणित भाग १ प्रात्यक्षिक – ५ गुण गणित भाग २ प्रात्यक्षिक – ५ गुण २० गुण गणित भाग १ ची चाचणी परीक्षा – ५ गुण गणित भाग २ ची चाचणी परीक्षा – ५ गुण एकूण – १०० गुण **किंवा** **विशेष गरजा असलेल्या मुलांसाठीचे अंकगणित (इयत्ता सातवीचे)** (विषयाचा कोड – ७६) **आणि** **कार्यशिक्षण विषयापैकी कोणताही एक विषय** (भाषेऐवजी घेण्यात आलेल्या कार्य शिक्षणाच्या विषयांव्यतिरिक्त) लेखी + वार्षिक काम + प्रात्यक्षिक २५ + २५ + ५० = १०० गुण **टीप** : कार्यशिक्षण विषयाचे १०० गुणाचे रूपांतर ५० गुणामध्ये करण्यात येईल. येथे कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या ९ विषयांपैकी एक विषय निवडावा. उदा. कागदकाम, पुठ्ठाकाम आणि पुस्तक बांधणी (M – ७)	४० + ४० + २० = १०० **किंवा** ५० आणि } १०० ५०	१०० १००
५)	**विज्ञान आणि तंत्रज्ञान :** **लेखी परीक्षा :** पेपर १ – ४० गुण पेपर २ – ४० गुण **प्रात्यक्षिक परीक्षा व उपक्रम** : २० गुण **प्रयोग** : १२ गुण (पेपर १ = ६ गुण + पेपर २ = ६ गुण) **नोंदवही** : ४ गुण (पेपर १ = २ गुण + पेपर २ = २ गुण) **उपक्रम नोंदणी** : ४ गुण (पेपर १ = २ गुण + पेपर २ = २ गुण) **किंवा**	४० ४० } १०० २० **किंवा**	१००

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	विषयाचे नाव	लेखी प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन	एकूण गुण
	शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र : (विषयाचा कोड – ७७) लेखी परीक्षा – प्रात्यक्षिक परीक्षा – वार्षिक काम (जनरल)– (येथे पर्यायी विषय निवडीला प्राधान्य द्यावे.)	६० २० २० १०० (१००)	१००
६)	**सामाजिक शास्त्र** (विषयाचा कोड – ७३) १) इतिहास व राज्यशास्त्र : ४० + २० = ६० २) भूगोल : ४० + २० = ६०	४० + २० = ६० ४०	१००

कार्य शिक्षणांतर्गत येणारे विषय :

- **पर्यायी विषयांची कोडसहित यादी (कार्य शिक्षणांतर्गत येणारे विषय)**

१) घरगुती विद्युत उपकरणे (J – १)

२) दूध आणि दुधाचे पदार्थ (J – ५)

३) हस्त भरतकाम (J – ९)

४) शिवणयंत्राद्वारे शिलाई आणि शिवण यंत्राची निगा व दुरुस्ती (K – १)

५) टाकाऊ वस्तूपासून सौंदर्याकृती (K – ५)

६) पाककला (L – ७)

७) भारतीय संगीत (M – ३)

८) चित्रकला आणि रंगकाम (M – ६)

९) कागदकाम, पुठ्ठाकाम आणि पुस्तक बांधणी (M – ७)

टीप : सदर पुस्तके ई–बालभारतीचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

विषय योजना :

प्रथम भाषा अनिवार्य प्रवर्ग	प्रथम भाषा अनिवार्य नसलेले प्रवर्ग
बौद्धिक अक्षमता	दृष्टीदोष
अस्थिव्यंग	कर्णबधीर
सेरेब्रल पाल्सी	बहुविकलांग
	अध्ययन अक्षम
	स्वमग्न

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

मूल्यमापन पद्धती :

लेखी परीक्षा	वार्षिक काम	प्रात्यक्षिक	एकूण
२५	२५	५०	१००

लेखनिकाची निवड करण्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना :

- लेखनिक हा परीक्षा देत असलेल्या वर्गाचा एक इयत्ता खालच्या वर्गाचा असावा.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार लेखनिक सुविधा देता येते.
- लेखनिक हा परीक्षा देत असलेल्या वर्गाचा एक इयत्ता खालच्या वर्गाचा असावा.
- इ. दहावी व इ. बारावीपर्यंत विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना गरजेनुसार प्रौढ लेखनिक घेण्याचे स्वतंत्र आहे.
- प्रौढ लेखनिक हे शाळेतील अथवा अन्य शाळेतील शिक्षक, खाजगी शिकवणी वर्गातील शिक्षक/ प्रतिनिधी, जवळचे नातेवाईक नसावेत.
- लेखनिक निवड करण्याचे पूर्ण अधिकार मुख्याध्यापकांना आहेत.
- लेखनिक हा शाळेतील किंवा त्या परिसरात वास्तव्यास असावा.
- लेखनिकाला परीक्षेचा कालावधी, वेळ, दिव्यांग विद्यार्थी व विषय यांबाबत पूर्व कल्पना देण्यात यावी.
- लेखानिकाबाबत आवश्यक कागदपत्रे

  १) लेखनिकाचा फोटो

  २) शाळेचे ID कार्ड

  ३) लेखनिक दुसऱ्या शाळेचा असल्यास शाळेचे संमती पत्र

  ४) लेखनिकाचे आधार कार्ड

  ५) लेखनिकाचे संमतीपत्र

  ६) लेखनिकाच्या पालकाचे संमतीपत्र

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

लेखनिकाची निवड करताना करावयाची कार्यवाही :

दिव्यांग विद्यार्थ्याचा अर्ज

प्रति,
मुख्याध्यापक
.....
.....

विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च/जुलै ऑगस्ट २० परीक्षेकरिता लेखनिक मिळणेबाबत.

वरील विषयाला अनुसरून विनंती अर्ज करतो कि, मी .... इयत्ता ..... तुकडी ..... मध्ये आपल्या शाळेत शिक्षण घेत आहे. मी दिव्यांग असल्यामुळे मला माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च/जुलै– ऑगस्ट २० साठी लेखनिक आवश्यक आहे.

लेखनिक विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव ..... इयत्ता ..... तुकडी ..... मध्ये ..... या शाळेत शिक्षण घेत असून सदर विद्यार्थी मला लेखनिक म्हणून घेण्यास परवानगी मिळावी ही नम्र विनंती.

दिनांक – / /२०
ठिकाण –

विद्यार्थी/विद्यार्थिनीची स्वाक्षरी

.....

मुख्याध्यापकाचे शिफारस पत्र

प्रमाणित करण्यात येते कि, सदर विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव .... या शाळेतील असून सन ..... या शैक्षणिक वर्षात इयत्ता ..... तुकडी ..... वर्गात शिक्षण घेत असून त्यास वरील लेखनिकाचे नाव ..... घेण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक – / /२०
ठिकाण –

मुख्याध्यापकाची स्वाक्षरी व शिक्का

लेखनिक विद्यार्थ्याचे संमतीपत्र

मी लेखनिक नाव कुमार/कुमारी ..... शाळेचे नाव – ..... या शाळेचा विद्यार्थी/विद्यार्थिनी असून सन ..... या शैक्षणिक वर्षात इयत्ता – ..... तुकडी – ..... या वर्गात शिकत आहे.

मी परीक्षार्थी नाव –..... इयत्ता ..... तुकडी ..... या वर्गात शिकत असलेल्या दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थिनीस माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च/जुलै – ऑगस्ट २० परीक्षेकरिता लेखनिक म्हणून काम करण्याकरिता माझी संमती आहे, असे मी लिहून देतो/देते.

दिनांक – / /२०
ठिकाण –

लेखनिक विद्यार्थी/विद्यार्थिनीची स्वाक्षरी

.....

लेखनिक पालकाचे संमतीपत्र

मी श्री./श्रीमती ..... माझा पाल्य कुमार/कुमारी ..... इयत्ता – ..... तुकडी ..... या वर्गात ..... या शाळेमध्ये शिक्षण घेत आहे.

..... या शाळेमधील कुमार/कुमारी ..... इयत्ता ..... तुकडी ..... या वर्गात शिकत असलेल्या दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थिनीस माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च / जुलै– ऑगस्ट २० परीक्षेकरिता माझ्या पाल्यास लेखनिक म्हणून देण्यास मी संमती देत आहे.

दिनांक – / /२०
ठिकाण –

लेखनिकाच्या पालकाची स्वाक्षरी

.....

मुख्याध्यापकाचे शिफारस पत्र

प्रमाणित करण्यात येते की, सदर विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव – .... हा/ही ..... या शाळेतील विद्यार्थी/विद्यार्थिनी असून सन ..... या शैक्षणिक वर्षात इयत्ता ..... तुकडी ..... या वर्गात शिक्षण घेत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे माझ्या शाळेतील विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव .... यास लेखनिक म्हणून देण्यास संमती/शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक – / /२०
ठिकाण –

मुख्याध्यापकाची स्वाक्षरी व शिक्का

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- **सदर प्रस्ताव तयार करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

  १) शाळेचे पत्र

  २) दिव्यांग प्रवर्ग निहाय विषय निवाडीचा फॉर्म (Medical Form)

  ३) ४०% किंवा ४०% पेक्षा जास्त प्रमाण असलेले दिव्यांग प्रमाणपत्र

  ४) दिव्यांग विद्यार्थ्याचा लेखनिक मिळण्याबाबतचा अर्ज

  ५) दिव्यांग विद्यार्थ्याचे आधार कार्ड

  ६) लेखनिकाचे ओळख पत्र

  ७) लेखनिकाचे व लेखनिकाच्या पालकांचे संमतीपत्र

  ८) लेखनिकाचा शालेय पुरावा

  वरील मुद्दा क्र. १ ते ८ प्रमाणे कागदपत्रे तयार करून सदर प्रस्ताव **बोर्डाला** पाठवावा व बोर्डाकडून मान्यता मिळाल्याचे परिपत्रक आल्यानंतर सदरच मुलाच्या कोडनिहाय विषयाची नोंद online पोर्टलला करण्यात यावी.

बोर्डाकडून प्राप्त दिव्यांग प्रवर्गनिहाय विषय निवड फॉर्म नमुना :

- **Form No. 1 : दृष्टीदोष विद्यार्थी (Visually Impairment)**
  (प्रवर्ग – अंशतः अंध व पूर्णतः अंध)
- **Form No. 2 : कर्णबधीर विद्यार्थी (Hearing Impairment)**
  (फक्त कर्णबधीर प्रवर्ग)
- **Form No. 3 : अस्थिव्यंग व सेरेब्रल पाल्सी विद्यार्थी**
  (Orthopedically Handicapped and Spastic)
  (प्रवर्ग – अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी)
- **Form No. 4 : अध्ययन अक्षम विद्यार्थी (Learning Disability)**
  (प्रवर्ग – अध्ययन अक्षम, बौद्धिक अक्षम, गतिमंद)
- **Form No. 5 : स्वमग्न विद्यार्थी (Autistic)**
  (प्रवर्ग – स्वमग्न)

सूचना : वरील बोर्डाकडून प्राप्त दिव्यांग विद्यार्थी सेवा सवलती विषय निवड फॉर्म अनुक्रमे १ ते ५ पर्यंतचे असून त्यामध्ये **१) दृष्टीदोष विद्यार्थी, २) कर्णबधीर विद्यार्थी, ३) अस्थिव्यंग, ४) सेरेब्रल पाल्सी, ५) अध्ययन अक्षम विद्यार्थी, ६) बौद्धिक अक्षम विद्यार्थी व ७) स्वमग्न विद्यार्थी** इ. सात प्रवर्ग पूर्ण होत आहे, मात्र प्रत्यक्षात दिव्यांगत्वाचे एकूण **२१ प्रकार** आहेत. त्यामुळे **उर्वरित (फॉर्ममध्ये नमूद नसलेले) दिव्यांग प्रवर्गासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या सूचनेनुसार वरील** फॉर्म क्र. १ ते ५ मध्ये नमूद नसलेल्या दिव्यांग प्रवर्गासाठी **उदा. हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकलसेल, ॲनेमिया व इतर)** इ. साठी **फॉर्म क्र. ४** भरावयाचा आहे व त्या फॉर्म क्र. ४ मध्ये नमूद अध्ययन अक्षम विद्यार्थी या हेडिंगला काट मारून ज्या दिव्यांग प्रवर्गासाठी फॉर्म भरावयाचा त्या प्रवर्गाचे नाव नमूद करावे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

• Form No. 1 : दृष्टीदोष विद्यार्थी (Visually Impairment)

C-1/SSC/A-101

FORM-L

MEDICAL CERTIFICATE FOR BLIND (1)

(VISUALLY IMPAIRED CANDIDATE)

Photograph Attested by Medical Officer

Certified that, I Dr. .....

Registration No. ..... have this .....

..... day of ..... 201 examined the .....

candidate whose particulars are given below :

1. Name of Candidate : .....
2. Sex : .....
3. Approximate Age : .....
4. Indentification Mark : .....
5. (a) Father's Name : .....

   (b) Mother's Name : .....
6. Extent of residual vision, if any, : ..... Right eye .....

   Left eye .....
7. On set of visual impairment : .....

   (Please state whether visual impairment is from birth or acquired later. If it has been caused afterwards, the age and casue of visual impairment may be indicated) (For the purpose of concessions granted to visually impaired candidates, visually impaired are those who suffer from either of the following.) : .....

   a) Total absence of sight : .....

   b) Visual acquity not exceeding 6/60 or 20/200 (Snellen) In the better eye with correcting lenses. : .....

   c) Limitation of the field of vision substanding an angle of 20 degree or worse) : .....
8. Please mention the percentage of disability and state clearly whether the candidate is visually impaired who can be considered for the purpose of giving concessions, granted by the Board to Visually Impaired Candidate. : .....

Signature of Candidate

(Signature of Opthalmologist)

Designation

Place :

Office Stamp :

Date :

Address :

Countersigned by Civil Surgeon and Date

Form I/Page 2 Date :

To,

The Divisional Secretary
Maharashtra State Board of Secondary
and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board
Vashi, Navi Mumbai - 400703.

Sub : Concessions for Visually impaired Candidate

Sir,

I have the honour to inform you that ..... (Application Sr. No. or Seat No. ..... is bonafied student of this school. As per Medical Certificate the Candidate is blind. Therefore please grant the following concessions for S.S.C. Examination as per Board's regulations.

1. The candidate be given extra 20 minute; per hour to solve the Question paper.
2. The candidate be given nearest examination centre as mentioned below.

Name of The Examination Place	**Centre No.**
.....	.....
.....	.....

3. The candidate be given all types of concessions as per the Board's regulations.
4. The candidate is to offer and appear for the following subject as per Board's regulations.

1. 1st Language,
2. 2nd Language
3. 3rd Language,
4. .....
5. .....
6. Social Science

Work Edu. and school subject (optional)

1. .....
2. .....

School Subjects

1. Information Communication Technology (ICT) (Compulsory) (41)
2. Health and Physical Education (Compulsory) (P1)
3. Personality Development (Compulsory) (R6)

One of the Following

(Tick Mark '✓' offered subject)

1. Scouting/Guiding (P2)
2. NCC/Sea Cadet Corps (P3)
3. Defence Studies (P4)
4. Civil Defence (P5)
5. Social Service (P6)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

• Form No. 2 : कर्णबधीर विद्यार्थी (Hearing Impairment)

FORM - IL

MEDICAL CERTIFICATE FOR

THE HEARING IMPAIRED DEAF (2) - DUMB (3) CANDIDATE

Photograph Attested by Medical Officer

Certified that, I Dr. .....

Registration No. ..... have this .....

..... day of ..... 201 examined the .....

candidate whose particulars are given below :

1. Name of Candidate : .....
2. Sex : .....
3. Approximate Age : .....
4. Indentification Mark : .....
5. (a) Father's Name : .....
   (b) Mother's Name : .....
6. An estimate of the residual hearing, if any, and the basis on which this estimate has been arrived at- : (a) Right ear ..... (b) Left ear .....
7. Onset of deafness (Please state whether deafness is from birth or accquired later. If it has been caused afterwards the age and cause of deafness may be Indicated.)
   For the purpose of concessions granted to deaf candidates, deaf are those in whom the sense of hearing is non-functional for the ordinary purpose of life. Generally loss of hearing at 60 dicibles or above at 500, 1000, 2000, frequencies residual will make hearing non-functional.) : .....
8. Please mention the percentage of disability and state clearly whether the candidate is DEAF for the purpose of giving concession, granted by Board to deaf candidates. .....
9. Please enclose audiagram chart:

Signature of Candidate

(Signature of ENT Specialist)

Designation

Place :

Office Stamp :

Date :

Address :

Countersigned by Civil Surgeon and Date

Form II/Page 2 Date :

To,

The Divisional Secretary
Maharashtra State Board of Secondary
and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board
Vashi, Navi Mumbai - 400703.

Sub : Concessions for Deaf - Dumb Candidate

Sir,

I have the honour to inform you that ..... (Application Sr. No. or Seat No. ..... is bonafied student of this school. As per Medical Certificate the Candidato (as above) is Deaf Dumb therefore please grant the following concessions for S.S.C. Examination as per Board's regulations.

1. The candidate be given extra 20 minute; per hour to solve the Question paper.
2. The candidate be given nearest examination centre as mentioned below.

Name of The Examination Place	**Centre No.**
.....	.....
.....	.....

3. The candidate be given all types of concessions as per the Board's regulations.
4. The candidate is to offer and appear for the following subject as per Board's regulations.

1. 1st Language
2. 2nd Language
3. 3rd Language,
4. .....
5. .....
6. Social Science

Work Edu. and school subject (optional)

1. .....
2. .....

School Subjects

1. Information Communication Technology (ICT) (Compulsory) (41)
2. Health and Physical Education (Compulsory) (P1)
3. Personality Development (Compulsory) (R6)

One of the Following

(Tick Mark '✓' offered subject)

1. Scouting/Guiding (P2)
2. NCC/Sea Cadet Corps (P3)
3. Defence Studies (P4)
4. Civil Defence (P5)
5. Social Service (P6)

School Index No. | | | ● | | | ● | | | |

Head Master/Mistress

(School Stamp)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

• Form No. 3 : अस्थिव्यंग व सेरेब्रल पाल्सी विद्यार्थी

FORM-III

MEDICAL CERTIFICATE IN RESPECT OF AN ORTHOPEDICALLY (PHYSICALLY) HANDICAPPED (4) OR SPASTIC (5) CANDIDATE

(Full Body Photograph with affective paris) attested by medical officer

For the purpose of concessions granted to orthopedically (physically) handicapped or spastic, the Orthopedically (Physically) Handicapped or spastic are those who have physical defect or deformity which causes an interference with the normal functioning of bones, muscles and joints.

Certified that, I Dr. .....

Registration No. ..... have this .....

day of ..... year 20 ..... examined the applicant whose particulars are given below and that he/she falls within the above definition.

1. Name of Candidate : .....
2. Sex : .....
3. Approximate Age : .....
4. Indentification Mark : .....
5. (a) Father's Name : .....
   (b) Mother's Name : .....
6. A. Nature of disability :
   (Tick relevant from following List)
   POST-POLIO-PARALYSIS, HEMIPLEGIA, QUADRAPLEGIA, MALUNITIED, FRACTURE, NERVE PARALYSIS, UPPER EXTREMITY, LOWER EXTREMITY, LIMP, PAINFUL, SHORTENING, DEFORMITY, CONGENITAL, ACQUIRED, ABOVE KNEE, BELOW KNEE, HIP HEMIPELVECTOMY, SYSMES, CHEOPARTS, WRIST, FINGERS, BELOW ELBOW, ABOVE ELBOW, SHOULDERS, FORE QUARTER, UNILATERAL, BILATERAL

   B. Extent of disability :
   Estimate in percentage (mc. Bridge Scale)
   On Anatomical, Functional, (Patients Assessment, Examiner's Assessment)
   Percentage (Please mention the percentage of disability and state whether the candidate is Orthopaedically (Physically) Handicapped or Spastic who can be consedered for the purpose of giving concessions granted by the Board to Physically Handicapped/Spastic candidate.

   C. Use of Applicant : (Tick relevant from following list) Callipor, Crutch, Above Knee, Below Knee Prosthesis, Cane, Unilateral, Bilateral, Above Elbow, Below Elbow, Hemipolvectomy, Shoulder, Dis-Articulation.

   D. Any operation done or indicated

   E. Photograph (Attested) to be pasted to show the nature of disability and any appliance if used.
7. Any other particulars to clarify that nature and extent of disability that the Surgeon might like to point out.:

Signature of Applicant. Signature of Orthopeaduc Surgeon

Place : Designation

Date : Office Stamp :

Form III/Page 2 Date :

To,
The Divisional Secretary
Maharashtra State Board of Secondary
and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board
Vashi, Navi Mumbai - 400703.

Sub : Concessions for Physically Handicapped Candidate

Sir,

I have the honour to inform you that ..... (Application Sr. No. or Seat No. ..... is bonafied student of this school. As per Medical Certificate the above Candidate is Physically Orthopaedically Handicapped / Spastic therefore please grant the following concessions for S.S.C. Examination as per Board's regulations.

1. The candidate be given extra 20 minutes per hour or one and half hour (As per Natural disability) to solve the Question paper.
2. The Candidate is unable to complete the course in physical Education Examination (School Subject)
3. The candidate be given nearest examination center as mentioned below.

Name of The Examination Place	Centre No.
.....	.....
.....	.....

4. The candidate be given all types of concessions as per the Board's regulations.
5. The candidate is to offer and appear for the following subject as per Board's regulations.

1. 1st Language
2. 2nd Language
3. 3rd Language,
4. .....
5. .....
6. Social Science

Work Edu. and school subject (optional)

1. .....
2. .....

School Subjects

1. Information Communication Technology (ICT) (Compulsory) (41)
2. Health and Physical Education (Compulsory) (P1)
3. Personality Development (Compulsory) (R6)

One of the Following

(Tick Mark '✓' offered subject)

1. Scouting/Guiding (P2)
2. NCC/Sea Cadet Corps (P3)
3. Defence Studies (P4)
4. Civil Defence (P5)
5. Social Service (P6)

School Index No. | | | ● | | | ● | | | |

Head Master/Mistress
(School Stamp)

Date :

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

• Form No. 4 : अध्ययन अक्षम विद्यार्थी (Learning Disability)

FORM - IV

MEDICAL CERTIFICATE FOR CANDIDATES HAVING LEARNING DISABILITY

Photograph Attested by Medical Officer

Certified that, We, Dr. ..... Regd. No. .....

and Dr. Special educator ..... Regd. No./Licence No. .....

have, examined the candidate, whose particulars are given below on the following dates independent of each other :

1. Name of Candidate : .....
2. Sex : .....
3. Age in years and Months : .....
4. (a) Identification mark : .....

   (a) Signature of the Candidate : .....
5. (a) Father's Name : .....

   (b) Mother's Name : .....
6. Nature and percentage of the disability (Based on the tests devised by the Board comprising of a Neurologist, Child Psychologist and Special Educator) Please indicate the disability with a (✓) (tick mark)

[a] DYSLEXIA - ☐

[b] DYSGRAPHIA - ☐

[c] DYSCALCULIA - ☐

We further recommend the following concessions to be permitted for the same.

DYSLEXIA -

The permission to conduct the examination with the use of a writer who will read out the question paper and take a dictation of the answer and the permission to offer Two Languages (one mother tongue/medium of instruction and the other second language) instead of three languages. For third language option of work education according to scheme of subjects for these candidates may be granted.

DYSGRAPHIA -

The permission to use a writer for answering the paper and the permission to offer Two Languages (ane mother tongue/medium of instruction and the other second language) instead of three languages. For third language option of work education according to scheme of subjects for those candidates may be granted.

DYSCALCULIA -

The permission to opt Arithmetic for Std. VII (50 Marks) and Work Education (50 Marks) Instead of Mathematics (Algebra and Geometry) No. concession regarding any other subjects.

Signature of the examining neurologist and Date :

Signature of the examining paediatrician/
Special educator and Dale :

Countersigned by Civil Surgeon and Date :

Handcup Ferm

Form IV/Page 2 Date :

To,

The Divisional Secretary
Maharashtra State Board of Secondary
and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board
Vashi, Navi Mumbai - 400703.

Sub : Concessions for Deaf - Dumb Candidate

Sir,

I have the honour to inform you that ..... (Application Sr. No. or Seat No. ..... is bonafied student of this school. As per Medical Certificate the Candidate (as above) is Learning Disabled candidate, therefore please grant the following concessions for S.S.C. Examination as per Board's regulations.

1. The candidate be given 25% extra time to solve the Question paper.
2. The Candidate be given nearest examination centre as mentioned below.

Name of The Examination Place	**Centre No.**
.....	.....
.....	.....

3. The candidate be given all types of concessions as per the Board's regulations.
4. The candidate is to offer and appear for the following subject as per Board's regulations.

1. 1st Language
2. 2nd Language
3. 3rd Language,
4. .....
5. .....
6. Social Science

Work Edu. and school subject (optional)

1. .....
2. .....

School Subjects

1. Information Communication Technology (ICT) (Compulsory) (41)
2. Health and Physical Education (Compulsory) (P1)
3. Personality Development (Compulsory) (R6)

One of the Following

(Tick Mark '✓' offered subject)

1. Scouting/Guiding (P2)
2. NCC/Sea Cadet Corps (P3)
3. Defence Studies (P4)
4. Civil Defence (P5)
5. Social Service (P6)

School Index No.

Head Master/Mistress
(School Stamp)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

• Form No. 5 : स्वमग्न विद्यार्थी (Autistic)

FORM - V

Medical Certificate for the Autistic Candidate

Photograph Attested by Medical Officer

Certified that, I Dr. .....

Registration No. ..... Dated ..... have examined the candidate whose particulars are given below :

1. Name of Candidate : .....
2. Sex : .....
3. Age/Approximate Age : .....
4. Indentification Mark : .....
5. (a) Father's Name : .....

   (b) Mother's Name : .....
6. Extent of autism : : .....
7. Please mention the percentage of disability and state clearly whether the candidate is autistic and eligible to get concession granted by the Board to autistic candidate

Signature of the Candidate :

Place :

Date :

Signature of Specialized Doctor

Countersigned by Civil Surgeon and Date

Designation

Office Stamp

Address :

Form V/Page 2 Date :

To,

The Divisional Secretary
Maharashtra State Board of Secondary
and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board
Vashi, Navi Mumbai - 400703.

Sub : Concessions for Autistic Candidate

Sir,

I have the honour to inform you that ..... (Application Sr. No. or Seat No. ..... is bonafied student of this school. As per Medical Certificate the Candidate is Autistic therefore please grant the following concessions for S.S.C. Examination as per Board's regulations.

1. The candidate be given 20 minutes extra per hour to solve the Question paper.
2. The Candidate be given nearest examination centre as mentioned below.

Name of The Examination Place	**Centre No.**
.....	.....
.....	.....

3. The candidate be given all types of concessions as per the Board's regulations.
4. The candidate is to offer and appear for the following subject as per Board's regulations.

1. 1st Language
2. 2nd Language
3. 3rd Language,
4. .....
5. .....
6. Social Science

Work Edu. and school subject (optional)

1. .....
2. .....

School Subjects

1. Information Communication Technology (ICT) (Compulsory) (41)
2. Health and Physical Education (Compulsory) (P1)
3. Personality Development (Compulsory) (R6)

One of the Following

(Tick Mark '✓' offered subject)

1. Scouting/Guiding (P2)
2. NCC/Sea Cadet Corps (P3)
3. Defence Studies (P4)
4. Civil Defence (P5)
5. Social Service (P6)

School Index No.

Head Master/Mistress

(School Stamp)

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

इ. दहावी परीक्षा, मूल्यमापन व विषय निवड योजनाबाबतची मार्गदर्शनपर परिपत्रके :

१) दिव्यांग विद्यार्थी विषय मूल्यमापन योजना बाबतचे दि. २७.९.२०१९ रोजीचे परिपत्रक.

२) दिव्यांग विद्यार्थांसाठी – परीक्षा योजना २०१८–१९ बाबतचे दि. २९.९.२०१८ रोजीचे परिपत्रक.

३) दिव्यांग विद्यार्थांसाठी परीक्षा योजना बाबतचे दि. ०८.१०.२०१८ रोजीचे प्रकटन परिपत्रक.

४) विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके व मूल्यमापन योजना इत्यादी बाबतचे दि. ०१.०१.२०२१ रोजीचे परिपत्रक.

५) इ. नववी, इ. दहावी आणि इ. अकरावी व इ. बारावी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना बाबतचे दि. १०.०२.२०२१ रोजीचे परिपत्रक.

६) इ. नववी व इ. दहावी आणि इ. अकरावी व इ. बारावी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे दि. ०१.०३.२०२१ रोजीचे परिपत्रक.

७) दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता लेखनिक व वाचक उपलब्ध करुन देणेबाबातचे दि. २४.०२.२०२१ रोजीचे परिपत्रक.

इ. दहावी परीक्षा, मूल्यमापन व विषय निवड योजनाबाबतचे मार्गदर्शनपर शासन निर्णय :

१) शासन निर्णय – विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनिक देण्याबाबत सूचना, दि. १५ फेब्रुवारी २०१६.

२) शासन निर्णय – इ. पहिली ते इ. बारावी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलतीबाबत मार्गदर्शक सूचना, दि. १६ ऑक्टोबर २०१६.

समग्र प्रगतिपत्रक (Holistic Progress of Card - HPC)

- **समग्र प्रगतिपत्रक पार्श्वभूमी व गरज :**

  शिक्षण ही एक प्रक्रिया असून या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे अपेक्षित असते वर्षाअखेरीस करण्यास येणाऱ्या संकलित मूल्यमापनामुळे केवळ विद्यार्थ्यांच्या अंतिम संपादणुकीवर लक्ष केंद्रित होते. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक विकासासाठी समग्र प्रगती पत्रकाची शिफारस केलेली आहे.

- **संकल्पना :**

  समग्र प्रगतिपत्रक म्हणजे अभ्यासक्रमातील क्षेत्रे, ध्येये, क्षमता, अध्ययन निष्पत्तीच्या मूल्यांकनाविषयी सर्वंकष माहिती देणारा दस्तऐवज होय.

समग्र प्रगतिपत्रकाची निर्मिती करताना ३६० अंश दृष्टिकोनाचा अवलंब करण्यात आला आहे. हे पत्रक समग्र आणि बहुआयामी असेल समग्र प्रगती पत्रकामध्ये विशिष्ट कालावधीत एखाद्या बालकाच्या कार्यक्षम तेचे सर्वंकष वर्णन असेल. याबरोबरच विशिष्ट कालावधीत सामर्थ्य, संधी, आव्हाने आणि कौशल्ये यांची नोंद असेल. ३६० अंश प्रगतिपत्रक हे असे क्रांतीकारक साधन आहे की ज्यात बालकांशी संबंधित भागधारकांना सुनियोजित अध्यापन शास्त्रीय पद्धती आणि अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी चांगली मदत होऊ शकते. समग्र प्रगतिपत्रकाची रचना करताना बालकाच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व इतर विकासातील सर्व पैलूमध्ये ठरावीक कालावधीत वाढ करण्यासाठी समान लक्ष दिले जाईल. समग्र प्रगतिपत्रक प्रत्येक मुलाच्या बोधात्मक, भावनिक आणि कारक कौशल्यामध्ये प्रगती तसेच वेगळेपणाचे तपशील नमूद करते. हे प्रगतिपत्रक बालकांना त्यांच्या सामर्थ्याबद्दल, आवडीच्या क्षेत्राबद्दल तसेच स्वतःमध्ये सुधारण्याच्या संधीबद्दल जागरूक करेल. अशा प्रकारे या प्रगतिपत्रकात प्रत्येक बालकातील वेगळेपणा प्रतिबिंब होईल हे पत्रक घर आणि शाळा यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा बनेल आणि पालक/कुटुंबांना त्यांच्या मुलांच्या सर्वांगीण शिक्षण आणि विकासामध्ये नियमित व सक्रियपणे सहभागी करून घेईल.

- **समग्र प्रगतिपत्रकाचे घटक :**

मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू समाविष्ट केले जातील. त्यामुळे बालकाचे कच्चे दुवे ओळखण्यास मदत होईलच पण मुले–शिक्षक आंतरक्रिया, अध्यापनाची प्रगती, गळती, अध्ययनातील आव्हाने तसेच यापासून कोणत्याही शाळेतील बहुआयामी आव्हानांचे निराकरण करण्यास मदत होईल. समग्र प्रगती पत्रकात वेगवेगळे संदर्भ, वातावरणात आणि नाते संबंधांमध्ये मुलांच्या शिक्षण आणि विकासाच्या विविध पैलूंचा शोध घेणे आणि त्याचे मूल्यांकन करणे समाविष्ट आहे.

भाग अ : १) विद्यार्थी सर्वसाधारण माहिती

यामध्ये विद्यार्थी नाव वर्ग, तुकडी, जन्म दिनांक, पत्ता, आइ–वडिलांचे नाव, त्यांचे शिक्षण, भाऊ–बहिणीचे नाव, मातृभाषा, क्षेत्र, महिनानिहाय उपस्थिती, छंद इत्यादी.

भाग अ : २) मी व माझा परिसर

यामध्ये विद्यार्थ्यांचा आयकार्ड साईज फोटो, कुटुंबाचा एकत्रित फोटो, जन्मदिनांक, विद्यार्थ्यांच्या मित्रांची नावे, विद्यार्थ्याचा आवडता रंग इत्यादी.

भाग ब : १) अभ्यासक्रमाचे क्षेत्र

२) अभ्यासक्रमाचे ध्येय

३) क्षमता

४) अध्ययन निष्पत्ती

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

५) उपक्रम

६) मूल्यमापन रुब्रिक

७) शिक्षक अभिप्राय

८) स्वमूल्यमापन

९) सहाध्यायी मूल्यमापन

१०) पालक काळजीवाहक व्यक्ती यांचा अभिप्राय

समग्र प्रगती पत्रकाची वैशिष्ट्ये :

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाच्या विविधांगी पैलूंचा विचार समग्र प्रगती पत्रकात केला जातो. समग्र प्रगतिपत्रकाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतील,

१) सहभागी आणि अध्ययनार्थीकेंद्रित.

२) सर्वसमावेशक.

३) प्रगतीबद्दल गुणात्मक अभिप्राय.

४) कौशल्ये आणि क्षमतांचा सतत मागोवा.

५) स्व-जाणीव व आत्मसन्मान यावर आधारित.

६) केवळ संख्यात्मक बाबींऐवजी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक.

७) विद्यार्थ्यांचे सत्रनिहाय समग्र प्रगतिपत्रक ठेवण्यात येईल.

सद्यःस्थितीत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत समग्र प्रगतिपत्रक विकसनाचे काम सुरू आहे. याबाबतचा पथदर्शी अभ्यास, NCERT, नवी दिल्ली व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेला आहे. याआधारे NCERT, नवी दिल्ली यांचे मार्फत अंतिम HPC लवकरच पायाभूत स्तरापासून माध्यमिक स्तरापर्यंत टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येईल. स्वतंत्रपणे शासन निर्णय/परिपत्रक प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येतील.

❖❖❖

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

९. अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा (ICT) वापर

प्रस्तावना :

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. आज प्रत्येक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने सुलभता आली आहे. भारतात तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. यामध्ये ऑनलाइन पेमेंट, खरेदी व दैनंदिन व्यवहार तसेच शेती व्यवसायातील तंत्रज्ञान व इतर पूरक व्यवसायांचा समावेश होतो. संगीत, खेळ, क्रीडा, अशी सर्वच क्षेत्रे माहिती तंत्रज्ञानाने व्यापली आहेत.



शिक्षणक्षेत्रात देखील माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. अध्ययन–अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ, मनोरंजक होण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांना कठीणाकडून सोप्याकडे आणि अज्ञाताकडून ज्ञाताकडे नेण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. त्याचबरोबर **दिव्यांग मुलांना अध्ययन अनुभव देण्यासाठी आणि कौशल्य विकसन करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान हा एक राजमार्ग आहे.**

व्याख्या :

१) दळणवळणाच्या साधनांचा उपयोग करून योग्य माहिती योग्य त्या ठिकाणी व योग्य वेळी पोहोचविण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान म्हणजे, 'माहिती तंत्रज्ञान' होय.

२) मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक उन्नतीसाठी माहिती साठवणे, मिळवणे व तिच्यावर प्रक्रिया करणे, ती इतरत्र पाठवणे म्हणजेच माहितीचा कार्यक्षम व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या आज्ञावली व यंत्रसामग्रीचा संच म्हणजे, 'माहिती संप्रेषण तंत्रज्ञान' होय.

(संदर्भ : अध्यापक शिक्षण पदविका, द्वितीय वर्ष, माहिती संप्रषण तंत्रज्ञान पुस्तक पान क्रमांक : १.४)

माहिती आणि तंत्रज्ञानाची गरज आणि महत्त्व :

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणक्षेत्रात झाल्याने अनेक बदल घडून आले आहेत. यावरूनच त्याचे महत्त्व स्पष्ट होते.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभूती देण्यासाठी, त्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करता येतो.
- शिक्षणामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या विविध साधनांचा वापर केल्यामुळे शिक्षणाची परिणामकारकताही निःसंशय वाढते.
- प्रत्येक विषयाच्या तंत्रशिक्षकांच्या अध्यापनाचा लाभ असंख्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येतो.
- इंटरॲक्टिव्ह मीडिया तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेदरम्यान शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दिले जाणारे उपक्रम तयार करण्यासाठी येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाची मदत होते.
- टेली कॉन्फरन्सिंग, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, व्हर्च्युअल क्लासरूम यांसारख्या तंत्रज्ञानाच्या आधारे एकाचवेळी मार्गदर्शन करता येते, तसेच यासाठी लागणारा खर्चही वाचतो.
- शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभिरूप परिस्थितीची निर्मिती करून प्रभावी अध्यापन करता येते.
- विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी माहिती तंत्रज्ञान उपयुक्त ठरते.
- शालेय माहिती, अभिलेखे, नोंदी, सांख्यिकी माहिती इत्यादी कागदविरहित संग्रह करणे सुलभ होते.
- इंटरॅक्टिव्ह मीडिया, चॅट ग्रुप, ऑनलाइन लर्निंग, एक्झामिनेशन, टेलिफोन टेक्निक्स यांसारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर दिव्यांग विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ करण्यासाठी करता येतो.
- NEP-2020 व NCF-SE 2023 मध्ये शिक्षणातील सर्वसमावेशकतेला चालना देण्यासाठी तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे.

अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करताना वर्गशिक्षकांची भूमिका :

- शिक्षकांनी मुलांची शिकण्याची शैली ओळखून आवश्यक माहिती व तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर करावा.
- अभ्यासक्रम अनुकूलित करणे व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून मूल्यांकन व मूल्यमापन करणे, यासाठी वर्गशिक्षकांनी तंत्रस्नेही असणे आवश्यक आहे.
- आनंददायी वातावरणामध्ये अध्ययन व्हावे, यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा.
- गृहमार्गदर्शनाची आवश्यकता असलेल्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी ऑनलाइन मीटिंग, व्हिडिओ कॉलींग यांसारखे तंत्रज्ञान वापरावे.
- विद्यार्थी शाळेत दाखल करणे, नियमित शाळेत येणे, तसेच त्यांच्या अध्ययनासंदर्भातील पालकांच्या अडचणी दूर करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

विशेष शिक्षकांची भूमिका :

- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या संदर्भाने तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी विशेष शिक्षक स्वतः तंत्रस्नेही असावा.
- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनासाठी आवश्यक तंत्रज्ञान साधनांचा वापर करण्यासंदर्भात वर्गशिक्षकांना साहाय्य करावे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांच्या संपर्कात रहावे. त्यांना आवश्यक माहिती व मार्गदर्शन विहित कालावधीत करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा.
- कार्यक्षेत्रातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सतत संपर्कात राहून त्यांच्या शैक्षणिक व वैद्यकीय अडचणी दूर करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा.
- गृहमार्गदर्शनाच्या विद्यार्थ्यांना थेरपी सेवा (OT, PT, ST, BM) नियमितपणे देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा.

माहिती व तंत्रज्ञान साधने वापरताना घ्यावयाची काळजी :

- डोळ्यांवर ताण पडून डोळ्यांचे आजार होणार नाहीत, याची काळजी घ्या. यासाठी स्क्रीनचा अतिवापर टाळावा.
- माहिती तंत्रज्ञानाची साधने काळजीपूर्वक हाताळावीत.
- https या URL द्वारे सुरक्षित असलेल्या वेबसाईटचा वापर करावा. असुरक्षित (फक्त http ने सुरू होणाऱ्या) वेबसाईट वापरू नयेत.
- अनोळखी व फसव्या ई-मेलला प्रत्युत्तर देऊ नये.
- अज्ञात लिंकवर क्लिक करू नये. काही असुविधाजनक, असुरक्षित अथवा अनुचित प्रकार आढळल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.
- वारंवार आपले पासवर्ड बदलावेत. कठीण पासवर्ड आणि सुरक्षा सेटिंग वापरून तुमचा वैयक्तिक डेटा तुमच्या मोबाइल फोनवर अथवा संगणकावर संरक्षित करावा.
- संगणक वापरात नसताना संगणक लॉग ऑफ/लॉग आऊट करावे.
- विजेच्या दाबाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी स्टेबिलायझर, UPS वापरावे
- पायरेटेड सॉफ्टवेअरचा वापर करू नये.
- कॉपिराईट केलेली सामग्री डाऊनलोड करू नये.
- सिस्टिममधील अँटिव्हायरस सॉफ्टवेअर अद्ययावत असल्याचे नियमित तपासावे.
- सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर करावा. वैयक्तिक माहिती उघड करणे टाळावे. फसव्या पोस्टना बळी पडू नये.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

विशेष गरजाधारित विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान : विविध Software/Application/App

अ. क्र.	ॲपचे/सॉफ्टवेअरचे नाव	अध्ययनशैली	उपयोग	इन्स्टॉल व डाऊनलोड
१)	NVDA (Non Visual Desktop Access)	श्राव्य अध्ययनशैली	NVDA हे एक विनामूल्य, पोर्टेबल आणि ओपन सोर्स स्क्रिन रीडर आहे. ते डाऊनलोड आणि वापरण्यास विनामूल्य आहे, यामुळे अंध आणि दृष्टिहीन व्यक्तींना स्क्रिन वाचणे सुलभ होते.	हे सॉफ्टवेअर Windows च्या सर्व व्हर्जनला सपोर्ट करते, या स्क्रिन रीडरमध्ये भारतीय २२ भाषांमध्ये मजकूर ऐकता येतो.
२)	JAWS (Job Access with Speech)	श्राव्यशैली	अंध आणि दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी हे जगातील सर्वांत लोकप्रिय स्क्रिन रीडर आहे. ज्यांची दृष्टी कमी झाल्यामुळे त्यांना स्क्रिन पाहण्यासाठी किंवा माऊस नेविगेट करण्यासाठी अडथळा निर्माण होतो. त्यांच्यासाठी JAWS हे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. हे सॉफ्टवेअर संभाषणाला ब्रेल आऊटपुट प्रदान करते. स्क्रिनवरील माहिती वाचन करून ऐकवते.	हे सॉफटवेअर Windows 10 आणि Windows 11 ला सपोर्ट करते.
३)	OCR (Optical Character Recognition)	श्राव्यशैली	हे डिजिटल प्रतिमेतील मजकूर ओळखते. स्कॅन केलेला मजकूर आणि प्रतिमांमधील मजकूर ओळखण्यासाठी वापरले जाते.	हे सॉफ्टवेअर Windows 10 आणि Windows 11 ला सपोर्ट करते.
४)	Google KEEP (App for Note Pad)	बहु अध्ययनशैली	Voice Taping तसेच स्क्रिनवर बोटांनी लिहिता येते.	Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	ॲपचे/सॉफ्टवेअरचे नाव	अध्ययनशैली	उपयोग	इन्स्टॉल व डाऊनलोड
५)	Autism Basics	बहु अध्ययनशैली	स्वमग्न मुलांसाठी उपयुक्त दृक्श्राव्य माध्यमांतील विविध कृती देण्यात आलेल्या आहेत.	Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
६)	Marathi Kids App	बहु अध्ययनशैली	मराठी मुळाक्षरे, वर्णमाला, अंक, फळे, भाज्या, फुले, वाहने, प्राणी, पक्षी, रंग, आकार, माझे कुटुंब, चित्रकला, अक्षर गिरवणे, अंक गिरवणे इत्यादी सराव यामध्ये करता येतात.	Android-Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
७)	Diksha app	बहु अध्ययनशैली	हे ॲप सर्व वर्गशिक्षक वापरत आहेत. याचा उपयोग दिव्यांग मुलांना अध्ययन अनुभूती देण्यासाठी प्रभावीपणे केला जातो.	Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
८)	Google meet	बहु अध्ययनशैली	या ॲपद्वारे अनेक व्यक्ती एकाच वेळी दृक्श्राव्य पद्धतीने अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतात.	IOS/Android-Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
९)	Talking Calculator	श्राव्य अध्ययनशैली	गणन करण्यासाठी या ॲपचा प्रभावी वापर दृष्टिहीन व इतर दिव्यांग विद्यार्थी करू शकतात.	IOS/Android-Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
१०)	Google classroom	बहु अध्ययनशैली	या ॲपद्वारे वर्गशिक्षक ऑनलाइन पद्धतीने वर्गअध्यापन करू शकतात.	IOS/Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
११)	Smart vision glasses	श्राव्य अध्ययनशैली	हा चष्मा वापरून समोर असलेले पुस्तक किंवा स्क्रिन स्कॅन करून ऐकून वाचन करता येते.	हे एक चष्म्यासारखे डिव्हाईस आहे. जे मार्केटमध्ये खरेदी करून वापरता येईल.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	ॲपचे/सॉफ्टवेअरचे नाव	अध्ययनशैली	उपयोग	इन्स्टॉल व डाऊनलोड
१२)	प्रशस्त ॲप	बहु अध्ययनशैली	या ॲपचा वापर करून दिव्यांग विद्यार्थ्यांचा चेकलिस्टद्वारे शोध घेणे, नोंदणी करणे व आरोग्य तपासणी ते दिव्यांग प्रमाणपत्र असा फॉलोअप ठेवता येतो.	IOS/Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
१३)	Zoom APP	बहु अध्ययनशैली	या ॲपद्वारे एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांशी समान पातळीवर संवाद साधता येतो.	IOS/Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.
१४)	Google Assistant	बहु अध्ययनशैली	यामध्ये बोलून गुगल सर्च इंजिनद्वारे माहिती मिळवता येते.	IOS/Android - Play Store वरून डाऊनलोड करून वापरता येते.

अशा प्रकारे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करता येऊ शकतो.

❖❖❖

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१०. उपलब्ध साहित्य साधनांचा प्रभावी वापर

प्रस्तावना :

प्रत्येक बालकाची शिकण्याची प्रक्रिया ही आईच्या गर्भात असल्यापासून सुरू होते. बालकाचा पहिला गुरू त्याची आई असते आणि दुसरा गुरू हे शिक्षक असतात. जन्मापासून ते शाळेत येण्यापर्यंतच्या कालावधीत मूल हे कुटुंब, समाज व परिसर यांमधून औपचारिक व अनौपचारिक गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करते. सामान्य मुलांच्या तुलनेत विशेष बालकाला शिकण्यात, समजण्यात बऱ्याच गोष्टींची आव्हाने येतात. त्यासाठी विशेष बालकांच्या गरजेनुसार उपलब्ध साहित्य साधनांचा वापर केल्यास त्याला शिक्षणाच्या व समाजाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

साहाय्यभूत साहित्य साधने :

विशेष मुलांच्या बाबतीत काही साहित्य साधनांविषयी थोडक्यात माहिती पाहूयात.

अ.क्र.	साहित्याचे नाव	चित्र
१.	क्रचेस	
३.	कुबडी	
५.	क्रचेस	
७.	ट्रायसिकल	

अ.क्र.	साहित्याचे नाव	चित्र
२.	वॉकर	
४.	एल्बो क्रचेस	
६.	व्हिलचेअर	
८.	कॅलिपर	

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

अ.क्र.	साहित्याचे नाव	चित्र
९.	स्प्लिंट	
११.	श्रवणयंत्र	

अ.क्र.	साहित्याचे नाव	चित्र
१०.	चष्मा	
१२.	पांढरी काठी	

उपलब्ध साहित्य व साधने :

उपलब्ध भौतिक साहित्य साधनांमध्ये विशेष गरजाधारक बालकांसाठी स्प्लिंट, कॅलिपर, श्रवणयंत्र व MS-ID किट इत्यादी या साहित्य साधनांचा वापर पाहिजे तितक्या प्रभावीपणे न झाल्यास विशेष गरजाधारक बालक समाजामध्ये व शिक्षणामध्ये मागे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. भौतिक व शैक्षणिक साहित्य साधनांचा प्रभावी वापर होण्यासाठी पालक, शिक्षक, भावंड व वर्गसवंगडी यांना साहित्याच्या वापराबाबत योग्य मार्गदर्शन पर्यवेक्षीय यंत्रणेद्वारे करणे गरजेचे आहे. जेणेकरून सदर साहित्याचा शिक्षकांच्या मदतीने गरजेनुसार वापर करून विशेष गरजाधारक बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होईल तसेच उपलब्ध शैक्षणिक साहित्य – गणितपेटी, भाषापेटी, विज्ञानपेटी व इंग्रजीपेटी यांमधील साहित्य साधनांचा प्रभावी वापर विशेष गरजाधारक बालके सामान्य मुलांप्रमाणेच करू शकतील.

लो–व्हिजन किट



ब्रेल पाटी

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

साहाय्यभूत साधनांच्या प्रभावी वापराबाबत उपाययोजना :

१) दिव्यांग मुलांसाठी आवश्यक साहित्य साधनांचे मोजमाप होताच किमान एक महिन्यात सदर साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे.

२) साहित्य साधनांच्या वापराबाबतचे महत्त्व व निगा याबाबत पालक व शिक्षकांना समुपदेशन करावे.

३) क्षेत्रभेटीच्या वेळी पर्यवेक्षीय यंत्रणेने साहित्य वापराबाबत बालक–पालक व शिक्षकांना मार्गदर्शन करावे.

४) भौतिक साहित्याचा दीर्घ काळ प्रभावी वापर होण्यासाठी वेळोवेळी त्याची देखभाल व दुरुस्ती वेळेवर व्हावी.

५) साहाय्यभूत साहित्य साधनाच्या देखभाल दुरुस्तीसाठी तालुका स्तरावर वेळेवर निधीची उपलब्धता करून द्यावी.

६) विशेष गरजाधारक बालकांना सहजपणे हालचाल करता येण्याकरिता साहित्याचे वजन व आकारात सुलभता आणावी.

७) शाळा स्तरावर विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेल्या साहित्य साधनांची नोंद घेणेबाबत वर्गशिक्षकास निर्देश द्यावेत.

८) वर्गखोलीमध्ये उपलब्ध असलेल्या साहित्य साधनांचा विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांसाठी प्रभावी वापर करणे. उदा. वाचन कोपरा व गरजेनुसार तयार करण्यात आलेले शैक्षणिक साहित्य इत्यादी.

९) अडथळाविरहित वातावरणनिर्मिती करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार भौतिक सुविधा असावी. उदा. रॅम्प, हँड्रील्स, चेकर टाईल्स, बिपर, कमोड चेअर इत्यादी.

१०) वर्गातील विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांची बैठकव्यवस्था ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सुलभ असावी.

११) उपलब्ध साहित्याचे पालकांकडून उपयोगिता प्रमाणपत्र घ्यावे.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

११. अडथळाविरहित वातावरण

प्रस्तावना :

शिक्षण हा एक मूलभूत हक्क आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळावी, ही आजच्या शैक्षणिक व्यवस्थेची गरज आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना (विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना) नियमित शाळेमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी आणि त्यांना अडथळाविरहित वातावरण तयार करण्यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. शाळा ही केवळ शैक्षणिक ज्ञान देण्याचे केंद्र नसून ती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे माध्यमही असते. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमता आणि स्वानुभवानुसार उत्तम शिक्षण मिळावे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तथापि, विविध कारणांमुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणप्रक्रियेतील अडथळे सहन करावे लागतात. यामुळे त्यांचा शैक्षणिक आणि वैयक्तिक विकास मर्यादित होऊ शकतो.



संकल्पना :

अडथळाविरहित वातावरण म्हणजे असे शैक्षणिक वातावरण ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थी भौतिक, मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक अडथळ्यांपासून मुक्त असतो. अडथळाविरहीत वातावरण सर्व विद्यार्थ्यांना समान संधी आणि साधने उपलब्ध करून देण्यावर भर देते.

उद्देश :

शाळा, समाज व रोजच्या वावर असणाऱ्या ठिकाणी मानवनिर्मित, नैसर्गिक व सामाजिक अडथळ्यांमुळे विद्यार्थ्याला शैक्षणिक प्रवाहात येण्यावर परिणाम होणार नाही अशी व्यवस्था निर्माण करणे.

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पूर्वप्राथमिक स्तर ते उच्च माध्यमिक स्तरावरील शाळांच्या इमारतींमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अडथळाविरहीत वातावरणाची निर्मिती करणे आवश्यक आहे. RPWD Act 2016 नुसार, २१ प्रकारच्या दिव्यांग प्रवर्गांचा सर्वांगीण विचार करून सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याकरिता संचारमुक्त वातावरणाची निर्मिती करावयाची आहे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्येही या बाबींवर भर देण्यात आला आहे. या अनुषंगाने पुढील बाबींची विशेषतः पूर्तता करणे गरजेचे आहे.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१) शाळेतील इमारतीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता रॅम्पची उपलब्धता :



शाळेचे प्रवेशद्वार, ग्रंथालय, वर्गखोल्या, उपाहारगृह, स्वच्छतागृहे, ऑडिटोरिअम/सभागृह, खेळाचे मैदान व प्रत्येक मजल्यावर जाण्या-येण्याकरिता शालेय परिसरामध्ये रॅम्प्स असणे आवश्यक आहे. सदर रॅम्प्स उपलब्ध करून देताना रॅम्प्सचा पृष्ठभाग सपाट, सुरक्षित असावा आणि निसरडा नसावा. रॅम्प्सचा उतार १:१२ च्या प्रमाणात असावा, म्हणजेच प्रत्येक १२ इंचांच्या लांबीला १ इंच उंचीचा उतार असावा, व्हिलचेअर सहजतेने जाऊ शकेल अशी किमान ३६ इंच रूंदी असावी, रॅम्प्सच्या दोन्ही बाजूला ३४-३८ इंच उंचीवर रेलिंग्स असाव्यात, रॅम्प्स टिकाऊ आणि मजबूत सामग्रीपासून बनवलेला असावा, ज्यामुळे दीर्घकालीन वापर शक्य होईल. रॅम्प्सच्या सुरुवातीला आणि शेवटी किमान ६० इंच लांबीची सपाट जागा असावी. रॅम्प्समध्ये वळण असल्यास तिथे किमान ६० × ६० इंचाची सपाट जागा असावी, रॅम्प्सच्या काठांवर आणि पायऱ्यांच्या सुरुवातीला आणि शेवटी उच्च दृश्यमानता असणारे मार्किंग करणे, रॅम्प्सवर पाणी साचू नये म्हणून योग्य निचऱ्याची व्यवस्था करणे, रॅम्प्सची नियमित देखरेख आणि साफसफाई करणे, ज्यामुळे तो सुरक्षित आणि कार्यक्षम राहील.

२) दिव्यांग विद्यार्थ्यांना वर्गखोलीपर्यंत पोहोचण्याकरिता हॅन्ड्रेल्सची उपलब्धता :

ग्रंथालय, वर्गखोल्या, उपाहारगृह, स्वच्छतागृहे, संसाधन कक्ष, प्रयोगशाळा, ऑडिटोरिअम/सभागृह, कार्यालय व प्रत्येक मजल्यावर जाण्या-येण्याकरिता शालेय परिसरामध्ये हॅन्ड्रेल्स असणे आवश्यक आहे सदर हॅन्ड्रेल्स उपलब्ध करून देताना रेलिंगची उंची सामान्यतः जमिनीपासून ३४ ते ३८ इंच (८६ ते ९७ सेंमी) असावी. मुलांसाठी रेलिंगची उंची २८ इंच (७१ सेंमी) पर्यंत असावी. हँडलचा व्यास साधारणतः १.२५ ते २ इंच (३.२ ते ५ सेंमी) असावा, ज्यामुळे पकडणे सोपे जाते. रेलिंग्स मजबुतीने आणि सुरक्षिततेने लावली जावीत. दर ४ ते ६ फुटांवर सपोर्टिंग ब्रॅकेट्स असावीत, हँडल्स आणि रेलिंग्स गंजरोधक आणि स्वच्छ करण्यास सोप्या असलेल्या मटेरिअलपासून बनवलेली असावीत. जसे

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T



की, स्टेनलेस स्टील, ॲल्युमिनियम इ. हँडल्सचा शेवट गोलाकार असावा किंवा भिंतीला चिकटवून लावलेली असावीत. ज्यामुळे अपघात टाळता येतील. हँडल्सचा पृष्ठभाग गुळगुळीत आणि पकडण्यास सोपा असावा. रेलिंग्स सलग असावीत. मध्ये कोणत्याही प्रकारचा खंड नसावा. रेलिंग्सच्याजवळ पुरेशी प्रकाश व्यवस्था असावी जेणेकरून दिव्यांग विद्यार्थ्यांना दिसण्यास सोपे जाईल. हँडल्स आणि रेलिंग्ससाठी दिशानिर्देश असावे, विशेषतः जिथे दिशांचा बदल होतो.

३) विज्ञान प्रयोगशाळांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता सोई-सुविधांची उपलब्धता :

व्हीलचेअर वापरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोग शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ आणि आत रॅम्प तसेच पुरेसे रूंद दरवाजे असणे आवश्यक आहे, विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार योग्य उंचीचे फर्निचर आणि उपकरणे उपलब्ध असणे आवश्यक आहे. दृष्टिबाधित विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक पट्ट्या आणि ब्रेल लिपीचा वापर करून आवश्यक माहिती पुरवणे गरजेचे आहे तसेच या विद्यार्थ्यांसाठी वाचक व स्पर्श संवेदनशील उपकरणे असावीत. श्रवणबाधित विद्यार्थ्यांसाठी दृश्य साधनांची व्यवस्था असावी. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षित शिक्षण साहाय्यकाची उपलब्धता असावी, प्रयोग शाळेतील उपकरणे आणि तंत्रज्ञान वापरण्यासाठी अतिरिक्त साहाय्य प्रदान करणारे उत्प्रेरक असावे. जर काही विद्यार्थ्यांना शारीरिकदृष्ट्या प्रयोगशाळेत येणे शक्य नसेल तर त्यांच्यासाठी ऑनलाइन

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

संसाधने आणि व्हर्च्युअल लॅब्सची सुविधा असावी. प्रयोगशाळेतील काचेची उपकरणे ठेवण्याची व्यवस्था दिव्यांग विद्यार्थ्यांना अडथळ्याची ठरेल अशी नसावी.

४) वर्गखोलीतील अडथळाविरहित वातावरण :

वर्गखोली पुरेशी प्रकाश व्यवस्था व हवा खेळती राहील अशी असावी, वर्गखोलीतील रंग पांढरा असावा, तसेच पृष्ठभाग व भिंतींचा रंग हा वेगवेगळा असावा वर्गखोलीत आवाजाचा गोंगाट होणार नाही, यादृष्टीने वर्गखोल्यांची रचना असावी. शारीरिक अक्षम विद्यार्थ्यांसाठी व सुलभ हालचालींसाठी अनुकूलित साहित्य साधने उपलब्ध असावी, ब्लॅक बोर्डवर पुरेशी प्रकाश व्यवस्था असावी, वर्गखोलीचा पृष्ठभाग समतल असावा.

५) शाळेतील इमारतीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता मुलांचे व मुलींचे स्वच्छतागृह :



U Shape (moveble)

L Shape grab bar

Signage for toilets/bathrooms



Tactile signage placement on door of toilet

स्वच्छतागृह हे शाळेच्या आवारातच असावे, स्वच्छतागृहामध्ये व्हीलचेअर सहज प्रवेश करू शकेल असे पुरेसे रुंद दरवाजे असावेत व उंबरा नसावा. शक्य असल्यास स्वयंचलित दरवाजे असावेत, स्वच्छतागृहाच्या आत आणि बाहेर योग्य ठिकाणी मजबूत ग्रॅब बार्स (पकडण्याचे बार) बसवलेले असावेत, फरश्या निसरड्या असू नयेत तसेच चेकर स्टाईल्सचा वापर करावा, कमोडची उंची विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार असावी. स्टँडर्ड उंची (१७–१९ इंच) असावी, दरवाज्याचे हँडल्स आणि नळांच्या तोट्या योग्य प्रकाराचे असावेत जेणेकरून कमी शक्तीने वापरता येतील, स्वच्छतागृहात पुरेसा प्रकाश असावा, दरवाजाच्या आत–बाहेर जाणाऱ्या भागात ब्रेल लिपीत व मोठ्या अक्षरांत दिशा दर्शवणारी चिन्हे असावीत, आपतकालीन परिस्थितीत मदतीसाठी अलार्म सिस्टिम असावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना त्वरित संपर्क साधता येईल. किशोरवयीन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी MHM (Menstrual

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

Hygiene management kit) किट उपलब्ध असावे. स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता व देखभाल आवश्यक आहे. जेणेकरून, ते नेहमीच स्वच्छ आणि सुरक्षित राहील.

तसेच खालील बाबतीतही अडथळाविरहित वातावरण असणे आवश्यक आहे.

६) मैदानी खेळांकरिता दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेच्या आवारामध्ये खेळाच्या मैदानाची उपलब्धता.

७) शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या ग्रंथालयामध्ये विशेष बालकांकरिता शैक्षणिक साहित्याची उपलब्धता.

८) शाळेच्या सभागृहामध्ये दिव्यांग बालकांना मुक्त संचार करण्यासाठी अडथळाविरहित वातावरणाची निर्मिती करणे.

९) दिव्यांग बालकांमधील दृष्टी अधू असणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्गखोलीपर्यंत पोहोचण्याकरिता व वर्गात मुक्त संचार करण्याकरिता शाळेचे जिने, वऱ्हांडे यांमध्ये visual contrast चा वापर करावा.

१०) पिण्याच्या पाण्याकरिता दिव्यांग विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होईल अशा पद्धतीची नळ जोडणी व्यवस्था करावी, जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना सहजपणे पिण्याच्या पाण्याचा लाभ घेता येईल.

११) आणीबाणीच्या परिस्थितीत शाळेच्या आवारातून दिव्यांग विद्यार्थ्यांना सहजपणे बाहेर पडण्याकरिता व्यवस्था असावी.

❖❖❖

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१२. गृहआधारित शिक्षण (Home Based Education)

जुलै २००६ साली सर्व शिक्षा अभियान (SSA) अंतर्गत तीव्र स्वरूपातील विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) मुलांच्या शिक्षणासाठी गृहआधारित (Home Based Education) कार्यक्रमाबाबतची माहिती देण्यात आली. जी मुले अती तीव्र बौद्धिक व शारीरिक विकलांग आहेत, ज्यांना शाळेत बसवणे व शिक्षण देणे कठीण जाते. ज्या मुलांचा वैयक्तिक, शैक्षणिक, सामाजिक कौशल्ये विकसित झालेली नाही या कारणासाठी एक विशेष प्रशिक्षित शिक्षक व बहु तज्ज्ञांच्या मदतीने मुलांच्या क्षमतांचे मापन करून प्रशिक्षण आराखडा तयार केला जातो व मुलांच्या घरी किंवा परिसरात प्रशिक्षण दिले जाते.

संकल्पना :

सर्व शिक्षा अभियान (SSA) अंतर्गत दिव्यांग मुलांना नियमित शाळांमध्ये शिक्षण दिले जात आहे. नियमित शाळांमध्ये मुख्य प्रवाहात येण्यापूर्वी या मुलांना प्रथम काही शालेय तयारी कार्यक्रम घ्यावे लागतात. समग्र शिक्षा अंतर्गत गृहआधारित शिक्षणाच्या धोरणाचे सध्या मूल्यांकन केले जाते. ० ते ६ वयोगटातील मुलांसाठी प्रारंभिक हस्तक्षेप आणि शाळेच्या तयारीसाठी आणि त्यानंतर शाळेच्या मुख्य प्रवाहात त्यांचा समावेश करण्यासाठी या धोरणाचा पाठपुरावा केला जात आहे. त्यामुळे अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या मुलांसाठी शाळा किंवा गृहआधारित शिक्षणाची निवड करण्याची संधी देण्यात आली आहे आणि गृहआधारित शिक्षणाची सुरुवात सर्व शिक्षा अभियानाने 'समावेशनाचा मार्ग' म्हणून सुरू केली आहे.

गृहआधारित शिक्षणाचे स्वरूप :

गृहआधारित शिक्षण यामध्ये तज्ज्ञांच्या सेवा या घरामध्ये आणल्या जातात. जेथे अनेक दिव्यांग मुले घरआधारित काळजीद्वारे राहतात. जेव्हा एकापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले मूल त्याच्या किंवा कुटुंबाच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या शिकते, तेव्हा कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या मुलाच्या क्षमतेबद्दल सकारात्मक आणि अश्वासकवृत्ती विकसित होण्याची शक्यता जास्त असते. यामुळे चांगले परिणाम मिळतात आणि कुटुंबाची त्यांच्या मुलाची काळजी घेण्याची क्षमता सुधारते तसेच दिव्यांगत्वाबद्दल लोकांची समज वाढण्यास आणि त्यांच्या विषयाचे गैरसमज कमी होण्यास मदत होते.

यामध्ये विशेष शिक्षक व थेरेपिस्ट मुलाच्या कौशल्य विकसनासाठी त्यांच्या घरी भेट देतील. वैयक्तिक, शैक्षणिक व इतर कौशल्य विकसित करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करतील. मुलांना त्यांच्या अभ्यासात व इतर गोष्टींमध्ये मदत करण्यासाठी, त्याने इच्छित शिक्षण पातळी गाठली की मूल हळूहळू नियमित शालेय शिक्षणाकडे जाऊ शकेल.

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

व्याख्या :

सामान्यत: गृहआधारित शिक्षणाची व्याख्या गंभीर बौद्धिक/शारीरिक दिव्यांग मुलांचे शिक्षण अशी केली जाते, ज्यांना गृहआधारित आणि पर्यायी शैक्षणिक समायोजनात शिक्षण दिले जाऊ शकते, जेणेकरून त्यांना स्वतंत्र राहण्याची कौशल्ये प्राप्त करता येतील. (SSA 2006 CWSN साठी गृहआधारित पद्धत)

गृहआधारित शिक्षणाची गरज :

- दिव्यांगत्वामुळे जी मुले शाळेत येऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी
- त्यांच्या राहत्या वातावरणात प्रत्यक्ष अनुभव देऊन शिकविण्यासाठी
- शीघ्र हस्तक्षेप कार्यक्रमासाठी
- पालकांना प्रशिक्षित करण्यासाठी
- कौशल्ये विकसनसाठी
- संवेदनाकौशल्ये विकसित करणेसाठी
- हलनचलन, संभाषणकौशल्यात काय बदल झाला आहे ते पाहण्यासाठी
- व्यक्त करण्यासाठी, ग्रहण करण्यासाठी, भाषा सुधार पाहण्यासाठी
- वैयक्तिक कौशल्यात सुधार व बदल पाहण्यासाठी
- समाजाचा सहभाग वाढवण्यासाठी
- समतामुलक दृष्टिकोन जपण्यासाठी

गृहआधारित मुलांच्या समस्या/आव्हाने :

- **कारक विकास (Motor Development) :**

  यामध्ये रांगणे, चालणे, धावणे, मारणे, वस्तू फेकणे, पेन्सिल पकडणे, लिहणे यांसारख्या क्रिया करणाऱ्या स्नायूंवर परिणाम झालेला असतो.

  कारक विकासाचे टप्पे जसे की मान पकडणे, उलटणे, रांगणे, बसणे, उभे राहणे, चालणे इ. मध्ये विलंब दिसून येतो.

- **संवेदना प्रणाली (Sensory system) :**

  मज्जासंस्थेचे मार्ग आणि मेंदूचे काही भाग असतात जी संवेदना आकलनामध्ये गुंतलेले असतात. अशा दृष्टी, श्रवण, स्पर्श, चव यासाठी संवेदना ओळखल्या जाणाऱ्या प्रणालीमध्ये समस्या येतात.

- **शारीरिक स्थिती आणि हालचाल (Posture and Mobality) :**

  आपली दृष्टी, श्रवण, शरीराच्या हालचाली या आपल्याला वस्तू पकडण्यासाठी आणि पाहण्यासाठी, शारीरिक हालचाल करण्यासाठी, स्वत:चे हात, पाय वापरण्यास मदत करतात. परंतु सेरेब्रल पाल्सी,

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

अस्थिव्यंग दिव्यांगत्व असणाऱ्या मुलांना अडचणी येतात. मुलाला स्वत:च्या शरीराची हालचाल व्यवस्थापित करणे कठीण जाते आणि त्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी समस्या निर्माण होतात.

- **वैद्यकीय परिस्थिती (Medical Conditions) :**

  अती तीव्र/गंभीर स्वरूपाची बहु दिव्यांग मुले ही इतर वैद्यकीय स्थितीने ग्रासलेले असतात जसे की, वारंवार डोळा आणि कानाचे संक्रमण, श्वसनाचे विकार, स्नायूचा ऱ्हास, वारंवार शस्त्रक्रिया, Epilepsy, इ. वैद्यकीय परिस्थितीमुळे वारंवार Hospitalization होते आणि मूल पुन्हा पुन्हा वातावरणातील शिकणे गमावते यासाठी सहज प्रयत्न होणे योग्य राहते.

- **दृष्टी समस्या (Vision Problem) :**

  बहु दिव्यांगत्व मुलांमध्ये एखाद्या गोष्टीकडे पाहत राहणे, एखाद्या वस्तूवर आदळणे, प्रकाशाची तक्रार करणे या समस्या दृष्टिदोषामध्ये दिसून येतात.

- **श्रवण समस्या (Hearing Problem) :**

  ऐकण्याची समस्या असणारे मूल केवळ विशिष्ट आवाजाला प्रतिसाद देऊ शकते किंवा देत नाही. त्यांची भाषा विकसित करण्यासाठी बराच वेळ आणि वारंवार प्रशिक्षण द्यावे लागते. काही वेळा कर्णबधीर मुले देखील त्यांच्या शरीराचा समतोल राखण्यात किंवा सरळ चालण्यात असमर्थ असतात.

- **अध्ययन समस्या (Learning Problems) :**

  एकापेक्षा अधिक दिव्यंगत्वामुळे मुलांच्या शिकण्याचा वेग आणि गती खूप कमी असते. वातावरणातील गोष्टी लगेच शिकत नाहीत, बहुविकलांग मुलांकडे त्यांच्या आजूबाजूच्या खेळण्याशी किंवा वस्तूशी खेळण्यासाठी खूप मर्यादा असते.

- **अभिव्यक्ती भाषेचा विकार (Expressive Language Disorder Aphasia) :**

  हा विकार सामान्यत: बालपणातील असतो, ज्यामध्ये एखाद्या मुलास भाषणाचा वापर करून स्वत:ला व्यक्त करण्यात अडचण येते. योग्य शब्द, व्याकरणाच्या समस्या येतात. मेंदूला होणारे नुकसान जसे स्ट्रोक किंवा डोक्याला दुखापत किंवा इतरत्र वैद्यकीय परिस्थिती यामुळे हे होऊ शकते.

- **ग्रहणक्षमता (Receptiveness) :**

  एखाद्या मुलाला मातृभाषा आकलन होण्यास समस्या येते आणि इतर लोक त्याला किंवा तिला काय काय म्हणतात हे समजण्यात समस्या येतात.

- **ध्वनी विकार (Phonological Disorder Speech) :**

  एखाद्या मुलामध्ये सामन्यपणे वापरले जाणारे काही किंवा सर्व आवाज तयार होण्याची कार्यक्षमता विकसित होत नाहीत, आवश्यक ध्वनी तयार करण्याच्या अक्षमतेमुळे मूल त्याच्या किंवा तिच्या

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

वयोगटातील अपेक्षित स्तरावर संवाद साधू शकत नाही. याला Developmental Articulation किंवा Speech Sound Production Disorder म्हणतात.

- **तोतरेपणा (Stuting) :**

  यामध्ये भाषेचा प्रवाह विस्कळीत होतो. अनैच्छिक पुनरावृत्ती आणि ध्वनी, अक्षरे, शब्द किंवा वाक्यप्रचार यामध्ये तोतरेपणा असतो.

- **बौद्धिक विकास (Coganative Development) :**

  एकापेक्षा जास्त दिव्यांगत्व किंवा अतितीव्र मुलांना त्यांच्या अनियंत्रित हालचाली, दृष्टी, ऐकणे, अक्षमता, संवाद किंवा सहकारी वर्तनात वारंवार मर्यादा येत असल्यामुळे स्व-काळजी, संवाद, घरातील राहणी, सामाजिक कौशल्यात आव्हाने येतात.

- **सामाजिकीकरण (Socialisation) :**

  बाल्यावस्था हा सर्वांत तीव्र आणि सर्वांत महत्त्वपूर्ण समाजिकीकरणाचा काळ असतो. जेव्हा आपण एकमेकांशी संवाद साधतो आणि आपण ज्या सामाजिक जगामध्ये राहतो त्याच्याशी परिचित होतो. तिथेच या मुलांच्या भाषिक, शारीरिक अक्षमतेमुळे सामाजिकीकरण करण्यास असमर्थता येते.

गृहआधारित शिक्षणात विशेष शिक्षकाची भूमिका :

अती तीव्र दिव्यांग मुलाला किंवा त्याच्या कुटुंबाला त्यांच्या विकासासाठी गरजेनुसार मुलांना मदत करणे.

- मुलांना मदत करणे, तंत्रज्ञान उपकरणे आणि सेवा साहाय्य देणे.
- खाणे, फिरणे, खेळणे यांसारख्या क्रियांमध्ये भाग घेण्याची मुलांची क्षमता वाढविणे.
- श्रवण कौशल्य विकसित करणे.
- **कौटुंबिक उद्बोधन :** कुटुंबातील सर्व सदस्यांना उद्बोधन करणे.
- **वैद्यकीय सेवा (Medical Services) :** क्षमतेचे मोजमाप व कार्यात्मक मूल्यमापन या उद्देशासाठी सेवेचा पाठपुरावा करणे.
- **पोषणसेवा (Nutrition Services) :** शीघ्र हस्तक्षेप सेवांचा लाभ घेणेसाठी सक्षम करणे. तसेच ज्या मुलांच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यात मदत करतात, ज्यात आहार कौशल्ये ओळखणे, आहार समस्या, खाण्याच्या सवयी यांचा समावेश होतो.
- **पालक उद्बोधन :** मुलांचे वर्तन, शिक्षण, मानसिक आरोग्य, विकास तसेच समुपदेशन, पालक प्रशिक्षण, शिक्षण कार्यक्रमांसह नियोजन करणे. संबंधित मुलांच्या व कौटुंबिक परिस्थितीबद्दल मानसिक चाचण्यांनुसार समुपदेशन करणे.
- **विशेष सूचना (Special Instruction) :** शैक्षणिक वातावरण तसेच मुलाच्या विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमाचे नियोजन करणे, कुटुंबांना विविध योजनांची माहिती देणे.

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

- **वाचा व भाषा विकास (Speech Language Development) :** संवाद कौशल्यामध्ये अडथळा असलेल्या मुलांसाठी किंवा तोंडाचे स्नायू कमकुवत, लाळ गळणे इत्यादी समस्यांवर उपाययोजना केली जाते.
- **दृष्टी सेवा (Vision Services) :** दृष्टी विकासात्मक विलंब, ओळख आणि त्या मुलांना सेवा देणे आणि प्रशिक्षण प्रदान करणे.

गृहआधारित मुलांसाठी थेरपी सेवा/मार्गदर्शन :

- **भौतिक सेवा (Physiotherapy) :**



मुलाची स्थिती, हालचाल, सामर्थ्य, संतुलन आणि शरीराचे नियंत्रण सुधारण्यास मदत करते. कार्यात्मक समस्या आणि हालचालीतील अडचणी टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी भौतिक सेवा दिली जाते.

- **व्यावसायिक थेरपी (Occupational Therapy) :**

मुलाच्या दैनंदिन कार्यक्षमतेचे विश्लेषण करण्याशी संबंधित असून यामुळे मुलांमधील कार्यक्षमता वाढविणे, दिव्यांगत्व तीव्रता कमी करणे, आत्मसन्मान वाढविणे, परस्पर संवाद वाढविणे आणि नातेसंबंधांना प्रोत्साहन देते. स्वयं मदत कौशल्ये, अनुकूलित वर्तन आणि खेळ, संवेदना, सूक्ष्मकारक कौशल्ये इत्यादी कौशल्य विकसित करण्यात येतात.

- **अनुकूलित साहित्य/कृत्रिम अवयव साहित्य :**

शारीरिक व्यंगत्वानुसार तज्ज्ञांद्वारे मोजमाप करून (Prosthesis and arthory) गरजेनुसार साहित्य उपलब्ध करून दिली जातात. हे शारीरिक समस्या असलेल्या मुलांसाठी कॅलिपर्स, स्प्लिंट तयार करतात. मुलाच्या गरजेनुसार इतर कृत्रिम अवयव दिले जातात.

- **वाचा उपचार (Speech Therapy) :**

मेंदूचा पक्षाघात, बौद्धिक क्षमता, श्रवण व वाचा दोष यांना अडचणी येणाऱ्या मुलांच्या भाषा समस्या, संवाद समस्या हाताळते, जसे की आवाज, स्वर, लय, उच्चार यांसारख्या समस्यांचे निराकरण करते. वाचा दोष असणाऱ्या मुलांना संभाषण कौशल्यात येणाऱ्या अडचणींवर तज्ज्ञांद्वारे थेरपी सेवा दिली जाते.

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

- **संवेदनात्मक थेरपी सेवा (Sensory Integration Therapy) :** ही एक Neurological प्रक्रिया आहे जी स्वत:च्या शरीरातून आणि वातावरणातून संवेदना उत्तेजित करते आणि वातावरणात शरीराचा प्रभावीपणे वापर करणे शक्य करते.

गृहआधारित मुलांसाठी वैयक्तिक व शैक्षणिक विकास – तंत्रे :

- **कार्यविश्लेषण (Task Analysis) :** यामध्ये अवघड कार्य सोप्या टप्प्यामध्ये विभागले जाते. सोप्या स्टेप्स मुलांचा चांगला सराव होण्यास व चांगले लक्षात ठेवण्यास मदत करतात.
- **Chaining :** मुलाच्या वर्तनाच्या प्रत्येक घटकाला शिकवण्याची आणि नंतर वर्तणुकीचे घटक जोडण्याची प्रक्रिया आहे. Chaining मागे पुढे असू शकते.
- **Prompting :** हे वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतात, भौतिक आणि शारीरिक Prompt मुलाला शरीरिकरीत्या मार्गदर्शन करत असतात. उदा. हात धरून सूचना देणे.
- **Fading :** या प्रक्रियेमध्ये सूचना कमी केल्या जातात. विद्यार्थ्याला दिला जाणारा आधार कौशल्य प्राप्त झाल्यावर हळूहळू कमी करणे.
- **Teach Self Care Task :** योग्य वेळी स्वत:ची काळजी घेण्याची कार्ये शिकविणे.

गृहआधारित मुलांसाठी (Assestive Devices) :

- **Wheelchairs :** व्हिलचेअर या manual किंवा Powered असतात.



- **Crutches :** जिथे ताकद अपुरी आहे आणि संतुलन अपूर्ण आहे तेथे अतिरिक्त आधार देण्यासाठी क्रचेसचा वापर केला जातो.

- **Walker :** जी मुले उभे राहू शकतात त्यामना आधाराने उभे राहून चालणे यासाठी वॉकर्सचा वापर केला जातो. ज्या मुलांना उभ्या स्थितीत खेचण्याची आणि पकड राखण्याची क्षमता आहे अशी मुले वॉकर्स वापरू शकतात. चालण्यासाठी वॉकर्सचा वापर होतो.

- **Parallel Bars :** चालण्याचा सराव करण्यासाठी व चालण्याची पद्धत दुरुस्त करण्यासाठी समांतर बार वापरले जातात.

- **CP Chair :** या खुर्चीला चाके जोडली जाऊन पालकांना मुलाला घराभोवती फिरवणे सोपे होते. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा, क्रिया पूर्ण करण्यासाठीचे बदल सीपी चेअरमध्ये असतात. उदा. लेखन टेबल.

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

- **Corner Seating :** ज्या मुलाच्या डोक्यावर, पाठीला, कमरेवर नियंत्रण नसते. त्यांना बसण्यासाठी Corner Seating चा वापर करतात.

- **Calipers :** शरीराच्या खालच्या अंगाच्या Orthosis ला कॅलिपर म्हणतात. ताठरपणा, पायाचा कमजोरपणा, वाकडेपणा कमी करण्यासाठी कॅलिपरचा वापर करतात. त्यामुळे पायाची मूळ स्थिती टिकवण्यास मदत होते.

- **Splints :** हाताला मूळ स्थितीत नेण्यासाठी Splint चा वापर केला जातो.

- **Commode Chair किंवा Toilet Stool :** ज्या मुलांना भारतीय शौचालये वापर करणे कठीण जाते. अशा मुलांसाठी प्लॅस्टिकच्या खुर्चीचा अनुषंगिक बदल करून ती चेअर बनवली जाते.

शैक्षणिकदृष्ट्या साहित्य बदल :

- **TLM विकसन :** शिक्षकांनी बनवलेले किंवा खरेदी केलेले साहित्य – Clay , Tiffin carrier, Cassette Modify aids - ब्रश, जेवण करताना चमचा, पेन इ.
- **समग्र शिक्षा :** समावेशित शिक्षण विभागाकडून विशेष शिक्षक, Physio therapist, Occupatinal therapist, Speech therapist Psychologist यांची सेवा उपलब्ध करून दिली जाते.

अ) मूल्यमापन :

प्रत्येक बालक हे अद्‌वितीय आहे. विकासाची प्रक्रिया ही सुसंगत मार्गक्रमण करणारी असली तरीही विविध टप्प्यांवर बालकांच्या व्यक्तिगत विकासांमध्ये भिन्नता दिसून येते. सर्वच बालके एकाच वेळी विकासाचे टप्पे गाठत नाहीत. वैयक्तिक भेद विविध कारणांमुळे उद्‌भवतात. विलंब हा विकासाच्या कोणत्याही क्षेत्रात असू शकतो. शारीरिक, भाषिक, सामाजिक, भावनिक, बोधात्मक किंवा एकापेक्षा जास्त क्षेत्रातही असू शकतो. विकासातील विलंब हा शिक्षण, भाषा, संप्रेषण, बोधन, वर्तन, सामाजिक आणि गतिविकलांगता यामधील कार्यात्मक मर्यादांच्या आधारे ठरवला जातो.

बालकाची कार्यक्षमता आणि विकासाची पातळी कशीही असली, तरीही त्याचे पालन–पोषण व संगोपन करणे आवश्यक आहे. काही वेळा बालकाकडे अतिरिक्त लक्ष देण्याची आवश्यकता असते. पालकांशी सल्लामसलत करून विशेष शिक्षकांनी व्यक्तिगत शिक्षण योजना तयार करणे आवश्यक आहे.

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

ब) वैयक्तिक शिक्षण योजना (IEP : Individualized Education Plan) :

सचिन हा ६ वर्षांचा मुलगा आहे. तो स्वतंत्रपणे चालू शकत नाही, स्वत:ची कामे थोड्याशा मदतीने करतो. त्याला दिलेल्या सूचना तो समजू शकतो आणि ऐकू शकतो व अडखळत बोलतो. पुढील दोन महिन्यांकरिता सचिनसाठी शिक्षण योजना तयार केली आहे.

ध्येय	अध्ययन	घरी करावयाची कृती
१) शारीरिक विकास	आधार घेऊन पाच/दहा पावले चालणे.	आठवी दोरी बांधा. दोरीच्या शेवटी एक लाल रंगाचा चेंडू ठेवा. चेंडूपर्यंत चालण्यासाठी त्याला आधार द्या. विद्यार्थ्याला सतत प्रोत्साहन द्या.
२) भाषिक विकास	वेगवेगळ्या प्राण्यांच्या आवाजाला ऐकण्याचा अनुभव मौखिक भाषेत सादर करतो.	वेगवेगळ्या प्राण्यांच्या आवाजाची चित्रफित विद्यार्थ्याला दाखवावे. रेकॉर्ड केलेले आवाज ऐकवावे. प्रत्येक ध्वनीची निर्मिती, तोंडाचा विशिष्ट आकार व दात, टाळ आणि जिभेच्या कोणत्या जागेवर ध्वनीची निर्मिती होते, हे आरशाचा वापर करून सांगा. तोंडातील स्नायूंचा विकास होण्याकरिता दिवसातून काही वेळा तोंडाच्या स्नायूंचे विशिष्ट व्यायाम करून घ्या.
३) स्व-मदत	स्वत:चे दात स्वत: घासतो.	कृतीची छोट्या-छोट्या भागात विभागणी करा व प्रत्येक कृती बालकाकडून मदतीने करून घ्या.
४) बौद्धिक विकास	चित्र आणि वस्तूंच्या जोड्या लावतो.	बालकाला त्याच्या परिचयाची चित्रे दाखवून जसे : चेंडू, कप, बाहुली. चित्रातील वस्तू द्या आणि चित्रे व वस्तू यांच्या जोड्या लावायला सांगा. चित्र व वस्तू यांचे नाव सांगायला लावा.
५) सामाजिक, भावनिक विकास	घरातील व्यक्तींचा परिचय करून द्या. बालकाला संवाद साधण्यास सांगा.	बालकाला प्रत्येक व्यक्तीचे नाव व नाते सांगा. विद्यार्थ्यांकडे चॉकलेट द्या व नाव, नाते सांगून त्या व्यक्तीला देण्यास सांगा.

क) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) :

गृहआधारित शिक्षणातील बालकांच्या कौशल्य विकसनातून झालेला कारक विकास, भावना विकास यांच्या नोंदी ठेवून आठवडाभरातील झालेल्या त्याच्या प्रगतीची नोंद घेणे. मूल्यामापनाद्वारे निश्चित उद्दिष्टे ठरवावी.

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

त्या अनुषंगाने प्रथम विशेष शिक्षकाने बालकांच्या सर्व आव्हानांवर सूक्ष्म पद्धतीने निरीक्षण करून त्याच्या नोंदी घेणे महत्त्वाचे आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे मूल्यामापन पद्धती अवलंबावी.

मूल्यमापन पद्धती :

१) गृहआधारीत शिक्षणातील बालकांच्या विकासात्मक बाबींवर सूक्ष्म निरीक्षण करणे. (उदा. शारीरिक हालचाल, भावना विकास)

२) सूक्ष्म निरीक्षणातूनच आव्हांनाची निश्चिती करणे.

३) आव्हानानुसार उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी लक्ष्य ठरविणे.

४) उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विशेष शिक्षकांनी आव्हानांची सूची तयार करून त्याच्या नोंदी घेणे.

५) नोंदीनुसार विशेष शिक्षकांनी गृहमार्गदर्शनातील बालकांच्या कौशल्यातील झालेल्या प्रगतीची नोंद घेणे.

६) प्रगती व बालकांच्या वर्तनातील सुधारणेबाबत झालेली विकासात्मक बाबींची माहिती पालकांना अवगत करणे.

७) सामान्य शिक्षक व विशेष शिक्षक यांनी संयुक्तिकरीत्या गृहमार्गदर्शन आधारित बालकांचे मूल्यमापन करावे.

८) बालकांच्या प्रगतीची नोंद सामान्य शिक्षक व विशेष शिक्षक यांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापना (CCE) मध्ये नोंद घ्यावी.

❖❖❖

Com1/E/2024)6) Samveshit Shikashan /14) Chapter 14 New /Proof -VIII/15-11-2024/T

१३. मार्गदर्शन व समुपदेशन

पालकांच्या शैक्षणिक, सामाजिक, भावनिक जडणघडणीच्या टप्प्यात वेगवेगळ्या पायऱ्यांवर मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते. शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रक्रियेपासून त्यांना या टप्प्यांत समावेशित करणे, शाळा आणि सवंगड्यांनी स्वीकारणे यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन उपयुक्त ठरते. वर्गातील विद्यार्थी म्हणून त्यांना समानतेची किंवा समतेची वागणूक देणे, शिक्षणातील अडथळे व त्यावरील उपाययोजना यांपासून शिक्षणाच्या वेगवेगळ्या टप्प्यांतील मार्गदर्शन असो किंवा व्यवसायनिवडीचे समुपदेशन असो. थोडक्यात बालकाच्या जडणघडणीतील सर्व स्तरांतील व्यक्तींना मार्गदर्शन व समुपदेशन करणे वेळोवेळी गरजेचे असते. त्याचबरोबर दिव्यांग विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक वाटचालीदरम्यान मार्गदर्शन व समुपदेशनाची आवश्यकता असते. यासाठी आपण या अत्यंत महत्त्वाच्या घटकाकडे अभ्यासपूर्ण व गांभीर्याने बघणे अपेक्षित आहे.

मानवी जीवनामध्ये यशस्वितेसाठी मार्गदर्शन खूप महत्त्वाचे मानले जाते. यासाठी मार्गदर्शनातून मानवाच्या दैनंदिन जीवनामध्ये लक्षणीय बदल होण्यासाठी मोठी मदत होते. मानवी जीवन अतिशय गुंतागुंतीचे असून व्यक्तींसमोर वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक व धार्मिक समस्या उभ्या आहेत. अशा वेळी समस्यांचे निराकरण करण्यास व्यक्तीचा केवळ स्वतःचा पूर्वानुभव अथवा अनुभव पुरेसा नाही. त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक अथवा शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांची गरज असते. अशा परिस्थितीत समस्या जाणून व्यक्तीला समस्या सोडवण्याच्या उद्देशाने केलेले सहकार्य म्हणजे 'मार्गदर्शन'.

व्यक्तीच्या सभोवतालचे वातावरण हे अनुकूल असेल तर व्यक्ती प्रगती करते, परंतु प्रतिकूल वातावरणात व्यक्तीला समायोजन करणे कठीण जाते; व्यक्ती गोंधळून जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीला अथवा समूहाला जे साहाय्य केले जाते ते 'मार्गदर्शन'. व्यक्ती रोजगाराच्या अनेक संधी शोधत असते, परंतु योग्य व्यक्ती आणि योग्य व्यवसाय अथवा नोकरी यांचा समन्वय कसा साधावा, नोकरी–व्यवसायामध्ये समाधान कसे मिळवावे, या संदर्भाने केलेले साहाय्य म्हणजे 'मार्गदर्शन' होय.

मार्गदर्शन व्याख्या :

एखादी महत्त्वपूर्ण कृती शिकवायची असेल आणि ती कृती शिकताना, समायोजन साधताना सहकार्याची गरज असेल, अशा वेळेस त्यास मार्गदर्शन संबोधावे. ती कृती फुरसतीच्या वेळेतील असेल अथवा भिन्न व्यक्तींबरोबर असलेल्या वर्तणुकीबाबत असेल. अशावेळी केलेले सहकार्य म्हणजे, 'मार्गदर्शन' होईल.

– ब्रेवर (Brewer)

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

मार्गदर्शन सेवांची व्याप्ती व कार्य विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक व व्यावसायिक निवड करण्यात साहाय्य करण्यापेक्षा अधिक आहे. मार्गदर्शनाची ध्येये दोन प्रकारची आहेत. एक समायोजनात्मक व दुसरे विकसनात्मक मार्गदर्शन. विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेतील व घरातील परिस्थितीशी शक्यतो अधिक जुळवून घेण्यास साहाय्य करते आणि त्याचबरोबर त्याला स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासाची सोय पुरवते, म्हणून मार्गदर्शन हा शिक्षणाचा अंगभूत भाग समजण्यात आला पाहिजे. मार्गदर्शन सर्वांकरिता हवे. ही एक सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया आहे. ती व्यक्तीस निर्णय घेण्यास व समायोजन साधण्यास साहाय्यभूत होते.

– भारतीय शिक्षण आयोग

(कोठारी आयोग १९६४–६६)

मार्गदर्शनाची तत्त्वे :

१) **मार्गदर्शन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे :** मार्गदर्शनाची गरज बालपणापासून ते मृत्यूपर्यंत असते, म्हणून मार्गदर्शन ही सातत्याने अखंड चालणारी प्रक्रिया आहे.

२) **मार्गदर्शन ही एक प्रक्रिया आहे :** मार्गदर्शन हे प्रत्येक व्यक्तीला स्वतःला ओळखण्यात आणि स्वतःमधील क्षमतास्रोतांचा उपयोग करण्यात, ध्येयनिश्चिती करण्यात, नियोजन करण्यात, स्वतःच्या समस्यांचे निराकरण करण्यात आणि व्यक्तिमत्त्व विकासात साहाय्यभूत ठरते.

३) **मार्गदर्शन हे व्यक्ती विकासावर भर देते :** मार्गदर्शन हे प्रत्येक व्यक्तीला आपले व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी स्वातंत्र्य देते. जेव्हा आवश्यकता असेल, तेव्हा त्याला त्याच्या समस्यांबद्दल मार्गदर्शन केले जाते.

४) **मार्गदर्शन हे सर्वांसाठी असते :** प्रत्येक व्यक्तीच्या क्षमताविकासावर मार्गदर्शन भर देते. विषम समायोजित व्यक्तीला मार्गदर्शकांकडून मार्गदर्शनासाठी भरपूर वेळ द्यावा लागतो. तरीही बहुसंख्य व्यक्तींना मार्गदर्शन करणे हे मार्गदर्शनाचे मूलतत्त्व आहे.

५) **मार्गदर्शनात लवचीकपणा असतो :** संघटित मार्गदर्शन कार्यक्रम हा लवचीक असायला हवा. ही लवचीकता व्यक्तीच्या किंवा समुदायाच्या गरजांनुसार आणि परिस्थितीनुसार असायला हवी. मार्गदर्शनात कोणताही निश्चित असा साचेबद्धपणा अपेक्षित नसतो.

६) **मार्गदर्शन प्रक्रियेत मार्गदर्शकाला विशेष प्रशिक्षणाची गरज असते :** मार्गदर्शकाला प्रशिक्षण दिले गेले तर कोणती माहिती संकलित करावी? निर्णयप्रक्रियेत समस्याग्रस्त व्यक्तीला कसे सामावून घ्यावे? संवाद कसा साधावा? इ. बाबी मार्गदर्शकाला समजतात. तसेच मार्गदर्शनाच्या संस्था, माहिती, स्रोत, मार्गदर्शनाची क्षेत्रे इ. बाबी समजल्यामुळे विद्यार्थ्यांना समस्या सोडवण्यासाठी तो मदत करू शकतो.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

मार्गदर्शनाची गरज :

बदलत्या समाजाच्या स्वरूपामुळे व वाढत्या औद्योगिक तंत्रज्ञानामुळे मानवासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. या समस्यांचे वेळोवेळी व योग्य वयात निराकरण केले नाही तर गंभीर समस्या निर्माण होतात, म्हणून व्यक्तीला मार्गदर्शनाची गरज असते. मार्गदर्शनाची गरज खालीलप्रमाणे–

१) **व्यक्तिभिन्नता :** दोन व्यक्ती बौद्धिक, शारीरिक, मानसिक क्षमतांबाबत भिन्न असू शकतात. त्यांच्या गरजा व समस्या वेगवेगळ्या असतात. त्यासाठी त्यांना मार्गदर्शन हवे असते.

२) **पौगंडावस्थेतील वादळाचा काळ** : मानवाच्या वाढीबरोबरच वयात येताना काही शारीरिक बदल होतात. भिन्नलिंगी आकर्षण हे पौगंडावस्थेत तीव्रतेने निर्माण होतो. मुले कधी आक्रमक होतात तर कधी–कधी आपल्या सौंदर्याविषयी जास्त चिंता करतात. विद्यार्थ्यांना या अवस्थेत विविध शारीरिक, मानसिक समस्या निर्माण होतात. या समस्यांचे वेळीच निराकरण करणे गरजेचे असते.

३) **भावनिक दुर्बलतेचा त्याग व विचारांचे प्राबल्य** : काही व्यक्ती अतिशय भावनाप्रधान असतात. असे असणे स्वाभाविक असते, परंतु एखाद्या संकटाने व्यक्ती खच्ची होते व ती भावनिक दुर्बल बनते अशा वेळी मार्गदर्शन लागते.

४) **व्यक्तिमत्त्व विकास** : यात जसे मानवाला लाभलेला अनेक क्षमतांचा समावेश होतो. तसेच त्याने संपादित केलेल्या गुणवैशिष्ट्यांचाही समावेश होतो. व्यक्तिमत्त्व विकास जरी शिक्षणाचे ध्येय असले तरी मार्गदर्शन सेवा या विकासाला साहाय्यभूत होते.

५) **योग्य वैकल्पिक विषय व अभ्यासक्रमाची निवड** : प्रत्येकाला शिक्षणाची संधी आता उपलब्ध होत आहे. विविध अभ्यासक्रमांतर्गत विविध वैकल्पिक विषय उपलब्ध आहेत. या विविध अभ्यासक्रमांतून योग्य विषय निवडीचा प्रश्न प्रामुख्याने येतो. त्याचप्रमाणे आपल्या क्षमता आणि अभिरुचीनुसार अभ्यासक्रमाची निवड कशी करावी, यासाठी मार्गदर्शन हवे असते.

६) **विद्यार्थ्यांमधील वर्तन समस्या** : विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा असंतोष, त्यांचे गैरवर्तन ही आता राष्ट्रव्यापी समस्या बनली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज असते.

७) **व्यवसाय निवड** : व्यक्तीच्या क्षमता व शैक्षणिक व्यावसायिक पात्रतेला अनुसरून तिच्या आवडीच्या क्षेत्रात व्यवसायाच्या कोणकोणत्या विविध संधी उपलब्ध आहेत? अचूक व्यवसायाची निवड कशी करावी? यासाठी मार्गदर्शन लागते.

८) **दिव्यांगांचे प्रश्न व त्यावरील उपाय** : दिव्यांगांच्या विविध अध्ययनशैलीनुसार त्यांना मार्गदर्शनाची गरज असते. तसे झाल्यास त्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक व वर्तन व्यवस्थापनाचे मार्ग खुले होतात.

मार्गदर्शनाची व्याप्ती :

- विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासासाठी संधीची उपलब्धता होते.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- विविध अभ्यासक्रमांची माहिती प्राप्त होते.
- व्यवसायनिवडीसाठी मार्गदर्शन मिळते.
- शालेय प्रगती व संपादनक्षमता विकसित होते.
- विद्यार्थ्यांच्या वर्तन समस्यांचे व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शन मिळते.
- अध्ययन व अध्यापनातील समस्या दूर करता येतात.
- विद्यार्थ्यांमधील उणिवा व समस्या यांबाबत मार्गदर्शन मिळते.

मार्गदर्शन क्षेत्र :

विविध क्षेत्रांमध्ये मार्गदर्शनाची आवश्यकता असते. जसे,

१) शैक्षणिक मार्गदर्शन

२) व्यावसायिक मार्गदर्शन

३) आरोग्य व शारीरिक बाबींबाबत मार्गदर्शन

४) व्यवसायनिवडीबाबत मार्गदर्शन

५) वर्तनाबाबत मार्गदर्शन

६) मानसिक स्वास्थ्याबाबत मार्गदर्शन

७) व्यक्तिगत विकासाबाबत मार्गदर्शन

८) सामाजिक संबंधांविषयी मार्गदर्शन

९) दिव्यांगत्व संदर्भाने येणाऱ्या विषयांबाबत मार्गदर्शन

१०) वयात आलेल्या मुलांच्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन

समुपदेशन

समुपदेशन हे मार्गदर्शनाचे एक अंग आहे. समुपदेशनाशिवाय मार्गदर्शन अर्थपूर्ण होऊ शकत नाही. मार्गदर्शन हे सामूहिकरीत्या ही करता येते, परंतु समुपदेशनाचे तसे नाही ते वैयक्तिक लक्ष देऊनच दिले जाते. मार्गदर्शनात निर्णय कसा घ्यावा? हे विद्यार्थी जरी ठरवत असला, तरी समुपदेशन मात्र विद्यार्थ्यांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करते. मार्गदर्शन प्रक्रियेचा समुपदेशन हा एक भाग असतो. 'समुपदेशन म्हणजे वैयक्तिक, शैक्षणिक, व्यावसायिक इ. समस्यांची सर्व महत्त्वाची समर्पक तथ्ये लक्षात घेऊन, त्यांचे विश्लेषण करून उपाय शोधण्यासाठी केलेले व्यक्ती विशिष्ट व वैयक्तिक सहकार्य होय. समुपदेशनामध्ये बहुतेक वेळा तज्ज्ञ, शाळा, समाज इतर स्रोत आणि वैयक्तिक मुलाखतीच्या सहकार्याने सल्लार्थीला स्वतः निर्णय घेण्यास शिकवले जाते.'

– गुड (Good) शब्दकोश १९४५

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

समुपदेशनाची तत्त्वे :

१) समुपदेशन ही सावकाश चालणारी प्रक्रिया असून हे समुपदेशकाला माहिती असणे आवश्यक आहे.

२) समुपदेशन हे सर्वांसाठी असते. शाळेच्या संदर्भात बोलायचे झाल्यास शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना समुपदेशन करावे लागते. ते केवळ समस्याग्रस्त व विशेष विद्यार्थ्यांसाठीच असते असे नाही. शाळेतील समुपदेशन हे उपचारात्मक स्वरूपापेक्षा जास्त विकासात्मक आणि प्रतिबंधात्मक स्वरूपाचे असते.

३) समुपदेशन हे निश्चित अशा गृहीतकांवर अवलंबून असते. एखादी गोष्ट जी सत्य आहे किंवा कदाचित सत्य आहे असे मानले जाते. समुपदेशनात काही तर्क किंवा कारणांच्या आधारे सत्य म्हणून स्वीकारली जातात. उदा. दिव्यांग विद्यार्थ्यांना तो ज्या समाजात राहतो तेथे स्वीकारले जात नाही.

४) समुपदेशन म्हणजे केवळ सल्ला देणे नव्हे.

५) समुपदेशन म्हणजे समस्या निराकरण नव्हे तर यात समुपदेशक समस्याग्रस्त व्यक्तीला त्याच्या समस्येचे उत्तर, उपाय शोधण्यात सहकार्य करतो.

६) समुपदेशकाने सल्लार्थीला मुक्त चिकित्सा समीक्षणासाठी तयार केले पाहिजे व स्व समिक्षणासाठी तयार राहिले पाहिजे.

७) समुपदेशन म्हणजे केवळ मुलाखत नाही तर व्यक्तीला त्याच्या मागणीप्रमाणे स्वतःला समजून घेणे. त्याबाबत त्यांच्याशी संवाद करणे हे होय.

८) सल्लार्थ्याची स्थिती स्वीकारणे.

९) सल्लार्थ्याशी प्रभावी संप्रेषण करणे.

१०) सल्लार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करणे, भावनिक सहभाग टाकणे व त्याच्याविषयी गोपनीयता ठेवणे.

११) सल्लार्थ्याविषयी non judgemental राहणे. निर्णय न घेणे. बऱ्याच कारणांमुळे निर्णय न घेता समुपदेशन करणे हितावह ठरते. निर्णयामुळे आपल्या परस्परसंबंधावर हानिकारक प्रभाव पडतो.

समस्या असलेल्या व्यक्तीला कठीण प्रसंगातून किंवा समस्येतून बाहेर काढणे हे महत्त्वाचे ध्येय समुपदेशनाचे आहे. समस्याग्रस्त व्यक्तीला समस्येतून बाहेर पडण्यासाठी सहकार्य करावे, परंतु त्या व्यक्तीने स्वत:च्या समस्येतून स्वत: बाहेर पडणे आवश्यक आहे हे लक्षात ठेवावे.

समुपदेशनाचे प्रकार :

- **शैक्षणिक समुपदेशन** : शालेय, महाविद्यालयीन किंवा व्यावसायिक शिक्षणात येणाऱ्या आव्हांनाबाबत विद्यार्थ्यांना समुपदेशन केले जाते. यामध्ये शिक्षणात येणाऱ्या विविध समस्यांना सामोरे कसे जायचे? आपल्या शैक्षणिक क्षमतांचा विकास कसा करायचा? व्यावसायिक अभ्याक्रमाची निवड व निर्णय कसा

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

घ्यायचा? याबाबत विद्यार्थ्यांना सहकार्य केले जाते. दिव्यांग विद्यार्थ्यांनाही त्यांच्या क्षमता, गरज व आव्हांनानुसार शैक्षणिक समुपदेशन केले जाते.

- **व्यावसायिक समुपदेशन** : यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम निवडीसंदर्भात करिअरविषयक, रोजगाराच्या उपलब्ध संधीविषयी समुपदेशन केले जाते. समुपदेशन करताना विद्यार्थ्यांच्या क्षमता, अभिरुची, व्यक्तिमत्त्व, कल याचा विचार केला जातो. दिव्यांग विद्यार्थ्यांना क्षमतेनुसार व गरजेप्रमाणे अभ्यासक्रम निवडीसाठी रोजगारविषयक समुपदेशन केले जाते. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत उपलब्ध असलेल्या शिक्षणाच्या व रोजगाराच्या वाटा याबाबतही व्यावसायिक समुपदेशन केले जाते.
- **मानसशास्त्रीय समुपदेशन किंवा व्यक्तिमत्त्व** : वैयक्तिक किंवा भावनिक समस्यांवरील उपाय हे व्यक्तिमत्त्व किंवा मानसशास्त्रीय समुपदेशन होय. उदा. मित्रांची कमतरता, एकटेपणासाठी उपचार केले नाही तर त्याचा शालेय जीवनावर परिणाम होतो.
- **युवा समुपदेशन :** तरुण मुलांना भेडसावणाऱ्या करिअर, नातेसंबंध, भावनिक, मानसिक, शारीरिक बदल, ताणतणाव अशा अनेक समस्यांच्या समाधानासाठी युवा समुपदेशन केले जाते.
- **पुनर्वसन समुपदेशन :** पुनर्वसन समुपदेशन हे दिव्यांग असलेल्या व्यक्तींना समुपदेशन प्रक्रियेद्वारे त्यांची वैयक्तिक, व्यावसायिक, सामाजिक जीवनाची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत करते. मागील दोन दशकात दिव्यांगांचे 'पुनर्वसन समुपदेशन' या विषयाला गती प्राप्त होत आहे. दिव्यांगांची विविध आव्हाने व त्यावरील उपाययोजना, शालेय-महाविद्यालयीन शिक्षण, करिअरविषयक समस्या, शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयानुसार विविध सवलती, कायद्याच्या योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या आव्हानांना परतवून लावण्यासाठी पुनर्वसन समुपदेशन केले जाते. तसेच दिव्यांग व्यक्तींना वैयक्तिक, व्यावसायिक, कौटुंबिक स्तरावर येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, समस्यांशी समर्थपणे मुकाबला करण्यासाठी व योग्य, तार्किक विचार करून निर्णय घेण्यासाठी सहकार्य करते. पुनर्वसन समुपदेशनात दिव्यांग व्यक्तींबरोबर आवश्यकतेनुसार त्यांच्या कुटुंबियांचा, शालेय व व्यावसायिक मित्रपरिवाराचा, संबंधित सामाजिक घटकांचा तसेच कामाच्या ठिकाणी कार्यरत सहकाऱ्यांचा सहभाग घेतला जातो.

समुपदेशनाची कौशल्ये :

१) **निरीक्षण** : समुपदेशन मुलाखतीच्या वेळी समुपदेशकाने सल्लार्थीच्या क्रिया व प्रतिक्रियांबाबत शारीरिक व मानसिकरीत्या अतिशय सजग असणे गरजेचे आहे. थोडक्यात सूक्ष्म निरीक्षण करायला हवे. उदा. सल्लार्थीचे रुमालाशी खेळणे, पायाची घडी बदलणे, डोके खाजवणे, ओठ चावणे इ. क्रिया प्रतिक्रियांचे निरीक्षण समुपदेशक करत असतो.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

२) **ऐकणे** : समुपदेशनात श्रवण करण्याची कला हे फार महत्त्वाचे तंत्र आहे. ते समुपदेशकाला अवगत असले पाहिजे. उत्तम समुपदेशक तो असतो की, जो कमी बोलतो व आपला वेळ वाया न घालवता आपल्या सल्लार्थीला तणाव मुक्त करतो.

३) **संप्रेषण** : हे तंत्र क्वचितच वापरण्यात येते. या तंत्रात समुपदेशक बोलतो व सल्लार्थी ऐकतो, परंतु अशी परिस्थिती तेव्हाच उद्‌भवू शकते जेव्हा सल्लार्थीला एखादी माहिती देणे अपेक्षित असते.

४) **नेतृत्व पुढाकार** : सल्लार्थीशी संभाषण चालू असताना किंवा मध्येच स्वतः पुढाकार घ्यावा हे समुपदेशकाने ठरवावे. जेणेकरून समस्या शोधताना, निश्चित करताना त्याला या पुढाकाराचा उपयोग होऊ शकेल. तसेच सल्लार्थीला बोलते करण्यासाठी देखील पुढाकार घ्यावा लागेल.

समुपदेशकाची वैशिष्ट्ये व कौशल्ये :

व्यक्तिमत्त्व विशेषतज्ज्ञ वॉल्टर जोन्स यांनी व्यक्तिमत्त्वाशी निगडित विशेषतज्ज्ञाची दूरदृष्टिता, अभिरुची, व्यापकता, सहकाराची भावना, नम्र स्वभाव अशी गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१) **दूरदर्शिता** : समुपदेशक हा दूरदर्शी असावा. त्यास भविष्याचा वेध घेता आला पाहिजे. चर्चेत काही पेच प्रसंग, अडचणी निर्माण होतात. त्याने त्याच्याशी सामोरे जात सल्लार्थीच्या समस्यांचे निराकरण करावे.

२) **अभिरुची व्यापकता** : समुपदेशकामध्ये व्यापक अभिरुची असावी. समुपदेशकास विविध लोकांशी संपर्क साधून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्या लागतात. अशा कामात समुपदेशकाने अभिरुची दाखवली पाहिजे. अन्यथा समस्येचे निराकरण करण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते.

३) **सहकार्याची भावना** : समुपदेशक आणि सल्लार्थी यात जवळीक निर्माण होणे गरजेचे असते. समुपदेशकाने यासाठी सल्लार्थीला सहकार्य करावे जेणेकरून, सल्लार्थ्यांचा ताण कमी होऊन त्यात समुपदेशकाविषयी आपलेपणाची भावना निर्माण होईल.

४) **नम्र स्वभाव** : समुपदेशक नम्र स्वभावाचा नसेल तर विद्यार्थी व त्याचे सहकारी त्याच्याशी योग्य प्रकारे चर्चा किंवा विचारविनिमय करू शकणार नाही. तसेच सल्लार्थी त्याची समस्या समुपदेशकासमोर मांडण्यास संकोच करेल.

५) **प्रशिक्षण आणि सज्जता** : समुपदेशकाने समुपदेशनाचे विशेष प्रशिक्षण घ्यायला हवे. तो सजग असणे गरजेचे आहे. विविध विषयाविषयी माहिती असणे गरजेचे आहे. मार्गदर्शन व संप्रेषणाच्या सिद्धांताच्या तत्त्वांची माहिती समुपदेशकाकडे असावी.

६) **विशेष व्यक्तिगत गुण** : सहानुभूती, तदानुभूती, व्यवसायनिष्ठा, वस्तुनिष्ठता, सहकार्य इत्यादी विशेष गुण समुपदेशकाकडे असावेत.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

७) **सौहार्दपूर्वक संबंध** : समुपदेशन प्रक्रियेच्या प्रारंभी समुपदेशकांनी वातावरण निर्मिती करायला हवी. त्याने सल्लार्थीशी विनाअट संबंध प्रस्थापित करावा जेणेकरून, सल्लार्थी मुलाखतीसाठी स्थानापन्न होईल. म्हणून समुपदेशकाने सल्लार्थीशी जवळीक निर्माण करावी.

८) **तदानुभूती** : सल्लार्थीच्या जागी मी असतो तर? असा विचार समुपदेशकाने करावा. म्हणजे सल्लार्थीचे विचार, भावना, कल्पना याची जाण समुपदेशकाला येऊ शकते. वेळोवेळी भिन्न व्यक्तींचा दृष्टिकोन लक्षात घेऊन त्याने समुपदेशन करावे.

समुपदेशकाची भूमिका :

१) **सल्लार्थ्याला त्याच्या वर्तनात बदल करण्यास सहकार्य करणे :** सल्लार्थीने स्वतःच्या वैशिष्ट्यांबाबत, क्षमता, अभिरुची, वर्तनाबाबत अधिक जाणून घेऊन स्वतःच्या वर्तनात बदल करणे अपेक्षित असते. त्यासाठी समुपदेशकाला पर्याय व संधीची जाणीव असली पाहिजे. समाजाच्या अपेक्षा, समाजातील परिस्थिती आणि बंधने याची जाणीव समुपदेशकाला असली पाहिजे.

२) **प्रश्न विचारणे :** योग्य प्रश्न विचारून सल्लार्थीकडून समुपदेशक माहिती मिळवतो व सल्लार्थीस समजून घेतो. सल्लार्थीने स्वतःला समजून घ्यावे यासाठी प्रश्न विचारले जातात परंतु समुपदेशकाने प्रश्न अत्यंत काळजीपूर्वक विचारले पाहिजे.

३) **सूचना देणे :** बराच काळ समुपदेशक काळजीपूर्वक ऐकण्याचे कार्य करतो. काही ठिकाणी संवादही साधतो व काही सर्वसामान्य सूचना देतो. सुरुवातीस सर्वसामान्य व शेवटी विशेष सूचना दिल्या जातात.

४) **मानवी वर्तनाच्या संकल्पनेबाबत माहिती पुरवणे :** समुपदेशक बऱ्याच वेळा मानवी वर्तनाबाबत सूचना देत असतो. सल्लार्थ्याची क्षमता, अभिरुची, बुद्धिमत्ता शैक्षणिक क्षमता यांसारख्या अनेक मानवी वर्तन घटकाची माहिती समुपदेशक सल्ल्यार्थ्याला देत असतो.

५) **प्रमाणित माहितीची जुळणी करणे :** मानसशास्त्रीय चाचण्या, नोंदी, आरोग्य याबाबतीत सल्लार्थीची माहिती समुपदेशक संकलित करत असतो. कोणत्याही चाचणीतून संकलित केलेली माहिती ही दुसऱ्या गुणवैशिष्ट्ये माहिती असलेल्या गुणांकाशी तुलना केल्या खेरीज निरर्थक ठरते. प्रमाणित माहितीची जुळणी करणे. प्रमाणित चाचण्यांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करून त्यानुसार शास्त्रशुद्ध समुपदेशन करणे.

समुपदेशकाची कार्य :

मार्गदर्शनाच्या कार्यक्रमाचे नियोजन व संघटन यांमध्ये व्यावसायिक माहिती, वैयक्तिक माहिती संकलन, समुपदेशन सेवा, व्यावसायिक तयारी, अनुधावन, समाज योजना सेवा व संशोधन या सर्वांचे नियोजन व संघटन यांचा समावेश असतो.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१) **उद्‌बोधन :** रोजगार व स्रोतांबद्दल माहिती संकलित करणे, विद्यार्थ्यांध्ये माहिती प्रसारित करणे आणि कार्यक्रमाचे नियोजन करणे अशी एक प्रकारे तयारी म्हणजे उद्‌बोधन होय.

२) **मुलाखत घेणे :** सल्लार्थीची वैयक्तिक मुलाखत घेणे.

३) **अनुधावन करणे** : आपण सल्लार्थीला दिलेल्या सल्ल्यानंतर त्याचे काय झाले? समस्या निराकरण करण्यात योग्य पद्धती वापरल्या का? त्यात यश आले का? अपयश आले असेल तर...त्याची कारणे कोणती? याबाबत अनुधावन करणे.

समुपदेशकांनी सल्लार्थीच्या समस्येबाबत विचारविमर्श करावा. अंतिम निर्णय मात्र सल्लार्थीनेच घ्यायचा असतो. समुपदेशकाने सल्ल्यार्थ्यावर कोणत्याही प्रकारची समस्या अथवा निर्णय लादू नये. समुपदेशकाने आपले कार्यक्षेत्र व मर्यादा लक्षात घेऊनच समुपदेशन करावे.

ऑनलाइन समुपदेशन :

आपल्या जीवनात अधिक चांगला बदल घडवून आणण्यासाठी विविध क्षेत्रात ऑनलाइन समुपदेशन हे समाधानकारक ठरत आहे. ज्या समुपदेशनात ऑनलाइन स्वरूपाचा वापर करून समुपदेशक समस्याग्रस्त व्यक्तीला व्यक्तिगत सल्ला अथवा मार्गदर्शन देतो अशा समुपदेशनाला ऑनलाइन समुपदेशन असे म्हणतात.

ऑनलाइन समुपदेशन खालील विषय संदर्भात उपयुक्त ठरू शकते

१) नातेसंबंध	२) व्यक्तिमत्त्व विकास
३) जीवनशैली घटना	४) व्यवसाय निवड
५) मानसिक स्वास्थ्य	६) वर्तनसमस्या
७) दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी	८) इतर समस्या

समुपदेशन करताना पूरक माहिती व स्रोत :

- समुपदेशकाचे नेटवर्क/जाळे (राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील)
- डॉक्युमेंटेशन माहितीचे संकलन करणे. यशोगाथांच्या मालिका प्रकाशित करणे.
- प्रसारमाध्यमे, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधींना समुपदेशन केंद्राची माहिती देणे, प्रक्रिया सांगणे.

समुपदेशकाने घ्यावयाची काळजी :

- व्यवस्थेतील आव्हाने व जमेच्या बाजू यांबाबत नियमित स्वरूपात व्यवस्थेशी संवाद साधणे.
- स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या विविध क्षेत्रांतील समुपदेशकाशी संवाद, समन्वय साधणे, जाळे तयार करणे.
- समुपदेशन कक्ष सर्वार्थाने अद्ययावत करणे किंवा ठेवणे.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- ऑनलाइन, ऑफलाइन, हायब्रीड समुपदेशनाची व्यवस्था कक्षामध्ये असणे.
- स्थानिक अथवा जिल्हा पातळीवरील विविध व्यवसायांच्या संबंधित माहिती कक्षामध्ये असणे तसेच समुपदेशकाकडे असायला हवे.

सल्ला	मार्गदर्शन	समुपदेशन
एखाद्या व्यक्तीने काय करावे आणि काय करू नये याविषयी व्यक्त केलेले मत	निरीक्षणात्मक प्रतिक्रियात्मक तथा प्रत्यक्ष मागणीनुसार केले जाते. मात्र अनुधावन केले जात नाही.	निरीक्षणात्मक, प्रतिक्रियात्मक तथा प्रत्यक्ष मागणीनुसार केले जाते. पूर्णपणे अनुधावन केले जाते. समज, कुवत व सकारात्मक प्रतिक्रियांच्या आधारावर.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शन व समुपदेशनातील पालकांची भूमिका :

- आपल्या दिव्यांग मुलाचा आहे तसा स्वीकार करावा.
- आपल्या मुलाच्या योग्य त्या सर्व गरजा कशा पूर्ण करता येतील हे पाहावे.
- मुलाचे अति लाड करू नये तसेच मुलाकडे दुर्लक्ष न करता मुलाच्या आरोग्य याकडे विशेष लक्ष द्यावे.
- मुलाला भावनिकदृष्ट्या सुरक्षितता द्यावी.
- मुलांवर लहान-लहान कामे सोपवावीत.
- घरांमध्ये प्रेमळ व सहकार्याचे वातावरण ठेवावे.
- आपल्या मुलाचे शिक्षक, विशेष शिक्षक, शाळा, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सतत संपर्कात राहावे.

- आपल्या मुलाला मिळालेल्या साहित्याचा वापर नियमित करावा.
- स्वतःच्या इच्छा, अपेक्षा मुलांवर लादू नये.
- दिव्यांग मूल व त्याची इतर भावंडे किंवा सामान्य मूल यात भेदभाव करू नये.
- आपल्या मुलाच्या बाबतीत डॉक्टर, मानसोपचार तज्ज्ञ किंवा इतर तज्ज्ञांची मदत घ्यावी.
- पालकांनी स्वतः मानसिकदृष्ट्या सक्षम रहावे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजन व समुपदेशन याबाबतीत वर्गशिक्षकांची भूमिका :

- 'दिव्यांग मूलही शिकू शकते' याचा स्वीकार करावा.

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- दिव्यांग विद्यार्थ्यांला येणारी शैक्षणिक आव्हाने समजून घ्यावी.
- या विद्यार्थ्यांना समान संधी द्यावी.
- विद्यार्थ्याच्या गरजेनुसार बैठकव्यवस्था करावी.
- असमायोजित वर्तन असलेल्या विद्यार्थ्यांना ओळखून त्यांना समुपदेशन सेवा उपलब्ध करून द्यावी.
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला वाव व प्रेरणा द्यावी.

- अध्यापन करताना विविध अध्यापन पद्धती व तंत्रे यांचा वापर करावा.
- दिव्यांग मुलाने साहित्याचा वापर केला की नाही पाहावे जसे की, कर्णबधिर विद्यार्थ्याने श्रवणयंत्र कानात घातले की नाही ते पाहावे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजन, मार्गदर्शन व समुपदेशनातील विशेष शिक्षकांची भूमिका :

- दिव्यांग मुलाची नोंद घेऊन त्याला जवळच्या शाळेत प्रवेश निश्चित करावा.
- त्याच्या शाळेतील वातावरण अनुकूलित कसे ठेवता येईल याविषयी वर्गशिक्षक, मुख्याध्यापक, SMC सदस्य यांच्याशी चर्चा करावी व गरजेनुसार साहाय्य करावे.
- विद्यार्थांच्या गंभीर समस्येविषयी बहुतज्ज्ञांच्या समन्वयाने निराकरण करणे.
- दिव्यांग विद्यार्थी वैयक्तिक शैक्षणिक आराखडा तयार करताना पालक, शिक्षक यांचे मार्गदर्शन व समुपदेशन करणे.



- दिव्यांग मुलांचा अभ्यासक्रमात बदल करणेसाठी वर्गशिक्षक यांना मार्गदर्शन करणे.
- दिव्यांग मुलांची सद्यःस्थिती, पूर्वस्थिती मूल्यमापन करत असताना वर्गशिक्षक यांना मार्गदर्शन करणे.

❖❖❖

Runa Graphics:Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१४. व्यवसायाभिमुख शिक्षण

प्रस्तावना :

Rights of Persons with Disabilities (RPWD) Act, 2016 या नवीन कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये देशाच्या प्रत्येक राज्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध व्हावे, समाजातील दुर्बल, दुर्लक्षित दिव्यांगांच्या जीवनातील अंधःकार दूर करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे हे उद्‌दिष्ट प्रामुख्याने ठेवण्यात आले. या कायद्यामध्ये दिव्यांग व्यक्तीच्या हिताच्या अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच या कायद्यामध्ये दिव्यांग व्यक्तीचा मानसन्मान राखून या कायद्याचा लाभ घेऊन दिव्यांग व्यक्तीचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याची काळजी घेण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरिता आर्थिक साहाय्य उपलब्ध व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ मार्च, २००२ रोजी 'महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची' स्थापना केली आहे. असे मंडळ स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

शिक्षणाचे महत्त्वाचे उद्‌दिष्ट म्हणजे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे मानसिक, व्यावसायिक पुनर्वसन हे महत्त्वपूर्ण ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षणात विविध कलांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रारंभिक अवस्थेत पूर्वप्राथमिक स्तरावर इंद्रिय शिक्षणाद्‌वारे ज्ञानेंद्रियांचा जास्तीत जास्त विकास करून दिव्यांगत्वावर मात करून विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांचा किमान मर्यादेपर्यंत बौद्‌धिक विकास करण्याची संधी मुलांना विशेष शिक्षक व वर्ग शिक्षकांमार्फत प्राप्त करून देण्यात येते. समग्र शिक्षा समावेशित शिक्षण अंतर्गत सर्व शाळांमधून व्यावसायिक पुनर्वसनाची पूर्वतयारी म्हणून व्यवसायास आवश्यक अशी व्यवसाय पूर्वकौशल्ये दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी, त्यासाठी विविध व्यवसायांची, कलांची विद्यार्थ्यांना बाल अवस्थेपासून ओळख करून देण्यात येते.

आधुनिक शिक्षणपद्‌धतीमध्ये आमूलाग्र बदल झालेला आपल्याला दिसून येतो. याचाच परिणाम की आज दिव्यांग मुले सर्वसामान्य मुलांबरोबर शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील झालेली दिसतात. या मुलांना शासनाने शिक्षणासाठी विविध मार्ग खुले केलेले आहेत. या शिक्षणप्रवाहात बरीच मुले दिव्यांगत्वावर मात करून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण घेत असलेली दिसून येतात, तसेच बऱ्याच शासकीय/अशासकीय कार्यालयात कर्मचारी तसेच अधिकारी वर्ग या पदावर काम करताना दिसतात. त्याचबरोबर बरेच दिव्यांग बांधव उद्‌योगक्षेत्रात पुढे गेलेलेही दिसून येतात.

शासनाच्या या विविध योजनांअंतर्गत दहावी अथवा बारावी पास/नापास मुलामुलींसाठी व्यावसायिक कौशल्य विकास व उद्‌योजकता विभाग प्रशिक्षण संस्थांमध्ये व औद्‌योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये इतर सर्वसामान्य मुलांसोबत दिव्यांग बालकांना व्यवसाय शिक्षणामध्ये दाखल करून घेण्यासाठी शासनाने ५% आरक्षण दिले

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

आहे. तसेच जी मुले आर्थिक व इतर कारणांमुळे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर झाली आहेत. अशा मुलांना उदरनिर्वाह किंवा स्वयंरोजगाराच्या संधी या शासनाच्या विविध योजनांमधून देण्यात आलेल्या आहेत. जसे उच्च व तांत्रिक शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती देणे, केंद्रशासनाचा लोकसेवा आयोग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी पूर्वतयारी करता शासकीय स्पर्धापरीक्षा केंद्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम देणे, दिव्यांग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थसाहाय्य देणे, दिव्यांगांच्या अर्थसाहाय्यता गटांना अनुदान देणे, दिव्यांग उद्योजकता व कौशल्य विकास प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे, दिव्यांग व्यक्तींकरिता क्रीडा प्रबोधिनी स्थापन करणे व क्रीडा संचलनालयाच्या मान्यतेने क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे, दिव्यांग व्यक्तींना साहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसाहाय्य देणे.

गरज, महत्त्व व उद्देश :

सर्वसामान्यपणे व्यक्तीला जीवन जगताना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी पैशाची आवश्यकता असते व हा पैसा कमावण्यासाठी व्यक्तीला रोजगाराची आवश्यकता असते म्हणून दिव्यांग व्यक्तीला सुद्धा स्वावलंबी जीवन जगण्यासाठी रोजगार आवश्यक आहे. या रोजगाराच्या संधी मिळून देण्यासाठी शाळा स्तरावर व्यवसाय पूर्वकौशल्य शिकवण्याची सुरुवात करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना भविष्यात व्यवसायाच्या/रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

समाजातील सर्व दिव्यांग व्यक्तींकडे त्यांच्या दिव्यांगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्यांच्यामधील असलेले सुप्त सामर्थ्य विकसित करून समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय तसेच इतर विविध विभागामार्फत कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षिततेसाठी दिव्यांग व्यक्तींना काही क्षेत्राम ध्ये आरक्षण, सवलती, सूट तसेच प्राधान्य देण्यात आलेले आहे. या सर्वांचे उद्देश दिव्यांग व्यक्तींना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे हा आहे.

व्यवसाय शिक्षणाची महाराष्ट्रातील सद्य:स्थिती :

राज्यातील एकूण ४१७ शासकीय व ५३८ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून एकूण ७९ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यात अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीचे २३ व्यवसाय अभ्यासक्रम दोन वर्षे कालावधीचे एकूण ३२ व्यवसाय अभ्यासक्रम तसेच अभियांत्रिकी गटात एक वर्ष कृषी, बाजार, उद्योग इत्यादी क्षेत्रातील प्रगतीसाठी व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाच्या मिश्र शिक्षणपद्धती माध्यमिक शाळांत तसेच महाविद्यालयीन दर्जाच्या शिक्षणसंस्थात दिले जात आहे. हे प्रशिक्षण सर्वसामान्य शिक्षणापेक्षा वेगळे असते. नोकरी मिळविण्यासाठी किंवा व्यवसायात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता या व्यवसाय शिक्षणाद्वारे संपादन करता येते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

समग्र शिक्षा अभियानांतर्गत सुरू असलेले व्यवसाय विषय :

दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता व्यवसाय शिक्षण योजना राबविण्यास सुरू करण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ रोजी व्यवसाय शिक्षण उपक्रम इयत्ता नववी ते बारावी या वर्गासाठी आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणअंतर्गत आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाकडून केंद्र शासनाच्या धोरणानुसार व राज्य सरकारच्या परवानगीने राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये एकूण ८४४ शाळांमध्ये व्यवसाय शिक्षण उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात National Skill Development Corporation (NSDC) करिता नवी दिल्ली यांच्या नोंदणीकृत १७ व्यवसाय प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. सदर व्यवसाय प्रशिक्षण संस्थांना त्यांच्याकडे वेगवेगळ्या सेक्टरच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मुलांमध्ये व्यवसाय शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व त्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी तसेच व्यवसाय शिक्षणाचा व्यापक प्रसार होण्याच्या दृष्टीने व्यवसाय प्रशिक्षण व व्यवसाय समन्वयक यांची नियुक्ती करण्याची तरतूद करारामध्ये आहे. व्यवसाय शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या व १८ वर्षे पूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित संस्थांतून कौशल्य प्रशिक्षण व त्यानंतर रोजगाराच्या संधी मिळवून देणे. ग्रामीण भागातील युवकांना नवनवीन संधींच्या माध्यमातून दहावी बारावीनंतर आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत करणे हे मुख्य उद्‌दिष्ट आहे.

१) Internship - हा एक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा घटक आहे. इयत्ता नववी ते बारावीकरिता स्थानिक स्तरावर शाळा मुख्याध्यापक आणि व्यवसाय प्रशिक्षक यांनी विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठी संबंधित क्षेत्रातील उद्योजकांशी बोलनी करून प्रत्येक विद्यार्थ्यांना वार्षिक ८० तासांचे व्यवसायभिमुख प्रशिक्षण (Internship) देणे गरजेचे आहे.

२) अतिथी व्याख्यान (Guest Lecturer) : व्यवसाय शिक्षण हा विषय शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञानाबरोबर संबंधित क्षेत्रामधील तज्ज्ञ व्यक्तींमार्फत मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. याकरिता महिन्यातून १ अतिथी व्याख्यान घेणे गरजेचे आहे. यासाठी अनुभवी तज्ज्ञ व्यक्ती शोधण्याची जबाबदारी ही विशेष शिक्षक यांची असेल.

३) करिअर मेळावा : व्यवसाय विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी (Vertical Mobality) ची संधी प्राप्त करून देणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे त्यासाठी शाळांमध्ये करिअर मेळाव्याचे आयोजन करणे इ. दहावी व बारावी नंतर विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याकरिता शाळेच्या परिसरामधील Govt. ITI, Pollytechnic Collages Jr. Collages यांच्या प्रतिनिधींना शाळेमध्ये आमंत्रित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

४) विद्यार्थ्यांचे मूल्यमापन इयत्ता नववी ते अकरावीमधील व्यवसाय विषय शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे शाळा स्तरावर करण्यात येईल व इयत्ता दहावी व इयत्ता बारावीमधील विद्यार्थ्यांचे

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

मूल्यमापन हे संबंधित Sector Skill Council सेक्टर स्किल काऊंसिल यांच्या मार्फत करण्यात येईल.

Scheme of Examination : For 9th to 12th

Sr. No.	Method of Assessment	Weight age of Marks	Evaluator
1)	Theory Paper (Written)	30 Marks (80 marks converted into 30 marks)	School/State Board
2)	Practical Exam	30 Marks	Certified Assessor State Board
3)	Term Work Journal	10 Marks	School Instructer Trainer
4)	Project Work	10 Marks	School Instructer Trainer
5)	Oral/Via-Voce	10 Marks	School Instructer Trainer
6)	Direct observation	10 Marks	School Instructer Trainer
	Total	100 Marks	School Instructer Trainer

व्यावसायिक विषय अभ्यासक्रम :

सर्व व्यवसाय विषयांच्या अभ्यासक्रम हा पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल व इन्स्टिट्यूट फॉर व्होकेशनल एज्युकेशन, भोपाल (PSSCIVE) या संस्थेने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे असते तसेच या शाळामध्ये व्यवसाय प्रयोगशाळा उभारण्याची तसेच National Skill Development Council (NSDC) च्या सहकार्याने व्यवसाय विषय निर्देशक (Trainers) नियुक्ती करण्यात येतात.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत सुरू असलेले व्यवसायाचे विषय :

Sr. No.	Trade Sector	9th and10th Job Role	11th and 12th Job Role
1)	Multi Skills	Multi Skills Assistant Technology/Introduction to Basics Technology	Multi skill Technician Electrical II - Multi skill Technician Food Processing
2)	Agriculture	Agriculture-Solaraceous Crop Cultivator	Agriculture Micro irrigation Technology
3)	Apparel	Apparels - Sewing Machine Operator	-
4)	Automotive	Automotive Service Technician	Automotive Service Technician
5)	Beauty and Wellness	Assistant Beauty Therapist	Beauty Therapist

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

Sr. No.	Trade Sector	9th and10th Job Role	11th and 12th Job Role
6)	Electronics	Electronics and Hardware Field Technician-other Home Appliances	Electronics Field Technician Wireman Control Panal
7)	Health Care	Health Care Home Health Aide	Health Care General Duty Assistant
8)	Plumber General	Plumber General	Plumber Gerneral II
9)	Power	Consumer Energy Meter Technician	Power Distribution Lineman
10)	Retail	Store Operations Assistant	Retail Sales Associate
11)	Sport	Physical Education and sports	Physical Education and Sports Fitness Trainer
12)	Tourism and Hospitality	Food and Beverage Service Trainee	Customer Service Executive (Meet and Greet)
13)	IT/ITCS	Domestic Data Entry Operator	-
14)	Banking Financial Services and Insurance	Banking Financial Services and Insurance Microfinance Executive	-

वरील नमूद समग्रशिक्षा अभियानांतर्गत सुरू असलेले सर्व व्यवसाय शिक्षण हे दिव्यांग विद्यार्थ्यांना सुद्धा घेता येतील.

व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम घेऊन इयत्ता दहावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे लाभ मिळतील.

१) शासकीय/अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये २५ टक्के आरक्षण.

२) शासकीय/अशासकीय तंत्रनिकेतनामध्ये १५ टक्के आरक्षण.

३) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये २५ टक्के आरक्षण.

४) द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये २५ टक्के आरक्षण.
(NVEQE/NSQF सुधारित स्तरामध्ये)

संबंधित महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ अभ्यासक्रमाची परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाकडून अतिरिक्त प्रमाणपत्र देण्यात येते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

दिव्यांग असलेल्या उमेदवारांकरिता आरक्षण :

१.१ : The Rights of Persons with Disabilities Act, 2016 (No. 49 of 2016) तरतुदीनुसार केंद्रीय प्रवेश पद्धती अंतर्गत उपलब्ध जागांच्या ५% जागा प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दिव्यांग उमेद्वार आरक्षित असतील.

१.२ : खाली दिलेल्या प्रकाराप्रमाणे हे आरक्षण दिव्यांग उमेदवारांना लागू होईल.

अ.क्र.	दिव्यांग कोड	दिव्यांग प्रवर्ग
१)	PWD-1	Blindness and low vision.
२)	PWD-2	Deaf and hard of hearing.
३)	PWD-3	Loco-motor disability including cerebral palsy, leprosy cured, dwarfism, acid attack victims and muscular dystrophy.
४)	PWD-4	Autism, intellectual disability, specific learning disability and mental illness.
५)	PWD-5	Multiple disabilities from amongst under clauses.

विविध क्षेत्रांत शिक्षण घेतलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना उपलब्ध रोजगाराच्या संधीचे विविध क्षेत्र –

क्षेत्र	निवडलेले व्यवसाय	रोजगाराच्या संधी/क्षेत्र
ITI प्रशिक्षण केंद्र, शासकिय तंत्रनिकेतन व इतर व्यावसायिक प्रशिक्षण संस्था तसेच कला, वाणिज्य, विज्ञान विभाग, पदवीधर, विधी विभाग, औषध निर्माण, अभियांत्रिकी विभाग इत्यादी.	उदा. टेलिफोन ऑपरेटर, संगणक विभाग, बेसिक तारतंत्री, ड्रेस मेकिंग, मेकॅनिक – ऑटो बॉडी पेंटींग, रिपेअर, ॲग्रीकल्चरल मशिनरी, Fitter, Machinist Fitter, Machinist steel metal worker, Turner, Welder, Carpenter, Mason, Painter, Interior Design, संगीत, गायन, नृत्य इत्यादी.	**सरकारी नोकरी :** आयटीआय, शासकीय तंत्रनिकेतन व इतर व्यावसायिक प्रशिक्षण संस्था तसेच कला, वाणिज्य, विज्ञान विभाग, पदवीधर, विधी विभाग, औषध निर्माण, अभियांत्रिकी विभाग इत्यादी. या विभागात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक क्षेत्रात किंवा सरकारी एजन्सीमध्ये करिअर करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या हा एक उत्तम पर्याय आहे. तसेच रेल्वे, दूरसंचार/BSNL, IOCL, ONCG, राज्यवार PWD सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्समध्ये नोकरी शोधू शकतात, तर सरकारी क्षेत्रात ते भारतीय सशस्त्र दलात म्हणजे भारतीय नौदल, भारतीय सैन्यात नोकरी शोधू शकतात. हवाई दल, सीमा सुरक्षा दल (BSF), केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) आणि इतर निमलष्करी दल इत्यादींमध्ये नोकऱ्या मिळू शकतात. **खासगी क्षेत्रातील नोकऱ्या :** आयटीआय, शासकीय तंत्रनिकेतन व इतर व्यावसायिक प्रशिक्षण संस्था तसेच कला, वाणिज्य, विज्ञान विभाग, पदवीधर, विधी विभाग, औषधनिर्माण, अभियांत्रिकी विभाग इत्यादी. या विभागात

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

क्षेत्र	निवडलेले व्यवसाय	रोजगाराच्या संधी/क्षेत्र
		शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी मिळतात. खाजगी क्षेत्रांतर्गत ज्या मुख्य क्षेत्रांमध्ये आयटीआय विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतात, त्यात बांधकाम, कृषी, वस्त्र, ऊर्जा आणि काही विशिष्ट नोकरी प्रोफाइल जसे की, इलेक्ट्रॉनिक्स, वेल्डिंग रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनर मेकॅनिक यांचा समावेश होतो. **स्वयं-रोजगार :** या विद्यार्थ्यांसाठी स्वयंरोजगार हा कदाचित सर्वोत्तम पर्याय आहे कारण आयटीआयमधील व इतर विभागातील प्रात्यक्षिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा स्वयंरोजगार मिळविण्याचे प्रशिक्षणही देते. **परदेशात नोकऱ्या :** या विद्यार्थ्यांना परदेशात नोकरी करता येते. आंतरराष्ट्रीय तेल आणि वायू कारखाने आणि शिपयार्ड इत्यादींमध्ये माल वाहतूक इत्यादींसारख्या विशिष्ट व्यवसायांसाठी नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत.

दिव्यांगासाठीच्या रोजगाराच्या दृष्टीने वैयक्तिक लाभाच्या योजना –

अ. क्र.	योजना	स्वरूप	विभाग
१)	दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल	१८ ते ५० वयोगटातील दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी, स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना कार्यान्वित केली आहे. दिव्यांग व्यक्तींना स्वतःचा व्यवसाय, धंदा, उद्योग, शेतीपूरक उद्योग सुरू करण्यासाठी शासनाकडून रु. ३०,०००/- पर्यंत मर्यादेच्या स्वरूपात व प्रकल्प खर्चाच्या २० टक्के अनुदान बीज भांडवल स्वरूपात देण्यात येते. उर्वरित ८० टक्के भाग बँकेकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध होतो. या योजनेअंतर्गत १,५०,०००/- कर्ज मिळू शकते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ. २) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	योजना	स्वरूप	विभाग
२)	वैयक्तिक थेट कर्ज योजना	कमी भांडवलात व्यवसाय करणे शक्य व्हावे, हा या योजनेचा हेतू आहे. या योजनेअंतर्गत २ टक्के व्याज दराने २० हजारांपर्यंत रक्कम मिळते. हे कर्ज व्याजासहित मासिक/त्रैमासिक अशा समान हप्त्यात तीन वर्षांत परत करायची असते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ.
३)	छोट्या उद्योगास कर्ज	राष्ट्रीय विकलांग वित्त एवम् विकास निगम योजने अंतर्गत व्यापार व खरेदी विक्रीविषयक व्यवसायासाठी एक लाख तर सेवाविषयक योजनेसाठी ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. ज्यासाठी कर्ज घेतले आहे, त्याच उद्देशासाठी त्याचा विनीयोग करणे आवश्यक आहे तसेच संबंधित व्यवसाय हा दिव्यांग व्यक्तीने चालवायला हवा.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ.
४)	दिव्यांग शेतकऱ्यांसाठी कृषी संजीवनी/ हॉर्टीकल्चर योजना	या अंतर्गत शेती उत्पादन, सिंचन योजना, फळबाग, रेशीम उत्पादन, शेतीसाठीची यंत्रसामग्री अवजारे खरेदी, विहीर खोदणे, बी-बियाणे, दुकान, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, डुक्करपालन, शेती-मेंढीपालन, पशुखाद्य दुकान, शेतीमालासाठी बाजारपेठ मिळविण्यासाठी ५ लाखापर्यंत कर्ज मिळू शकते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ.
५)	वाहतुक व्यवसायासाठी वाहन खरेदी स्वरूप	या योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते. ऑटोरिक्षासहित इतर वाहने या योजनेअंतर्गत खरेदी करता येऊ शकतात.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ.
६)	लघुउद्योगासाठी कर्ज	लघुउद्योगासाठी ३ लाखापर्यंत कर्ज मिळते. उद्योगातून साधननिर्मिती, फॅब्रिकेशन आणि उत्पादन करणे आवश्यक असून त्यासाठी अर्जदार दिव्यांग व्यक्ती ही त्या उद्योगाचा मालक अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी असणे आवश्यक आहे.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ.
७)	मनोरुग्णांच्या लाभासाठी कर्ज योजना	या योजनेअंतर्गत ५ लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. मनोरुग्णाच्या उत्पन्न मिळविणाच्या साधनांसाठी पालकसंघटनेला अर्थसाहाय्य	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	योजना	स्वरूप	विभाग
		केले जाते. मात्र उत्पन्न मिळविण्याच्या प्रक्रियेत मनोरुग्ण व्यक्तीचा सहभाग असणे आवश्यक आहे. मिळणाऱ्या उत्पन्नात त्यांनाही सहभागी करून घेणे गरजेचे आहे.	
८)	दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार मेळावे	शासकीय धोरणानुसार ३ टक्के आरक्षणाचा लाभ दिव्यांगांना शासकीय नोकऱ्यांमध्ये मिळवून देण्याचा प्रयत्न असतोच, पण खाजगी क्षेत्रात आजही दिव्यांगांना नोकरीच्या संधी तितक्या सहजपणे उपलब्ध होताना दिसत नाहीत व त्यांनाही या क्षेत्रात भरपूर संधी मिळवून देऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते.	१) केंद्रशासन, राज्यशासन व जिल्हा परिषद
९)	प्रशिक्षित दिव्यांगांना व्यवसायासाठी अर्थ साहाय्य	शासकीय तसेच शासनमान्य संस्थेमधून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १८ ते ५० वयोगटातील दिव्यांग व्यक्तीस प्रशिक्षण पूर्ण केलेला व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या साधनांकरिता रु. १,०००/- अर्थसाहाय्य देण्यात येते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ. २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१०)	महिला समृद्धी योजना	अपंग महिलांना राष्ट्रीय महामंडळाच्या सर्व योजनांमध्ये महिला समृद्धी योजनेअंतर्गत व्याजदरामध्ये १ टक्के सूट दिली जाते. कर्ज मंजुरी प्रक्रियेत महिलांना प्रथम प्राधान्य दिले जाते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ. २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
११)	सूक्ष्म पतपुरवठा योजना	नोंदणीकृत अशासकीय संस्थामार्फत स्वयंसाहाय्यता बचत गटांस कर्जपुरवठा करण्यासाठी संस्थेला रुपये ५ लाखांपर्यंत कर्ज, नोंदणीकृत संस्थेला सभासदांसाठी थेट कर्ज. संस्था बचत गटातील जास्तीत जास्त रुपये २५,०००/- पर्यंत कर्ज देऊ शकते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ. २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

अ. क्र.	योजना	स्वरूप	विभाग
१२)	अपंगांमधील प्रावीण्यता/कौशल्य तथा उद्योजकता विकसित करण्यासाठी कर्जयोजना	अपंगांमधील प्रावीण्य/कौशल्य तथा उद्योजकता विकसित करण्यासाठी विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्याची योजना प्राधिकृत वाहिन्यांद्वारे राबविण्यात येते.	१) महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ. २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१३)	राष्ट्रीय व राज्य पुरस्कार योजना	अपंग व्यक्तीची क्षमता वाढविणे व जास्तीत जास्त अपंग व्यक्तींना नोकरी उपलब्ध होण्यासाठी कारखानदार, मालक, अधिकारी यांना प्रोत्साहित करण्यासाठी राज्यपुरस्कार प्रदान करण्यात येतो.	१) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१४)	संजय गांधी अनुदान योजना	या योजनेअंतर्गत ६५ वर्षांखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, अपंगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यांसारख्या आजारामुळे स्वतःचा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा (आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवासह), घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षांवरील अविवाहीत स्त्रिया, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो.	१) जिल्हा परिषद, तहसील कार्यालय

व्यावसायिक प्रशिक्षणात विशेष शिक्षकांची भूमिका :

१) विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचा शोध घेणे व त्यास प्रोत्साहन देणे.

२) विद्यार्थ्यांची व्यावसायिक पार्श्वभूमी माहिती करून घेणे व त्याप्रमाणे वैयक्तिक शैक्षणिक आराखड्यामध्ये ध्येय निवडणे.

३) पालकांना व्यवसाय शिक्षणाबद्दल मार्गदर्शन करणे.

४) परिसरातील विविध व्यवसायांची माहिती घेणे.

५) वेळोवेळी आपल्या केंद्रांमध्ये व्यावसायिक मार्गदर्शनाची शिबिरे किंवा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करणे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

६) राज्य, जिल्हा, तालुका, स्थानिक परिसर येथे उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी शोधणे व त्यांची माहिती विद्यार्थी व पालक यांना देणे.

७) शासकीय योजना, विविध व्यावसायिक संस्था यातील आरक्षण यांची माहिती वेळोवेळी पालक, शिक्षक, विद्यार्थी यांना देणे.

८) स्थानिक व्यवसायांची माहिती घेऊन रोजगारांच्या संधी शोधणे.

९) भौगोलिक परिस्थितीनुसार प्रचलित व्यवसायांची माहिती पालक व शिक्षक यांना देणे.

व्यावसायाभिमुख शिक्षण या विभागांतर्गत सामान्य विद्यार्थ्यांसोबत दिव्यांग विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी सोयीसुविधा आणि संधी निर्माण केल्या आहेत. शालेय शिक्षण व तंत्रशिक्षण यांच्या विषयांची जोड तयार करून अभ्यासक्रम/पाठ्यक्रम निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये संबंधित तंत्रशिक्षण विभागाने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विचार केला आहे. त्याचा परिणाम दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता, आवड यांच्यासाठी क्षेत्रांची निवड करण्यात येते. व्यावसायिक शिक्षण विद्यार्थ्यास आवश्यक आधार सेवासुविधांद्वारा पूर्ण करू शकतो.

आवश्यक सेवासुविधा आणि भविष्यातील संधी याविषयी पालक सकारात्मक दृष्टीने सहभागी होतात. त्याचा परिणाम पालकांची अनावश्यक भीती राहत नाही. त्यासोबत भविष्यासाठी शासकीय ध्येयधोरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना पूरक होतात. त्याद्वारे दिव्यांग व्यक्ती सामान्य नागरिक म्हणून जीवनास सामोरे जाण्याचे सामर्थ्य स्वतःमध्ये निर्माण करतो.

❖❖❖

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१५. विशेष गरजाधारक अध्ययनार्थींच्या शिक्षणामध्ये सहभागी यंत्रणेची भूमिका

विशेष गरजाधारक अध्ययनार्थींना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये टिकवून ठेवण्यामध्ये सर्व सहभागी यंत्रणेची भूमिका महत्त्वाची ठरते.

❖ **वर्गशिक्षकांची भूमिका :**

- विद्यार्थ्यांचा दिव्यांग प्रकार व त्याच्या अध्ययनशैलीची ओळख करून देणे.
- अध्ययनशैलीनुसार मूलनिहाय कृतिआराखडा तयार करणे.
- दैनंदिन अध्यापनात सर्वसमावेशक वातावरण निर्माण करणे आणि दिव्यांग बालकांच्या शिक्षणाच्या बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे.
- आकारिक व संकलित मूल्यमापन करताना विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अनुकूलित प्रश्नपत्रिका तयार करून मूल्यमापन करणे. (शैलीनुसार अनुकूलित प्रश्नपत्रिका नमुने मूल्यमापन या घटकात देण्यात आले आहेत.) दैनंदिन उपस्थिती शंभर टक्के राहण्यासाठी प्रयत्न करून विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे.
- विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक, मूल्यमापनविषयक व इतर बाबतीत येणाऱ्या अडचणींसंदर्भात आवश्यक तेथे विशेष शिक्षकांची मदत घेणे.

❖ **विशेष शिक्षकांची भूमिका :**

- कार्यक्षेत्रातील दिव्यांग बालकांचा शोध घेणे, अंगणवाडी, शाळा व महाविद्यालयात प्रवेशित करणे आवश्यक.
- पूर्वतपासणी साहित्य साधनांची शिफारस करणे.
- वैद्यकीय व शैक्षणिक, कार्यात्मक मूल्यमापन करण्यास साहाय्य करणे.
- कार्यक्षेत्रातील शैक्षणिक दृष्टिकोनातून दिव्यांग विद्यार्थ्यांची वर्गवारी करणे. (Classroom Support, Inclusive Support, Home Base Education).
- कार्यक्षेत्रातील विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांचा वैयक्तिक आराखडा तयार करणे.
- आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम सुलभीकरण करण्यास वर्गशिक्षकांना मदत करणे.
- विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीनुसार शैक्षणिक साहित्य (TLM) निर्मितीसाठी वर्गशिक्षकांना साहाय्य करणे. शैक्षणिक साहित्याचा वापर करण्यास शिक्षकांना सांगणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- शाळा भेटीदरम्यान दिव्यांग बालकांना येणारी शैक्षणिक आव्हाने समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे.
- अडथळाविरहित शैक्षणिक प्रक्रियेसाठी पालक, भावंडे, संवगडी तथा समाजातील संबंधित घटकांचे समुपदेशन करणे.
- बालकांच्या क्षमतेनुसार व्यवसायपूर्व/व्यावसायिक शिक्षणाबाबत संधी उपलब्ध करून देणे.
- कार्यक्षेत्रातील गृह मार्गदर्शनाची गरज असणाऱ्या विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांचे नियमित गृहभेटीचे वेळापत्रक तयार करणे.
- NAS, SLAS पायाभूत चाचण्या, संकलित चाचण्या, प्रश्नपत्रिका अनुकूलन व मूल्यमापनाच्या बाबतीत वर्गशिक्षकांना साहाय्य करणे.
- केंद्रस्तरीय संसाधन कक्ष अद्ययावत ठेवणे. संसाधन कक्षात उपस्थित पालक व विद्यार्थी यांच्या नोंदी जतन करून ठेवणे.
- अंगणवाडीताई, पालक, भावंडे, वर्गशिक्षक, पर्यवेक्षीय यंत्रणा, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
- शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये उपस्थित राहून दिव्यांग बालकाशी संबंधित प्रश्न मांडणे व आवश्यक माहिती पुरविणे.
- शालेय आरोग्य तपासणीमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत तज्ज्ञांशी समन्वय ठेवून कार्यक्षेत्रातील शंभर टक्के मुलांची आरोग्य तपासणी करून घेऊन त्यांना आवश्यक संदर्भीय सेवा मिळवून देण्यासाठी मुख्याध्यापक यांना साहाय्य करणे.
- कार्यक्षेत्रातील शंभर टक्के मुलांचे दिव्यांग प्रमाणपत्र व UDID (Unique Disability ID) काढण्यासाठी पालकांना आवश्यक साहाय्य करणे.
- वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक यामध्ये सहभाग घेऊन आवश्यक माहिती देणे व स्थानिक पातळीवरील अडचणींवर उपाययोजना सुचविणे. कार्यक्षेत्रातील शीघ्र हस्तक्षेपाची गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय व शैक्षणिक सेवा मिळवून देणे.
- CRG सदस्य या नात्याने सर्व बैठकीत उपस्थित राहून कार्यक्षेत्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांची आव्हाने व त्यावरील उपाययोजना सुचविणे.
- समावेशित शिक्षणांतर्गत अंमलबजावणीबाबत परिपत्रक, शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना, संदर्भीय पुस्तके याबाबत अद्ययावत राहणे व माहिती जतन करून ठेवणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

❖ मुख्याध्यापक यांची भूमिका :

- कार्यक्षेत्रातील शंभर टक्के दिव्यांग विद्यार्थ्यांची नोंद घेऊन त्यांना प्रवेशित करणे.
- शाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी पूर्ण करून घेणे.
- आवश्यकतेनुसार संदर्भीय सेवा व साहित्य साधने उपलब्ध करून देणे.
- शाळा परिसरात अडथळाविरहित व सुरक्षित वातावरण निर्मिती करणे.
- शालेय उपक्रम व शालेय परिसर यामध्ये समतामूलक वातावरणाची निर्मिती करणे व सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देणे.
- १६ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार विविध परीक्षांमध्ये सवलत उपलब्ध करून देणे.
- एसएससी व एचएससीचे फॉर्म भरते वेळी योग्य त्या सवलती उपलब्ध करून देणे.
- विविध विभागांमार्फत विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या लाभाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविणे.

❖ विषय साधनव्यक्ती यांची भूमिका :

- कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये भेटीदरम्यान दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक व वैद्यकीय साहाय्यभूत सेवा मिळाल्याबाबत खात्री करावी. सदर नोंदी अभिलेखावर करून त्याची माहिती वरिष्ठ कार्यालयास व विशेषतज्ज्ञ व विशेष शिक्षकांना अवगत करावी. जेणेकरून सदर विद्यार्थ्यांना आवश्यक साहाय्य उपलब्ध करून देता येईल.
- वर्गशिक्षकांना वर्गअध्यापन करताना विषयाच्या अनुषंगाने कठीण संकल्पनाबाबत शैक्षणिक साहाय्य करावे, सर्वसमावेशक आदर्श पाठ घ्यावा.

❖ विशेषतज्ज्ञ/थेरपीस्ट यांची भूमिका :

- कार्यक्षेत्रातील दिव्यांग बालकांची सांख्यिकीय माहिती यादीसह अद्ययावत ठेवावी.
- संदर्भित सेवा-सुविधा शंभर टक्के विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी प्रयत्न करावेत.
- उपलब्ध सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करून त्याआधारे तालुक्याचा मासिक व वार्षिक कृती आराखडा तयार करावा.
- तालुका स्तरावर आरोग्य विभाग व महिला बालकल्याण विभाग यांच्याशी समन्वय साधून वैद्यकीय व साहाय्यभूत सेवा उपलब्ध करून घेणे.
- तालुका स्तरावर कार्यात्मक मूल्यमापन शिबिराचे नियोजन, आयोजन व व्यवस्थापन करावे.
- तालुकास्तरीय संसाधन कक्ष अद्ययावत ठेवणे व कक्षात उपस्थित पालक व विद्यार्थी यांच्या नोंदी जतन करून ठेवणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- आवश्यकतेनुसार व मागणीनुसार माहिती वरिष्ठांस व वरिष्ठ कार्यालयास विहित वेळेत सादर करणे.
- शाळा प्रवेश व सेवा सवलतीबाबत प्राप्त तक्रारी तात्काळ निकाली काढाव्यात व गरजेनुसार वरिष्ठ कार्यालयास कळविण्यात याव्यात.
- समावेशित शिक्षणाबाबत मार्गदर्शक सूचनेनुसार प्रशिक्षणाचे आयोजन, नियोजन व व्यवस्थापन करावे.
- विशेष शिक्षकांच्या साप्ताहिक, मासिक आढावा व सहविचार सभा घेऊन त्याचे इतिवृत्त जतन करून ठेवावे.
- विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांची माहिती यु-डायस प्रणालीमध्ये अद्ययावत झाल्याची पडताळणी करावी.
- गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रप्रमुख, केंद्रशाळेचा मुख्याध्यापक, विशेष शिक्षक यांच्या संयुक्त मासिक सहविचार सभा घ्याव्यात.
- १६ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार सेवा-सवलती विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.
- एका महिन्यात कार्यक्षेत्रातील किमान १५ शाळा भेटी कराव्यात.
- विविध भत्ते, पात्र लाभार्थी यांची यादी एकत्रित करणे, वरिष्ठ लेखालिपिक यांचेकडून PFMS प्रणालीवर व्हेंडर तयार करून लाभार्थ्यांना विहित कालावधीत भत्ते उपलब्ध झाल्याची खात्री करावी.
- प्राप्त साहित्य साधने, पुस्तके लाभार्थ्यांना पोहोच झाल्याची खात्री करावी.
- वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात मंजूर उपक्रमाची मार्गदर्शक सूचनेनुसार यशस्वी अंमलबजावणी करावी.
- दिव्यांग विद्यार्थ्यांशी संबंधित कृतिसंशोधन करावे.
- कार्यक्षेत्रातील थेरपीची आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती विशेष शिक्षकांकडून घ्यावी.
- MPRTC (Multipurpose Resource and Training Centre) सेंटरमध्ये उपस्थित राहून थेरेपी सेवा द्यावी.
- शीघ्र हस्तक्षेपाची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना मूल्यमापन करून थेरपीची सेवा द्यावी.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- घरच्या घरी करता येणाऱ्या थेरपीबाबत पालकांना मार्गदर्शन करावे.
- पालकांचे थेरपीबाबत उद्‌बोधन करावे.

❖ **पर्यवेक्षकीय यंत्रणेची भूमिका :**

- गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांनी विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांची दिव्यांग प्रकारानुसार अद्ययावत माहिती द्यावी.
- विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, शासकीय योजनांचे लाभ मिळवून द्यावे.
- समावेशित शिक्षणअंतर्गत विविध अनुदाने योग्य त्या पद्धतीने लाभार्थ्यांपर्यंत प्राप्त झाली किंवा नाही याची पडताळणी करणे.
- विविध स्पर्धापरीक्षा व उपक्रमांत दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी विशेष प्रयत्न करावेत.
- शाळा भेटीदरम्यान इतर बालकांसोबतच विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांबाबत अभिलेखे, शैक्षणिक व इतर आनुषंगिक बाबीची पडताळणी करावी.
- शाळा भेटीदरम्यान वर्गशिक्षकांना अध्ययन-अध्यापन व मूल्यामापनाबाबत येणारी आव्हाने दूर करणे.
- विशेष गरजाधारक विद्यार्थी शाळाबाह्य होऊ नये यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी.
- तालुकास्तरीय आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ बालकांस मिळेल यासाठी प्रयत्न व गरजेनुरूप पाठपुरावा करावा.

❖ **जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील 'समता' विभागामधील कार्यरत यंत्रणेची भूमिका.**

- जिल्ह्यातील शंभर टक्के मुलांची (CWSN सह) पटनोंदणी व उपस्थिती याकरिता शाळांमधील अध्ययनपूरक वातावरण निर्माण करावे.
- राज्य प्रशिक्षण धोरणानुसार वर्ग शिक्षकांना अध्ययन-अध्यापन तंत्र पद्धतींबाबत प्रशिक्षणाचे आयोजन करावे.
- अंगणवाडीताई, पालक, भावंडे यांच्यासाठी घटकसंच निर्मिती करून प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
- कार्यरत विशेष शिक्षक, विशेषतज्ज्ञ व पर्यवेक्षीय यंत्रणेसाठी घटकसंच निर्मिती करून प्रशिक्षणाचे आयोजन करावे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांची सांख्यिकीय माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण करून उपाययोजना सुचविणे.

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

- केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत माहिती देणे.
- SLAS, NAS पायाभूत चाचणी, संकलित चाचणी १ व २ या परीक्षांबाबत शिक्षकांना येणाऱ्या अडचणी सोडविणे.
- दिव्यांग बालकांच्या साहाय्यभूत सेवा–सुविधांबाबत आढावा घेणे.
- जिल्ह्यातील अध्ययन अक्षमता या दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रमाणीकरण करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे LD सेंटरची स्थापना झाली असून त्या सेंटरचे नोडल अधिकारी म्हणून डायटचे प्राचार्य असतील व ते संनियंत्रण करतील.
- समावेशित शिक्षणअंतर्गत संशोधन हाती घेणे.

❖ **शालेय व्यवस्थापन समितीची भूमिका :**

- शाळा व्यवस्थापन समितीमध्ये दिव्यांग बालकांच्या पालकांना सदस्यत्व देणे.
- शालेय स्तरावर गावपातळीवर होणाऱ्या विविध उपक्रमांत दिव्यांग विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी प्रयत्न करणे.
- दिव्यांग विद्यार्थी शाळेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन आवश्यक कार्यवाही करावी.
- शाळा परिसरात अडथळा विरहित व भेदभाव मुक्त वातावरण निर्मिती करावी.
- शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत नियमितपणे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबींचा आढावा घेणे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण व सेवा–सुविधांबाबत समितीच्या बैठकीत उपस्थित झालेले प्रस्ताव सकारात्मक विचार करून मान्य करावे.

❖❖❖

Com1/E/2024)25) Samveshit Shikashan /Proof -VIII/15-11-2024/T

१६. विशेष शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि सॉफ्ट स्किल्स

प्रस्तावना :

समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत केंद्र स्तरावर विशेष शिक्षकांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सदर कार्यरत विशेष शिक्षक हे विशेष शिक्षणक्षेत्रातील पदविका/पदवीधारक आहेत.

सदर विशेष शिक्षक भारतीय पुनर्वास परिषद (Rehabilitation council of India) नवी दिल्ली यांच्याकडे नोंदणीकृत व्यावसायिक आहेत.

भारतीय पुर्नवास परिषद, नवी दिल्ली यांच्या नोंदणी नियमानुसार प्रत्येक ०५ वर्षाला प्रमाणपत्राचे नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. सदरील नूतनीकरण करण्यासाठी विशेष शिक्षकांनी पाच वर्षांच्या कालावधीत सातत्यपूर्ण पुर्नवसन शिक्षण व प्रशिक्षण (CRE) द्वारे १०० गुण प्राप्त करावे लागतात.

NEP-2020 नुसार प्रत्येक शिक्षकाला एका वर्षात ५० तासांचे प्रशिक्षण बंधनकारक आहे. त्यामुळे विशेष शिक्षणक्षेत्रातील झालेले बदल व नवीन माहिती प्राप्त करून घेण्यासाठी विशेष शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास होणे आवश्यक आहे.

अनुक्रमांक (३) मधील MA (Clinical psychology) ही पदवीत्तर पदवी IGNOU (Indira Gandhi open University) मार्फत दुरस्थ पद्धतीने उपलब्ध आहे.

विशेष शिक्षकांची भूमिका :

समावेशित शिक्षण उपक्रमामध्ये सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभूती देणे व त्यांना शासनाच्या सर्व सोयी-सुविधांचा लाभ देण्यासाठी विशेष शिक्षक यांची भूमिका महत्त्वाची आहे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध घेणे, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करणे व टिकवून ठेवणे यासाठी विशेष शिक्षक यांची महत्त्वाची भूमिका आहे.

सद्य:स्थितीत सर्वसमावेशकता आणि समता व समानता या तत्त्वांचा स्वीकार करण्यात आलेला आहे. यासाठी नवनवीन शिक्षण तंत्रे व पद्धती, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन कौशल्ये यांबाबत समावेशित शिक्षण उपक्रमांमध्ये काम करणारे विशेष शिक्षक यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

CPD (Continuous professional development) म्हणजे काय? :

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासामध्ये विशेष शिक्षकांना प्रभावीपणे सहभाग घेण्यासाठी, प्रोत्साहित करण्यात, व्यावसायिक विकास कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग घेण्यासाठी मदत करते.

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास गरज व महत्त्व :

- विशेष शिक्षकांना सामान्य शैक्षणिक कौशल्यांसह सर्वसमावेशक वातावरणात सर्व प्रवर्गातील व्यवस्थापन करण्याची कौशल्ये आवश्यक आहेत.
- हा एक गुणात्मक अभ्यास आहे, ज्याचा हेतू शिक्षकांना प्रभावीपणे यशस्वी होण्यासाठी आवश्यक ज्ञान कौशल्ये, कृती आणि वृत्ती ओळखणे आहे. सेवांतर्गत प्रशिक्षण, वैयक्तिक आणि सांघिक कार्याचे प्रतिबिंब आणि मूल्यमापन, तसेच प्रारंभिक विशेष शिक्षण प्रशिक्षणातील विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांवर लक्ष केंद्रित करणे, अध्यापनाच्या यशासाठी एक महत्त्वपूर्ण पूर्वशर्त म्हणून प्रतिबिंबित वृत्ती मॉडेल करण्याची तयारी वाढविण्यात मदत करू शकते. म्हणून या अभ्यासाचे परिणाम दर्शवतात.
- शिक्षकांना त्यांची लवचीकता, सहयोगी कार्य आणि प्रभावी संवाद यातील कौशल्ये सुधारण्याची आवश्यकता आहे. यासाठी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास होणे आवश्यक आहे.
- समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत व्यावसायाभिमुख जिल्हा समन्वयक विशेषतज्ञ व विशेष शिक्षक यांच्यासाठी वेळोवेळी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे.
- व्यायामोपचार, वाचा उपचार, व्यावसायिक उपचार व मानसोपचार या तज्ज्ञांच्या माध्यामातून विचार अदानप्रदान करण्यात प्रोत्साहन मिळते.

  (प्राथमिक स्वरूपात पायाभूत कौशल्य शिकून घेणे.)

२१ प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता संसाधन शिक्षक म्हणून काम करताना विशेष शिक्षण संदर्भातील विविध प्रकारचे पर्याय उपलब्ध आहेत.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

विशेष शिक्षकांसाठी व्यावसायिक शिक्षणाची उपलब्धता :

भारतात विशेष शिक्षकांसाठी विविध प्रकारचे अभ्यासक्रम नियमित स्वरूपात उपलब्ध आहेत ते खालीलप्रमाणे :

अ. क्र.	अभ्यासक्रमाचे नाव (Course)	विषय	कालावधी
१)	Diploma in Special Education	VI/HI/MR/DB	२ वर्षे
२)	B.Ed in Special Education	VI/HI/MR	२ वर्षे
३)	M.Ed In Special Education	VI/HI/MR	२ वर्षे
४)	Bachelor In Physiotherapist	Physiotherapist	४.५ वर्षे
५)	Master In Clinical Psychology	Clinical Psychologist	२ वर्षे
६)	Bachelor In Occupational Therapy	Occupational Therapist	४.५ वर्षे
७)	Diploma in Hearing Language and Speech (DHLS)	Speech Therapist	२ वर्षे
८)	Bachelor in Hearing Language and Speech Therapy (BHLS)	Audiologist	४ वर्षे
९)	Diploma In Learning Disability	Learning Disability	२ वर्षे
१०)	Diploma In Cerebral Palsy	Cerebral Palsy	२ वर्षे
११)	Diploma In Autism Spectrum Disorder	ASD	२ वर्षे
१२)	Orientation and Mobility Instructor	VI/DB	२ वर्षे
१३)	Early Intervention	EI	६ महिने
१४)	Diploma in Vocation Training	DVR	२ वर्षे
१५)	DIKSHA App Training	-	
१६)	दूरस्थ course	-	
१७)	Paidable course	-	

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

अन्य कोर्स :

अ. क्र.	अभ्यासक्रमाचे नाव (Course)	विषय	कालावधी
१)	Autism Management Therapy	ASD	१ वर्षे (Online Training)
२)	Psychological Counselling	Counselling	६ महिने (Online/Offline Training)
३)	Sing Language	HI/DB	१ महिने
४)	Braill	VI	१ महिने
५)	Behaviour of Modification	BOM	१ महिने
६)	Attention Deficit and Hyperactive Disorder	ADHD	१ महिने

वरील तक्त्यामधील B.ed Special Education ही दोन वर्षांची पदवीका यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेमार्फत दूरस्थ पद्धतीने उपलब्ध आहे.

वर्ग व्यस्थापन आणि शैक्षणिक कौशल्य यासारख्या विस्तृत विषयांचा समावेश असलेल्या नियमित व्यावसायिक विकासाच्या विपरीत, विशेष शैक्षणिक व्यावसायिक विकास वर्तन व्यवस्थापन तंत्र आणि विशिष्ट शिक्षण अक्षमता समजून घेणे यासारख्या विशिष्ट क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतो.

विशेष शिक्षणासाठी व्यावसायिक विकास :

विशेष शिक्षणासाठी व्यावसायिक विकास म्हणजे विशेषत: विशेष शिक्षकांसाठी डिझाइन केलेल्या लक्षित शिक्षण संधीचा संदर्भ होय. हे कार्यक्रम दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेगळ्या गरजा आणि आव्हाने ओळखतात. या बदल्यात, ते त्यांच्या व्यावसायिक वाढीस समर्थन देण्यासाठी धोरणे आणि संसाधने देतात.

विशेष शिक्षकांनी व्यावसायिक विकासाच्या संधीचा पुरेपुर फायदा करून घेणे आणि विशेष नवीनतम घडामोडींसह अद्ययावत राहणे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी साधने प्राप्त करणे आवश्यक आहे. विशेष शिक्षण हे एक गतीशील क्षेत्र आहे. जे नवीन संशोधन, हस्तक्षेप आणि सर्वोत्तम पद्धतींसह विकसित होत असते.

विशेष शिक्षकांना सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासामुळे होणारे फायदे :

१) दिव्यांगत्वाच्या विविध श्रेणी आणि प्रत्येकाशी संबंधित विशिष्ट आव्हानांची सखोल माहिती मिळते. हे ज्ञान अधिक लक्ष्यित आणि प्रभावी निर्देशात्मक धोरणे विकसित करण्यास सक्षम करते.

२) विशेष शिक्षण व्यावसायिक विकासाचे नेटवर्क, सहयोग आणि समवयस्कांसह अनुभव सामायिक करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करते. इतरांकडून शिकून सतत सुधारणा करण्याच्या सामूहिक संस्कृतीला प्रोत्साहन मिळते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

३) सर्वसमावेशक शिक्षण वातावरण तयार करण्यासाठी व्यावसायिक विकास पुरावा–आधारित पद्धती, संसाधने आणि साधनांसह सुसज्ज करतो. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात प्रवेश मिळण्यास आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या सोयी आणि बदलांची अंमलबजावणी करण्यासाठी हे सामर्थ्य देते.

४) विशेष शिक्षण व्यावसायिक विकास दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुधारित शैक्षणिक परिणामांमध्ये योगदान देते.

विविध प्रकारच्या विशेष शैक्षणिक व्यावसायिक विकासाच्या संधी :

१) वेबिनार आणि ऑनलाइन कार्यशाळा :

आजच्या डिजिटल युगात, वेबिनार आणि ऑनलाइन कार्यशाळा हे विशेष शिक्षण शिक्षकांना व्यावसायिक विकासात गुंतण्यासाठी एक सोयीस्कर आणि प्रवेशजोगी मार्ग आहेत.

या विषयांमध्ये विभेदित सूचना, वर्तन व्यवस्थापन, सहाय्यक तंत्रज्ञान आणि सर्वसमावेशक शिक्षण पद्धती यांचा समावेश असतो. वेबिनारमध्ये तज्ज्ञांकडून अंतर्दृष्टी मिळविण्यास, प्रश्न विचारण्याची आणि वर्गात त्वरित लागू करता येतील अशा व्यावहारिक धोरणांचा शोध घेण्यास मदत होते.

२) व्यावसायिक शिक्षण समुदाय :

व्यवसाय शिक्षण समुदायात सामील होणे विशेष शिक्षकांसाठी खूप मोलाचे आहे. व्यावसायिक शिक्षण समुदाय त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीत सुधारणा करण्यात स्वारस्य असलेल्या समविचारी व्यावसायिकांना एकत्र आणतात. हा समुदाय स्थानिक पातळीवर, प्रसारमाध्यमे (Social Media Platform) किंवा विशेष मंच यांसारख्या प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाइन माहितीचे आदान प्रदान करू शकतात. यामूळे सहयोग, संसाधने आणि कल्पनांची देवाणघेवाण समर्थनासाठी संधी मिळते. या समूहामध्ये राहून अनुभवी शिक्षकांच्या अनुभवाचा उपयोग होतो ज्यामुळे अध्यापन प्रभाविता वाढते.

३) ऑनलाइन अभ्यासक्रम :

लवचीक आणि प्रवेशयोग्य शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या, मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस (MOOCs) द्वारे विशेष व्यावसायिक विकासात क्रांती झाली आहे. Coursera, edX, आणि Future Learn सारख्या प्लॅटफॉर्मवर विशेष शिक्षणाशी संबंधित विषयांचा समावेश असलेले ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

काही कोर्सेसमध्ये प्रमाणपत्र मिळवण्याशी संबंधित खर्च असू शकतो, अनेक प्लॅटफॉर्म विनामूल्य अभ्यासक्रम कोर्सेस उपलब्ध करून देतात. ही लवचीकता विशिष्ट गतीने शिकण्यास, नवीन कौशल्ये आत्मसात करण्यास आणि नवीनतम संशोधन आणि सर्वोत्तम पद्धतींवर अपडेट राहण्यास सक्षम करते.

ऑनलाइन अभ्यासक्रमांमध्ये सहसा संवादात्मक कृती, केसस्टडी आणि चर्चा यांचा समावेश असतो.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

४) शैक्षणिक ब्लॉग आणि पॉडकास्ट :

ब्लॉग आणि पॉडकास्ट हे अनुभवी शिक्षकांकडून अंतर्दृष्टी, टिपा आणि प्रेरणा गोळा करण्यासाठी उत्कृष्ट माध्यम म्हणून काम करतात. अनेक विशेष शिक्षण व्यावसायिक या प्लॅटफॉर्मद्वारे त्यांचे कौशल्य सामायिक करतात. मौल्यवान संसाधने प्रदान करतात जे शिकवण्याच्या पद्धती वाढवू शकतात.

शैक्षणिक ब्लॉग व्यावहारिक धोरणांपासून ते शिकवण्याच्या अनुभवांवरील प्रतिबिंबांपर्यंत भरपूर माहिती देतात. पॉडकास्ट या क्षेत्रातील तज्ज्ञांशी आकर्षक चर्चा आणि मुलाखती देतात, ज्यामुळे तज्ज्ञांच्या संपर्कात राहता येते आणि विचारवंत तज्ज्ञांकडून शिकता येते.

शैक्षणिक ब्लॉग आणि पॉडकास्ट एक्सप्लोर करून, विशेष शिक्षण रिसोर्स टीचर नवीन दृष्टिकोन मिळवू शकतात, नावीन्यपूर्ण कल्पना शोधू शकतात आणि त्यांच्या व्यावसायिक वाढीस समर्थन देण्यासाठी भरपूर संसाधनांमध्ये प्रवेश करू शकतात.

शिक्षण व्यावसायिक विकासाचे क्षेत्र :

विशेष शिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष शिक्षण व्यावसायिक विकास कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहेत. या क्षेत्रांमध्ये साहाय्यक तंत्रज्ञान, डिस्लेक्सिया, एआरडी/आयईपी सपोर्ट, ऑटिझम, वर्तन आणि शिस्त, बहिरे/ऐकणे कठीण, डिस्लेक्सिया, मूल्यांकन आणि बरेच काही समाविष्ट आहे. या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून विविध गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे ज्ञान, कौशल्ये आणि प्रभावीपणे मदत करण्याची क्षमता वाढवू शकतात.

१) साहाय्यक तंत्रज्ञान :

हे साधने, उपकरणे आणि सॉफ्टवेअरचा संदर्भ देते जे दिव्यांग विद्यार्थ्यांना माहिती, संप्रेषण आणि शिकण्यात मदत करतात. सहाय्यक उपकरणे शिकणाऱ्याच्या विशिष्ट शिक्षणातील कमतरता भरून काढण्यासाठी कार्य करतात. विशेष शिक्षण व्यावसायिक विकास तुम्हाला विविध साहाय्यक तंत्रज्ञान पर्यायांबद्दल, त्यांना अभ्यासक्रमात कसे समाकलित करायचे आणि वैयक्तिक विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान कसे सानुकूलित करायचे याबद्दल ज्ञानाने सुसज्ज करते.

हे प्रशिक्षण हे सुनिश्चित करते की रिसोर्स टिचर दिव्यांग विद्यार्थ्यांचा शिकण्याचा अनुभव आणि स्वातंत्र्य वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करू शकतात.

२) IEP : (Indivisualized Education plan)

(वैयक्तिक शिक्षण योजना) हे समावेशित शिक्षणाचे महत्त्वाचे घटक आहेत. विशेष शिक्षण व्यावसायिक विकास कायदेशीर आवश्यकता, मार्गदर्शक तत्त्वे आणि IEPs विकसित आणि अंमलबजावणीसाठी सर्वोत्तम पद्धतींची सखोल माहिती प्रदान करते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याच्या अन्य गरजा पूर्ण करण्यासाठी कुटुंबांना गुंतवून ठेवण्यासाठी, संबंधित डेटा गोळा करण्यासाठी, अर्थपूर्ण उद्दिष्टे सेट करण्यासाठी आणि योग्य राहण्याची सोय आणि बदलांची रचना करण्यासाठी धोरणे समाविष्ट आहेत.

३) ऑटिझम : (Autisum spectrum Disorder)

ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर (ASD) संवाद, वर्तन आणि सामाजिक परस्पर संवादावर परिणाम करते. ऑटिझमवरील विशेष शैक्षणिक व्यावसायिक विकास स्पेक्ट्रमवरील विद्यार्थ्यांसाठी साहाय्यक वातावरण तयार करण्यासाठी पुराव्यावर आधारित धोरणांसह सुसज्ज करतो. विविध शैक्षणिक सेटिंग्जमध्ये ASD असलेल्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी प्रभावी धोरणे आणि हस्तक्षेपांची माहिती मिळते.

या प्रशिक्षणामध्ये संप्रेषण तंत्र, संवेदनात्मक एकीकरण पद्धती, सामाजिक कौशल्य सूचना आणि व्यक्तीच्या सामर्थ्य आणि आव्हानांना अनुरूप वर्तन व्यवस्थापन धोरणे यांचा समावेश होतो.

सॉफ्ट स्किल्स

प्रस्तावना :

आजच्या धकाधकीच्या जीवनात सॉफ्ट स्किल्स प्रत्येकाकडे असणे गरजेचे आहे म्हणून आपण काही सॉफ्ट स्किल्सची ओळख करून घेऊ.

व्याख्या : एखाद्याची स्वतःच्या आणि इतरांच्या भावनांची ओळख समाज, व्यवस्थापन आणि वापर करण्याची क्षमता म्हणजे सॉफ्ट स्किल्स होय.

१) ताणतणाव व्यवस्थापन (Stress Management)

२) वेळेचे व्यवस्थापन (Time Management)

३) नेतृत्व संघटन व व्यवस्थापन (Team building and Leadership)

४) प्रकल्प व्यवस्थापन (Project Management)

५) व्यावसायिक व आर्थिक गुंतवणुकीचे व्यवस्थापन (Professional Finance Management)

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

१) ताणतणाव व्यवस्थापन कौशल्य (Stress Management skill)

प्रस्तावना :

'जीवन ताणाशिवाय जगताच येत नाही, त्यांचे नियंत्रण करता येणे हे एक व्यवस्थापन आहे.'

मानवाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत बालकांपासून वृद्धांपर्यंत जर कोणती गोष्ट त्यांची कायम साथ करीत असेल ती म्हणजे 'ताण' होय. एकविसावे शतक हे मानसिक विकासाचे शतक होण्याची संभाव्यता जाणवते. (WHO)

व्याख्या :

मनातील अनावश्यक व नकारात्मक विचारांच्या गर्दीमुळे मनाची जी स्थिती होते तिला ताण असे म्हणतात.

ताणतणावाची लक्षणे (शारीरिक परिणाम, एम. के. गुप्ता–२००८) :

- छातीत धडधडणे
- एकाग्रतेचा अभाव
- नखे कुरतडणे
- घसा कोरडा होणे
- डोके दुखणे (विचित्र आभास होणे)
- भूक न लागणे
- स्नायूंची कार्यक्षमता कमी होणे
- पचनक्रियेत बिघाड होणे
- येरझाऱ्या मारणे
- पाठ/मान दुखणे.
- उच्च रक्तदाब व मधुमेह
- नेहमीपेक्षा जास्त/कमी जेवणे.
- आत्मविश्वास कमी होणे
- प्रचंड वेगाने मुड स्विंग होणे.
- गोष्टींचा विसर पडणे
- मद्यपान/अंमलीपदार्थांचे जास्त प्रमाणात सेवन करणे.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

- वागणुकीमध्ये बदल होणे
- आवडीच्या गोष्टीमध्ये मन न रमणे.
- कामामध्ये लक्ष विचलित होणे.

ताणाची कारणे :

ताण होण्याची काही सामान्य कारणे पुढीलप्रमाणे :

१) घटस्फोट	२) बेरोजगारी
३) नोकरीमध्ये समस्या	४) पैसे
५) अपत्यांनी घर सोडणे	६) एकटेपणा
७) शारीरिक स्थिती योग्य नसणे	८) आजूबाजूचे वातावरण
९) हिंसा	१०) पती/पत्नीचे निधन
११) वाईट संगत	१२) अंमली पदार्थांचे सेवन
१३) सेक्सशी निगडित समस्या	१४) मद्यपानाची सवय
१५) वाईट सवयी	१६) नकारात्मक दृष्टिकोन

ताणाची कारणे :

१) **कामाचे अधिक तास :** सर्वसाधारणपणे कामाच्या दिवशी जास्तीचे काम करणे.

२) **कार्यस्थळी, कामाच्या ठिकाणी परस्परांशी असणारे संबंध :** सेले यांच्या मतानुसार, लोकांबरोबर राहणे हाच जीवनातील सर्वांत मोठा ताण आहे. कामाच्या ठिकाणी चांगले संबंध असतील, तर ताण जास्त जाणवत नाही त्यामुळे स्वास्थ्य चांगले राहते.

याउलट ताणलेल्या वाईट संबंधांमुळे आपणास सामाजिक पाठिंबा असल्याची जाणीव निर्माण होते.

३) **समूह दबाव :** औपचारिक समूह (सहकारी) व अनौपचारिक (मित्र) समूहाचा दबाव सहकाऱ्यामार्फत झाल्यास ताण निर्माण होतो.

४) **दर्जा व गौरव :** कामाच्या दर्जातील विसंगतीमुळे ताण निर्माण होतो. जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्याच्या कामाचा गौरव केला जात नाही तेव्हासुद्धा त्याच्या मनात ताण निर्माण होण्याची शक्यता नाकारू शकत नाही.

५) **व्यवस्थापकीय ताण (सानेथोफ–१७६४) :** व्यवस्थापक हा एक तंत्रज्ञ असतो. कर्मचारी व वरिष्ठ यांच्यातील दुवा साधण्याचे काम तो करीत असतो पण हे काम किंवा आंतरवैयक्तिक, माहिती, निर्णय विषयक भूमिका त्याला नीट पार पाडता आल्या नाहीत तर कर्मचाऱ्यामध्ये ताण निर्माण होऊ शकतो.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

६) **मानसशास्त्रीय कारणे :** 'जशी दृष्टी तशी सृष्टी' या उक्तीप्रमाणे असे म्हणता येईल की एखाद्या घटनेकडे/व्यक्तीकडे नकारात्मक भावनेने (भीती, राग, द्वेष, मत्सर, काळजी, वैफल्य, चिंता, सूड, चिडणे) पाहिल्यास आपल्या मनावर तसेच परिणाम उमटून ताण निर्माण होतो.

ताणतणाव व्यवस्थापनाची तंत्रे व पद्धती :

१) **सहन होईल तेवढाच ताण घ्या :** 'एक ना धड भाराभर चिंध्या' या उक्तीप्रमाणे अनेक व्यक्ती एका वेळी अनेक कार्यात स्वत:ला गुंतवून घेतात व त्यामुळे एकही काम व्यवस्थित होऊ शकत नाहीत

२) **न्यूनगंडाची भावना असू नये :** मला जमत नाही, मी हे करू शकत नाही अशी आत्मटिका टाळली पाहिजे. असे विचार मनात कोणतेही काम करताना येत असतील तर त्यांचा आत्मविश्वास कमी होऊन त्यांना कोणतेही यश मिळणे अशक्यच. स्वत:ला कमी लेखणाऱ्या माणसाची स्थिती फार असहाय्य असते. सर्व शक्तीचे मूळ या आत्मटिकेमुळे नष्ट होतो.

३) **परिपूर्णतेचा अतिरेक :** सद्य:स्थितीमध्ये परिपूर्णतेचा अतिरेक झालेला दिसत आहे. उदा. मला पैकीच्या पैकी गुण मिळाले तरच योग्य आणि नाही मिळाले तर अयोग्य. कोणतीही व्यक्ती परिपूर्ण नसते याची जाणीव ठेवून परिस्थितीशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

४) **विनोदबुद्धी कायम जागृत ठेवा :** विनोदाने मनावरचा ताण हलका होतो. आयुष्यातील ताणतणावाकडे हसत खेळत पाहण्याची वृत्ती विनोदामुळे निर्माण होते. सर्व तणावाच्या दु:खावर रामबाण उपाय म्हणजे हसणे होय आणि हे केवळ विनोदबुद्धीमुळेच घडू शकते.

५) **व्यायाम व इतर पद्धती :** ताणतणाव व्यवस्थापनामध्ये व्यायामाला फार महत्त्व आहे. व्यायाम फक्त शारीरिक आरोग्यासाठी नाही, तर मानसिक आरोग्यासाठी खूप महत्त्वाची आहे. व्यायामामुळे एडॅर्फिन्स (Endoxphins) नावाचे रसायने तयार होतात. त्यामुळे व्यायाम केल्यानंतर आनंदी वाटते, उत्साही वाटते.

६) **नैसर्गिक सानिध्य :** व्यक्तीचा थकवा व ताणतणाव कमी होऊन उत्साह वाढतो. त्यासाठी थकलेल्या शरीराला उद्याने, जंगल, पर्वत, नदी, बागबगीचे यांच्या सानिध्यात घेऊन जाता तेव्हा त्यांना आराम मिळतो. दिवसातून एकदा तरी मोकळ्या हवेत फिरायला जावे. त्यामुळे थकवा व ताणतणाव दूर होतो. कामाच्या स्वरूपानुसार निसर्गाच्या सान्निध्यात फिरायला जायचे असे नियोजन करावे.

सारांश :

ताणाला 'सायलंट किलर ऑफ मॉडर्न एज' (Silent killer of Modern Age) असे म्हटले जाते. त्यामुळे एकविसाव्या शतकात यशस्वी जीवन जगण्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमता, वेळ, वय इत्यादी लक्षात घेऊन वरील ताणतणाव व्यवस्थापनाच्या तंत्रापैकी जी तंत्रे लागू पडतील अशा तंत्राचा अवलंब करावा.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

उपाय :

१) समस्यांचा क्रम ठरवणे : दैनंदिन समस्यांची गरजेनुसार यादी तयार करणे. त्या यादीमध्ये काठीण्यपातळीवर क्रम लावणे व त्यानुसार समस्या सोडविण्यासाठी नियोजन करणे.

२) आपला टिप्पणीचा मुद्दाच स्वीकार करून सकारात्मक बदल करणे.

३) Negative Inquiry : कसल्याही प्रकारच्या अत्यावश्यक माहितीशिवाय टीकेमुळे सक्रिय न होता, हतबल न होता त्या टिकेला आग्रही प्रतिपादनशीलतेची जोड द्यावी.

४) Workable Compromise : आपला आत्मसन्मान प्रश्नार्थक नसेल त्या परिस्थितीत कामचलाऊ जुळावाजुळव करवून घ्यावी. परंतु एखाद्या गोष्टीचा शेवट आत्मसन्मानाच्या हानामधून होत असेल तर जुळवून घेऊ नका.

५) अशाब्दिक संप्रेषण : आरामशीर बसणे, वेडेवाकडे बसणे, शांतचित्ताने ऐकणे.

६) दैनंदिनी लिहिणे : रोज काय घडले? त्या घडलेल्या घटनेला दैनंदिनीमध्ये लिहिणे.

७) संगीत ऐकणे.

२) वेळेचे व्यवस्थापन (Time Management)

प्रस्तावना :

''प्रत्येकाकडे वेळेचा एक विशिष्ट कोटा असतो, त्याचा योग्य वापर करता येणे, हे एक कौशल्य आहे. त्यानुसार त्याचा सदुपयोग व उपलब्ध संधी याचा योग्य ताळमेळ म्हणजेच वेळेचे व्यवस्थापन.''

वेळेच्या व्यवस्थापनाचे महत्त्व :

वेळ व्यवस्थापन हे एक कौशल्य आहे. जीवनात वेळ व्यवस्थापन शिकणे म्हणजेच क्षमता वृद्धीत रूपांतर करणे.

वेळेच्या व्यवस्थापनाचे फायदे :

- उत्पादन क्षमता वाढते.
- सुधारित निर्णय घेण्याची क्षमता वाढते.
- वृद्धिंगत कार्य, जीवन व संतुलन बाबत व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका ठरते.
- गतीशीलता वाढते.
- स्वतःसाठी अधिक वेळ व वेळेचे महत्त्व समजते.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

वेळ व्यवस्थापन तंत्रे :

१) **प्राधान्यक्रम :** किंमत आणि गरजेनुसार कोणत्याही कामाला प्राधान्य देणे. मोठ्या गोष्टीला आधी प्राधान्य देऊन मग लहान गोष्टीला प्राधान्य द्यावे.

२) **नियम ठरवणे :** एखादे कार्य पूर्ण करण्यासाठी उच्च अधिकार, व्यवस्था व कार्यक्षमता यासारखे नियम ठरविले पाहिजेत.

३) **कार्यामध्ये ब्रेक घ्या :** एकाच ठिकाणी काम करत असताना त्या कामाचा कंटाळा येवू नये म्हणून मध्ये मध्ये त्या कामामध्ये विश्रांती घेऊन त्या कामाची गती पुन्हा वाढविणे.

४) **ध्येय निश्चित करा :** कोणते काम आणि किती करणार हे आधी ठरवा. निश्चित केलेले ध्येय ठरवून वेळेत काम पूर्ण करणे.

३) नेतृत्व संघटन व व्यवस्थापन (Team building and Leadership)

प्रस्तावना :

जेव्हा मनुष्य स्वतःच्या हाताने अथवा बुद्धिने काम करतो तेव्हा कामाची गुणवत्ता संपूर्णपणे नेतृत्व संघटनाच्याकामाच्या दर्जेची ओळख दर्शवते. नेतृत्व हे व्यवस्थापनाच्या अनेक तत्त्वांपैकी एक महत्त्वाचे तत्त्व आहे. कोणत्याही कार्याच्या अमंलबजावणीत नेतृत्वाची अत्यंत गरज असते. नियोजित ध्येयपूर्तीकडे घेऊन जाण्यासाठी आणि कार्याचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज भासते. या अनुषंगाने प्रक्रियामध्ये मार्गदर्शन, नियंत्रण व समन्वय साधून दिव्यांग व्यक्तीचे सर्वांगीण विकासामध्ये नेतृत्व संघटन व व्यवस्थापनाला खूप महत्त्व देते.

नेतृत्वाचे प्रकार/विविध अंगे :

- पदावर आधारित नेतृत्व
- व्यक्तिमत्त्वावर आधारित नेतृत्व
- राजकीय पक्षाचे नेतृत्व
- शासनाचे नेतृत्व
- शिक्षणसंस्थांचे नेतृत्व
- आर्थिक नेतृत्व

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

नेतृत्व आणि व्यवस्थापन यातील फरक :

नेतृत्व :

- नेतृत्व हे मुख्यतः व्यवस्थापनाच्या कार्याचा एक भाग आहे.
- नेतृत्व करणाऱ्याला सांघिक कार्यकरणे, प्रेरणा देणे, प्रेरित करणे, ऐकणे, नातेसंबंध निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित करावे लागतात.
- नेत्याला त्याच्या अनुयायाकडून त्यांचे अधिकार मिळतात.
- नेतृत्व करणाऱ्यास (सकारात्मक) वृत्तीचे पालन करावे लागते.
- नेतृत्व ही एक कला आहे.
- नेतृत्व सक्रिय असते.

व्यवस्थापन :

- व्यवस्थापनात व्यवस्थापक रचना मांडतात आणि अधिकार आणि जबाबदारी सोपवतात.
- व्यवस्थापनामध्ये नियोजन, संघटन, कर्मचारी, दिग्दर्शन आणि नियंत्रण यावर लक्ष केंद्रित केले जाते.
- व्यवस्थापक संस्थेची धोरणे आणि कार्यपद्धती पाळतात.
- व्यवस्थापक अचूक नियोजित, मानक, तार्किक असतात.
- व्यवस्थापन लोकांचे नाव, भूतकाळातील नोंदी, वर्तमान कामगिरी यानुसार मूल्यांकन करते.
- व्यवस्थापन प्रतिक्रियाशील असते.

४) प्रकल्प व्यवस्थापन (Project Management)

प्रकल्पाच्या व्यवस्थापनामध्ये आवश्यकता ओळखणे, स्पष्ट आणि साध्य करण्यायोग्य उद्दिष्टे प्रस्थापित करणे, गुणवत्ता, व्याप्ती, आणि वेळेच्या स्पर्धात्मक मागण्या संतुलित करणे, वैशिष्ट्ये, योजना आणि दृष्टिकोन स्वीकारणे यांचा समावेश होतो.

एखादा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनुभव, ज्ञान, कौशल्ये, साधने आणि तंत्रे कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे वापरण्याची कला आणि विज्ञान याचा वापर केला जातो.

प्रकल्प व्यवस्थापित करण्यात दीर्घकालीन यशासाठी सिद्ध आणि स्थापित प्रकल्प व्यवस्थापन पद्धती आहेत प्रक्रिया आणि अनुकरण करण्यासाठी अनेक यशस्वी प्रकल्प आवश्यक आहेत. म्हणून यशस्वी

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

होण्यासाठी संस्था–व्यापी संसाधन वाटप आवश्यक आहे, जे नेहमीच शक्य नसते. तसेच, कौशल्य नेहमीच स्थानिक पातळीवर उपलब्ध नसतात. परिणामी, प्रकल्प अंमलबजावणीसाठी आभासी संघ सामान्य होत आहेत.

प्रकल्प व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये :

- प्रकल्पाची आवश्यकता ओळखणे.
- स्पष्ट आणि साध्य करण्यायोग्य उद्दिष्टे स्थापित करणे.
- वेळ, व्याप्ती आणि गुणवत्तेच्या मागण्यांचा समतोल साधणे.
- सर्व भागधारकांच्या अपेक्षांशी जुळवून घेणे.

अशा प्रकारे, प्रकल्प व्यवस्थापन हा अंतर्गत प्रकल्पांसाठी संस्थात्मक संरचना आणि संसाधनांच्या मर्यादांमध्ये प्रकल्प उद्दिष्टे पूर्ण करण्याचा एक दृष्टिकोन आहे. बाह्य प्रकल्पांसाठी, राजकीय, सामाजिक, कायदेशीर आणि पर्यावरणीय मर्यादांचा देखील विचार करावा लागेल.

प्रकल्प व्यवस्थापनाची आवश्यकता :

व्यवसाय रणनीती राबविणे हा प्रकल्प व्यवस्थापित करण्याचा वेगवान मार्ग बनत आहे. प्रकल्प व्यवस्थापन पद्धती अवलंबण्याची काही कारणे आहेत.

१) ज्ञान अर्थव्यवस्था

२) मुक्त बाजार तत्त्वज्ञानामुळे वाढलेली स्पर्धा

३) खर्च, वेळ आणि व्याप्तीची मर्यादा (गुणवत्ता)

विद्यार्थी फोकस संसाधन मर्यादा :

एखाद्या संस्थेला अनौपचारिक किंवा औपचारिक प्रकल्प व्यवस्थापन पद्धती आवश्यक आहेत की नाही हे प्रकल्पांचे स्वरूप आणि वारंवारता ठरवते.

खालीलपैकी काही प्रश्न प्रकल्प व्यवस्थापनाची आवश्यकता निश्चित करण्यात मदत करतील.

१) प्रयत्न जटिलता आणि अनिश्चिततेशी संबंधित आहेत का?

२) संस्थेत बदल घडवून आणण्यासाठी बाह्य आणि तांत्रिक वातावरण गतिमान आहेत का?

३) ते वेळ, बजेट, व्याप्ती आणि गुणवत्ता यांसारख्या मर्यादांद्वारे शासित आहे का?

४) तेथे अनेक कार्ये समाविष्ट आहेत?

यापैकी काही किंवा सर्व प्रश्नांना होकारार्थी प्रतिसाद हे ठरवतील की प्रकल्प व्यवस्थापन किती प्रमाणात यशस्वी ठरेल.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/T

५) व्यावसायिक व आर्थिक गुंतवणुकीचे व्यवस्थापन
(Professional Finance Management)

बऱ्याच बँका आणि ब्रोकरेज इंडेक्स किंवा म्युच्युअल फंडांमध्ये स्वयंचलित ठेवी सेट करण्याच्या योजना देतात (जो एक चांगला आर्थिक मार्ग आहे). याशिवाय, तुम्ही ऑनलाइन गुंतवणूक सेवा वापरून किंवा थेट ऑनलाइन ब्रोकर किंवा आर्थिक सल्लागाराकडून वैयक्तिक स्टॉक किंवा बाँड खरेदी करून ऑनलाइन सुरू करू शकता आणि गुंतवणूक करू शकता.

व्यवसाय गुंतवणूक :

गुंतवणूक म्हणजे स्वतःचे किंवा आपल्या व्यवस्थापनाचे जास्तीचे पैसे अधिक उत्पन्न मिळवण्याच्या उद्देशाने बँकेच्या स्वाधीन करणे वा दुसऱ्या व्यक्तीला किंवा कंपनीला त्याच्या उद्योगासाठी देणे. या दुसऱ्या उद्योगाला होणाऱ्या नफ्याचा हिस्सा गुंतवणूकदाराला व्याजाच्या लाभांशाच्या किंवा बोनसच्या रूपात मिळतो.

गुंतवणुकीचा अर्थ :

भविष्यात उत्पन्न किंवा नफा मिळवण्याच्या अपेक्षेने एखाद्या प्रयत्नासाठी पैसे किंवा संसाधने वाटप करण्याची कृती म्हणून गुंतवणूकीची व्याख्या केली जाऊ शकते. यामध्ये तुमची संपत्ती वाढवण्यासाठी आणि तुमची आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे समाविष्ट आहे. जेव्हा तुम्ही गुंतवणूक करता तेव्हा तुम्ही तुमचे पैसे तुमच्यासाठी अशा साधनांमध्ये ठेवता ज्यात मजबूत परतावा मिळवण्याची क्षमता असते. स्टॉक्स, बॉण्ड्स, रिअल इस्टेट किंवा इतर मालमत्ता असोत, गुंतवणुकीत विशेषत: सध्याच्या काळात भविष्यातील फायद्यांच्या अपेक्षेने संसाधनांची बांधिलकी समाविष्ट असते.

विमा योजना :

अक्षय योजना, व्हिजन मनीबँक प्लस योजना, Vision Life Secure योजना, उत्पन्नाची खात्रीशीर योजना, जीवन बचत योजना, मासिक उत्पन्न योजना, व्हिजन एंडोमेंट प्लस योजना, व्हिजन लाइफ इन्कम योजना

बचत योजना :

निश्चित आयुष योजना, खात्रीशीर उत्पन्न प्लस, Secure Plus योजना, निश्चित लाभ योजना, खात्रीशीर बचत योजना, Fixed Maturity Plan (Papular) Guaranteed Milestone Plan, Savings Plan, Assured FlexiSavings Plan, Term Insurance.

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/B/A/T

Salaried Term Plan, DigiShield Plan, Paoorna Suraksha Kawach, Saral Jeevn Bima, Anmol Suraksha Kawach, Retirement Plans.

Retirement Plans :

Guaranteed Annuity Plus, Saral Pension, Nishchit Pension Plan, Critical Illness. Insurance, Critical Illness Insurance, Cancer Shield Plan, CritiShield Plan, Child Plans.

Child Plans

चाइल्डची भविष्यातील खात्रीशीर योजना

युलिप योजना :

वेल्थ स्मार्ट प्लस, पगारदार सुरक्षा, ULIP फॉर्च्यून वेल्थ प्लॅन, प्लॅटिनम गेन योजना, स्मार्ट ग्रोथ योजना, वेल्थ इन्फिनिया, वेल्थ ॲश्युर प्लस, वेल्थ मॅक्स प्लॅन, संपत्ती सुरक्षित योजना, वेल्थ आकांक्षा योजना,

गट विमा :

संरक्षण उपाय, नियोक्ता कर्मचारी, ऐच्छिक, आत्मीयता, क्रेडिट लाइफ, निवृत्ती उपाय, वार्षिकी योजना

ग्रॅच्युइटी :

एनकॅशमेंट सोडा सेवानिवृत्तीनंतर वैद्यकीय लाभ योजना, संरक्षण कर्मचारी योजना, बिझनेस सोल्युशन्स मुदत विमा, युनिट लिंक्ड विमा, बाल विमा, आरोग्य विमा, सेवानिवृत्ती विमा, बचत योजना

पोर्टफोलिओ व्यवस्थापन सेवा :

पेन्शन फंड, विमा, जीवन विमा, आरोग्य विमा, निरोगपणा उपाय.

गुंतवणुकीचे प्रकार : सर्वोत्तम परतावा दरांसह भारतातील लोकप्रिय गुंतवणूक पर्याय

गुंतवणुकीमुळे तुमची संपत्ती कालांतराने लक्षणीय वाढू शकते. तथापि तुमची जोखीम भूक, गुंतवणुकीचे क्षितिज आणि आर्थिक उद्दिष्टे यावर आधारित योग्य गुंतवणूक पर्याय निवडणे महत्त्वाचे आहे. जर तुम्ही भारतात पैसे गुंतवण्याचा सर्वोत्तम मार्ग विचार करत असाल तर भारतातील काही लोकप्रिय गुंतवणूक पर्याय येथे आहेत प्रत्येक जोखीम आणि परताव्याच्या वेगवेगळ्या स्तरांसह.

१) **स्टॉक्स (इक्विटी) :** इक्विटी गुंतवणुकीत कंपनीचे शेअर्स खरेदी करणे समाविष्ट असते. ते दीर्घ कालावधीत उच्च परतावा देऊ शकतात, ते उच्च जोखमीशी देखील संबंधित आहेत. गुंतवणुकीवरील परतावा कंपनीच्या कामगिरीवर बाजारातील परिस्थिती आणि एकूण आर्थिक वातावरणावर अवलंबून असतो.



Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/B/A/T

- जोखीम पातळी : उच्च
- गुंतवणूक मुदत : दीर्घकालीन
- परतावा : बाजारातील कामगिरीवर अवलंबून, परिवर्तनशील.

२) **बाँड्स आणि डिबेंचर्स :** बाँण्ड्स आणि डिबेंचर्स हे कर्ज गुंतवणुकीचे एक प्रकार आहेत जिथे तुम्ही कॉर्पोरेट संस्था किंवा सरकारला नियतकालिक व्याज देयके आणि मुदतपूर्तीच्या वेळी मूळ रक्कम परत करण्याच्या बदल्यात पैसे उधार देतात.

- जोखीम पातळी : कमी ते मध्यम
- गुंतवणूक मुदत : मध्यम ते दीर्घकालीन
- परतावा : मध्यम, निश्चित व्याजदर

३) **म्युच्युअल फंड :** म्युच्युअल फंड विविध गुंतवणूकदारांकडून स्टॉकबाँड किंवा इतर मालमत्ततेच्या वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पैसे गोळा करतात. ते व्यावसायिक निधी व्यवस्थापकांद्वारे व्यवस्थापित केले जातात.

- जोखीम पातळी : फंडाच्या प्रकारानुसार बदलते (इक्विटी उच्च, कर्ज – कमी ते मध्यम)
- गुंतवणुकीची मुदत : बदलते
- परतावा : परिवर्तनशील, फंडाच्या कामगिरीवर अवलंबून

४) **सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF) :** PPF हा भारत सरकारद्वारे प्रदान केलेला दीर्घकालीन गुंतवणूक पर्याय आहे जो आकर्षक व्याजदर आणि परतावा पूर्णपणे करमुक्त आहे.

- जोखीम पातळी : कमी
- गुंतवणूक मुदत : १५ वर्षे
- परतावा : मध्यम, निश्चित व्याजदर

५) **मुदत ठेवी (FDS) :** एफडी बँकांद्वारे पुरविल्या जातात आणि ते खात्रीशीर परतावा देणारे सर्वात सुरक्षित गुंतवणूक पर्यायांपैकी एक आहेत.

- जोखीम पातळी कमी
- गुंतवणूक मुदत : बदलते (दिवसांपासून ते १० वर्षांपर्यंत)
- परतावा : मध्यम, निश्चित व्याजदर

Runa Graphics : Com1/E/2024)25) Samveshit Shikashan/open files/Proof -VIII/15-11-2024/B/A/T

६) **रिअल इस्टेट :** रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करताना भांडवल वाढीसाठी किंवा भाड्याच्या उत्पन्नासाठी मालमत्ता खरेदी करणे समाविष्ट आहे.

- जोखीम पातळी : मध्यम ते उच्च
- गुंतवणूक टर्म : दीर्घकालीन
- परतावा : मालमत्ता मूल्य आणि स्थान यावर अवलंबून परिवर्तनीय.

७) **सोने :** सोने हा भारतातील गुंतवणुकीचा पारंपारिक प्रकार आहे, जो आर्थिक मंदीच्या काळात स्थिरतेसाठी ओळखला जातो.

- जोखीम पातळी : मध्यम
- गुंतवणूक मुदत : बदलते
- परतावा : चल, सोन्याच्या किंमतीवर आधारित

८) **राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS) :** NPS ही सरकार प्रायोजित पेन्शन योजना आहे. हे इक्विटी, कॉर्पोरेट बॉंड्स आणि सरकारी सिक्युरिटीज यांसारख्या विविध मालमत्ता वर्गामध्ये गुंतवणूक करते.

- जोखीम पातळी : मध्यम
- गुंतवणुकीची मुदत : निवृत्तीचे वय होईपर्यंत
